साहित्य आणि संस्कृति मंडळ
महाराष्ट्र राज्य

तिरुवळ्ळुवर्
विरचित

तिरुक्कुरळ

(मराठी अनुवाद)

अनुवादक : पुरूषोत्तम दिनकर जोशी

तिरुवळ्ळुवर्

विरचित

तिरुक्कुरळ

(मराठी अनुवाद)

अनुक्रमणिका

भाषांतर माला क्र. ६९

तिरुवळ्ळुवर्
विरचित

तिरुक्कुरळ

(मराठी अनुवाद)

: अनुवाद :

पुरुषोत्तम दिनकर जोशी

महाराष्ट्र राज्य साहित्य -संस्कृति मंडळ मुंबई

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती – १९७७ (शके १८९९)

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई ४०००३२

© महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ

मुद्रक :
शं. ना. अंघृटकर
महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,
गोखले पथ,
पुणे ४११००४

किंमत रु. ११-५०

अनुक्रमणिका

निवेदन

आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी इत्यादी क्षेत्रांत त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य यावे हा उद्देश लक्षात घेऊन साहित्य-संस्कृती मंडळाने वाङ्मयनिर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. मराठी विश्वकोश, मराठी भाषेचा महाकोश, मराठी वाङ्ममयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला, आंतरभारती विश्वभारती, महाराष्ट्रेतिहास इत्यादी योजना मंडळाच्या या कार्यक्रमात अंतर्भूत केल्या आहेत.

२. मराठी भाषेला विद्यापीठीय भाषेचे प्रगत स्वरूप व दर्जा देण्याकरिता मराठीत विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तंत्रविज्ञान या विषयांवरील संशोधनात्मक व अद्यावत माहितीने युक्त अशा ग्रंथांची रचना मोठ्या प्रमाणावर होण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या प्रसाराने मराठी भाषेचा विकास होईल ही गोष्ट तर निर्विवादच आहे. पण मराठी भाषेचा विकास होण्यास आणखीही एक साधन आहे आणि ते साधन म्हणजे मराठी भाषेत निर्माण होणारे उत्कृष्ट वाङ्मय हे होय. जीवनाच्या भाषेतच ज्ञान व संस्कृती यांचे अधिष्ठान तयार व्हावे लागते. जोपर्यंन्त माणसे परकीय भाषेच्याच आश्रयाने शिक्षण घेतात, कामे करतात व विचार व्यक्त करतात, तोपर्यंत शिक्षण सकस बनत नाही, संशोधनाला परावंलबित्व राहाते व विचाराला अस्सलपणा येत नाही, एवढेच नव्हे तर वेगाने वाढणाऱ्या ज्ञानविज्ञानापासून सर्वसामान्य माणसे वंचित राहतात.

३. संस्कृत व अन्य भारतीय भाषातील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटिन इत्यादी पश्चिमी भाषातील अभिजात ग्रंथांचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हा मंडळाच्या भाषांतरमालेचा उद्देश आहे.

४. भाषांतर योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्याना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्त्य व भारतीय भाषांतील सुमारे ३०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, ईस्किलस, ॲरिस्टोफेनीस, युरायपिडिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, थॉमस ॲक्वायनस, न्यूटन, डार्विन, रूसो, कान्ट, हेगल, जॉन स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपीअर, टॉलस्टॉय, दोस्तएव्स्की, कॅसिरेर, गॉर्डन व्ही. चाईल्ड इत्यादिकांचा भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भरताचे नाट्यशास्त्र, संगीत रत्नाकर, ध्वन्यालोक, प्राकृतातील गाथासप्तशती, त्रिपीटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही भाषांतरमालेत समावेश केला आहे.

५. भाषांतरयोजनेखाली मंडळाने आतापर्यंत ५१ अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टुअर्ट मिलचे "On Liberty", रूसोचे "Social Contract", एम. एन. रॉयचे "Reason, Romanticism and Revolution" व "Letters from Jail", स्तानिस्लाव्स्कीचे "An Actor prepares" व "Building a Character", तुर्गिनेव्हचे "Fathers and Sons", रायशेनबाखचे "Rise of Scientific Philosophy", गन्नर मिर्दालचे "Economic Theory and Underdeveloped Regions", कै. पां. वा. काणे यांचे "History of Dharmashastra", कोपलँडचे "Music and Imagination", बर्न्ट्रांड रसेलचे "Religion and Science", तेरझागीचे "Theoretical Soil Mechanics", विशाखादत्तचे "मुद्राराक्षसम्",

अनुक्रमणिका

भरतमुनींचे "भरतनाट्यशास्त्र" (अध्याय ६ व ७ आणि अध्याय १८ व १९), निकोलाय मनुचीचे "Storia do Mogor", ए. सी. पिगुलिखित "Socialism Vs. Capitalism", इझाडोरा ढंकनचे "My life", स्ट्रॅविन्स्कीचे "Poetics of Music" इत्यादी ग्रंथांची भाषांतरे मंडळाने प्रकाशित केली आहेत.

६. दक्षिण भारतातील सर्वांत जुनी तमीळ भाषा. ह्या भाषेत अत्यंत मौलिक व सर्वमान्य आद्यग्रंथांपैकी संत तिरुवळ्ळुवर् यांचा "तिरुक्कुरळ" हा ग्रंथ निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ पद्यग्रंथ आहे. सदर ग्रंथाचा अनुवाद करून मंडळाने तो प्रकाशित करावा अशी सूचना मद्रास येथील श्री. पु. दि. जोशी यांनी केली आणि मंडळाच्या विनंतीवरून सदर काव्यग्रंथाचा उत्कृष्ट अनुवादही त्यांनीच केला आहे. प्राचीन व प्रमुख अशा या तमीळ पद्यग्रंथाचे तितकेच आटोपशीर भाषांतर प्रस्तुत करून अनुवादकाने मोठीच कामगिरी बजावली आहे. इतर भारतीय भाषांतील आद्य-काव्यांकडे पाहिल्यास बहुधा इतिहास, पुराणांवर आधारलेली अशीच ती काव्ये आढळतात. पण दक्षिण भारतातील या फार प्राचीन भाषेमधील प्रस्तुत संकीर्ण पद्ये असलेल्या या काव्यात 'धर्म', 'अर्थ' व 'काम' या तीनही जीवनअंगांचे सुबोध निवेदन केलेले आहे. भाषांतरकार, श्री. जोशी हे सदर काव्याचे केवळ भाषांतर करून थांबले नाहीत; तर मराठी वाचकांसाठी त्यांनी संबंधित ठिकाणी तत्सम प्रसिद्ध संस्कृत काव्यपंक्तीही मुबलक उद्धृत केल्या आहेत. भारतीय संस्कृतीची एकात्मता लक्षात येण्यास त्यांचा चांगला उपयोग होतो. मंडळाच्या भाषांतरमालेत सदर काव्याचा प्रस्तुत अनुवाद प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ

मुंबई, ४०० ०३२
आषाढ, शके १८९९
२७ जून, १९७७
(आषाढी एकादशी)

अनुक्रमणिका

ति रु क्कु र ळ

प्रस्तावना

प्रस्तुत अनुवादित ग्रंथ “तिरुक्कुरळ” व त्याचे कर्ते संत तिरुवळ्ळुवर् यांचा परिचय करून घेण्यापूर्वी प्राचीन तमिळ साहित्याचा थोडक्यात परिचय करून घेणे अवश्य आहे.

तमिळ ही जगातील अत्यंत प्राचीन भाषांपैकी एक असून ती अजूनही प्रचलित आहे. तिचा विकास व विस्तार अद्यापही सर्वत्र होत आहे. त्या भाषेत विविध विषयांवर ग्रंथनिर्मिती होत आहे, व या विविध विषयक साहित्याचा वाचकवर्ग वाढत आहे. केवळ वाचनालयांवर व ग्रंथालयांवर अवलंबून न राहता, त्या भाषेतील नियतकालिके व पुस्तके विकत घेऊन वाचण्याची सवय तमिळ वाचकास आहे. म्हणूनच त्या भाषेतील नियतकालिकांचा आणि ग्रंथांचा खप इतर कित्येक भारतीय भाषांतील ग्रंथांपेक्षा अधिक होतो. याच कारणाने ग्रंथ व नियतकालिके स्वस्त दराने देणे प्रकाशकास परवडते. भाषा संपन्न करणे हे जसे लेखकांचे कर्तव्य आहे, तसेच लेखकांना उत्तेजन देण्यासाठी वाचकांनी त्यांचे साहित्य विकत घेऊन वाचले पाहिजे, हे उघड आहे.

दक्षिण भारतातील भाषा द्राविडी गटाच्या आहेत. त्यातील तमिळ ही प्राचीनतम असून, तिच्यानंतर तेलुगु, कन्नड व मल्याळम् या भाषा याच कालानुक्रमाने विकसित झाल्या. तमिळ भाषेत संस्कृत भाषेतील “ळ” या उच्चाराचा एक वर्ण आहे, तसाच आणखी एक “ळ” असून त्याचा उच्चार “ळ” आणि “ष” यांच्या मध्यंतरात होतो. असे सांगतात की, या विशिष्ट “ळ” चा उच्चार कठीण वाटल्यामुळे या भाषेसच उत्तरेकडील पंडितांनी “द्रविड” (म्हणजे कठीण) अशी संज्ञा दिली. “तमिळ” शब्दातील “ळ” हाच विशिष्ट “ळ” आहे. तमिळ या शब्दाचा मूळ अर्थ मधुर असा आहे. प्रत्येकाला आपापली माता जशी सुंदर व प्रेमळ वाटते तशीच प्रत्येकास आपापली मातृभाषा मधुर वाटते हे खरे आहे. पण हा अर्थ केवळ रोचनार्थ नसून त्या अर्थाने तो शब्द त्या साहित्यात वापरलेला आढळतो.

तमिळ भाषिकांची वस्ती असलेला तमिळनाडू याची सीमा उत्तरेस तिरुपतीपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत व पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत अशी प्राचीन ग्रंथात आढळते. पश्चिम समुद्राच्या काठी सध्या प्रचलित असलेली मल्याळम् ही भाषा तमिळमधूनच निघालेली आहे.

वाल्मीकिरामायणात म्हटल्याप्रमाणे महर्षी अगस्ति हे उत्तर भारतातून विंध्याद्री ओलांडून (रामायणपूर्व काली) दक्षिणेत येणारे पहिले वैदिक ऋषी. या अगस्ति महर्षीनीच तमिळ भाषेतील पहिला व्याकरणग्रंथ लिहिला. त्याचे नाव “अगत्तियम्” तो त्यांनी “ऐन्द्र” या नावाच्या संस्कृत व्याकरणग्रंथाच्या धर्तीवर रचिला, अशी आख्यायिका आहे. अगत्तियम् हा प्राचीनतम व्याकरणग्रंथ सध्या उपलब्ध नाही. अगस्ति ऋषींचे १२ शिष्य होते. त्यांपैकी एक “तोल्काप्पियर्” याने रचिलेला “तोल्काप्पियम्” हा ग्रंथ आज उपलब्ध असलेल्या तमिळ ग्रंथांत प्राचीनतम आहे, असे म्हणतात. या ग्रंथात ध्वनी व शब्द यांची शास्त्रीय चर्चा केली आहे. याचा रचनाकाळ इ. स. पूर्व ५ वे शतक मानतात. तोल्काप्पियर्चे गुरू अगस्ति यांनी लिहिलेले व्याकरण अर्थात् त्यापेक्षाही प्राचीन असले पाहिजे. कोणत्याही भाषेत शास्त्रीय व्याकरणग्रंथाची गरज भासू लागून ते रचिण्यापूर्वी ती भाषा दीर्घकाळपर्यंत चांगली समृद्ध झालेली असून

अनुक्रमणिका

तिच्यात बरीच ग्रंथनिर्मिती झाली असली पाहिजे, हे उघड आहे. यावरून आपण तमिळ भाषेच्या प्राचीनपणाची कल्पना केली पाहिजे.

प्राचीन काळी तमिळ भाषेतील विद्वानांची एक विद्वत्सभा असे. तिला "संघम्" अशी संज्ञा आहे. या संघास भरपूर राजाश्रय असे. पहिल्या संघाचा काळ इ. स. पूर्व १००० ते ६०० असा मानतात. या संघाचे एकूण ५४९ सदस्य होते, व संघकाळात ८९ पांड्य राजे होऊन गेले. संघाची मान्यता मिळालेल्या ग्रंथकारांची संख्या ४४४९ इतकी होती. या प्रथम संघाचे उद्घाटक महर्षी अगस्ति असून, प्रत्यक्ष भगवान शंकर हे सदस्यांपैकी एक होते. अशीही आख्यायिका आहे. अगस्ति ऋषींची गणना दुसऱ्या संघाच्या सदस्यातही केली जाते. या संघाचे केंद्रस्थान दक्षिण मदुरा येथे होते. हे नगर व त्यातील सर्व ग्रंथसंपदा समुद्रात गडप झाली.

दुसऱ्या संघाचा काळ इ. स. पूर्व ५०० ते ३०० असा मानतात. त्याचे ५९ सदस्य होते. त्यांनी मान्यता दिलेल्या ग्रंथकारांची संख्या ३६०० असून, या काळात एकूण ५९ राजे होऊन गेले. या संघाचे केंद्र कपाटपुरम् येथे होते. या नगराचा उल्लेख वाल्मीकिरामायणात (४-४१-१९) आहे. हे नगर व तेथील ग्रंथसंपत्ती यांचाही ग्रास समुद्राने केला.

तृतीय संघाचा काळ इ. स. पूर्व २०० ते इ. स. २०० असा मानतात. या संघाचे केंद्रस्थान उत्तर मदुरा होते. हेच अर्वाचीन मदुरा शहर. या संघाचे ४९ सदस्य होते व त्यांनी ४४९ ग्रंथकारांस मान्यता दिली. या काळात राज्य करणाऱ्या राजांची संख्याही ४९ होती. तिरुक्कुरळचा कर्ता संत तिरुवळ्ळुवर् हा या तिसऱ्या संघकाळातील विद्वान कवी होता.

एकामागून एक होऊन गेलेल्या या तीन तमिळ संघांचे काळ अलीकडील विद्वानांनी बऱ्याच संशोधनांती मान्य केले आहेत. प्राचीन परंपरेप्रमाणे पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या संघांचे काळ अनुक्रमे इ. स. पूर्व ४४००, ३७८० व १८५० असे मानीत.

आपल्या ग्रंथास प्रतिष्ठा मिळविण्यासाठी कवीला आपला ग्रंथ संघास सादर करावा लागे. अन्य भाषीय व अन्य प्रांतांतील रहिवासी विद्वानही त्या काळी तमिळ प्रांतात येत आणि येथील संस्कृतीचा व कलाकौशल्याचा परिचय करून घेत. उलटपक्षी तमिळ प्रांतातील विद्वानही अन्य प्रांतात जात व तेथील संस्कृतीशी आणि विद्वानांशी आपला परिचय करून घेत. अशी ही देवाणघेवाण प्राचीन काळी कदाचित फारशी होत नसेल. पण उत्तरोत्तर ती वाढत्या प्रमाणात होऊ लागली. विद्वत्तेप्रमाणे कलाकौशल्याची व कलाकारांचीही देवाणघेवाण होऊ लागली. दक्षिणेतील शिल्पकृतीत उत्तरेकडील कलाकारांचाही वाटा आहे. पाच तमिळ महाकाव्यांपैकी एक "मणिमेखलै" यात उत्तरेकडील कलाकारांचे साहाय्य एक राजमंडप उभारण्याच्या कामी घेतल्याचे वर्णन आहे.

मगद विनैअरुम्, मराट्टरक्कम्मरुम्,
अवन्तिक्कोल्लरुम्, यवनतच्चरुम्,
तण् तमिळ विनैअर्, तम्मोडु कूडि......

अनुक्रमणिका

मगध देशातील जवाहिऱ्ये, महाराष्ट्रातील सोनार, अवन्तीचे लोहार व यवन देशातील सुतार, या कामासाठी आले होते, असा याचा अर्थ आहे. या भेटी प्रतिभेटी चालू झाल्यानंतर एकमेकांच्या भाषेवर, साहित्यावर, कलेवर, एकमेकांचा परिणाम होऊ लागणे स्वाभाविक आहे. व्यापाराच्या निमित्ताने तमिळ व्यापारी द्वीपांतरी जाऊ लागले. मालाच्या आयातनिर्याती प्रमाणे अन्य क्षेत्रांतही आयातनिर्यात होऊ लागली. तिरुक्कुरळमधील कामखंडात नायक समुद्रतीरी (व कदाचित द्वीपांतरी) युद्धासाठी गेल्याचा उल्लेख आहे. संत वळ्ळुवर् यांचा अनेक परदेशी प्रवाशांशी व येथून परदेशात जाऊन आलेल्या प्रवाशांशी चांगला परिचय होता, अशी वर्णने आहेत. एलेळसिंगम् (सागरी सिंह) या नावाच्या एका नौकानयनी वीराशी त्यांची चांगली मैत्री होती, अशी आख्यायिका आहे.

संस्कृत भाषेच्या नागरी लिपीतील अनेक वर्ण तमिळ लिपीत नाहीत. तथापि ही लिपी मूळ ब्राह्मी लिपीपासूनच निघाली असे विद्वानांचे मत आहे. संस्कृत भाषेतील काही शब्द, विशेषतः विशेषनामे, तमिळमध्ये लिहिण्याची गरज कालांतराने निर्माण झाली. तेव्हा तमिळ लिपीत काही अक्षरांची भर पडली, व त्यांना "ग्रंथ" अक्षरे म्हणू लागले. ज, ष, स, ह, क्ष, ही ती अक्षरे होत. ही अक्षरे मूळ तमिळ लिपीत नाहीत.

प्राचीन तमिळ भाषेत संस्कृत शब्द सापडत नाहीत. प्रस्तुत तिरुक्कुरळमध्येही ते मोजकेच सापडतात. याचा उल्लेख पुढे येईल. मूळ तमिळ भाषेचे शब्दभांडार इतके विपुल व समृद्ध आहे की, त्याला तोड नाही. कालांतराने विचारविनिमय होऊ लागल्यावर संस्कृत भाषेतही काही तमिळ शब्द समाविष्ट झाले. उदाहरणार्थ, फलम् हा शब्द मूळ वैदिक भाषेत नाही पण तमिळमध्ये "पळम्" आहे. पूजा शब्द वैदिक नाही. प्राचीन काळी देवतेला तृप्त करण्यासाठी अग्नीत आहुती किंवा बलि देण्याची प्रथा होती. तमिळ प्रांतात देवतेपुढे फुले ठेवण्याची पद्धत होती. "पू-शेय" (शेय = करणे, म्हणून फुलांसंबंधी कृती) या शब्दावरून तमिळमध्ये "पूशै" असा शब्द रूढ झाला. संस्कृतमधील पूजा हा शब्द त्यावरून निघाला असे काही विद्वानांचे मत आहे.

तिरुवळ्ळुवर् या कवीने (सिंहिणीच्या एकाच छाव्याप्रमाणे) एकच काव्य लिहिले. वास्तविक पाहता तिरुवळ्ळुवर् हे कवीचे नावच नाही, व त्याने आपल्या ग्रंथास तिरुक्कुरळ असे (वा अन्य कोणतेही) नाव दिले नाही. "तिरु" हे उपपद. मांगल्यदर्शक श्रीकारासारखे आहे. वळ्ळुवन् ही एक अस्पृश्य जात आहे. (वळ्ळुवन् या नावाचे वळ्ळुवर् हे सन्मानार्थी बहुवचन) म्हणून हा कवी अनामिक आहे. त्याचप्रमाणे त्याचा एकमेव ग्रंथ हाही अनामिकच आहे. ग्रंथाची रचना ज्या छंदात (कुरळ्वेण्बा) केली आहे, त्याचे बोधक कुरळ् हे नाव असून त्यामागे तिरु हे उपपद लागले आहे. याचा विचार पुढे करू. प्रसिद्धिपराङ्मुखता हे या कवीचे ब्रीद दिसते, व ते परंपरागत असावे असे वाटते. प्राचीनतम उपलब्ध तमिळ (व्याकरणाचा) ग्रंथ तोल्काप्पियम् याचा कर्ता तोल्काप्पियर् यांचे उदाहरणही तसेच आहे. तोल्काप्यन् म्हणजे कपी गोत्रातील एक वृद्ध नेता. (काप्यर् हे सन्मानार्थी बहुवचन) त्याने रचिलेला ग्रंथ तो तोल्काप्यम् (काप्यमचा संबंध काव्याशी नसून कपी गोत्राशी आहे.) याच न्यायाने वळ्ळुवन् जातीच्या एका गृहस्थाने रचिलेला विशिष्ट छंदातील ग्रंथ म्हणजे तिरुवळ्ळुवर्चे तिरुक्कुरळ.

तोल्काप्पियम् ग्रंथावरून त्या काळापर्यंत प्रचलित असलेल्या तमिळ साहित्याची व त्या देशातील समाजपद्धती, लोकाचार, इत्यादी गोष्टींची कल्पना करावी लागते. प्राचीन तमिळ साहित्याची विभागणी दोन प्रमुख भागांत करतात. (१) "अहम्" म्हणजे आध्यात्मिक (संस्कृत प्रथम पुरुषी अहम् या सर्वनामाशी याचा काही संबंध नाही) आणि (२) "पुरम्" म्हणजे व्यावहारिक. अहम्मध्ये अध्यात्म, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र

अनुक्रमणिका

इत्यादी विषय येतात, तर पुरम् मध्ये इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र इत्यादी विषय येतात. त्यात ऐतिहासिक व पौराणिक व्यक्तींची चरित्रेही येऊ शकतात.

वर उल्लेखिल्याप्रमाणे तिरुक्कुरळ या ग्रंथाचा समावेश तृतीय संघकालीन साहित्यात होतो. या काळात बौद्ध व जैन धर्मास बरेच महत्त्व आले होते. अनेक सत्ताधारी पुरुष व विद्वान यांनी या धर्माचा अंगीकार केला होता. बौद्ध व जैन तत्त्वज्ञानांनी प्रभावित झालेले पुष्कळ तमिळ साहित्य आज उपलब्ध आहे. तिरुवळ्ळुवर् हे वास्तविक कोणत्याच एका धर्माचे वा पंथाचे नव्हते. तथापि ते जैन वा बौद्ध संप्रदायातील होते, असा दावा त्या दोघा सांप्रदायिकांनी केला आहे. (इतकेच नव्हे तर, ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी या कवीला इ. स. च्या आठव्या शतकापर्यंत अलीकडे खेचले असू ख्रिस्ती उपाध्यायांच्या सान्निध्यात आल्यानंतर कवीने आपला ग्रंथ रचिला असेही ते म्हणतात.) बौद्ध व जैन तत्त्वज्ञानाच्या खंडणार्थ शैव व वैष्णव पंथांचा आणि भक्तिमार्गाचा उदय झाला. दक्षिणेतील शैव पंथ हा वैदिक नसून पाशुपत तत्त्वज्ञानाच्या प्रभावाने तो वाढला. शैव संप्रदायात ६३ प्रमुख शिवभक्त होऊन गेले. त्यांना "नायन्मार्" [अनेक शिवमंदिरातून प्रदक्षिणेच्या वाटेवर या लहान लहान ६३ मूर्ती ठेवलेल्या आढळतात.] अशी संज्ञा आहे. तिरुवाचकम् या सुप्रसिद्ध तमिळ ग्रंथाचा कर्ता माणिकवाचकर् हा शैवसंप्रदायी होता. वैष्णव पंथात प्रमुख असे १२ विष्णुभक्त होऊन गेले. त्यांना "आळ्वार्" असे म्हणतात. यातच श्रीक्षेत्र श्रीरंगम् येथील "आण्डाळ" या भक्तिणीचा अंतर्भाव होतो. तिचे मूळ नाव गोदा. तिने श्रीरंगनाथाला आपला पती मानले होते. स्वतः तिने गुंफून आपल्या गळ्यात घातलेल्या पुष्पमाला रंगनाथ मूर्तीच्या गळ्यात दिसू लागल्या. आपल्या आयुष्याच्या अंती ती रंगनाथाच्या मूर्तीत विलीन झाली.

वैष्णवपंथीय आण्डाळ्कृत ३० श्लोकांचे एक स्तोत्र "तिरुप्पावै" या नावाचे आहे. त्याचप्रमाणे शैवपंथीय माणिकवाचकर् यांच्या तिरुवाचकम् या ग्रंथातील २० निवडक श्लोकांचे स्तोत्र वेगळे काढले आसून (हे वेण्बा छंदात आहे.) त्याला "तिरुवेण्बावै" असे नाव दिले आहे. या दोन्ही स्तोत्रांचे पठण घरोघरी, निदान मंदिरांतून, प्रतिवर्षी मार्गशीर्ष महिन्यात प्रातःकाळी करावे, असा आदेश कांचीकामकोटी पीठाच्या श्रीमच्छंकराचार्यांनी काही वर्षांपूर्वी दिला असून, तो मोठ्या प्रमाणावर पाळला जातो.

याच संदर्भात आणखी एका विख्यात भक्तिणीचा उल्लेख येथे करणे योग्य होईल. ही म्हणजे प्रख्यात संत तमिळ कवयित्री 'औव्वैयार्' (आजीबाई) या नावाने विख्यात आहे. तिने रचलेली अनेक नीतिवचने शिक्षणसंस्थांतील क्रमिक पुस्तकात घातली असून विद्यार्थ्यांस ती तोंडपाठ करावी लागतात. अपसमजामुळे औव्वैयार्चा संबंध तिरुवळ्ळुवर यांच्याशी जोडला जातो. ती बहीणभावंडे होती असा हा अपसमज आहे. औव्वैयार् ही तिरुवळ्ळुवर यांच्यानंतर अनेक शतकांनी झाली.

संघकाळ व त्यानंतरचा भक्तिकाळ यांच्या संधिकाळात म्हणजे इ. स. च्या दुसऱ्या शतकात संत तिरुवळ्ळुवर् व त्यांचे एकुलते ग्रंथापत्य तिरुक्कुरळ यांचे अवतार झाले. हा ग्रंथ इतका लोकप्रिय झाला, व अजूनही तो इतका लोकप्रिय आहे, की त्यानंतरच्या तमिळ साहित्यावर त्याचा प्रभाव फार मोठ्या प्रमाणात पडला आहे. तिरुवाचकम् व तिरुक्कुरळ हे तमिळ साहित्याचे आत्मा व देह आहेत, असा उल्लेख अनेक विद्वानांनी केला आहे. इतकेच नव्हे, तर तिरुक्कुरळ म्हणजे 'तमिळ वेदम्' असा मान त्या ग्रंथास दिला जातो. अशीही एक आख्यायिका प्रचलित आहे, की प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने मानवी अवतार घेऊन हा ग्रंथ रचिला. एका पाण्ड्य राजाने असे लिहून ठेविले आहे की, ब्रह्मदेवाने तिरुवळ्ळुवर्चे रूप धारण करून धर्म, अर्थ व काम या पुरुषार्थाचे सत्य स्वरूप या ग्रंथात प्रकट केले आहे. म्हणून माझे कान, मन, मुख व शिर यांच्या

द्वारा त्या ग्रंथाचे श्रवण, मनन, स्तवन व वंदन करून मी त्याचा सन्मान करतो. प्राचीन काळी वेदान्त शास्त्रात (१) दशोपनिषदे (२) भगवद्गीता व (३) ब्रह्मसूत्र अशी प्रस्थानत्रयी प्रसिद्ध आहे. तसेच तमिळ साहित्यात तिरुक्कुरळ व तिरुवाचकम् हे ग्रंथ प्रमाणभूत आहेत.

तिरुवळ्ळुवर् यांनी या ग्रंथाची रचना तीन खंडांत केली आहे. धर्म (अरम्) अर्थ (पोरुळ्) व काम (इन्बम्) अशी नावे त्या खंडांस देण्यात आली आहेत. या खंडांचे अनुक्रमे ४, ७ व २ असे भाग करण्यात आले असून, खंडांतील अध्यायांची (अदिकारम्) संख्या ३८, ७० व २५ अशी आहे. प्रत्येक अध्यायात १० श्लोक असून एकूण श्लोकसंख्या अर्थातच १३३० आहे. प्रत्येक अध्यायास अंतर्गत विषयानुरूप स्वतंत्र मथळा दिला आहे. अशा प्रकारे या काव्यग्रंथाची रचना अगदी प्रमाणबद्ध व नीटनेटकी आहे. प्रत्येक श्लोक आपापल्या परीने अगदी स्वतंत्र असून त्यात स्वतंत्र विचार (एखाद्या प्रसंगी तोच विचार वेगळ्या दृष्टिकोनातून) मांडला आहे. ग्रंथ विस्तृत असल्यामुळे काही पुनरुक्तीचा दोष अपरिहार्यपणे जाणवतो.

वैदिक व संस्कृत वाङ्मयातील सूत्रग्रंथांचे स्मरण हा ग्रंथ वाचीत असताना झाल्यावाचून राहात नाही. मोजक्या शब्दांत, छंदाचे बंधन पाळून, पुष्कळ अर्थ सांगण्याचे कौशल्य या ग्रंथात पदोपदी येते. मात्र सूत्रग्रंथ म्हणून त्यात नीरसता मुळीच नाही. कित्येक श्लोकांत एखादी उपमा वा दृष्टांत असतो, व तो मोठा सूचक आणि अर्थपूर्ण असतो.

या ग्रंथाची रचना होईपर्यंत तमिळ साहित्यात वृत्तरचनेस प्रारंभ झाला नव्हता. प्राचीन तमिळ साहित्यात चारच छंद असत. त्यांपैकी “वेण्बा” या प्राचीन छंदाचा उपयोग या काव्यात केला आहे. या छंदाचे ४ चरण असतात. संत वळ्ळुवर् यांनी अंतिम चरणाचा अर्धा भाग छाटून तो थोडा थोटा केला आहे. म्हणून “कुरळ्वेण्बा” असे त्या छंदास नाव पडले: “कुरळ्” या शब्दाचा अर्थच मुळी लघू, छोटा, असा आहे. म्हणूनच कुरळ्वेण्बा छंदात रचिलेल्या या काव्याचे नाव “कुरळ्” असे प्रचलित झाले. अनामिक कवीने आपल्या काव्याचेही नामकरण न करता ते अनामिक ठेवले. कवीचा हा विनय त्याच्या प्रसिद्धिपराङ्मुखतेचा द्योतक आहे.

वैदिक छंदातील अनुष्टुप हा छंद चार चरणांचा आहे, तर गायत्री छंदाचे तीनच चरण (त्रिपदा गायत्री) असतात. मराठीतील ओवी छंद अनुष्टुपापासून झाला असून त्याचे चार चरण व चारी चरणांत बहुधा समान अक्षरे असतात. पण संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी रचिलेली ओवी पाहिली, तर तिचा चौथा चरण लघू (कुरळ्?) असतो. या चरणात बहुधा चारच अक्षरे असून क्वचित एकादे दुसरे अक्षर अधिक असते. म्हणून “ओवी ज्ञानेशाची” साडेतीन चरणांची असते, असे आपणास म्हणता येईल. मूळ वेण्बा हा छंद तमिळ छंदात सर्वांत कमी अक्षरांचा आहे. कवीने त्याच्या चौथ्या चरणावर थोडी शस्त्रक्रिया करून त्याचे सौंदर्य वाढविले आहे, असे म्हणण्यास चिंता नाही.

कवीने या छंदात पुष्कळ यमकेही साधली आहेत. पहिल्या व दुसऱ्या चरणाच्या आरंभी, पहिल्या व तिसऱ्या चरणाच्या आरंभी, पहिल्या चरणाच्या आरंभी व दुसऱ्या चरणाच्या शेवटी, दुसऱ्या चरणाच्या शेवटी व तिसऱ्याच्या आरंभी, असे यमकांचे विविध प्रकार या काव्यात दिसतात.

संघकाळात अशी प्रथा होती, की एखाद्या कवीने चांगला ग्रंथ लिहून पूर्ण केला, म्हणजे तो आपला ग्रंथ घेऊन संघाच्या केंद्रस्थानी येई. तेथे संघाच्या उपस्थित सदस्यांपुढे तो ग्रंथ संघाची मान्यता

मिळविण्यासाठी सादर करण्यात येई. तत्कालीन तृतीय संघाकडून आपल्या ग्रंथास मान्यता प्राप्त करून घेण्यासाठी संत तिरुवळ्ळुवर् हे मदुरा येथे आले. मदुरा येथील मीनाक्षी-मंदिरात पुष्करिणीच्या काठी एक आसन असे. त्याला "संगप्पलहै" (संघपीठ) असे नाव होते. हे आसन हिऱ्यांनी अलंकृत असून ते भगवान शंकराकडून मिळाले होते, अशी परंपरागत आख्यायिका आहे. संघाचे उपस्थित असलेले सदस्य या पीठावर बसून आपला निर्णय देत. तिरुवळ्ळुवर् हे अस्पृश्य असल्याने पीठाजवळ जाण्यासही त्यांना प्रतिबंध करण्यात आला. म्हणून ४७ सदस्यांसमवेत त्यांचा ग्रंथ तेवढा पीठावर ठेवण्यात आला आणि (आख्यायिकेप्रमाणे) काय आश्चर्य! ते सर्व पीठ वरील सदस्यांसह पुष्करिणीत प्रवेश करते झाले व तिरुक्कुरळ ग्रंथ मात्र पाण्यावर तरंगत राहिला! प्रत्यक्ष भगवान शंकरांनीच या, ग्रंथास मान्यता दिली असल्याचे घोषित करण्यात आले.

धर्म, अर्थ व काम असे या ग्रंथाचे तीन खंड पाहिल्यानंतर चार पारंपरिक पुरुषार्थांची आठवण झाल्यावाचून राहात नाही. या इतक्या उत्तम ग्रंथात मोक्ष या चौथ्या व अंतिम पुरुषार्थाचा समावेश कसा नाही, याचे आश्चर्य वाटू लागते. अनेक टीकाकारांनी यासंबंधी चर्चा केली आहे. चटकन् सुचण्यासारखे उत्तर असे की, या तीन पुरुषार्थांचे (त्याच अनुक्रमाने केले पाहिजे असा आग्रह न धरता) साधन केले की, चौथा आपोआप साध्य झाला पाहिजे. काही टीकाकारांच्या मते मोक्ष हा अवर्णनीय आहे. त्याचे वर्णन इतका मोठा कवी झाला तरी कसे करणार? काहींच्या मते धर्म या पहिल्या खंडाचे पहिले चार अध्याय (ईशस्तुती, पर्जन्य-महिमा, यति-महिमा व धर्माचे सामर्थ्य) विचारात घेतले, तर त्यात मोक्ष हा अध्याहृतच आहे. या ग्रंथातील उलट्या अनुक्रमाने, म्हणजे प्रथम काम (इंद्रियसुखाची इच्छा असा संकुचित अर्थ न घेता, नुसती इच्छा वा वासना असा अर्थ घेऊन) नंतर अर्थ व धर्म, अशी तीन साधने अवलंबिली, म्हणजे मोक्ष हा आपोआपच साध्य झाला पाहिजे. अन्य तीन पुरुषार्थ या मोक्षसाधनरूपी मंदिराच्या पायऱ्याच म्हणाव्या. महाभारतात व्यास महर्षींनी

ऊर्ध्वबाहुर्विरोम्येष न च कश्चिच्छृणोति मे।
धर्मादर्थश्व कामश्व स धर्मः किं न सेव्यते।।

(मभा १८·५·६२)

या श्लोकात अर्थ व काम हे धर्मामुळेच साध्य होतात. असे मी हात वर करून ओरडून सांगत असताही लोक धर्माची सेवा का करीत नाहीत? असा साश्चर्य व सरोष प्रश्न केला आहे. येथेही मोक्षाचा उल्लेख अध्याहृतच नाही का?

येथे काम या शब्दानी थोडी चिकित्सा करणे अवश्य आहे. कुरळ्मधील तिसऱ्या खंडाचा वर्ण्यविषय काम हा स्त्री-पुरुषामधील प्रणय व चेष्टा या अर्थानेच वापरला आहे. पण या खंडातील सर्व श्लोक वाचल्यानंतर वाचकाच्या सहजच ध्यानी येईल, की हा काम म्हणजे भगवद्गीतेत (७-११) भगवान श्रीकृष्णांनी स्वतःचे रूप म्हणून वर्णन केलेला "धर्माऽविरुद्ध काम" आहे. या कामखंडात श्रृंगाररस भरपूर आहे. कित्येक वेळी तर (श्लो. ११०८, १२३९) तो उतू चालला आहे, असे वाटते. पण अश्लीलता अशी शब्दांतच काय, पण कल्पनेतही शोधून सापडणार नाही!

एकदा प्रणयी युगुलाचे परस्परांवरील गूढ प्रेम, अल्पकाळपर्यंत किंवा एकदाच झालेले त्यांचे मीलन, त्यानंतर प्रियकर युद्धासाठी परदेशी गेल्यामुळे झालेला परस्परांचा विरह, त्याची व्यथा, लोकांत

उठलेले प्रवाद, पूर्वी झालेल्या मीलनाच्या मधुर स्मृती, पुनर्मीलनाची उत्सुकता, प्रियकराच्या प्रेमासंबंधी प्रेयसीच्या मनाची दोलायमान स्थिती, त्या मीलनापूर्वी कृतककलह करण्याचा प्रेयसीचा बेत, पण उत्कट प्रेमाने आपला डाव साधून तो बेत हाणून पाडणे, दीर्घकालानंतर झालेले पुनर्मीलन, "विरह, कलह आणि मीलन" या तिन्ही घटनांची पुनरावृत्ती व्हावी अशी प्रियकराने केलेली इच्छा, असे वर्णन करून हे खंड कवीने मनोहारित्वाने रंगविले आहे. यातील प्रेम हे उनाड नसून त्याची परिणती विवाहात होणार असल्याची (पातिव्रत्याचा उल्लेख करून) ग्वाही कवीने दिली आहे.

ख्रिस्ती धर्माच्या उपाध्यायांनी या ग्रंथाचा प्रथम अभ्यास केला, व पुढे भाषांतरेही केली. तेव्हा त्यांनी हा खंड वगळला होता. पण नंतर जेव्हा त्यांच्या ध्यानी आले, की कामदेवाचे व त्याच्या पराक्रमाचे इतके विस्तृत वर्णन करूनही त्यात नैतिकदृष्ट्या आक्षेपार्ह असे काही नाही, तेव्हा त्यांनी त्याही खंडाचा अभ्यास करून त्याचे भाषांतर आपापल्या ग्रंथातून समाविष्ट केले.

तिरुक्कुरळ हे प्राचीन सूत्ररूप तमिळ काव्य असल्याने त्याला प्रथमतःच अनेक टीकाकार लाभले. या मध्ययुगीन टीकाकारांत प्रथम स्थान परिमेळगर् यांचे आहे. त्यानंतर माणक्कुडवर्, कलिंगर् इत्यादी टीकाकार झाले. अनेक प्राचीन व अर्वाचीन टीकाकारांनी हा ग्रंथ हाताळला असून आश्चर्याची गोष्ट अशी की, त्याच्या संहितेत पाठभेद मुळीच नाहीत. त्यामुळे टीकाकारांना पाठभेदांवर टीका करण्याचे सौख्य लाभले नाही. त्यांना मूळ एकाच संहितेवर टीका-टिप्पणी कराव्या लागल्या. ग्रंथाची भाषा प्राचीन असल्याने ग्रंथातून विविध अर्थ काढण्याची संधी मात्र टीकाकारांना मिळाली. ग्रंथाचा अर्थ लावण्याच्या कामी आधुनिक वाचकास टीकाकारांचे साहाय्य अवश्य घ्यावे लागते. मद्रास शहरातील सरकारी बसगाड्यांच्या आतल्या बाजूस, सारथी व प्रवासी यांना दिसेल अशा रीतीने, एक एक कुरळ (श्लोक) रंगविलेले असते. तो श्लोक वाचून समजून त्यांचा अर्थ सांगणारे प्रवासी मात्र विरळा!

ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी त्या धर्माचे प्रचारक भारतात आले, तेव्हा देशाच्या त्या त्या भागात प्रचलित असलेल्या भाषांचा अभ्यास करून लोकप्रियता संपादन करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यानंतर येथील ग्रंथांची भाषांतरे त्यांनी आपापल्या भाषांत केली. अशा प्रकारे भारतीय भाषेतून पाश्चात्त्य भाषेत भाषांतरित झालेला पहिला ग्रंथ म्हणजे तिरुक्कुरळ असे विद्वानांचे मत आहे. याचे पहिले भाषांतर इ. स. १७९४ पूर्वी इंग्रजीत झाले. लॅटिन, फ्रेंच, जर्मन, याही पाश्चात्त्य भाषांतून या ग्रंथाची भाषांतरे झाली. भारतीय भाषेत पहिला अनुवाद होण्याचे भाग्य तेलुगु भाषेस १८८७ मध्ये लाभले. कन्नड, मल्याळम्, हिंदी, संस्कृत, उर्दू, या भाषांतूनही त्याची भाषांतरे झाली आहेत. पण पाश्चात्त्य भाषांत झालेल्या अनुवादापेक्षा त्यांची संख्या कमीच!

इंग्रजी अनुवादात प्रख्यात तमिळ पंडित रेव्ह. जी. यू. पोप यांनी केलेला अनुवाद छंदोबद्ध असून तो उत्कृष्ट आहे, व म्हणूनच प्रमाणभूत मानला जातो. अगदी अलीकडे कै. बालसुब्रह्मण्यम् यांनीही केलेला छंदोबद्ध अनुवाद उत्तम वठला असून त्यांनी लिहिलेल्या आपल्या विस्तृत टिपणांतून इंग्रजी व अन्य भाषांतील अनेक काव्ये व ग्रंथ यांतील साम्यस्थळे उद्‌धृत केली आहेत.

ग्रंथाच्या पहिल्या खंडास धर्म (अरम्) असे नाव असून त्याचे ३८ अध्याय (अदिकारम्) आहेत. संस्कृत भाषेत धर्म हा शब्द त्या व्यापक अर्थांनी वापरला जातो, ते सर्व अर्थ या अरम् शब्दाने व्यक्त होतात, असे अनुक्रमणिकेवर दृष्टिक्षेप केल्यास दिसून येईल.

अनुक्रमणिका

दुसरा खंड अर्थ (पोरुळ्) हा शब्दही संस्कृत भाषेतील अर्थ या शब्दाच्या विविध अर्थांस सामावून घेऊन वापरला आहे. कौटिलीय अर्थशास्त्रासारख्या एतद्विषयक ग्रंथातून जे विषय येतात ते सर्व या खंडात येतात. राज्यशासन, प्रजापालन, युद्धशास्त्र, करवसुली, राष्ट्राचे उत्पन्न व व्यय, मंत्री व अधिकारी यांची निवड, स्वतः सत्ताधारी (काही अध्यायातून राजा या अर्थाचे वेगवेगळे शब्द वापरून, केवळ वंशपरंपरेने राजपद प्राप्त झालेला, इतका संकुचित अर्थ व्यक्त न करता सत्ताधारी व्यक्ती असा अर्थ या विविध शब्दांतून विद्वान टीकाकारांनी काढला आहे.) व्यक्तीच्या अंगचे स्वाभाविक व अवश्य संपादनीय गुण त्याची विविध कर्तव्ये, इत्यादी विषयांचा विस्तृत ऊहापोह केला आहे. या खंडाची अनुक्रमणिका पाहता असे दिसून येईल की, यात अवश्य म्हणून वर्णिलेले सद्‌गुण केवळ सत्ताधाऱ्यांसाठी नसून, सामान्य नागरिकांस व त्यांच्या नेत्यांसही ते तितकेच अवश्य आहेत.

तिसऱ्या कामखंडाविषयी पूर्वीच विवेचन केले आहे.

संत वळ्ळुवर् हे पक्के आस्तिक होते यात संदेहच नाही. ईशस्तुतिपर पहिल्या अध्यायाच्या पहिल्या श्लोकात आदिभगवान हे जगाचे मूळ कारण असल्याचे त्यांनी सांगितलेच आहे. ते भक्तिमार्गी होते. कारण ईश्वरभक्तीची थोरवी त्यांनी मार्मिकपणे वर्णिली आहे. पण ते सगुण भक्ती मानणारे होते, असे दिसत नाही. यज्ञकर्माची आवश्यकता त्यांनी उत्तमप्रकारे वर्णिली आहे. "अवि" (हवि) हा शब्द त्यांनी या संदर्भात (श्लो. ४१३) वापरला आहे. चंद्राला ग्रहण लागते ते त्याचा ग्रास सर्पाने (राहूने नव्हे) केल्यामुळे लागते (११४६) असे ते म्हणतात.

त्यांनी या काव्यात उल्लेखिलेली शस्त्रे व हत्यारे म्हणजे भाला, खड्‌ग, धनुष्यबाण (बंदूक अर्थात्‌च नाही) नांगर, ओली माती कापण्याची कुंभाराची सुरी, कानस, करवत, ऐरण ही होत. कावळा (हीन अर्थाने नव्हे, तर आतिथ्यशील व सहभोजनाची सवय असलेला म्हणून सन्मानपूर्वक) मोर, बगळा, हंस, या पक्ष्यांचा उल्लेख या काव्यात असून, हत्ती, वाघ, सिंह, बैल, गाय, रेडा, मेंढा, कोल्हा, ससा, याक, या पशूंची नावे त्यात आली आहेत. सर्प, नक, मासा, हेही आहेत. सैनिक, शेतकरी, लोहार, सोनार, कुंभार, पारधी, हे व्यावसायिक यात सापडतात. वरी, मोहरी, गुंज, ताड, वड, गोखरू या धान्य-वृक्ष-वनस्पती यात समाविष्ट आहेत. भाताची पेज व मीठ हे अन्नपदार्थ यात दिसतात. रथ, नौका, पालखी, घोडा ही वाहने आहेत.

वर एकदा सांगितलेच आहे, की प्राचीन तमिळ भाषा ही संस्कृतपासून अगदी अलिप्त आहे. संस्कृत भाषेचा वास येणारे, आदिभगवन् अवि (हवी, आहुती) तवम् (तप) असे थोडे शब्द या काव्यात आढळतात. तमिळ भाषा ही प्राचीन काळीही चांगली समृद्ध असल्याने, एकाच अर्थाचे अनेक शब्द (प्रसंगानुरूप विविध अर्थच्छटा दर्शविणारे किंवा नुसतेच) या काव्यात सापडतात.

संत तिरुवळ्ळुवर् यांचा जन्म वळ्ळुवन् या अस्पृश्य जमातीत झाला असल्याचे मागे सांगितलेच आहे. त्याचे खरे नाव माहीत नाही, मग मातापित्याची कोठून असणार? काव्याच्या पहिल्या श्लोकात "आदिभगवन्" असा सामासिक शब्द आला आहे, त्यावरून त्यांच्या मातेचे नाव आदि व पित्याचे भगवान असावे, अशी एक आख्यायिका आहे. दुसऱ्या एका आख्यायिकेप्रमाणे ब्राह्मण पुरुष व चांडाल स्त्री यांपासून त्यांची उत्पत्ती झाली. पण या सर्व दंतकथाच आहेत. त्यांना ऐतिहासिक आधार असा काही नाही. अधिकृत माहिती एवढीच की, सध्याच्या मद्रास शहराचा एक भाग मैलापूर (मयिलापुरम् = मयूरनगरी) तेथील ते

अनुक्रमणिका

रहिवासी होते. वळ्ळुवर् यांचा स्वतःचा व्यवसाय कोष्ट्याचा होता. त्यांच्या पत्नीचे नाव वासुकी होते. (पतीचे नाव अज्ञात असूनही पत्नीचे नाव कसे सापडते हे गूढच आहे) तमिळ भाषेतील स्त्री-पुरुषांची नावे मराठी भाषिकांस चमत्कारिक वाटतात. वासुकी हे जसे स्त्रीचे नाव, तसेच वसंता हेही! वासुकी ही उत्तम गृहिणी व पतिव्रता होती. कित्येक वेळी पतीने नादिष्टपणाने दिलेल्या आज्ञाही ती निःशंकपणे पार पाडीत असे.

एकदा भर दुपारी हातमागाचा एक भाग खाली पडला. तो शोधण्यासाठी पतीच्या आज्ञेवरून पत्नीने ताबडतोब दिवा लावून आणला! वासुकी ही एकद पोहऱ्याने विहिरीतून पाणी काढीत असता, पतीची हाक ऐकून तशीच धावत आली व विहिरीतून पाण्याने भरलेला आणि वर येत असलेला पोहरा ती परत येईपर्यंत अधान्तरी लोंबकळत राहिला. पातिव्रत्याच्या प्रभावाने गुरुत्वाकर्षणाचा निसर्गनियम धाव्यावर बसविला! तमिळ प्रांतातील परंपरेप्रमाणे रात्रभर पाण्यात ठेवलेला शिळा भात खाण्यासाठी पतिराज सकाळी बसले असता, भात फार ऊन असल्याची तक्रार त्यांनी केली. ही पतिव्रता हाती पंखा घेऊन धावत आली, आणि नो थंड शिळा भात निववविण्यासाठी वारा घालू लागली!

लग्न होऊन सासरी आल्यानंतर पहिल्या दिवसापासून जेवण्याच्या वेळी भोजनपात्राजवळ एक स्वच्छ पाण्याने भरलेले भांडे व एक सुई ठेवण्याची आज्ञा पतिराजांनी आपल्या अर्धांगीस दिली होती. किंचित्ही चिकित्सा न करता दीर्घकाळपर्यंत तिने ती आज्ञा तंतोतंत पाळली होती. ती मुत्युशय्येवर असताना, अनेक वर्षे मनात दाबून ठेवलेली शंका तिने आपल्या पतिराजास विचारली, आणि तिचे समाधानकारक निराकरण झाल्यानंतर या पतिव्रतेचे प्राण तिच्या देहास सोडून गेले! जेवताना भाताचे एखादे शीत पानाबाहेर सांडले तर ते व्यर्थ जाऊ नये म्हणून सुईच्या अग्राने उचलून, स्वच्छ पाण्याच्या भांड्यात धरून धुतल्यानंतर पानात घ्यावे, असा त्या गूढ कृतीचा अर्थ असल्याचे या संत पतीने आपल्या पत्नीस सांगितले.

तिरुक्कुरळसारखे एकुलते ग्रंथापत्य प्रसविणारा तिरुवळ्ळुवर् हा जसा महाकवी होता, तसाच अखिल विश्वास पदोपदी उपयोगी पडतील असे नीतिपाठ देणारा तो थोर ऋषी होता. उच्च नीतितत्त्वांनी हा ग्रंथ ठेचून भरलेला असला, तरी ग्रंथकाराचे पाय पृथ्वीवर घट्ट रोवले असून, तो केवळ आकाशाकडे न पाहता जमिनीवर पाहून चालतो. या ग्रंथात त्याने केलेला उपदेश अत्यंत व्यावहारिक स्वरूपाचा आहे.

हा ग्रंथ अनेक रत्नांची खाण आहे. त्यातील काही रत्ने शीतल सौम्य तेजाने सुखवीत असतील, तर काही रत्नांच्या प्रखर तेजाने आपले डोळे दिपतील. पण सर्व रत्नेच! त्यात गारगोट्यांची भर किंवा भेसळ नाही! प्रत्येक कुरळ किंवा श्लोक हे एक सुंदर सुभाषित आहे. संतवाणी असल्याने ग्रंथाचे मूल्य व सौंदर्य स्वतःसिद्ध आहे. वक्ता व श्रोता या थाटात यातील उपदेश नसून, महाकवीने मनातल्या मनात चिंतन करून काढलेल्या उद्गारांचा प्रत्यय प्रत्येक श्लोक वाचताना येतो.

एकाच रंगाच्या विविध छटांनी युक्त अशी १०-१० पुष्पे निवडून त्याच्या उपमाला (पदर) मालाकाराने बनविल्या. अशा १३३ उपमाला (पदर) मोठ्या कौशल्याने गुंफून कवीने ही बृहन्माला जनतेच्या चरणी अर्पण केली आहे. जनताजनार्दन या पूजनाने संतुष्ट झाला आहे. ही तुष्टी चिरंतन आहे.

अनुक्रमणिका

या संत कवीने योजिलेली भाषा त्या काळी सोपी व प्रासादिक असली, तरी आज जवळजवळ दोन सहस्त्र वर्षांनंतर ती तमिळ भाषिकांसही चांगलीच दुर्बोध आहे. ग्रंथाचा अर्थ लावताना अनेक टीकाकारांनी मतभिन्नता दर्शविली आहे. ग्रंथाचा मराठी अनुवाद करताना अनेक भाषांतरांचे साहाय्य मी घेतले आहे. तथापि मूळ ग्रंथाचा आशय शक्य तोवर जसाच्या तसा ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी केला आहे. संतवाणीची प्रासादिकता अनुवादात कशी उतरणार? म्हणून या अनुवादात अनेक त्रुटी असतील याची जाणीव मला आहे. वाचकांना भाषांतरात जे दोष दिसतील ते माझे आहेत, आणि जे काही चांगले त्यांना गवसेल, ते मूळ संत कवीचे व मला साहाय्यभूत होणाऱ्या टीकाकारांचे आहे, असे वाचकांनी कृपा करून समजावे.

हा दिव्य ग्रंथ योगायोगाने वाचनात आल्यानंतर त्यातील काही निवडक श्लोकांचे भाषांतर मी हौसेने केले, व ते "प्रसाद" मासिकाच्या डिसेंबर १९७२ च्या अंकात प्रसिद्ध झाले. प्रसादच्या संपादकांनी मजवर हा मोठा अनुग्रह केला, यासाठी मी त्यांचा ऋणी आहे. ते भाषांतर माझ्या काही मित्रांच्या वाचनात आले व काहीजणांना मी ते दाखविले. या सर्व मित्रमंडळींनी समग्र ग्रंथाचे भाषांतर करण्याची प्रेरणा मला दिली, प्रेमळ आग्रह केला, म्हणूनच हे सत्कार्य तडीस जात आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाने ही संतवाणी महाराष्ट्रशारदेच्या कंठात घालण्याच्या योग्यतेची आहे, असे ठरवून तिचा स्वीकार प्रकाशनासाठी करण्याचे मान्य केले, म्हणून मी मंडळाचा ऋणी आहे. मंडळाच्या सन्मान्य व (ज्ञान+तपो+वयो-) वृद्ध अध्यक्षांच्या हाती ही माला मी विनयपूर्वक देत आहे, आणि त्यांनी ती महाराष्ट्रशारदेच्या कंठी घालावी, अशी प्रार्थना त्यांना करीत आहे.

भारतीय स्वातंत्र्यदिन }
१५ ऑगस्ट १९७५ }

पु. दि. जोशी

अनुक्रमणिका

साम्यस्थळांसंबंधी थोडेसे

तिरुक्कुरळच्या प्रथम वाचनाच्या वेळीच, पहिला श्लोक वाचला, तेव्हा त्यातील कल्पनेशी सदृश अशी कल्पना भगवद्गीतेतील “अक्षराणामकारोऽस्मि” या श्लोकपादात असल्याचे सहजच आढळून आले. त्यानंतर श्लोकांचे मराठी भाषांतर करू लागलो, तेव्हा काही संस्कृत सुभाषिते मनात येऊ लागली. भारताच्या भिन्न भागांतील, भिन्न भाषा बोलणारे महात्मे चिंतन व उपदेश करू लागले, म्हणजे त्यांच्या मनात जे विचारतरंग उठत असतील, व त्यांना शब्दरूप मिळाले असेल, त्यात असे साम्य असणे अगदी साहजिक आहे, असे वाटू लागले.

आपल्या घरापासून दूर असलेल्या एखाद्या उद्यानात भटकत असता एखाद्या सुंदर व सुवासिक फुलावर आपली दृष्टी खिळावी, व आपण त्याच्या सौंदर्याचे व सुवासाचे कौतुक करू लागावे, आणि असे करताना एखादे वेळी आपल्या मनात सहजच यावे की, “असे फूल आपल्या घराच्या आवारातही आहे की!” हा विचार थोडा मौजेचा व कौतुकाचा असतो. कुरळमधील काही श्लोकांचा अनुवाद करताना माझ्या मनाची अशीच स्थिती झाली. अनुवाद पूर्ण झाल्यानंतर मनाला एक छंदच लागला, की अशी साम्यस्थळे मला जशी आवडली, तशी ती विद्वान वाचक बंधुभगिनींसही आवडतील व तशी ती आपण शोधून काढून वाचकांपुढे ठेवावी.

यातील काही साम्यस्थळे आश्चर्य वाटण्याइतकी समान आहेत. काहीत आशयाचे तर काहीत उपमा, दृष्टांतांचे साम्य आहे, असे वाचकांस आढळून येईल. काही ठिकाणी हे साम्य बरेच दूरान्वित वाटेल. तथापि माझ्या दृष्टीने बहुतेक सर्व स्थळे सुंदर असल्याने ती कुरळच्या वाचकांस सादर करीत आहे. माझ्यासारख्या सामान्य वाचकास ही जी स्थळे आढळली, त्यापेक्षा कितीतरी अधिक वचने व्यासंगी विद्वानांस सापडतील, यात शंका नाही. पण हीही काही थोडी नव्हेत!

धर्म, अर्थ व काम असे तिरुक्कुरळचे तीन खंड आहेत. संस्कृत साहित्यात भर्तृहरीची नीती, वैराग्य व शृंगार अशी तीन शतके प्रसिद्ध आहेत, पण ही साम्यस्थळे निवडताना मी प्राचीन साहित्याचा शोध घेतला आहे. कारण कुरळ ग्रंथाची रचना इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात झाली असल्याचे विद्वानांचे मत आहे. भगवद्गीता, दशोपनिषदांपैकी काही उपनिषदे, महाभारत, रामायण, योगवासिष्ठ, मनुस्मृती, भागवत, कौटिलीय अर्थशास्त्र, चाणक्यसूत्रे, या ग्रंथांतील ही स्थळे आहेत, व त्यांचे संदर्भ प्रत्येक ठिकाणी दिले आहेत. ही साम्यस्थळे पाहून माझ्या मनात मौज व कौतुक या भावना जशा उमटल्या, तशाच वाचकांच्या मनातही उमटतील, असे मला वाटते.

साहित्य-संस्कृति मंडळाने या साम्यस्थळांचा समावेश अनुवादात करण्यास संमती दिली, यास्तव मी मंडळाचा ऋणी आहे.

पु. दि. जोशी

अनुक्रमणिका

तिरुक्कुरळ

खंड पहिला - धर्म

अनुक्रमणिका

प्रस्तावना ७

साम्यस्थळांसंबंधी थोडेसे १७

खंड पहिला २४

¬धर्म २४

भाग १ - प्रस्तावना २५

अध्याय १—ईशस्तुती २५

अध्याय २¬पर्जन्य-महिमा २६

अध्याय ३—यति-महिमा २७

अध्याय ४—धर्माचे सामर्थ्य २८

भाग २ — गृहस्थ-धर्म ३०

अध्याय ५—गृहस्थ-जीवन ३०

अध्याय ६—सहधर्मिणीचे गुण ३१

अध्याय ७—संततीचा लाभ ३२

अध्याय ८—स्नेह-संपदा ३३

अध्याय ९—आतिथ्य ३४

अध्याय १०—मधुर भाषण ३५

अध्याय ११ — कृतज्ञता ३६

अध्याय १२ — निःपक्षपात ३८

अध्याय १३ — आत्मसंयमन ३९

अध्याय १४ — सदाचरण ४०

अध्याय १५ — अव्यभिचार ४१

अध्याय १६ — सहनशीलता ४२

अध्याय १७ — मत्सर ४४

अध्याय १८ — निर्लोभिता ४४

अध्याय १९ — निंदा ४६

अध्याय २०—व्यर्थ प्रलाप ४७

अध्याय २१ — पापभीरुता ४८

अध्याय २२ — कर्तव्यनिष्ठा ४८

अध्याय २३ — दान ५०

अध्याय २४—कीर्ती ५१

भाग ३—संन्यास-धर्म ५३

अध्याय २५ — दयाळूपणा ५३

अध्याय २६ — मांसाहार ५४

अध्याय २७ — तपश्चर्या ५५

अध्याय २८ — दंभाचरण ५६

अध्याय २९ — अस्तेय ५७

अध्याय ३० —सत्यवचन ५८

अध्याय ३१ — अक्रोध ५९

अध्याय ३२ — पर-पीडा ६०

अध्याय ३३ — अहिंसा ६२

अध्याय ३४–अनित्यत्व ६३

अध्याय ३५ — संन्यास ६४

अध्याय ३६ — तत्त्वबोध ६५

अध्याय ३७ — अनासक्ती ६६

भाग ४ — दैव ६९

अध्याय ३८ — दैव ६९

खंड दुसरा –अर्थ ७१

भाग १ — राज्य ७२

अध्याय ३९ — राजाचे गुण ७२
अध्याय ४० — विद्याध्ययन ७३
अध्याय ४१ — विद्याराहित्य ७४
अध्याय ४२ — श्रवण ७५
अध्याय ४३ — बुद्धिमत्ता ७५
अध्याय ४४ — दोषनिर्मूलन ७७
अध्याय ४५ — थोरांचे साहाय्य ७८
अध्याय ४६ — कुसंगतीचा त्याग ७९
अध्याय ४७ — विवेकपूर्वक कर्म ८०
अध्याय ४८ — शक्ति-मापन ८१
अध्याय ४९ — योग्य संधीचा लाभ ८२
अध्याय ५०—स्थान-माहात्म्य ८३
अध्याय ५१ — विचारपूर्वक निवड ८४
अध्याय ५२ — विश्वासार्ह अधिकारी ८५
अध्याय ५३—बंधुजनांचे पोषण ८७
अध्याय ५४—सावधानता ८८
अध्याय ५५ — न्याय्य शासन ८९
अध्याय ५६—दुष्ट शासन ९०
अध्याय ५७—क्रूर शासन ९१
अध्याय ५८—दयादृष्टी ९२
अध्याय ५९—गुप्तचर ९३
अध्याय ६० — उत्साह ९४
अध्याय ६१ — अनालस्य ९५
अध्याय ६२ — दीर्घोद्योग ९६
अध्याय ६३ — विपत्तीत धैर्य ९७
भाग २ - राज्याची अंगे १००
अध्याय ६४ - मंत्री १००

अनुक्रमणिका

अध्याय ६५ — वक्तृत्व १०१
अध्याय ६६ — शुद्धाचरण १०२
अध्याय ६७ — दृढ कार्यक्षमता १०३
अध्याय ६८—कार्यपद्धती १०४
अध्याय ६९ — दूत (राजदूत) १०६
अध्याय ७० — राजसभेतील वर्तन १०७
अध्याय ७१ — इंगित ज्ञान १०८
अध्याय ७२ — श्रोतृ-परीक्षा १०९
अध्याय ७३ — सभाधीटपणा ११०
भाग — ३ दुर्ग ११२
अध्याय ७४ — राज्य ११२
अध्याय ७५ — दुर्ग ११३
भाग ४ — अन्न ११५
अध्याय ७६ - धनसंपादनाचे मार्ग ११५
भाग ५ — सैन्य ११७
अध्याय ७७ - सैन्याचे महत्त्व ११७
अध्याय ७८ — सैन्याची प्रतिष्ठा ११८
भाग ६ — मैत्री ११९
अध्याय ७९ - मैत्री ११९
अध्याय ८० — मित्र-परीक्षा १२०
अध्याय ८१ — चिरकालीन मैत्री १२१
अध्याय ८२ — दुष्टांशी मैत्री १२२
अध्याय ८३ — खोटी मैत्री १२३
अध्याय ८४ — मूर्खपणा १२४
अध्याय ८५ — बुद्धिहीनता १२५
अध्याय ८६ - शत्रुत्व १२६
अध्याय ८७ — वैराचा महिमा १२६

अध्याय ८८ — शत्रूच्या सामर्थ्याची जाणीव १२७

अध्याय ८९ — अंतःशत्रू १२८

अध्याय ९० — थोरांचा अपमान १२९

अध्याय ९१ — स्त्रैणपणा १३०

अध्याय ९२ — वेश्या १३१

अध्याय ९३ — मद्यपान १३२

अध्याय ९४ — द्यूत..१३३

अध्याय ९५ — औषधी १३४

भाग ७ — पुरवणी १३६

अध्याय ९६ — कुलीनता १३६

अध्याय ९७ — मानापमान १३७

अध्याय ९८ — थोरवी... १३८

अध्याय ९९ — चारित्र्य १३९

अध्याय १०० — सुसंस्कृतता १३९

अध्याय १०१ — संपत्तीचा सद्व्यय १४०

अध्याय १०२ — विनयशीलता १४१

अध्याय १०३ — कुलोत्कर्ष..१४२

अध्याय १०४ — कृषि १४३

अध्याय १०५ — दारिद्र्य १४४

अध्याय १०६ — याचना १४५

अध्याय १०७ — याचनेची भीति १४६

अध्याय १०८ — नीचपणा १४७

खंड तिसरा – काम १४९

भाग १ — गुप्त प्रेम १५०

अध्याय ११० — प्रेम-संकेत १५०

अध्याय १११ — मीलन सुख १५१

अध्याय ११२ — सौंदर्य-प्रशंसा...१५२

अध्याय ११३ — प्रेम-महिमा १५३
अध्याय ११४ — विनयाचा त्याग १५४
अध्याय ११५ — प्रवाद-स्फोट १५५
भाग २ — पातिव्रत्य १५७
अध्याय ११७ — विरहिणीचा विलाप १५७
अध्याय ११८ — नेत्रांची विरह-वेदना १५८
अध्याय ११९ — निस्तेजतेची व्यथा १५९
अध्याय १२० — विरहाची तीव्रता १६०
अध्याय १२१ — शोकमय स्मृति १६१
अध्याय १२२ — स्वप्न-कथन १६२
अध्याय १२३ — सायं-वेदना १६२
अध्याय १२४ — शरीर सौंदर्याची क्षीणता १६३
अध्याय १२५ — स्वगत चिंतन १६४
अध्याय १२६ — लज्जेचा त्याग १६५
अध्याय १२७ — परस्परांची मार्गप्रतीक्षा १६६
अध्याय १२८ — संकेताची अभिव्यक्ति १६७
अध्याय १२९ — मीलनाची उत्सुकता १६८
अध्याय १३० — ह्रदयाशी संवाद १६९
अध्याय १३१ — प्रेम-कलह १७०
अध्याय १३२ — प्रेमकलहातील सूक्ष्मता १७१
अध्याय १३३ — प्रेमकलहातील आनंद १७२
विषय-सूचि १७४

तिरुक्कुरळ

खंड पहिला

—धर्म

अनुक्रमणिका

भाग १ - प्रस्तावना

अध्याय १—ईशस्तुती

१ अक्षरमालिकेत “अ” चे प्रथम स्थान आहे. सर्व सृष्टीचे मूळ कारण आदी भगवान आहे

२ शुद्धबुद्धिरूपी परमेश्वराच्या चरणांची आराधना जर झाली नाही; तर सर्व विद्यार्जनाचा काय उपयोग?

३ सर्व प्राणिमात्रांच्या हृदयकमळात वास करणाऱ्या परमेश्वराची जो उपासना करतो, त्याची वस्ती दिव्य लोकांत दीर्घकाळपर्यंत होईल.

४ सकामता व निष्कामता यांच्या पलीकडे असलेल्या परमेश्वराच्या चरणकमळास जो शरण जातो, त्याला कोणतेच कष्ट पडत नाहीत.

५ परमेश्वराची उपासना व नामस्मरण करणारास अज्ञानजन्य सत्कर्म व दुष्कर्म या दोहोंचाही लेप लागत नाही.

६ पंचेद्रियांच्या (त्यांच्या विषयांच्या) पार असलेल्या परमेश्वराकडे पोचणाऱ्या सन्मार्गाचे जो अनुसरण करतो, त्याला दीर्घकाळ सद्‌गती प्राप्त होईल.

---

(१) **अक्षराणामकारोऽस्मि ।**

—गीता १०·३३

(३) **ईश्वरः सर्व भूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्टति ।**
तमेव शरणं गच्छ सर्व भावेन भारत ।

—गीता १८·६२

(४) **मच्चित्तः सर्व दुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।**

—गीता १८·५८

---

७ परमेश्वराच्या अतुलनीय पदाची प्राप्ती झाल्यावाचून मानसिक दुःख व चिंता यांचा नायनाट होणार नाही.

८ धर्मसिंधू परमेश्वराच्या पदकमळाची प्राप्ती झाली, तरच भवसागर पार करणे शक्य आहे.

अनुक्रमणिका

९ बुद्धीचे स्थान असलेले असे जे मस्तक अष्टगुणैश्वर्यसंपन्न [(१) स्वावलंबन (२) पवित्र शरीर (३) स्वतंत्र प्रज्ञा (४) सर्वज्ञता (५) अनासक्ती (६) अपार करुणा (७) सर्वशक्तिमत्त्व (८) अमर्याद सुख हे अष्टगुण होत.] परमेश्वराच्या चरणावर नम्र होत नाही, ते निष्प्राण व निर्बुद्ध इंद्रियासमानच होय.

१० परमेश्वराच्या चरणाप्रत जे पोचतात, ते प्रचंड भवसागर तरून गेलेले असतात. त्या पदाप्रत जे जाऊ शकत नाहीत, ते त्या सागरात गटांगळ्या खात राहतात.

अध्याय २—पर्जन्य-महिमा

११ आकाशातून अवतरणाऱ्या पर्जन्यामुळेच जगाचे धारणपोषण होते. म्हणून पर्जन्य हेच अमृत होय.

१२ प्राणिमात्रांच्या जीवनास अवश्य असे उत्कृष्ट भोज्य पदार्थ पर्जन्यामुळेच निर्माण होतात. इतकेच नव्हे तर, पर्जन्य हेच प्राणिमात्रांचे जीवन (पाणी) होय.

१३ ही पृथ्वी जरी महासागरांनी वेष्टित असली, तरी आकाशातून पर्जन्यवृष्टी न झाल्यास पृथ्वीवर अवर्षण पडेल व तिच्यावरील प्राणी भूकतहानेने व्याकुळ होतील.

---

(११) **देवाद् वृष्टिः प्रवर्तेत वृष्टेरोषधयः स्मृताः ।**
ओषधिभ्यो मनुष्याणां धारयन्सततं हितम् ॥

— मभा १·४१·३१

(१२) **अन्नाद् भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ।**

— गीता ३·१४

(१३) **अन्नाद् वै प्रजाः प्रजायन्ते । याः काश्च पृथिवी[redacted]**
श्रिताः । अथो अन्नेनैव जीवन्ति । अथैनदपि
यन्त्यन्ततः । अन्न # हि भूतानां ज्येष्टम् ।
तस्मात्सर्वौषधसुच्यते ।

— तैत्ति. आनंद. २·१

---

१४ जीवनाला आधारभूत असणाऱ्या पर्जन्याच्या वृष्टीत जर खंड पडला (वृष्टी कमी झाली) तर शेतकऱ्यास शेतात नांगरटही करता येणार नाही.

१५ पर्जन्याच्या अकाली वृष्टीमुळे किंवा अतिवृष्टीमुळे हानी होते खरी. पण त्यानंतर विकास करण्याचे सामर्थ्यही पर्जन्यासच असते.

अनुक्रमणिका

१६. आकाशातून पर्जन्यबिंदूचा शिडकावा झाला नाही, तर पुथ्वीवर हरित तृणांकुरांचे दर्शनही होणार नाही.

१७ मेघांनी सागरातून शोषिलेले पाणी जर ते पर्जन्यरूपाने परत करणार नाहीत, तर सागरातील पाणी व सागरी संपत्ती ही दोन्हीही घटतील.

१८. आकाशातून पर्जन्यवृष्टी झाली नाही, तर स्वर्गस्थ देवांना पृथ्वीवरून हविर्भाग मिळणार नाहीत.

१९ स्वर्गीय मेघांतून जलवृष्टी झाली नाही, तर या विशाल विश्वात दानधर्म, तपाचरण यांचा लोप होईल.

२० पर्जन्याच्या अभावी पृथ्वीवरील जीवन संपुष्टात येईल. पर्जन्यावाचून सदाचरणाचाही नाश होईल.

अध्याय ३—यति-महिमा

२१ सदाचरणी असून संन्यास ग्रहण करणारांची थोरवी सर्व धर्मग्रंथांनी वर्णिली आहे.

२२. संन्यासाश्रम स्वीकारणारांच्या माहात्म्याचे मोजमाप करणे म्हणजे आजपर्यंत या पृथ्वीवर मृत्यू पावलेल्यांची गणना करण्यासारखे आहे.

२३ जन्म व मोक्ष या द्वंद्वाचे पूर्ण ज्ञान झाल्यानंतर जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त होण्यासाठी संन्यासाश्रम घेणारांचा महिमा अवर्णनीय आहे.

२४ ज्ञानाच्या अंकुशाने जो पंचेंद्रियांचा निग्रह करतो, तो म्हणजे दिव्य लोक प्रसविणारे एक बीजच आहे.

(१४) **तस्माद्यदा सुवृष्टिर्न भवति व्याधीयन्ते प्राणा**
अन्नं कनीयो भविष्यतीत्यथ यदा सुवृष्टिर्भवति
आनन्दितः प्राणा भवन्ति ।

—छान्दोग्य ७·१०

२५ पंचेंद्रियांवर विजय प्राप्त करून घेणाराच्या सामर्थ्याचा मूर्तिमंत पुरावा म्हणजे स्वर्गलोकाचा अधिपती देवराज इंद्र हाच होय.

२६ महत्कार्ये तडीस नेणारे लोक श्रेष्ठ होत. ज्यांच्या हातून मोठी कार्ये पार पडत नाहीत, ते कनिष्ठच होत.

अनुक्रमणिका

२७ पंचज्ञानेंद्रियांच्या रस, रूप, स्पर्श, शब्द व गंध (शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध) या विषयांचे संपूर्ण ज्ञान ज्यांनी प्राप्त करून घेतले आहे, तेच खरोखर जगाचे शास्ते होत.

२८. सारगर्भ व प्रत्ययकारी वाणीच्या संन्याशांचा महिमा वेदवचनावरूनच या जगात प्रतीत झाला आहे.

२९ सद्‌गुणरूपी शिखरावर आरूढ झालेल्या लोकांचा क्रोध क्षणजीवी असतो खरा. पण त्या क्षणापुरता का होईना, तो असह्य असतो.

३० अखिल प्राणिमात्रांकडे जे स्नेहयुक्त व दयार्द्र दृष्टीने पाहतात, तेच खरे धर्मनिष्ठ (किंवा ब्राह्मण) होत.

अध्याय ४—धर्माचे सामर्थ्य

३१ यश व धनसंपत्ती या दोहोंची प्राप्ती ज्याच्या योगाने होते, त्या धर्मापेक्षा या जगात श्रेष्ठ काय आहे?

३२ या जगात धर्मापेक्षा कोणतीच वस्तू श्रेष्ठ नाही. धर्माचे विस्मरण म्हणजे अधःपतन!

३३ आपली सर्व कर्मे सतत व सर्व सामर्थ्यानिशी करीत राहावे. आपली धर्मावरील दृष्टी मात्र यत्किंचितही ढळू देऊ नये.

(२५) **हित्वा सुखं मनसश्च प्रियाणि**
तेन शक्रः कर्मणा श्रैष्ठ्य माप ।
सत्यं धर्मं पालयन्नप्रमत्तो
दमं तितिक्षां समतां प्रियंच ।।

— मभा ५·२९·१३

(३१) **कामार्थौ लिप्समानस्तु धर्ममेवा ऽ ऽ दितश्चरेत् ।**
न हि धर्मादपैत्यर्थः कामो वा ऽ पि कदाचन ।।

—मभा ५·१२४·३७

३४ मन निर्मळ व शुद्ध राखणे म्हणजेच धर्माचरण. चित शुद्ध नसता केलेले कर्म म्हणजे बाह्य अवडंबर।

३५ मत्सर, लोभ, क्रोध व कठोर वचन या चार दुर्गुणांपासून दूर राहणे म्हणजेच धर्म.

३६ धर्माचरण सतत करीत राहा. विलंब करू नका. मृत्युशय्येवरील धर्माचरणही मरणोत्तर साहाय्यक होते.

अनुक्रमणिका

३७ धर्माचरण व अधर्माचरण यांची फलिते वेगळी सांगण्याची काय आवश्यकता? पालखीत बसलेला व ती वाहणारा यांच्याकडे दृष्टिक्षेप करा!

३८ धर्माचरणात एखाद्या दिवसाचाही जरी खंड पडला, तरी त्यामुळे सुखमय मोक्षमार्गात अडथळा निर्माण होतो.

३९ सदाचरणापासून प्राप्त होणारे तेच खरे सुख. त्यावाचून इतर सुखही नव्हे व यशही नव्हे!

४० मनुष्यमात्राने सत्कर्माचे नित्य आचरण करावे. कुकर्माचा सदैव त्याग करावा.

(३४) न व्याजेन चरेद् धर्ममिति मे भवतः श्रुतम् ।

—मभा १·२१३·३४

(३६) न धर्मकालः पुरुषस्य निश्चितो
न चापि मृत्युः पुरुषं प्रतीक्षते ।
सदा हि धर्मस्य क्रियैव शोभना
यदा नरो मृत्युमुखेऽभिवर्तते ।।

— मभा १२·२९८·१७

(३७) महच्च फलवषम्यं दृश्यते कर्मसन्धिषु ।
वहन्ति शिबिकामन्ये यान्त्यन्ये शिबिकागताः ।।

— मभा १२·२३१·४२

(३८) शुभेन कर्मणा सौख्यं दुःखं पापेन कर्मणा ।
कृतं फलति सर्वत्र नाकृतं भुज्यते क्वचित् ।।

— मभा १३·६·१०

अनुक्रमणिका

भाग २ — गृहस्थ-धर्म

अध्याय ५—गृहस्थ-जीवन

४१ गृहस्थाश्रमी हा अन्य तीनही सदाचरणी आश्रमियांचा निरंतरचा साहाय्यक असतो.

४२ तपस्वी, निर्धन, निराश्रित व मृत लोक, या सर्वांना गृहस्थाश्रमियांचाच आधार असतो.

४३ आपले पितर, देव, अतिथी, बांधव व आपण स्वतः या पाचांची सेवा करीत राहणे हा श्रेष्ठ धर्म होय.

४४ पापाचरणापासून चार हात दूर राहून सदाचरणाने संपादिलेल्या धनाचा विनियोग लोककल्याणासाठी करणाऱ्या गृहस्थाची वंशवेल वृद्धिंगत होत राहील.

४५ प्रेम व धर्म यांच्या आधारावर गृहस्थधर्माचे आचरण हेच त्या आचरणाचे सौंदर्य व फल!

४६ गृहस्थाश्रमाची कर्तव्ये धर्मास अनुसरून पार पाडली, तर अधिक लाभासाठी अन्य आश्रमात प्रवेश करण्याची काय आवश्यकता?

(४१) **सर्वाश्रमानुपादाय स्वाश्रमेण कलत्रवान् ।**
व्यसनार्णवमत्येति जलयानैर्यथार्णवम् ।।

— भाग ३·१४·१७

(४३) **गृहस्थस्य स्वकर्माजीवस्तुल्यै : समानर्षिभिर्वै**
बाह्यमृतुगामित्वं देवपित्रतिथिभृत्येषु त्यागः
शेषभोजनं च ।

— कौअ. ३

(४६) **आश्रमांस्तुलया सर्वान्धृतानाहुर्मनीषिणः ।**
एकतश्च त्रयो राजन् गृहस्थाश्रम एकतः ।।

— मभा १२·१२·१२

अनुक्रमणिका

४७ गृहस्थाश्रमाचे आचरण योग्य मार्गाने करणारा हाच मोक्षमार्गावरील सर्व पथिकांमध्ये श्रेष्ठ होय.

४८ स्वतः धर्मच्युत न होता इतरांच्या धर्माचरणास जो साहाय्य करतो, तो गृहस्थाश्रमी तपस्व्यापेक्षाही श्रेष्ठ होय.

४९ गृहस्थाश्रमियाचे जीवन हेच खरे धर्माचरण आणि ते जर सर्वथा निर्दोष असेल, तर आणखी काय पाहिजे?

५० पृथ्वीवर गृहस्थाश्रमाची कर्तव्ये धर्मास अनुसरून पार पाडणाराची तुलना स्वर्गस्थ देवांशी सहज करता येईल.

अध्याय ६—सहधर्मिणीचे गुण

५१गृहस्थाश्रमास अवश्य असलेले अनेक सद्‌गुण अंगी बाणलेले असणारी व पतीच्या मिळकतीस अनुसरून योग्य तो संसारखर्च करणारी, तीच खरी सहधर्मचारिणी.

५२ गृहस्थाचे जीवन कितीही उच्च स्तरावरचे असले, आणि त्याच्या सहधर्मचारिणीच्या अंगी जर गृहस्थाश्रमास आवश्यक असे सद्‌गुण नसले, तर तो संसार व्यर्थ होय!

५३ सहधर्मिणी सद्‌गुणसंपन्न असेल, तर त्या संसारात कसलीही उणीव नाही. ती सद्‌गुणसंपन्न नसेल, तर त्या संसारात काही राम नाही.

५४ पतिव्रतेच्या पतिनिष्ठेपेक्षा संसारात दुसरी कोणती गोष्ट महत्त्वाची आहे?

(४७) **चतुर्णामाश्रमाणां हि गार्हस्थ्यं श्रेष्ठमुत्तमम् ।**

— रामा २·१०६·२२

(५२) **यस्य भार्या गृहे नास्ति साध्वी च प्रियवादिनी ।**
अरण्यं तेन गन्तव्यं यथाऽरण्यं तथा गृहम् ।।

—मभा १२·१४४·१७

(५३) **स्त्रियां तु रोचमानायां सर्वं तद्रोचते कुलम् ।**
तस्यां त्वरोचमानायां सर्वमेव न रोचते ।।

—मनु ३·६२

(५४) **भर्तुर्वशवर्तिनी भार्या ।**

— चासू ३३६

अनुक्रमणिका

५५ प्रातःकाळी उठल्यावर अन्य देवांच्या पूजेच्या भानगडीत न पडता जी पतिव्रता पतिदेवाचीच मात्र सेवा करते, तिने "वृष्टी कर" असे म्हणताच मेघ पर्जन्यवृष्टी करील.

५६ जी आपल्या पातिव्रत्याचे जिवापाड संरक्षण करते, पतीचे काळजीपूर्वक संगोपन करते, आणि दक्षतापूर्वक संसार करते, तीच खरी पत्नी.

५७ घराच्या चार भिंतींनी स्त्रियांचे संरक्षण होत नाही. त्यांचे पातिव्रत्य हीच त्यांची संरक्षक भिंत.

५८ पतिसेवा करून जी स्त्री पतीचे मन जिंकते, तिला स्वर्गलोकाची सुखे अनायासाने प्राप्त होतात.

५९ यशस्वी रीतीने संसार करून आपले गृहिणीपद जिने आकर्षक केले नाही, तिचा पती अपमानित झाला, तर तो पुरुषसिंह असूनही त्याला वर मान करून चालणे अशक्य आहे.

६० पतिव्रता गृहिणी ही गृहाची शोभा असून उत्तम संतती ही त्या गृहाची भूषणे होत.

अध्याय ७—संततीचा लाभ

६१ इहलोकी मनुष्यमात्रास त्या प्राप्य वस्तू आहेत, त्यांत बुद्धिमान संततीपेक्षा दुसरी कोणतीही वस्तू श्रेष्ठ नाही.

६२ ज्याची संतती सदाचरणी व निष्कलंक आहे, अशा मनुष्याला सात जन्मातही पाप स्पर्श करू शकणार नाही.

६३ संतती हीच इहलोकाची खरी संपत्ती. ही संपत्ती आपल्या पूर्वकर्मास अनुसरून प्राप्त होते.

(५५) **भर्तुः शुश्रूषया नारी लभते स्वर्गसुत्तमम् ।**
अपि या निर्नमस्कारा निवृत्ता देवपूजनात् ।।

—रामा २·२४·२७

(५७) **अरक्षिता गृहे रुद्धाः पुरुषैराप्तकारिभिः ।**
आत्मानमात्मना यास्तु रक्षेयुस्ता सुरक्षिताः ।।

—मनु ९·२

६४ आपल्या बालकाच्या कोमल करांनी चिवडलेली पेजही अमृतापेक्षा मधुर असते.

६५ आपल्या बालकाच्या अंगास स्पर्श केल्याने पित्याची काया पुलकित होते. बालकाचे मधुर बोबडे बोल ऐकून कान तृप्त होतात.

अनुक्रमणिका

६६ ज्याला आपल्या बालकाचे मधुर बोबडे बोल ऐकण्याचे भाग्य लाभले नाही तोच वीणानाद व वेणुनाद यांच्या माधुर्याची प्रशंसा करील.

६७ विद्वत्ससभेत आपल्या पुत्रास उच्च स्थान प्राप्त करून देणे हेच पित्याचे श्रेष्ठ कर्तव्य.

६८ आपला पुत्र आपल्यापेक्षाही अधिक बुद्धिमान (बापसे बेटा सवाई) झाला, तर पित्यास आनंद होईलच. पण जगातील प्राणिमात्रांसही त्याचे कौतुक वाटेल.

६९ मातेला पुत्रजन्माचा जो आनंद होतो, त्यापेक्षाही त्या पुत्राची बुद्धिमान म्हणून कीर्ती झाली म्हणजे होणारा आनंद श्रेष्ठ होय.

७० "अशा बुद्धिमान व श्रेष्ठ पुत्राच्या प्राप्तीसाठी पित्याने किती तपश्चर्या केली असेल?" असे जेव्हा लोक कौतुकाने विचारू लागतात, तेव्हा पुत्राचे पितृविषयक कर्तव्य पूर्ण झाले असे समजावे.

अध्याय ८—स्नेह-संपदा

७१ स्नेहाच्या दरवाजास कधी तरी अडसर लागतो का? (तो सदैव उघडाच असतो) स्नेहाचे अश्रू त्याचे अंतरंग प्रकट करतात.

७२ स्नेहशून्य लोक (अप्पलपोटे असल्यामुळे) सर्व वस्तूंचा हव्यास बाळगतात. स्तेहसंपन्न लोक आपले शरीरही दुसऱ्यांसाठी वेचतात!

७३ आत्म्याचा मानवी शरीराशी जो संयोग झालेला असतो, तो स्नेहानेच एकजी व झाला पाहिजे.

(६४) **प्रतिपद्य यथा सूनुर्धरणीरेणुगुण्टितः**
पितुराश्लिष्यतेऽङ्गानि किमस्त्यभ्यधिकं ततः ।।

—मभा १·७४·५४

(६५) **पुत्रस्पशात्सुखतरः लोके स्पर्शो न विद्यते ।**

—मभा १·७४·५८

(६७) **पुत्रा विद्यानां पारं गमयितव्याः ।**

— चासू ३८२

७४ वात्सल्याचा उगम प्रेमातून होतो, आणि वात्सल्यातून घनिष्ट स्नेहसंबंधनि र्णाम होतात.

७५ संसारात प्रेमपूर्ण जीवन ज्यांनी उपभोगिले आहे, त्यांना इहलोकातच स्वर्गीय आनंदाची प्राप्ती होते.

७६ प्रेम किंवा स्नेह यांपासून सदाचरणासच स्फूर्ती मिळते, असे मूर्ख लोक म्हणोत बापडे! पण खरे पाहता अनेक कठोर व पराक्रमी कृत्यांच्या मुळाशीही प्रेमच असते.

७७ अस्थिहीन जीवजंतू उन्हाने होरपळून शुष्क होतात, स्नेहशून्य व्यक्तीवर धर्माचा परिणाम त्यासारखाच होतो.

७८ शुष्क वृक्षाला ज्याप्रमाणे वाळवंटात शाखा फुटण्याचा संभव नाही, त्याचप्रमाणे निष्प्रेम जीवाचा कोठेही उत्कर्ष होणार नाही.

७९ शरिराच्या अंतर्यामी वास करणाऱ्या अंतःकरणात जर स्नेहाचा अभाव असेल, तर बाह्यांगाच्या सौंदर्याचा काय उपयोग?

८० स्नेहपूर्ण शरीरच (जिवंत) शरीर या संज्ञेस पात्र आहे. ते जर तसे नसेल, तर तो अस्थींचा चर्मवेष्टित सांगाडाच होय!

अध्याय ९—आतिथ्य

८१ गृहस्थाश्रमाची प्रधान कर्तव्ये म्हणजे अतिथिसत्कार व दातृत्व.

८२ अतिथीस बाहेर तिष्ठत ठेवून घरात अमृताचेही प्राशन करणे सर्वथा अनुचित आहे.

८३ जो गृहस्थाश्रमी प्रतिदिन अतिथीचा सत्कार करतो, त्याच्या संसारात दारिद्र्यामुळे कसलीही उणीव राहणार नाही.

(८१) **अतिथिदेवो भव ।**

—तैत्ति. शीक्षो. ११·३

(८२) **आशा प्रतीक्षे संगतँ #सूनृतां**
चेष्टापूर्ते पुत्रपशूँश्व# सर्वान् ।
एतद् वृङ्क्ते पुरुषस्याल्पमेधसो
यस्यानश्वन्वसति ब्राह्मणो गृहे ॥

—कठ १·८

८४ प्रसन्न चित्ताने जो अतिथीचा सत्कार करतो, त्याच्या घरी लक्ष्मी आनंदाने निवास करते.

८५ अतिथीस यथेष्ट भोजन अर्पण करून त्याचा सत्कार केल्यानंतर जो अवशिष्ट अन्न भक्षण करतो, त्याच्या शेतात बी न पेरताही भरघोस पीक येते.

८६ आलेल्या अतिथीचा सत्कार करून आणखी अतिथींची जो प्रतीक्षा करतो, तो स्वर्गातील देवांच्या आतिथ्याचा उपभोक्ता होतो.

अनुक्रमणिका

८७ अतिथिसत्काराने प्राप्त झालेल्या यशाचे मूल्यमापन करणे अशक्य आहे. अतिथीच्या योग्यतेवर ते अवलंबून आहे.

८८ अतिथिसत्काररूपी यज्ञ ज्यांच्या हातून पार पडला नाही, त्यांना शेवटी पश्चात्ताप होईल की, "अरेरे! कष्टाने मिळविलेली संपत्ती (तिचा विनियोग अतिथिसत्कारात न झाल्यामुळे) व्यर्थ गेली! स्वर्गीय देवतांकडून होणाऱ्या आतिथ्यास आपण आंचवू!"

८९ अतिथिपूजा न करणारा श्रीमंत हा वास्तविक दरिद्रीच म्हटला पाहिजे तसाच तो मूर्खही असतो.

९० [तमिळ भाषेत अनित्यम् या शब्दाचे लेखन "अनिच्चम्" असे केले जाते. यावरून फुलाचे अल्पजीवित्व अभिप्रेत आहे. त्याचप्रमाणे हे फूल कोमलही आहे म्हणून पुढे कामखंडात या फुलाचा उल्लेख आला आहे तेथे त्याचे भाषांतर "शिरीष पुष्प" असे केले आहे.] "अनिच्चम्" या नावाने प्रसिद्ध असलेले फूल एकदा हुंगताक्षणीच कोमेजते. गृहस्थाचे वाकडे तोंड पाहताच अतिथीचे मन म्लान होते.

अध्याय १०—मधुर भाषण

९१ धर्माचे अंतरंग जाणणारांची वाणी निर्मत्सर, मधुर व प्रेमाने ओथंबलेली असते.

(८६) **अतिथिः पूजितो यस्य गृहस्थस्य तु गच्छति ।**
नान्यस्तस्मात्परो धर्म इति प्राहुर्मनीषिणः ॥

—मभा १३·२·७०

(८७) **पात्रं त्वतिथिमासाद्य शीलाढ्यं यो न पूजयेत् ।**
स दत्वा दुष्कृतं तस्मै पुण्यमादाय गच्छति॥

—मभा १३·२·९३

९२ दान करताना अंतःकरणात दया तर असावीच, पण त्यापेक्षाही तोंडात मधुर शब्द असणे उत्तम!

९३ प्रसन्न मुद्रा, स्नेहपूर्ण दृष्टी आणि अंतःकरणापासून निघालेली मधुर वाणी म्हणजेच धर्म!

९४ ज्याची वाणी मधुर व सुखप्रद आहे, त्याच्या वाऱ्यासही दुःख व दारिद्र्य ही उभी राहणार नाहीत.

९५ विनय आणि मधुर वाणी हीच मनुष्याची खरी भूषणे होत. अन्य अलंकार व्यर्थ समजावे!

९६ज्याची वाणी शुभंकर व मधुर आहे, त्याच्या पापाची हानी होईल व पुण्याची वृद्धी होईल.

९७ दानसमयी हितकर व मधुर वाणीचा उपयोग केल्याने पुण्य व आनंद यांची प्राप्ती होईल.

अनुक्रमणिका

९८ दुसऱ्यास त्रस्त न करणारे व मधुर शब्द जो नेहमी उपयोगात आणील, त्याला इहलोकी व परलोको वैभव प्राप्त होईल.

९९ ज्याला मधुर शब्दांची अपेक्षा आहे, त्याने स्वतः मधुर वाणीचाच उपयोग न करता कठोर शब्दच का वापरावे?

(९२) दानमेव हि सर्वत्र सान्त्वेनानभिजल्पितम् ।
न प्रीणयति भूतानि निर्व्यञ्जनमिवाशनम् ।।

—मभा १२·८४·७

(९३) द्वे कर्मणी नरः कुर्वन्नस्मिंल्लोके विरोचते ।
अब्रुवन्परुषं किञ्चिदसतोऽनर्चयंस्तथा ।।

—मभा ५·३३·५४

(९७) अभ्यावहति कल्याणं विविधं वाक्सुभाषिता ।
सैव दुर्भाषिता राजन्ननर्थायोपपद्यते ।।

—मभा ५·३४·७७

(९८) श्लक्ष्णां वाणीं निराबाधां मधुरां पापवर्जिताम् ।
स्वागते नाभिभाषन्ते ते नरा स्वर्गगामिनः ।।

—मभा १३·१४४·२३

(९९) यस्मादुद्विजते लोकः सर्वो मृत्युमुखादिव ।
वाक्क्रूराद्दण्डपरुषात्स प्राप्नोति महद्भयम् ॥

—मभा १२·२६२·१८

१०० मधुर शब्दांचा उपयोग करता येण्यासारखा असून जो कटू वचनाचाच उपयोग करतो, त्याची ती कृती म्हणजे गोड पिकलेली फळे संग्रही असूनही आंबट कच्ची फळे खाण्यासारखी होय.

अध्याय ११ – कृतज्ञता

१०१ ज्यावर पूर्वी कधीही उपकार झाला नाही, त्याने उपकार (प्रत्युपकार नव्हे) केला तर त्याची परतफेड पृथ्वीच्याच काय, पण स्वर्गाच्याही राज्याने होणार नाही.

१०२ वेळेवर केलेल्या अल्पशा उपकाराचे मोल पृथ्वीमोलापेक्षाही अधिक असते.

१०३ निःस्वार्थ बुद्धीने केलेल्या साहाय्याचे मोल महासागरापेक्षाही विशाल आहे.

अनुक्रमणिका

१०४ उपकार जरी मोहरीच्या (किंवा वरीच्या) दाण्याइतका अल्प असला, तरी त्याची जाणीव ठेवणारास तो तालवृक्षापेक्षाही मोठा वाटतो.

१०५ उपकार व प्रत्युपकार यांची तुलनाच होऊ शकत नाही. उपकाराचे महत्त्व मूळ उपकृताच्या गुणग्राहकतेवर अवलंबून असते.

१०६ निष्कलंक माणसांची मैत्री तोडू नका. ज्यांनी तुम्हांला विपत्काळी साहाय्य केले, त्यांचा त्याग करू नका.

(१०१) **अर्थिनः कार्यनिर्वृत्तिमकर्तुरपि यश्चरेत् ।**
तस्य स्यात्सफलं जन्म किं पुनः पूर्वकारिणः ।।

— रामा ४·४३·७

(१०२) **कार्यमण्वपि काले तु कृतमेत्युपकारताम् ।**
महदप्युपकारोऽपि रिक्ततामेत्यकालतः ।।

— योवा १·७·२६

(१०४) **तिलमात्रमप्युपकारं शैलमात्रं मन्यते साधुः ।**

— चासू ३९८

(१०५) **प्रत्युपकुर्वन्बह्वपि**
न भाति पूर्वोपकारिणा तुल्यः ।
एकः करोति हि कृते
निष्कारणमेव कुरुतेऽन्यः ॥

—मभा १२·१३८·८२

१०७ संकटसमयी एकदाच केलेल्या उपकाराचे विस्मरण जो सात जन्मातही होऊ देत नाही, तोच खरा सज्जन.

१०८ उपकाराचे विस्मरण मुळीच होता कामा नये. अपकार मात्र त्वरित विसरावयास हवा.

१०९ हत्येसारखा एखादा भयंकर अपराध ज्याने केला आहे, त्याने जरी अल्पसा उपकार केला, तरी त्याचा पूर्वीचा अपकार विसरून गेले पाहिजे.

११० इतर कोणतीही हत्या हातून घडल्यास त्या पापाची निष्कृती होणे शक्य आहे. पण कृतज्ञतेच्या हत्येस प्रायश्चित नाही.

अनुक्रमणिका

अध्याय १२ — निःपक्षपात

१११ निःपक्षपात हा सद्‌गुण खरा. पण कर्तव्यबुद्धी जागृत ठेवूनच तो वापरला पाहिजे.

११२ न्यायी मनुष्यावर त्याच्या आयुष्यभर लक्ष्मीचा वरदहस्त राहीलच, पण त्याचे वंशजही वैभवसंपन्न होतील.

११३ अन्यायाने मिळविलेल्या संपत्तीमुळे एखादे वेळी सुख मिळेल. पण ती संपत्ती मिळताक्षणीच तिचा त्याग केला पाहिजे.

११४ मनुष्य आपल्या जीवनात न्यायाने (निःपक्षपाताने) वागला की अन्यायाने, याची परीक्षा त्याच्या मरणोत्तर त्याच्या प्रजेवरून होईल.

११५ जीवनात उत्कर्षापकर्ष दैवयोगाने होत राहणारच. पण कशाही परिस्थितीत न्यायीपणाने वागणे हे थोर लोकांचे भूषण होय.

(१०८) **धर्मलोपो महांस्तावत्कृते ह्यप्रतिकुर्वतः ।**
अर्थलोपश्च मित्रस्य नाशे गुणवतो महान् ।।

— रामा ४·३३·४७

(१०९) **स्मरन्ति सुकृतान्येव न वैराणि कृतान्यपि ।**
सन्तः प्रतिविजानन्तो लब्धसंभावनाः स्वयम् ।।

— मभा २·७२·९

(११०) **गोघ्ने चैव सुरापे च चौरे भग्नव्रते तथा ।**
निष्कृतिर्विहिता सद्‌भिः कृतघ्ने नास्ति निष्कृतिः ॥

—रामा ४·३४·१२

११६ न्याय्य मार्गापासून तुमचे चित्त जर चळू लागले, तर निश्चित समजा की लवकरच आपला अधःपात होणार आहे!

११७ नीतीस अनुसरून न्याय्य मार्गाने जाणारा मनुष्य जरी दरिद्री असला, तरी त्याच्या अवनत स्थितीतही लोक त्याला थोर समजतात व आदराने वागवितात.

११८ मध्यावर स्थिर राहून बरोबर वजन दाखविणाऱ्या तराजूच्या काव्याप्रमाणे जगात निःपक्षपाताने व न्यायाने वागणे हे थोरांचे भूषण होय.

११९ भाषणात तर वक्रता नसावीच. पण मनातही लेशमात्र वक्रता नसणे हेच निःपक्षपाताचे किंवा न्यायीपणाचे लक्षण.

अनुक्रमणिका

१२० जो व्यापारी आपला स्वतःचा व शेजाऱ्याचा माल यांत भेद न करता दोन्ही सारखेच मानतो, त्याचा उत्कर्ष होतो.

अध्याय १३ – आत्मसंयमन

१२१ आत्मसंयमनाने स्वर्गलोकात स्थान मिळते. स्वैराचाऱ्यांची पाठवणी अंधकारमय नरकलोकात होते.

१२२ आत्मसंयमन ही जगातील अतिमूल्यवान व म्हणून रक्षणीय संपत्ती आहे. तिचे रक्षण अतिशय दक्षतेने केले पाहिजे.

१२३ जाणीवपूर्वक व योग्य मार्गाने जो आत्मसंयमन करता, तो सज्जनांच्या आदरास पात्र होऊन वैभवसंपन्न होतो.

१२४ विचलित न होता जो सदैव आत्मसंयमन करतो, त्याची प्रतिष्ठा पर्वतापेक्षाही उंच असते.

१२५ नम्रता हा सद्गुण सर्वांच्याच ठिकाणी प्रशंसनीय आहे. धनवानांची तर ती सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे.

(११६) **बुद्धौ कलुषभूतायां विनाशे ससुपस्थिते ।**
अनयो नयसंकाशो हृदयान्नापसर्पति ।।

— मभा २·८२·९

(१२१) **इंद्रियाणां प्रसंगेन दोषमर्च्छत्यसंशयम् ।**
संनियम्य तु तान्येव सिद्धिमाप्नोति मानवः ।।

—मभा १२·३२३·८

१२६ जो या जन्मी आपली पंचेंद्रिये कासवाप्रमाणे आत संकोच करून ओढून घेतो, त्याच्या कीर्तीचा डंका सात जन्मपर्यंत वाजत राहतो.

१२७ अन्य वस्तूंचे नियंत्रण मनुष्याने न केले तरी चालेल. पण जिव्हेचे नियंत्रण त्याने जर केले नाही, तर तिच्या प्रतापाचे फळ त्यालाच भोगावे लागेल.

१२८ एकाद्याच्या तोंडातील दुरुत्तराने जर दुसऱ्यास पीडा होत असेल, तर अंगी असलेले सर्व सद्गुण मातीमोल होतात!

१२९ भाजलेल्या जागेची खोल जखम भरून येते. बाहेर फार तर वण राहतो. पण जिभेने केलेला घाव कधीच भरून येत नाही.

१३० विद्योपार्जनानंतर क्रोधादी रिपूंचा निग्रह करून जो आपला जीवनक्रम चालवितो, त्याच्या स्वागतासाठी प्रत्यक्ष धर्मच प्रतीक्षा करीत उभा असतो.

अनुक्रमणिका

अध्याय १४ – सदाचरण

१३१ सदाचरणाने उत्कर्ष होतो. म्हणून सदाचरणाचे रक्षण प्राणपणाने केले पाहिजे.

(१२६) **यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानवि सर्वशः ।**
इंद्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।।

— गीता २·५८

(१२७) **तावज्ञितेन्द्रियो न स्याद् विजितान्येन्द्रियः पुमान् ।**
न जयेद्रसनं यावज्ञितं सर्वे जिते रसे ।।

—भाग ११·८·२१

(१२८) **नाऽरुन्तुदः स्यान्न नृशंसवादी**
न हीनतः परमभ्याददीत ।
ययाऽस्य वाचा पर उद्विजेत ।
न तां वदेदुषतीं पापलोक्याम् ।।

—मभा २·६६·६

(१२९) **रोहते सायकैर्विद्धं वनं परशुना हतम् ।**
वाचा दुरुक्तं बीभत्सं न संरोहति वाक्क्षतम् ।।

— मभा ५·३४·७८

(१३०) **दमेन शोभते विप्रः क्षत्रियो विनयेन तु ।**
धनेन वैश्यः शूद्रस्तु नित्यं दाक्ष्येण शोभते ।।

— मभा १२·२९३·२१

१३२ सदाचरणाचे रक्षण दक्षतेने केले पाहिजे. सर्व सद्गुणांची विचारपूर्वक तुलना केली तर त्याचेच साहाय्य अधिक मोलाचे आहे.

१३३ सदाचरण हे उच्चकुलीन जन्माचे निदर्शक होय. दुराचरणाने नीच योनीतील जन्मच सिद्ध होतो.

१३४ ब्राह्मणास वेदाचे विस्मरण झाले तर त्याचे अध्ययन पुन्हा करता येईल. पण तो आचारभ्रष्ट झाला की त्याची वर्णाश्रित प्रतिष्ठा कायमचीच नष्ट होते.

१३५ मत्सरग्रस्त मनुष्यास ज्याप्रमाणे वैभव प्राप्त होत नाही; त्याचप्रमाणे दुराचारी मनुष्याचा उत्कर्ष होत नाही.

अनुक्रमणिका

१३६ दुराचरणामुळे आयुष्याचा नाश होणारच; याची जाणीव ठेवून दृढनिश्चयी लोक सदाचरणाची जोपासना करतात.

१३७ सदाचरणाने लोक श्रेष्ठ होतात, तर दुराचरणाने त्यांची अधोगती होते.

१३८ सदाचरणात सुखी जीवनाचे बीज असते, दुराचरणाने दुःखच प्राप्त होते.

१३९ सदाचरणी मनुष्याच्या तोंडून चुकूनही दुर्वचन बाहेर पडणार नाही.

१४० अनेक विद्यांचे संपूर्ण अध्ययन करूनही जर विविध लोकांत मिळून मिसळून वागता येत नसेल, तर ते अडाणीपणाचेच लक्षण होय.

अध्याय १५ – अव्यभिचार

१४१ जगातील धर्मशील आणि श्रीमान् लोक शेजाऱ्याच्या पत्नीविषयी मनात अभिलाषा धरण्याचा मूर्खपणा करीत नाहीत.

(१३२) **नाविरतो दुश्चरितान्नाशान्तो नासमाहितः ।**
नाशान्तमानसो वाऽपि प्रज्ञानेनैवमाप्नुयात् ।।

— कठोप १·२·२४

(१३३) **कुलीनमकुलीनं वा वीरं पुरुषमानिनम् ।**
चारित्र्यमेव व्याख्याति शुचिं वा यदि वाऽशुचिम् ।।

— मभा २·१०९·४

(१३४) **चतुर्वेदोऽपि दुर्वृत्तः स शूद्रादतिरिच्यते ।**

— मभा ३·३१३·१११

(१३९) **न ह्ययुक्तं न चाऽसत्यं नाऽसह्यं न च वाऽप्रियम् ।**
भाषितं चारुभावस्य जज्ञे पार्थस्य धीमतः ।।

—मभा १-२२२-११

१४२ अन्य स्त्रियांच्या घरांचे उंबरठे झिजविणारे मूर्ख लोक पापी व दुराचारी समुदायातच सापडतील.

१४३ आपल्यावर नितांत विश्वास ठेवणाच्या मित्राच्या पत्नीशी वाईट संबंध ठेवणारे लोक मृतप्राय होत.

अनुक्रमणिका

१४४ मनुष्य कितीही थोर का असेना, तो जर अविचाराने शेजारघरी शिरून शेजाऱ्याच्या गृहिणीशी वाईट संबंध ठेवील, तर त्याच्या थोरपणाचा काय उपयोग ?

१४५ अनायासाने शक्य म्हणूनही परस्त्रीशी व्यभिचार करणाऱ्या मनुष्याच्या मागे सतत लोकापवाद लागेल.

१४६ द्वेष, पाप, भय व दुष्कीर्ती हे चार शत्रू व्यभिचारी मनुष्याची पाठ कधीही सोडीत नाहीत.

१४७ शेजाऱ्याच्या पत्नीवर वाईट दृष्टी कदापि न ठेवणारा पुरुषच सद्‌गृहस्थ म्हणून गणला जातो.

१४८ शेजाऱ्याच्या पत्नीकडे वाईट दृष्टीने न पाहणे हा केवळ विद्वान लोकांचा धर्म नव्हे, तर तो सामान्य सदाचार होय.

१४९ भयंकर भवसागराने वेढलेल्या या जीवनात तोच वैभवसंपन्न असा राहू शकतो, की ज्याचा हात शेजाऱ्याच्या पत्नीच्या खांद्यावर पडत नाही.

१५० मनुष्याने कितीही अधर्माचरण केले, आणि शेजाऱ्याच्या पत्नीकडे लोभी दृष्टीने पाहण्याचे पाप मात्र केले नाही, तर तो चांगलाच म्हटला पाहिजे.

अध्याय १६ – सहनशीलता

१५१ पृथ्वीवर घातलेले घाव पृथ्वी जशी सहन करते, त्याचप्रमाणे निंदकाने केलेला अपमान सज्जनाने सहन केला पाहिजे.

(१४३) **न हीदृशमनायुष्यं लोके किंचन विद्यते ।**
यादृश पुरुषस्येह परदारोपसेवनम् ।।

—मभा १३·१४०·२१

(१५०) **परदाराभिमर्शात्तु नान्यत्पापतरं महत् ।**

—रामा ३·३८·३०

(१५१) **अमृतस्यवे संतृप्येदवमानस्य पण्डित ।**
सुखं ह्यवमतः शेते योऽवमन्ता स नश्यति ।।

—मभा १२·२९८·२६

१५२ चीड आणणारी गोष्ट सहन करणे चांगले. पण ती विसरून जाणे त्यापेक्षाही उत्तम.

१५३ दारिद्र्यातील दारिद्र्य म्हणजे अतिथीची उपेक्षा करणे. औदार्यातील औदार्य म्हणजे मूर्खाने केलेल्या निंदेची उपेक्षा करणे.

अनुक्रमणिका

१५४ ज्याला आपल्या प्रतिष्ठेचा नाश न होऊ देता तिचे संरक्षण करावयाचे आहे, त्याने आपल्या सहनशीलतेचे प्रथम संरक्षण करावयास हवे.

१५५ दुसऱ्याने दिलेल्या दुःखाचा प्रतिशोध घेणारा सज्ज्नांच्या आदरास पात्र होत नाही. क्षमाशील मनुष्यास मात्र सज्ज्न सुवर्णासारखा संभाळून ठेवतात.

१५६ प्रतिशोध घेणाराचा आनंद एखादा दिवस टिकेलही. पण क्षमाशील पुरुषाची कीर्ती प्रलयकालापर्यंत टिकून राहील.

१५७ तुमचा अपराध करणाराची कीव करा. अधर्माने त्याचा प्रतिशोध न घेणे हेच उत्तम.

१५८ अहंकारास बळी पडून ज्याने तुमचा अपराध केला असेल, त्याला क्षमा करून त्याच्यावर विजय मिळवा.

१५९ सर्वसंगपरित्याग करणाऱ्यांपेक्षाही निंदकास क्षमा करणारा अधिक पवित्र होय.

(१५२) यः समुत्पतितं क्रोधं क्षमयैव निरस्यति ।
यथोरगस्त्वचं जीर्णां स वै पुरुष उच्यते ।।

— रामा ५·५५·६

(१५५) पूर्वापकारी यस्ते स्यादपराधे गरीयसी ।
उपकारेण तत्तस्य क्षन्तव्यमपराधिनः ।।

— मभा ३·२८·२६

(१५६) न दुष्करमिदं पुत्र यत्प्रभुर्घातयेत्परम् ।
श्लाघनीया यशस्या च लोके प्रभवतां क्षमा ।।

—मभा १२·१११·६८

(१५८) यः समुत्पतितं क्रोधमक्रोधेन निरस्यति ।
देवयानि विजानीहि तेन सर्वमिदं जितम् ॥

—मभा १·७९·३

१६० अन्नग्रहण न करता उपवास करणारा पुण्यवान खरा. पण निंदकास क्षमा करून त्याची दुरुत्तरे सहन करणारा त्यापेक्षाही श्रेष्ठ.

अनुक्रमणिका

अध्याय १७ – मत्सर

१६१ अंतःकरणात मत्सर न बाळगणे हे सदाचरणाचेच लक्षण होय.

१६२ जगातील प्राणिमात्राचा मत्सर न करणे याहून कोणताच सद्‌गुण श्रेष्ठ नाही.

१६३ जो स्वतः वैभव व सदाचरण यांनी संपन्न होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगीत नाही, तोच दुसऱ्याच्या वैभवाचा मत्सर करतो.

१६४ मत्सरामुळे होणाऱ्या हानीची जाणीव ठेवून बुद्धिमान किंवा धार्मिक लोक मत्सरयुक्त आचरण करीत नाहीत.

१६५ मत्सरग्रस्त लोकांचा मत्सर हाच एवढा मोठा घातक शत्रू आहे की, मत्सरावाचून अन्य शत्रूची त्यास गरजच नाही.

१६६ उदार दात्याचे मत्सरग्रस्त कुटुंबीय व नातेवाईक अन्नवस्त्राच्या अभावी नाश पावतील.

१६७. प्रत्यक्ष देवीच (लक्ष्मी) मत्सरग्रस्त मनुष्याचा द्वेष करील, आणि आपण बाजूस राहून आपली थोरली बहीण अक्काबाई त्याच्या भेटीस पाठवील.

१६८ मत्सर नावाचा पापी प्राणी (आपल्या भक्ताच्या) संपत्तीचा नाश करतो, आणि त्याला नरकात ढकलून देतो.

१६९ मत्सरी मनुष्याची संपन्नता आणि न्यायी व सदाचारी मनुष्याची विपत्ती हे अभ्यास करण्याजोगे विषय आहेत.

१७० या जगात मत्सरग्रस्त मनुष्य सहसा संपन्न असत नाही, आणि निर्मत्सर मनुष्य विपत्तीने पीडलेला नसतो.

अध्याय १८ – निर्लोभिता

१७१. जी संपत्ती दुसऱ्याने न्यायाने संपादन केलेली असते, तिचा अन्यायाने केलेला लोभ कुलक्षय करील, आणि अनेक विपत्तीचे मूळ ठरेल.

(१६०) यः परेषां नरो नित्यमतिवादांस्तितिक्षते ।
देवयानि विजानीहि तेन सर्वमिदं जितम् ।।

—मभा १·७९·१

अनुक्रमणिका

१७२ दुसऱ्याच्या वस्तूचा लोभ करण्यापासून होणारी हानी ध्यानात घेऊन अन्यायाची चाड बाळगणारे लोक दुराचरण करणार नाहीत.

१७३ शाश्वत मोक्षाची इच्छा करणारे लोक क्षणिक आनंद देणाऱ्या वस्तूंच्या लोभाने दुर्वर्तन करणार नाहीत.

१७४ इंद्रियनिग्रही व निर्दोष आचरणाचे लोक दारिद्रयाने पीडले असताही दुसऱ्यांच्या संपत्तीचा लोभ धरीत नाहीत,

१७५ दुसऱ्या कोणाच्याही वस्तूंचा हव्यास धरण्याचा मूर्खपणा ज्याच्या अंगी आहे. त्याच्या विशाल आणि कुशाग्र विद्वत्तेचा काय उपयोग?

१७६ सन्मार्गास अनुसरून ईश्वरी कृपेची इच्छा करणारा मनुष्य लोभास बळी पडून जर थोडेही दुराचरण करील, तर त्याचा निश्चित नाश होईल.

१७७ दुसऱ्याने लोभाने मिळविलेल्या संपत्तीची अभिलाषा धरू नको. तिच्या उपभोगाने तुझे कल्याण होणार नाही.

१७८ तुझ्या संपत्तीचा संकोच न होता तुझा उत्कर्ष व्हावा अशी तुझी इच्छा आहे का? तर मग दुसऱ्याच्या संपत्तीचा लोभ धरू नको.

१७९ निर्लोभी वृत्तीने धर्माचरण करणाऱ्या लोकांचे मूल्य लक्ष्मी जाणते, आणि ती स्वयमेव त्यांचा शोध घेऊन त्यांच्याकडे जाते.

१८० परिणामाचा विचार न करणारे लोभी लोक नाश पावतात. उलट अनिच्छा नामक संपत्तीचे धनी विजयी होतात.

(१७५) यो न निवांसते नूनं सर्वधर्मपरोऽपि सः ।
सर्वज्ञोऽप्यभितो बद्धः पञ्जरस्थो यथा खगः ।।

— योवा ६·५५·४४

(१७०) आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।।
कामरूपेण कौन्तेय दूष्पूरेणानलेन च ।।

— गीता ३·३९

(१७८) अनार्याचरितं तात परस्वस्पृहणं भृशम् ।
स्वसंतुष्टः स्वधर्मस्थो यः स वै सुखमेधते ।।

— मभा २·५४·६

अनुक्रमणिका

अध्याय १९ — निंदा

१८१ एखाद्याच्या वाणीत व आचरणात धर्म प्रत्ययास न आला तरी चालेल. पण तो निंदक मात्र नसावा.

१८२ सद्धर्माचा त्याग आणि पापाचरण यापेक्षाही एखाद्याच्या तोंडावर त्याची स्तुती आणि त्याच्या पाठीमागे त्याची निंदा करणे हे अधिक अधमपणाचे आहे.

१८३ निंदकाचे पापी जीवन जगण्यापेक्षा निर्धनावस्थेत मृत्यू आला तर धर्मप्रणीत मोक्षप्राप्ती होईल.

१८४ कोणाच्याही तोंडावर त्याची हवी तेवढी निंदा करा. पण त्याच्या पश्चात त्याच्यासंबंधी एकही वाईट शब्द उच्चारू नका.

१८५ वाचा कितीही मधुर असली, पण तिच्यात पर-निंदा असेल, तर अंतःकरणात धर्मभावनेचा अभाव असल्याचे सिद्ध होते.

१८६ आपण दुसऱ्याची निंदा करीत असताना दुसराही आपली वैगुण्ये पारखून आपली निंदा करीत असेल, हे लक्षात ठेवावे.

१८७ गोड बोलून नवीन मित्र जोडण्याचे कौशल्य ज्यांच्यात नाही, ते आपल्या मित्रमंडळातच लावालावी करून त्यांच्यात वैर मात्र निर्माण करतात.

१८८ जे स्वकियांचेही दोष चारचौघांत सांगत सुटतात, ते परकीयांच्या गुणदोषांसंबंधी काय करतील, भगवान जाणे!

१८९ लोकांची निंदा त्यांच्या पाठीमागे करणाऱ्या दुर्जनांचा भार धरणी सहन करते, तो केवळ तिचा धर्म तसा आहे म्हणून!

१९० दुसऱ्याचे दोष हुडकीत बसण्यापेक्षा आपण स्वतःच्याच दोषांची जाणीव ठेविली, तर काय हानी होईल?

(१८८) परवाच्येषु निपुणः सर्वो भवति सर्वदा ।
आत्मवाच्यं न जानीते जानन्नपि न मुह्यति ।।

— मभा ८·४५·४४

(१८९) असतां शलिमेतद्वै परिवादोऽथ पैशुनम् ।

— मभा १२·१३२·१३

(१९०) राजन्सर्षपमात्राणि परच्छिद्राणि पश्यसि ।

अनुक्रमणिका

आत्मनो बिल्वमात्राणि पश्यन्नपि न पश्यसि ।।

—मभा १·७४·८२

अध्याय २०—व्यर्थ प्रलाप

१९१ निष्फळ बडबड करून जो इतरांस चिडवितो तो इतरांच्या तिरस्कारास पात्र होतो.

१९२ आपल्या मित्रांशी अनुचित वर्तन करण्यापेक्षा चारचौघांत व्यर्थ बडबड करणे हे अधिक तुच्छ होय.

१९३ चारचौघांत निरर्थक व निष्फळ बडबड करणारा आपला मूर्खपणाच प्रकट करतो.

१९४ जनसमुदायापुढे निष्फळ व असभ्य प्रलाप काढणाऱ्या व्यक्तीच्या जवळपास न्याय फिरकणार नाही, आणि कल्याण त्याच्यापासून दूर पळू लागेल.

१९५ सदाचरणी लोकही जर व्यर्थ बडबड करू लागतील, तर त्यांचे वैभव व त्यांची कीर्ती त्यांच्यापासून दूर पळू लागतील.

१९६ व्यर्थ प्रलाप करण्यातच जो अभिमान बाळगतो, तो मानव नव्हेच. मानवजातीतील तो भुसा समजावा.

१९७ विद्वान लोकांच्या तोंडून एखादा अनुचित वा अन्याय्य शब्द बाहेर पडला, तरी चिंता नाही. पण त्यांनी व्यर्थ बडबड न केली तर चांगले.

१९८ गंभीर व महत्त्वाच्या विषयाचे विवेचन करणारे विद्वान लोक निरर्थक बाष्फळ बडबड करणार नाहीत.

१९९ विरागी आणि निष्कलंक कीर्ती असलेल्या लोकांच्या तोंडातून चुकूनही बाष्कळ व निरर्थक शब्द बाहेर पडणार नाहीत.

२०० बोलावयाचे असेल तेव्हा अर्थपूर्ण व हितकर शब्द बोला. निरर्थक शब्द उच्चारू नका.

(१९३) **मूढानामवलिप्तानामसारं भाषितं बहु ।**
दर्शयत्यन्तमात्मानमग्निरूपमिवांशुमान् ।।

—मभा १२·२८७·३३

(१९६) **यत्तदुक्तं महद्वाक्यं कर्मणा तद्विभाव्यताम् ।**
अकर्मणा कत्थितेन सन्तः कुपुरुषं विदुः ।।

—मभा २·१६०·८६

अनुक्रमणिका

अध्याय २१ – पापभीरुता

२०१ उद्दण्ड लोकांची भीती पापी, दुराचारी लोकांस वाटत नाही. सज्जनच त्यांना भितात.

२०२ दुराचरणाचे फळ दुरितमयच असते. म्हणून दुराचरण हे अग्नीपेक्षाही भयंकर आहे.

२०३ शत्रूलाही दुःख न देणे हेच सर्वश्रेष्ठ ज्ञानाचे लक्षण असे ज्ञानी लोक सांगतात.

२०४ दुसऱ्याचा पाडाव होईल असे कृत्य करण्याचा विचार चुकूनही करू नका. दुसऱ्याचा पाडाव करू इच्छिणाऱ्यांचा पाडाव करण्याचा धर्मच विचार करतो.

२०५ आपण दरिद्री आहो अशा समजुतीने दारिद्र्याचे निवारण करण्यासाठी दुराचरण करू नका. नाहीतर तुम्ही खरोखरच दरिद्री व म्हणून दुःखीही व्हाल.

२०६ भविष्यकाळी तुम्हास दुःख होऊ नये असे वाटत असेल, तर दुराचरणाने दुसऱ्यास दुःख देऊ नये.

२०७ अती भयंकर शत्रूपासून तुम्हांला आपले संरक्षण करता येईल. पण पापाचरण हा शत्रू तुमचा पाठलाग करून तुमचा सर्वनाश करील.

२०८ पापी मनुष्याचा ताठा सावलीप्रमाणे त्याच्या पायाखाली (त्याला उमगणार नाही अशा रीतीने) राहून त्याचा पाठलाग करीत असतो.

२०९ तुझे स्वतःवर खरोखरच प्रेम असेल, तर अल्प वाटणाऱ्या पापाचरणाचाही सर्वथा त्याग कर.

२१० पुण्यमार्गास अनुसरून जो पापाचरणापासून दूर राहतो, तो मुक्त व अमर होतो.

अध्याय २२ – कर्तव्यनिष्ठा

२११ उदार बुद्धीचे लोक जगापासून प्रत्युपकाराची अपेक्षा करीत नाहीत. मेघांपासून प्राप्त होणाऱ्या जलवृष्टीची परतफेड जग काय करते?

(२०४) क्षन्तव्यं पुत्र धर्मो हि हतो हन्ति न संशयः ।

— मभा १·४१·२३

(२११) सन्तः परार्थं कुर्वाणा नावेक्षन्ति परस्परम् ।

—मभा ३·२९७·४९

अनुक्रमणिका

२१२ परिश्रमांनी मिळविलेली संपत्ती स्वकियांना व जगातील अन्य गरजवंतांना दान करण्यासाठीच असते.

२१३ परोपकार करून आपले आयुष्य वेचणे यासारखे मृत्युलोकात व स्वर्गलोकातही दुसरे पुण्यकृत्य नाही.

२१४ स्वकर्तव्याची जाणीव ठेवून जो आपले आयुष्य वेचतो, तोच जिवंत मनुष्य. इतर सर्व मृतवत होत.

२१५ स्वकर्तव्यनिष्ट बुद्धिमान मनुष्याची संपत्ती म्हणजे काठोकाठ भरलेल्या गावातील सार्वजनिक तळ्यासारखी आहे.

२१६ सद्गुणी व उदारधी मनुष्याजवळ असलेली संपत्ती म्हणजे गावाच्या मध्यभागी उभ्या असलेल्या मधुर फळांनी ओथंबणाऱ्या वृक्षासारखी आहे.

२१७ थोर व उदार मनुष्याजवळ असलेली संपत्ती अशा वृक्षासारखी असते. की त्याचा प्रत्येक भाग रामबाण औषधाप्रमाणे उपयोगी पडतो.

२१८ स्वकर्तव्यनिष्ठ उदार मनुष्य दारिदद्र्याने गांजलेला असला, तरी परोपकार करण्याची आपली वृत्ती सोडीत नाही.

२१९ पूर्वीप्रमाणे परोपकार करण्यास आपण असमर्थ झालो आहो, अशी जाणीव जेव्हा उदार मनुष्यास होते, तेव्हाच त्याला आपण दरिद्री झालो आहो, असे वाटते.

२२० दान करून जवळची संपत्ती संपल्यामुळे (दान करण्याच्या) स्वकर्तव्याची हानी होत असेल, तर स्वतःला विकूनही ती हानी विकत घेण्यासारखी आहे.

(२१२) **न्यायागतस्य द्रव्यस्य बोद्धव्यौ द्वावतिक्रमौ ।**
अपात्रे प्रतिपत्तिश्च पात्रे चाप्रतिपादनम् ।।

—मभा ५·१३·५९

(२१३) **यमाजीवन्ति पुरुषं सर्वभूतानि संजय ।।**
पक्वं द्रुममिवासाद्य तस्य जीवितमर्थवत् ।।

—मभा ५·१३३·४३

(२१९) **नाऽतःपरं वैनतेय किञ्चित् पापिष्टमुच्यते ।**
यथाऽऽशानाशनाल्लोके देहि नाऽस्तीति वा वचः ।।

—मभा ५·११५·९

अनुक्रमणिका

अध्याय २३ — दान

२२१ गरजवंत, दीनदुबळ्यास दिलेले दान तेच खरे दान. अन्य प्रकारचे दान म्हणजे परतफेडीच्या अपेक्षेने दिलेले ऋणच.

२२२ मोक्षदायक असला तरी प्रतिग्रह वाईटच. उलटपक्षी दानाने मोक्षप्राप्ती होण्यासारखी नसली, तरीही ते उत्तमच.

२२३ दान देण्याची असमर्थता दीनवाणेपणाने प्रकट करण्यापूर्वी जवळचे सर्वस्व देऊन टाकलेले असणे, हेच कुलीनपणाचे लक्षण होय.

२२४ याचकाच्या मुद्रेवर जोपर्यंत तृप्तीचे प्रसन्न हास्य दिसू लागले नाही, तोपर्यंत (याचनाच नव्हे, तर) दानही दुःखदायक असते.

२२५ क्षुधा सहन करणे हे तपस्वी जनांच्या सामर्थ्याचे लक्षण खरेच. पण क्षुधितांची क्षुधाशांती केल्याने प्राप्त होणाऱ्या समाधानापेक्षा ते गौणच!

२२६ क्षुधितांची क्षुधा शांत करून त्यांची व्यथा दूर करणे म्हणजे भविष्यकाळी आपणांस उपयोगी पडण्यासाठी पेढीवर द्रव्य गुंतविणे होय.

२२७ आपल्या अन्नात क्षुधितांना सहभागी करून जो भोजन करतो, त्याला क्षुधानामक रोगाची बाधा होत नाही.

२२८ दान न करता संचय केलेल्या धनाचा (स्वतःसाठी) व्यय करण्याइतके जे कठोर हृदयी आहेत, त्यांना दानाने प्राप्त होणाऱ्या आनंदाची कल्पनाच नसते!

(२२१) **यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः ।**
दयिते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ।।

—गीता १७·२१

(२२५) **यच्च दानपतिं शूरं क्षुधिताः पृथिवीचराः ।**
प्राप्य तुष्टाः प्रतिष्ठन्ते धर्मः कोऽभ्यधिकस्ततः ।।

— मभा ५·१३२·२८

(२२६) **नास्ति सत्यसमो धर्मो नास्ति दानसमो निधिः ।**

— मभा १३·६२·९२

(२२८) **अभिगम्याभिगम्यैवं याचन्ते सततं नराः ।**
न चाप्युत्सहते दातुं वित्तरक्षी महाजनान् ।।

अनुक्रमणिका

—मभा १२·३२०·४३

२२९ आपल्या संपत्तीत इतरांस सहभागी न करता तिचा जो एकटाच उपभोग घेतो, त्याची ती कृती ही भिक्षा मागण्यापेक्षाही दुःखदायक आहे.

२३० मरण ही सर्वांत दुःखदायक घटना खरी. पण इच्छा. असूनही दान देण्याचे सामर्थ्य नसल्यामुळे निर्धनास येणारे मरण हे सुखदायक असते.

अध्याय २४—कीर्ती

२३१ दान देत देत आयुष्य व्यतीत करून मिळविलेले जे यश, त्यापेक्षा या जगात अन्य श्रेष्ठ वस्तू नाही.

२३२ गरजवंत याचकांस दान करणाऱ्या दात्याची कीर्ती हाच या जगात वक्त्यांच्या भाषणात येणाऱ्या प्रशंसेचा विषय असतो.

२३३ मरणोत्तर मिळणाऱ्या महान कीर्तीवाचून शाश्वत व श्रेष्ठ संपत्ती या जगात नाही.

२३४ इहलोकात पुण्यकर्मे करून जे कीर्ती संपादन करतात, त्यांची प्रशंसा देवलोकातही होते. अशी प्रशंसा ज्ञानी किंवा विद्वान लोकांच्याही वाट्यास येत नाही.

२३५ मृत्यूमुळे स्थूल शरीराचा जरी नाश झाला, तरी ज्ञात्याचे यशः शरीर मरणोत्तरही चिरंजीव होते.

२३६ जन्म घेऊन कीर्ती संपादन करावयाची असली, तरच जन्म घ्या. नाहीतर जन्म न घेणेच चांगले.

(२३०) दारिद्र्यं खलु पुरुषस्य जीवितं मरणम् ।

—चासू २५७

(२३३) यावत्कीर्तिर्मनुष्यस्य न प्रणश्यति कौरव ।
तावज्जीवति गान्धारे नष्टकीर्तिस्तु नश्यति ॥

—मभा १·२०३·११

(२३४) पुरुषस्य परे लोके कीर्तिरेव परायणम् ।
इहलोके विशुद्धा च कीर्तिरायुर्विवर्धनी ॥

—मभा ३·३००·३४

(२३५) यशःशरीरं न विनश्यति ।

—चासू २९८

अनुक्रमणिका

(२३६) **कीर्त्यर्थं तु समारंभः सर्वेषां सुमहात्मनाम् ।**

— रामा ७·४५·१३

२३७ ज्यांनी आपल्या आयुष्यात कीर्ती न मिळविता अपकीर्तीच संपादन केली, त्यांनी स्वतःला दोष न देता निंदकास का दोष द्यावा?

२३८ नश्वर शरीराचा नाश झाल्यानंतर मागे राहणारी कीर्ती न्यास आयुष्यात संपादन करता आली नाही, त्याचे आयुष्य कलंकमयच म्हटले पाहिजे.

२३९ यशोहीन लोकांच्या शरीराचा भार सहन करणारी धरणी आपला सुपीकपणाही गमावून बसेल!

२४० निष्कलंक व कीर्तिमान जीवन हेच खरे जीवन. यशोहीन आयुष्य हे मृत्युतुल्यच होय.

(२३९) **अवशो भयं भयेषु ।**

—चासू ३१५

(२४०) **कीर्तिर्हि पुरुषं लोके संजीवयति मातृवत् ।**
अकीर्तिर्जीवितं हन्ति जीवतोऽपि शरीरिणः ॥

—मभा ३·३००·३२

अनुक्रमणिका

भाग ३—संन्यास-धर्म

अध्याय २५ — दयाळूपणा

२४१ दया हे धन सर्वांत श्रेष्ठ आहे. आपण ज्याला धन म्हणतो, ते तर नीच लोकांजवळही असते.

२४२ दीर्घ संशोधनांती दया हा उत्तम गुण असल्याचे तुम्हाला आढळून येईल. दया हीच मोक्षमार्गात साहाय्यक होते.

२४३ ज्यांच्या अंगी करुणेची वस्ती आहे, त्यांचा नरकलोकात प्रवेश होत नाही.

२४४ जीवमात्राविषयी दयेची भावना मनात बाळगून जो तिचे संरक्षण करतो, त्याच्या जिवाला या जगात कोणत्याही भयप्रद गोष्टीची पीडा होत नाही, असे ज्ञाते सांगतात.

२४५ करुणामय अंतःकरणाच्या लोकांस या जगात कसलीच पीडा होत नाही. वायूचा या जगातील मुक्त संचार हाच या गोष्टीचा पुरावा आहे.

२४६ ह्या जगात जे निर्दय लोक कठोर कर्माचे आचरण करतात, त्यांना पूर्वजन्मी झालेल्या उपेक्षेमुळे सदाचरणाचे विस्मरण झाले असावे, असे ज्ञाते सांगतात.

२४७ इहलोकात निर्धनास स्थान नाही. परलोकात निर्दयास स्थान नाही.

२४८ निर्धन व्यक्तींचा पुढे मागे कदाचित उत्कर्ष होईल. पण निर्दयांच्या बाबतीत तसे होण्याची मुळीच शक्यता नाही.

२४९ निर्दय मनुष्याचे धर्माचरण म्हणजे सूक्ष्म ज्ञानाच्या अभावी मनुष्याने आत्म्याचे संशोधन करण्यासारखे आहे.

२५० तुमच्यापेक्षा दुर्बल असणाऱ्यांना भीती दाखवून पळवून लावीत असताना, तुमच्यापेक्षा सबळ मनुष्यासमोर तुमची काय स्थिती होईल याचा विचार करा.

(२४२) **परो धर्मात्पाण्डवास्याऽनृशंस्यं**
धर्मः परो वित्तचयान्मतोऽस्य ।
सुखप्रियेऽधर्महीनेऽनपार्थेऽ
नुरुध्यते भारत तस्य बुद्धिः ।।

—मभा ५·३२·१२

अनुक्रमणिका

अध्याय २६ – मांसाहार

२५१ आपल्या शरीरावरील मांस वाढविण्यासाठी जो दुसऱ्याचे मांस खातो, त्याच्या अंतःकरणात करुणा उत्पन्न होणे कसे शक्य आहे?

२५२ संपत्तीचे संरक्षण दक्षतेने न करणारास सघनत्वाचा मान मिळत नाही. तसेच मांसाहारी लोकांस दयाळूपणाचा मान मिळणार नाही.

२५३ प्राणघातक शस्त्रे वापरणारांची आणि मांसाहार करणाऱ्या लोकांची अंतःकरणे सदय असणे शक्य नाही.

२५४ अहिंसा म्हणजे दया. हिंसा म्हणजेच निर्दयपणा. मांसाहार हाच अधर्म.

२५५ मांसाहाराच्या निषेधामुळेच मानव या जगात जिवंत राहतो. म्हणूनच मांसाहारामुळे नरकात पिचणाऱ्या लोकांची मुक्तता होत नाही.

२५६ मांसाहाराचा त्याग करून लोकांनी मांसाची मागणी केली नाही, तर जीवहत्या होणार नाही, व कोणी मांस-विक्रयही करणार नाही.

२५७ मांस मिळविण्यासाठी दुसऱ्याच्या जिवावर घाव घालावा लागतो, असा विचार करून तरी मांसाहाराचा त्याग केला पाहिजे.

२५८ जिवंत प्राण्याच्या शरीरातून प्राण निघून गेल्यानंतर मागे राहिलेल्या शरीरातून मांस मिळते. याचा नीट विचार करून निर्दोष बुद्धिमान लोक मांस भक्षण करीत नाहीत.

२५९ तुपाच्या आहुती देऊन सहस्र यज्ञ करण्यापेक्षा एकही जिवाची हत्या न करणे व मांसाहार न करणे हे कितीतरी श्रेष्ठ आहे.

(२५१) **स्वमांसं परमांसेन यो वर्धयितुमिच्छति ।**
नास्ति क्षुद्रतरस्तस्मात्स नृशंसतरो नरः ।।

— मभा १३·११६·११

(२५७) **नाकृत्वा प्राणिनां हिंसां मांसमुत्पद्यते क्वचित् ।**
न च प्राणिवधः स्वर्ग्यस्तस्मान्मांसं विवर्जयेत् ।।

— मनु ६·४८

(२५८) **न हि मांसं तृणात्काष्टायुत्पलाद्वापि जायते ।**
हत्वा जन्तुं ततो मांसं तस्माद्दोषस्तु भक्षणे ॥

—मभा १३·११५·२६

अनुक्रमणिका

२६० हिंसा आणि मांसाहार यांचा जो त्याग करील, त्याला अखिल प्राणिमात्र हात जोडून प्रणाम करतील.

अध्याय २७ — तपश्चर्या

२६१ स्वतःवर कोसळलेली दुःखे सहन करणे व दुसऱ्यास दुःख न देणे हेच तपश्चर्येचे खरे स्वरूप.

२६२ तपाचरण करणारांनीच तपस्व्याचा वेष धारण करणे उचित होय. नाहीतर तो वेष व्यर्थच होय.

२६३ तपस्वी लोकांचे धारणपोषण करता यावे म्हणूनच की काय अन्य आश्रमी (गृहस्थाश्रमी) तपाचरण करण्याचे विसरून गेले!

२६४ शत्रूंचा नाश करणे व मित्रास संपन्न करणे या गोष्टी करण्याचें मनात आणिलें तर तपस्वी जनांस त्यांच्या तपःसामर्थ्यामुळे त्या सहज साध्य आहेत.

२६५ इष्ट वस्तूंची प्राप्ती इष्ट समयी करून घ्यावयाची असेल, तर इहलोकी व या म्हणजे गृहस्थाश्रमात तपाचरणाचे कष्ट केले पाहिजेत.

२६६ तपश्चर्या करणारे लोकच स्वकर्तव्यतत्पर असतात. इतर लोक आसक्तीच्या आधीन होऊन त्यांचे प्रयास व्यर्थ होतात.

२६७ सोने अग्नीत अधिकाधिक तापवून ते अधिकाधिक निर्मळ झाल्याने त्याची प्रभा फाकते. त्याचप्रमाणे तपश्चर्येच्या अविरत कष्टांनी मनुष्य अधिकाधिक तेजस्वी होतो.

२६८ तपश्चर्येच्या योगाने ज्याने आपला अहंकार नष्ट केला आहे, त्याच्यापुढे अन्य जीव नम्र होऊन त्याची सेवा करतील.

(२६०) **मांसभक्षणमयुक्तं सर्वेषाम् ।**

—चासू ५६३

(२६१) **तप्यन्ते लोकतापेन साधवः प्रायशो जनाः ।**
परमाराधनं तद्धि पुरुषस्याखिलात्मनः ।।

—भाग ८·७·४४

(२६७) **दह्यन्ते ध्यायमानानां धातूनां हि यथा मलाः ।**
नथेन्द्रियाणां दह्यन्ते दोषाः प्राणस्य निग्रहात् ।।

—मनु ६·७१

अनुक्रमणिका

२६९ तपश्चयत मग्न होण्याऱ्या व्यक्ती आपल्या सामर्थ्याने यमावरही विजय मिळवतात.

२७० या जगात अनेक लोक आनंदास पारखे होतात, याचे कारण तपस्वी लोक अल्पसंख्या, तर तपश्चर्येची उपेक्षा करणारे अधिक असतात.

अध्याय २८ – दंभाचरण

२७१ ज्याच्या अंतःकरणात दंभाची वस्ती आहे, अशा व्यक्तीच्या शरीरातील पंचमहाभुते सुद्धा त्याच्या दांभिक आचरणाची चेष्टा करतात.

२७२ आपले मन जर जाणूनबुजून दुराचरणास बळी पडत असेल, तर स्वर्गातही शोभणाऱ्या बाह्य वेषाचा व अवडंबराचा काय उपयोग?

२७३ अंगी सामर्थ्य नसून जी सामर्थ्यसंपन्न माणसाप्रमाणे बाह्याचरण करू पाहतो, तो वाघाचे कातडे पांघरून शेतात चरणारा बैलच होय.

२७४ तपस्व्याचा वेष धारण करून दुराचरण करणारा ढोंगी मनुष्य उंच गवतात दडून राहून जाळ्यात पक्षी पकडणाऱ्या पारध्याप्रमाणे होय.

२७५ सर्वसंग-परित्यागाचे ढोंग करणाऱ्या दुराचारी लोकांना केव्हा तरी आपल्या आचरणाचा पश्चात्ताप होईलच.

२७६ अंतःकरणापासून कामनांचा त्याग केल्यावाचून जे संन्यासाचे ढोंग करतात, त्यांच्यापेक्षा अधिक कठोर हृदयाचे लोक या जगात नाहीत.

२७७ एका बाजूने आकर्षक दिसणाऱ्या पण दुसऱ्या बाजूने काळ्या असणाऱ्या गुंजेप्रमाणे बाहेरून सज्जन दिसणारे पण काळीकुट्ट अंतःकरणे असणारे अनेक लोक या जगात आहेत.

(२६९) **दुरन्वयं दुष्प्रधर्षं दुरापं दुरतिक्रमम् ।**
सर्वं हि तपसाभ्येति तपो हि बलवत्तरम् ।।

—मभा १३·१२२·८

(२७२) **कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।**
इन्द्रियाणां विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ।।

—गीता ३·६

(२७७) **योऽन्यथा सन्तमात्मानमन्यथा प्रतिपद्यते ।**
किं तेन न कृतं पापं चौरेणात्मापहारिणा ।।

मभा ५·४२·३७

अनुक्रमणिका

२७८ मनातून पापी वासना बाळगणारे पण बाह्यतः साधुसंन्याशांप्रमाणे तीर्थात स्नान करणारे अनेक दुर्जन या जगात आहेत.

२७९ बाण आकाराने सरळ असला तरी प्राणघातक असतो. वीणा वक्राकार असली, तर तिचा झंकार मधुर असतो. मनुष्याची परीक्षा त्याच्या आचरणावरून करा.

२८० जगातील निंद्य दुराचरणाचा त्याग केल्यानंतर डोक्याचे मुंडण करण्याची किंवा डोक्यावरील जटा वाढविण्याची आवश्यकता नाही.

अध्याय २९ – अस्तेय

२८१ दुसऱ्यांकडून निंदा किंवा तिरस्कार यास पात्र न होता जर तुमचा आयुष्यक्रम चालवावयाचा असेल, तर दुसऱ्याच्या वस्तूची चोरी करण्याचा विचारही मनात आणू नका.

२८२ मनात लोभाचा प्रादुर्भाव होणे हेही पापच. म्हणून दुसऱ्याची वस्तू त्याच्या न कळत घेण्याचा विचारही करू नका.

२८३ चोरीच्या मार्गाने प्राप्त झालेले वैभव उत्कर्षाच्या मार्गावर नेत आहे, असे भासते. पण वस्तुतः ते विनाशाच्या मार्गावरून जात असते.

२८४ दुसऱ्याच्या वैभवावर दृष्टी ठेवून वागत असता परिणामी अतीव निराशाच पदरी पडेल.

२८५ दुसरा सावध नसता त्याच्या संपत्तीचे अपहरण करण्याची संधी जो पाहात असतो, त्याच्या अंतःकरणात दया व प्रेम यांना स्थान नसते.

२८६ दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार करण्याची इच्छा जे बाळगतात, ते सदाचाराच्या मार्गाने जाऊच शकत नाहीत.

(२८१) **मा गृधः कस्यस्विद् धनम् ।**

—ईशा. १

(२८२) **मूलं लोभस्य मोहो वै कालात्मणतिरेव च ।**
छिन्ने भिन्ने तथा लोभे कारणं काल एव च ।।

—मभा १२·१५९·११

(२८४) **परविभवेष्यादरोऽपि नाशमूलम् ।**

—चासू २६७

अनुक्रमणिका

२८७ सदाचरणी व विद्वान लोकांच्या अंतःकरणात चोरीसारख्या कृष्णकृत्यांचा विचारच येणार नाही.

२८८ सज्जनांच्या अंतःकरणात धर्मबुद्धीचा वास असतो, तर चोरांच्या मनात वंचनेची वस्ती असते.

२८९ चौर्यकर्मावाचून अन्य कोणत्याच कलेचे ज्यास ज्ञान नाही, त्यांच्या हातून दुराचरण घडून त्यातच त्यांचा त्वरित नाश होईल.

२९० चोरांच्या जिवंत शरीरांना इहलोकात देखील थारा मिळत नाही. उलट सदाचरणी लोकांचा त्याग स्वर्गलोकही करणार नाही. तेथे त्यांचे स्वागतच होईल.

अध्याय ३० —सत्यवचन

२९१ ज्याच्या परिणामी हानी न होता हितच होते, ते सत्यवचन.

२९२ पापांवर पांघरूण न घालता परिणामी हितकर होणारे असत्यवचनसुद्धा सत्यवचन म्हणूनच समजावे.

२९३ तुमच्या अंतःकरणास जे असत्य वाटते, त्याचा उच्चार करू नका. ते असत्य म्हणून उघडकीस आले, तर ते तुमच्या अंतःकरणाचा दाह करील.

२९४ असत्यापासून जो जाणूनबुजून चार हात दूर राहील, त्याला लोकांच्या अंतःकरणात आदराचे स्थान मिळेल.

२९५ ज्याच्या मनात व वाणीत सत्याची वस्ती आहे, त्याची योग्यता तपोधन व दातृत्वसंपन्न मनुष्यापेक्षाही अधिक आहे.

(२९२) यद्भूतहितमत्यन्तमेतत्सत्यं ब्रवीम्यहम् ।

— मभा १२·२८७·२०

(२९४) न मे वृथा व्याहृतमेव वाक्यं
सत्यं हि सन्तः प्रतिपूजयन्ति ।

— मभा १·९३·२५

(२९५) नास्ति सत्यात्परं तपः ।

— चासू ४१७

२९६ सत्यधर्माच्या आचरणाहून श्रेष्ठ असे या जगात काही नाही. कष्ट न करताच ते तुमच्या गाठी पुण्य बांधील.

२९७ सदैव सत्यवचनाचा आश्रय केल्याने तुम्हाला पुण्यप्राप्ती होईल. अन्य सद्‌गुणांचे आचरण करण्याची आवश्यकताच मग राहणार नाही.

२९८ बाह्यांगाची शुद्धी जलाने होते. अंतरंगाची शुद्धी सत्याने होते.

२९९ पुण्यवान विद्वज्जनांना सामान्य दीपक हे दीपक नव्हेत. सत्यवचन हाच त्यांचा दीपक.

३०० आमच्या विचारशक्तीची मर्यादा जेथवर पोचते, तेथवर विचार करून आम्ही असे सांगतो की, सत्यापेक्षा श्रेष्ठ असे या जगात काही नाही.

अध्याय ३१ – अक्रोध

३०१ ज्याच्यावर (तो लहान असल्यामुळे) आपल्या क्रोधाचा प्रभाव पडू शकतो, अशावर न रागावणे म्हणजेच खरा अक्रोध. ज्याच्यापुढे(तो श्रेष्ठ असल्यामुळे) आपली मात्रा चालत नाही, त्याच्यावर रागावले काय वा न रागावले काय, सारखेच.

३०२ आपल्या क्रोधाचा इष्ट परिणाम न झाला तर वाईट वाटणारच, (पण म्हणून) क्रोधाचा परिणाम होतो या निमित्ताने दुर्बळावर राग काढणे, यापेक्षा वाईट ते काय?

(२१६) **नास्ति सत्यसमो धर्मो न सत्याद्विद्यते परम् ।**
न हि तीव्रतरं किंचिदनृतादिह विद्यते ।।

—मभा १·७४·१०५

(३००) **अश्वमेधसहस्त्रं च सत्यं च तुलया धृतम् ।**
अश्वमेधसहस्त्राद्धि सत्यमेव विशिष्यते ।।

—मभा १२·१६२·२६

(३०१) **द्वाविमौ कण्टकौ तीक्ष्णौ शरीरपरिशोषिणौ ।**
यश्चाधनः कामयते यश्च कुप्यत्यनीश्वरः ।।

—मभा ५·३३·५६

३०३ तुम्हाला क्रोध आणण्याचा कोणी प्रयत्न केला, तरी क्रोध विसरून वागले पाहिजे. कारण क्रोध हाच अनेक पापे व दुष्कृत्ये यांचा जनक आहे.

३०४ प्रसन्न हास्य व आनंद यांचा क्रोध वध करतो. म्हणून क्रोधापेक्षा मोठा शत्रू कोणी आहे काय?

३०५ या जगात स्वतःचे संरक्षण कोणापासून करायचे असेल तर ते क्रोधापासून. नाही तर तोच तुमचा बळी घेईल.

अनुक्रमणिका

३०६ तावडीत सापडलेल्यांचे भस्म करणे हा क्रोधाग्नीचा स्वभावच आहे. म्हणून गरजेच्या वेळी नौकेप्रमाणे साहाय्य करून तुम्हाला आनंद देणाऱ्या मित्रमंडळींचाही तो नाश करील.

३०७ जमिनीवर जोराने थपडा मारल्यानंतर हाताला झिणझिण्या येतात. राघोबादादांशी मैत्री ठेवणाराला तसाच अपाय होतो.

३०८ (तुमच्यावर) अग्निगोलक फेकण्याइतकी तीव्र पीडा तुम्हाला कोणी दिली, तरीही क्रोधाधीन न होणे हे उत्तम.

(३०३) अव्याधिजं कटुकं शीर्षरोगी
यशोऽमुपं पापफलोदयं वा ।
सतां पेयं यन्न पिबन्त्यसन्तो
मन्युं महाराज पिब प्रशाम्य ।।

—मभा ५·२७·२३

(३०४) क्रोधो हि धर्मं हरति यतीनां दुःखसंचितम् ।
ततो धर्मविहीनानां गतिरिष्टा न विद्यते ।।

—मभा १·४२·८

(३०५) चर क्रोधमिमं हत्वा नैवं धर्मं प्रहास्यसि ।

— मभा १·४२·७

(३०७) परं क्षिपति दोषेण वर्तमानः स्वयं तथा ।
यश्च कुप्यत्यनीशानः स च मूढतमो नरः ।।

—मभा ५·३३·३७

(३०८) आक्रुष्टस्ताडितः क्रुद्धः क्षमते यो बलीयसा ।
यश्चनित्यं जितक्रोधो विद्वानुत्तमपूरुषः ।।

—मभा १३·२९·३३

३०९ अंतःकरणात क्रोधास मात्र स्थान दिले नाही, तर सर्व इष्ट वस्तूंची त्वरित प्राप्ती होईल.

३१० अतिक्रोधाने अंध झालेला मनुष्य मेल्यासमान असतो. क्रोधास जिंकणारा मनुष्य मोक्षाचा स्वामी होतो.

अध्याय ३२ – पर-पीडा

३११ संपत्तीच्या समृद्धीमुळे जरी कीर्ती प्राप्त होत असली, तरी निष्कलंक चारित्र्याचे लोक तिच्या प्राप्तीसाठी पर-पीडेचे अवलंबन करीत नाहीत.

अनुक्रमणिका

३१२ दुसऱ्याने दिलेल्या पीडेचा प्रतिशोध घेण्यासाठीही दुसऱ्यास पीडा न देणे, हा निष्कलंक चारित्र्याच्या लोकांचा स्वभावच असतो.

३१३ तुम्हाला निष्कारण पीडा देणाऱ्याचा प्रतिशोध घेण्यासाठीही तुम्ही त्यास पीडा दिली, तर तुमची अधोगती होईल.

३१४ तुमचा अपराध करणारास तुम्ही दंड करू इच्छीत असाल, तर त्याचा अपराध व तुमची क्षमा विसरून त्याला लज्जित करणे हाच दंडाचा खरा मार्ग आहे.

३१५ दुसऱ्यास होत असलेले दुःख स्वतःलाच होत आहे असे मानून, त्याचे रक्षण जर केले नाही, तर आपल्या ज्ञानाचा काय उपयोग?

(३०९) सर्वं जयत्यक्रोधः ।

—चासू ३५०

(३१०) तपते यजते चैव यच्च दानं प्रयच्छति ।
क्रोधेन सर्वं हरति तस्मात्क्रोधं विवर्जयेत् ।।

—रामा ८·५९

(३११) व्याजेन विन्दन्वित्तं हि धर्मात्स परिहीयते ।

—मभा १२·१३२·१८

(३१२) विद्वांस्तथैव यः शक्तः क्लिश्यमानो न कुप्यति ।
अनाशयित्वा क्लेष्टारं परलोके च नन्दति ।।

—मभा ३·२९·१२

३१६ जी गोष्ट स्वतःला वाईट म्हणून वाटली, तिचा प्रयोग दुसऱ्यावर करण्याचा विचार सोडून दिला पाहिजे.

३१७ एखादे अगदी साधारण असे वाटणारे दुष्कृत्य मनात आले तर त्याचा प्रयोग केव्हाही कोणावरही न करणे ही श्रेष्ठ नीती होय.

३१८ एखाद्या दुष्कृत्याने आपणास पीडा होते हे ज्याला समजते, त्याने त्याच दुष्कृत्याचा प्रयोग दुसऱ्यावर करून त्याला का पीडा द्यावी?

३१९ प्रातःकाळी तुमच्या शेजाऱ्यास जर तुम्ही दुःख दिले, तर सायंकाळपर्यंत तुमच्यावर तेच आपोआप उलटेल.

अनुक्रमणिका

३२० दुसऱ्यास पीडा देणारी दुष्कृत्ये स्वतःवरच उलटतात. म्हणून ज्याला दुःखरहीत जीवन घालावावयाचे असेल, त्याने दुसऱ्यास दुःख देऊ नये.

अध्याय ३३ – अहिंसा

३२१ सर्वांत श्रेष्ठ धर्म कोणता? अहिंसा. सर्व पापांचे मूळ हिंसेतच असते.

३२२ स्वतःजवळचे अन्न सर्वांस वाटून झाल्यावर उरलेले आपण खावे, व अशा प्रकारे सर्वांचे रक्षण करावे, हाच सर्वश्रेष्ठ धर्म, असे अनेक धर्मग्रंथ सांगतात.

३२३ अहिंसा हा सर्वोत्तम व अतुलनीय धर्म होय. धर्मात त्यानंतर सत्याचा क्रम लागतो.

३२४ सन्मार्ग कोणता असा जर प्रश्न केला तर त्याचे उत्तर हेच की, कोणाचीही हिंसा न करणे हाच सर्वोत्तम मार्ग.

(३१६) **न तत्परस्य सन्दध्यात् प्रतिकूलं यदान्मनः ।**
संग्रहेणैव धर्मः स्यात्कामादन्य प्रवर्तते ।।

—मभा ५·३९·७२

(३२१) **अहिंसा परमो धर्मः ।**

—मभा ३·२०७·७४

(३२२) **स्वजनं तर्पयित्वा यः शेषभोजी सोऽमृतभोजी ।**

—चासू ५६१

(३२३) **अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् ।**

—गीता १६·२

३२५ जन्ममरणाच्या भवचक्रास भिऊन जे संन्यासमार्ग पत्करतात, त्या सर्वांत हिंसेचा त्याग करून अहिंसेस उत्तेजन देणारा उत्तम होय.

३२६ अहिंसा ही श्रेष्ठ मानून तिचे आचरण निष्ठेने करणाऱ्या मनुष्याच्या प्राणावर प्राणभक्षक यमराजाचीही सत्ता चालत नाही.

३२७ स्वतःचा प्राण अर्पण करण्याची वेळ आली, तरीही दुसऱ्यांचा प्राण घेता कामा नये.

३२८ (यज्ञ इत्यादी प्रसंगी) हिंसा केल्याने पुण्य प्राप्त होण्याचा संभव असला, तरी विद्वान व बुद्धिमान लोक हिंसा त्याज्यच समजतात.

अनुक्रमणिका

३२९ हिंसाचार करणारे दुष्ट लोक विद्वान लोकांच्या मते अती नीच प्रतीचे होत.

३३० शारीरिक व्याधी आणि दारिद्र्य यांनी ज्या दुर्दैवी लोकांचे आयुष्य ग्रस्त झाले आहे, त्यांनी पूर्वजन्मी कोणातरी प्राण्याची हिंसा केली असली पाहिजे, असे म्हणतात.

अध्याय ३४—अनित्यत्व

३३१ अनित्य वस्तूंना शाश्वत समजणे यासारखा दुसरा मूर्खपणा नाही.

३३२ नृत्योत्सव पाहण्यासाठी प्रेक्षकांचा समुदाय जसा हळूहळू येतो, तसेच संपत्तीचे आगमनही क्रमाक्रमाने होते. त्याचप्रमाणे प्रेक्षकांचे आणि संपत्तीचे निर्गमनही क्रमाक्रमाने होते.

३३३ संपत्ती ही स्वभातःच अनित्य असते. जर ती दैवयोगाने प्राप्त झाली, तर तिच्यामुळे परिणामी मिळणाऱ्या शाश्वत वस्तूंचा किंवा गुणांचा लाभ त्वरित करून घेतला पाहिजे.

३३४ दिवस हे काळाचे एक परिमाण आहे खरे. पण ज्ञात्यास हे माहीत आहे की, आयुष्य (म्हणजेच काळ) ही हळूहळू कापून कमी करणारी करवत आहे.

३३५ जीभ लुळी पडून मृत्युसमयीची उचकी लागण्यापूर्वीच त्वरेने काही पुण्यकर्म करा.

(३३४) आयुषः खण्डखण्डाश्च निपतन्तः पुनः पुनः ।
न कश्चिद् वेत्ति कालेन क्षतानि दिवसान्यहो ।।

— योवा ७·९३·५१

(३३५) येन खट्वा समारूढः परितप्येत कर्मणा ।
आदावेव न तत्कुर्यादध्रुवे जीविते सति ।।

—मभा ५·३९·२९

३३६ "एखादा मनुष्य काल विद्यमान होता, आज नाही" असे म्हणावयास लावणारे या जगातील जीवन क्षणभंगुर असते, व हाच त्याचा महिमा आहे.

३३७ आपले जीवन क्षणभंगुर आहे याचे ज्ञान मनुष्यास असते. आणि तरीही कोट्यवधी नव्हे, तर असंख्य विषयांच्या चिंतनात तो निमग्न असतो.

३३८ काही काळ अंड्याच्या अंतर्भागी वास्तव्य करून पक्ष्याचे पिलू त्यापासून विभक्त होऊन उडून जाते. मृत्युसमयी शरीरास सोडून जाणाऱ्या आत्म्याचा त्या शरीराशी संबंध याच प्रकारचा असतो.

३३९ मरण हे निद्रेसमान आहे. तर जन्म हा झोपेतून जागे होण्यासारखा आहे.

अनुक्रमणिका

३४० हे शरीर म्हणजे प्राणाचे तात्पुरते निवासस्थान (बिऱ्हाड) आहे. प्राणाला जणू काही शाश्वत वसतिस्थान सापडलेच नाही!

अध्याय ३५ – संन्यास

३४१ ज्या ज्या वस्तूंच्या बंधनातून मनुष्य मुक्त होतो, त्यापासून त्याला दुःख होण्याचे बंद होते.

(३३६) को हि जानाति कस्माद्य मृत्युकालो भविष्यति ।
युवैव धर्मशीलः स्यादनित्यं खलु जीवितम् ।।

—मभा १२·१७५·१६

(३३७) अल्पकालं जीवितं यन्मनुष्ये
महास्त्रावं नित्यदुःखं चलं च ।
भूयश्च तद्यशसो नाऽनुरूपं
तस्मात्पापं पाण्डव मा कृथास्त्वम् ।

—मभा ५·२७·३

(३३८) नेह चात्यन्तसंवासः कर्हिचित्केनचित्सह ।
राजन्स्वेनापि देहेन किमु जायात्मजादिभिः ।।

— भाग १०·४९·२०

(३४०) यथा हि पुरुषः शालां पुनः संप्रविशेन्नवाम् ।
एवं जीवः शरीराणि तानि तानि प्रपद्यते ।।

—मभा १२·१५·५७

(३४१) यतो यतो निवर्तते ततस्ततो विमुच्यते ।
निवर्तनाद्धि सर्वतो न वेत्ति दुःखमण्वपि ।।

—मभा ५·३६·१४

३४२ सुखप्राप्तीची इच्छा असेल, तर सर्वस्वाचा त्याग करा. त्यानंतरही इहलोकात अनेक सुखे प्राप्त होतील.

३४३ पंचेंद्रियांच्या सामर्थ्यांचा नाश करा. इंद्रियांना आधारभूत असलेल्या गोष्टींचा किंवा इंद्रिय विषयांचाही त्याग करा.

३४४ संन्यास म्हणजे स्वाभाविकच सर्व वस्तूंचा परित्याग. एखाद्या वस्तूचे किंवा विषयाचे बंधन मागे राहिले, तर पुन्हा गोंधळ निर्माण होतो.

अनुक्रमणिका

३४५ जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त व्हावयाचे असेल तर शरीर हेच सर्वांत मोठे बंधन आहे. मग आणखी बंधने कशासाठी लादून घ्यावयाची?

३४६ "मी, माझे" या ममत्वाच्या मोहाचा जो त्याग करील त्याला स्वर्गाहूनही उच्च लोकात प्रवेश मिळेल.

३४७ आसक्तीच्या बंधनाचा जे त्याग करीत नाहीत, त्यांना अनेक दुःखांची बंधने जखडून ठेवतात, आणि त्यांची मुक्तता होत नाही.

३४८ सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेणारे मुक्त होतात. इतर लोक अज्ञानाच्या जाळ्यात गुरफटून गोंधळतात.

३४९ संसारबंधनातून मुक्त होताच मनुष्य जन्ममृत्यूच्या भवचक्रातून सुटतो. नाही तर जन्ममृत्यूचे रहाटगाडगे चालूच राहते.

३५० बंधनरहित असलेल्या परमेश्वराशी स्वतःला बांधून घ्या. हे बंधन स्वीकारण्यासाठी अन्य बंधनांचा त्याग करावा लागतो.

अध्याय ३६ – तत्त्वबोध

३५१ अशाश्वत वस्तू शाश्वत आहेत असे मानून जे विपरीत ज्ञानाचा आश्रय करतात, ते जन्ममृत्यूच्या चक्रात सापडून दुःखद व नीच योनीत जन्म घेतात.

(३४३) प्रसृतैरिन्द्रियर्दुःखी तैरेव नियतैः सुखी ।
तस्मादिन्द्रियरूपेभ्यो यच्छेदात्मानमात्मना ।।

—मभा १२·२०४·९

(३४४) अथवा वसतो राजन्वने वन्येन जीवतः ।
द्रव्येषु यस्य ममता मृत्योरास्ये प्रवर्तते ।।

—मभा १२·१३·१०

३५२ अज्ञान नाहीसे होऊन शुद्ध व निर्मळ तत्त्वज्ञानाचा लाभ झाला, म्हणजे जन्ममृत्यूचा अंधकार नाहीसा होऊन शाश्वत आनंदाची प्राप्ती होते.

३५३ संशयनिवृती होऊन ज्यांना तत्त्वज्ञान प्राप्त झाले आहे, अशा लोकांना पृथ्वीपेक्षा स्वर्गलोकच जवळचा वाटतो.

३५४ पंचज्ञानेंद्रियांच्या द्वारा प्राप्त होणारे ज्ञान पदरात पडूनही ज्यांना सद्वस्तूचे ज्ञान झाले नाही, त्यांना काहीच लाभ झाला नाही.

अनुक्रमणिका

३५५ आपल्या दृष्टिपथात आलेली वस्तू बाह्यतः कशीही दिसली, तरीही तिच्या अंतरंगाचे पूर्ण ज्ञान करून धेणे हेच खरे ज्ञान.

३५६ श्रवणद्वारा अवश्य त्या अध्ययनानंतर ज्याला तत्त्वज्ञानाची प्राप्ती झाली, त्याला या जगात पुनर्जन्माची भीती नाही.

३५७ स्वतःच संशोधनद्वारा ज्याने तत्त्वज्ञानाची प्राप्ती करून घेतली, त्याला पुनर्जन्माची भीती नाही.

३५८ संसारात पीडा देणारे अज्ञान दूर केल्यानंतर सनातन व सत्य वस्तूचे ज्ञान होते. तेच खरे ज्ञान.

३५९ सर्व बंधनातून मुक्त होऊन सनातन व सर्वाधार सद्वस्तूचे ज्यास ज्ञान होईल, त्याला जन्ममरणापासून होणाऱ्या यातना सतावणार नाहीत.

३६० काम, क्रोध व मोह या तीन मनोविकारांची नावेही पुसून टाकली, तर त्यांनी संसारात दिलेली पीडाही नाहीशी होईल.

अध्याय ३७ – अनासक्ती

३६१ सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी सदैव वास करणारे वासना हे बीज आहे. त्यापासून जन्ममरणाची उत्पत्ती होते.

(३५२) **ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः ।**
तेषामदित्यवद् ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ।।
तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः ।
गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ।।

—गीता ५·१६·१७

(३६०) **त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।**
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत् त्रयं त्यजेत् ।।

—गीता ६१·२१

३६२ वासना बाळगावयाचीच असेल तर जन्ममरणातून मुक्त होण्याची. अनासक्तीच्या बळानेच ते शक्य आहे.

३६३ अनासक्तीसारखी श्रेष्ठ संपत्ती इहलोकी नाही. परलोकी तरी ती कोठे आहे ?

अनुक्रमणिका

३६४ वासनांचा त्याग म्हणजेच चित्तशुद्धी. सत्याची अभिलाषा बाळगली म्हणजे ती सहज साध्य होते.

३६५ अनासक्त लोक हेच खरे मुक्त होत. इतर बंधनांतून मुक्ती ही खरी मुक्ती नव्हे.

३६६ लोभाचे भय बाळगून त्यापासून दूर राहणे हाच धर्म. कारण लोभामुळेच इतरांशी कपटाने वागण्याची बुद्धी होते.

३६७ वासनांचा संपूर्णतः त्याग केला, तर मोक्ष आपोआपच मिळेल.

३६८ अनासक्त मनुष्य दुःखमुक्त होईल. लोभी मनुष्याच्या दुःखाची वृद्धीच होत राहील.

(३६३) **यच्च कामसुखं लोके यच्च दिव्यं महत्सुखम् ।**
तृष्णाक्षयसुखस्यैते नार्हतः षोडशीं कलाम् ।।

—मभा १२·२७६·६

(३६४) **सनावागुराकृष्टो मनो हरिणको नृणाम् ।**
परां विवशतामेति संसारवनगुल्मके ।।

—योवा ३·११०·११

(३६६) **लोभो धर्मस्य नाशाय भगवन्नाऽहमुत्सहे ।**
अनर्हा वरमादातुं तृतीयं राजसत्तम ।।

—मभा २·७१·३५

(३६७) **बद्धो हि वासनाबद्धो मोक्षः स्याद्वासनाक्षयः ।**

—योवा ४·५७·१९

(३६८) **आस्थामात्रमनन्तानां दुःखनामाकरं विदुः ।**
अनास्थामात्रमभितः सुखानामाकरं विदुः ।।

—योवा ४·२७·२७

३६९ दुःखातील महान दुःख जो लोभ, त्याचा जो नाश करील, त्याला शाश्वत सुखाची प्राप्ती होईल.

३७० कधीच तृप्त न होणाऱ्या लोभाचा त्याग करता आला, तर त्याच स्थितीत शाश्वत आनंदाची प्राप्ती होईल.

(३६९) **पापानां विद्धयनुष्ठानं लोभमेव द्विजोत्तम ।**

— मभा ३·२०७·५८

अनुक्रमणिका

(३७०) न तृप्तिः प्रियलाभेऽस्ति तृष्णा नाद्‌भिः प्रशाम्यति ।
संप्रज्वलति सा भूयः समिद्‌भिरिव पावकः ।।

—मभा १२·१८०·२६

अनुक्रमणिका

भाग ४ – दैव

अध्याय ३८ – दैव

३७१ दैव अनुकूल असेल, तरच परिश्रम करून धनप्राप्ती होईल. दैव प्रतिकूल असेल, तर आळसामुळे हाती असलेल्या धनाचाही नाश होईल.

३७२ दुर्भाग्याने वित्तहानी झाली, तर शहाण्याचा मूर्ख होतो. सुदैवाने धनप्राप्ती झाली, तर मूर्खाचाही शहाणा होतो.

३७३ अनेक विद्यांचे अध्ययन करून मनुष्य विद्वान झाला, तरी त्याला पूर्वपुण्याईमुळे लाभलेली उपजत बुद्धी महत्त्वाची आहे.

३७४ या जगात भाग्यानुरूप लोकांचे दोन प्रकार होतात. एक श्रीमान लोकांचा, व दुसरा विद्वान लोकांचा.

३७५ धनप्राप्तीसाठी प्रयत्न करीत असताना, दैव जर अनुकूल असेल, तर वाइटाचे बरे होते. दैव प्रतिकूल असेल, तर बऱ्याचे वाईट होते.

(३७१) दैवमेव परं मन्यं पौरुषं च निरर्थकम् ।
दृष्टवा कुन्तीसुते शुद्धां श्रियं तां महतां तथा ।।

—मभा २·४७·३६

(३७२) न विधिं ग्रसते प्रज्ञा प्रज्ञां तु ग्रसते विधिः ।
विधिपर्यागतानर्थान्प्राज्ञो न प्रतिपद्यते ।।

— मभा १·११८·१०

(३७३) यस्य नास्ति निजा प्रज्ञा केवलं तु बहुश्रुत ।
न स जानाति शास्त्रार्थं दर्वी सूपरसानिव ।।

—मभा २·५५·१

(३७४) समृद्वा गुणतः केचिद् भवन्ति धनतोऽपरे ।
धनवृद्धान्गुणैर्हीनान् धृतराष्ट्र विवर्जथ ।।

— मभा ५·३९·८

(३७५) धात्रा तु दिष्टस्य वशे किलेदं
सर्वं जगच्चेष्टति न स्वतंत्रम् ।

—मभा २·५७·४

३७६ आपल्या भाग्यात एखादी गोष्ट नसेल तर हरप्रयत्नांनी आपण ती सांभाळू शकत नाही. उलट ती जर आपल्या भाग्यात असेल तर फेकून दिल्यानेही ती नाहीशी होणार नाही.

३७७ तुम्ही कोट्यवधी (अगणित) संपत्ती संपादन केली असताही तुमच्या भाग्यात जर तिचा पुष्कळसा भाग नसेल, तर तुम्हाला तिचा उपभोग घेता येणार नाही.

३७८ पूर्वजन्मातील पापामुळे या जन्मात मनुष्य दुःखाने गांजला जातो, त्यामुळेच त्यास सद्बुद्धी होत नाही. नाही तर अन्नान्न दशा झाल्यावर तरी त्याने संन्यासच घेतला असता.

३७९ सुदैवाने सुख प्राप्त झाले म्हणजे त्याचा उपभोग घेण्यात जर आनंद होतो, तर दुर्दैवाने संकटे आली म्हणजे त्याचे दुःख का मानावे?

३८० दैवापेक्षा बलवत्तर काय आहे? दुसऱ्या एखाद्या शक्तीने जर त्याच्यावर आक्रमण केले तर दैव त्यापूर्वीच तिची अडवणूक करील.

(३७६) **दैवं विनाऽतिप्रयत्नं करोति यत्तद्विफलम् ।**

— चासू ९९

(३७७) **सर्वथा भागधेयानि स्वानि प्राप्नोति मानवः ।**

— मभा ५·१७५·३३

(३७८) **भवितव्यं तथा तच्च नानुशोचितुमर्हसि ।**
दैवं प्रज्ञाविशेषेण को निवर्तितुमर्हति ।।

—मभा १·१·२४६

(३७९) **विधिपूर्वं हि सर्वस्य दुःखं वा यदि वा सुखम् ।**

— मभा १·२०४·१५

अनुक्रमणिका

खंड दुसरा —अर्थ

अनुक्रमणिका

भाग १ — राज्य

अध्याय ३९ — राजाचे गुण

३८१ सैन्य, प्रजा, संपत्ती, अमात्य, मित्र व दुर्ग या सहांचा स्वामी असा तो राजा, तो राजसिंह.

३८२ धैर्य, औदार्य, बुद्धिमत्ता व उत्साह हे राजाचे चार स्वाभाविक गुण समजावे.

३८३ सदैव सावधानता, विद्या व दृढनिश्चय हे तीन गुण राजाने संपादन करून ते कधीही सोडू नयेत.

३८४ निर्दोष राज्यशासन, राज्यातील दुर्गुणांचे निष्कासन व साभिमान पराक्रम या तीन गोष्टींनी राजा संपन्न असला पाहिजे.

३८५ धन संपत्तीचे संपादन, रक्षण, वृद्धी व (दान इत्यादी) योग्य मार्गाने व्यय या सर्व कार्यांत राजाने नैपुण्य मिळविले पाहिजे.

३८६ ज्याचे दर्शन सुलभ असते व ज्याच्या वाणीत कठोरता नसते, अशा राजाच्या राज्याची सर्व लोक प्रशंसा करतात.

३८७ ज्या राजाच्या वाणीत माधुर्य असून जो दानशूर आहे, त्याची लोक प्रशंसा करतात व त्यास वश होतात.

३८८ प्रजेचे न्यायाने पालन करणाऱ्या राजाला प्रजा परमेश्वरासमान मानते.

(३८१) स्वाम्यमात्यजनपददुगर्काशेदण्डमित्राणि प्रकृतयः ।

(३८२-३-४) क्षमा तितिक्षा दम आर्जवं च
संत्यंव्रतत्वं श्रुतमप्रमादः ।
भूतानुकम्पा ह्यनुशासनं च
युधिष्टिरे राजगुणाः समस्ताः ।।

—मभा ५·१४९·३४

(३८५) अलब्धमिच्छेद् दण्डेन लब्धं रक्षेदवेक्षया ।
रक्षितं वर्धयेद् वृद्धया वृद्धं दानेन निक्षिपेत् ।।

—मनु ७·१०१

३८९ कानावर आदळणाऱ्या कठोर शब्दांचा आघात सहन करण्याचे सामर्थ्य असलेल्या राजाच्या छत्राखाली सर्व लोक जमतात.

अनुक्रमणिका

३९० औदार्य, दया, न्यायदान आणि प्रजापालन या चार गुणांनी संपन्न असणारा राजा दीपकाप्रमाणे प्रकाशदायी असतो.

अध्याय ४० – विद्याध्ययन

३९१ अवश्य त्या विद्यांचे संपूर्ण व निर्दोष अध्ययन केल्यानंतर त्या ज्ञानास अनुसरून जगातील व्यवहार करा.

३९२ गणितशास्त्र व साहित्य हे या जगातील मनुष्यमात्राचे दोन नेत्र आहेत.

३९३ विद्याध्ययन केलेला मनुष्य हाच खरा नेत्रवान असतो. विद्याध्ययन न केलेल्या मनुष्याचे नेत्र म्हणजे त्याच्या मुखावरील दोन ब्रणच होत.

३९४ विद्वान लोकांचे सुखप्रद संमेलन पार पडल्यानंतर विसर्जनसमयी त्यांची इतकीच व्यथा असते की, पुन्हा आपल्या गाठी दैवयोगाने केव्हा पडतील ?

३९५ जे निर्धन लोक धनवानासमोर नम्र होऊन त्यांच्या साहाय्याने विद्याध्ययन करतात, ते श्रेष्ठ होत. जे असे अध्ययन करीत नाहीत, ते सदा नीच स्थितीतच राहतात.

३९६ वालुकामय प्रदेशात विहीर जितकी खोल खणावी, तितके अधिक पाणी देणारे झरे लागतात. मनुष्याच्या विद्येचे अध्ययन जितके खोल असेल, तितकी त्याची बुद्धी तीक्ष्ण होईल.

३९७ विद्वान लोक जगातील सर्व देश व सर्व नगरे आपलीच समजतात. असे असूनही काही लोक आमरण विद्याध्ययन का करीत नाहीत?

३९८ एका जन्मात संपादन केलेली विद्या मनुष्याला सात जन्म साहाय्यभूत होते.

(३९०) स्वधर्मे वर्तमानस्त्वं किं नु शोचसि पाण्डव ।
राजा हि हन्याद् दद्याच्च प्रजा रक्षेच्च धर्मतः ।।

—मभा १२·३२·६

(३९६) यथा यथा हि पुरुषो नित्यं शास्त्रमवेक्षते ।
तथा तथा विजानाति विज्ञानमथ रोचते ।।

—मभा १२·१३०·१०

३९९ ज्या विद्येपासून स्वतःला आनंद होतो, तिच्यापासून सर्व जगही सुखी होते, हे जाणून विद्वान लोक विद्येचे अधिकाधिक अध्ययन करीत राहतात.

४०० विद्या हे चिरंजीव धन आहे. अन्य कोणतीही संपत्ती इतकी श्रेष्ठ नाही.

अनुक्रमणिका

अध्याय ४१ – विद्याराहित्य

४०१ चांगल्या ग्रंथांचा अभ्यास केला असल्यावाचून विद्वत्सभेत प्रवेश करणे म्हणजे पटावाचून बुद्धिबळाचा खेळ खेळण्याचा प्रयत्न करणे होय.

४०२ विद्यारहित मनुष्याने विद्वत्सभेत भाषण करण्याची अभिलाषा बाळगणे म्हणजे स्तनरहित स्त्रीने केलेल्या कामचेष्टितासारखे आहे.

४०३ विद्वानासमोर अविद्वानाने वाचाळपणा न करता मौन धारण केले, तर तोही एकप्रकारचा शिष्टाचारच होय.

४०४ विद्याध्ययन न केलेल्या मनुष्याची बुद्धी कितीही चांगली असली, तरी त्याला विद्वान लोक मान देत नाहीत.

४०५ अडाणी मनुष्याने शहाणपणाची कितीही ऐट आणिली, तरी विद्वान मनुष्याशी बोलताना त्याचा मूर्खपणा उघडकीस येतो.

४०६ अडाणी मनुष्य जगतो इतकेच म्हणावयाचे! नाहीतर त्याचे जीवन हे नापीक जमिनीसारखेच असते.

४०७ सुंदर मनुष्याची बुद्धी जर उत्तम, तीक्ष्ण व व्यापक नसेल, तर त्याचे सौंदर्य हे उत्तम वस्त्रालंकारांनी मंडित अशा मातीच्या बाहुलीसारखे आहे.

४०८ अडाणी लोकांचे वैभव हे विद्वानांच्या दारिद्र्यापेक्षाही अधिक दुःखदायक असते.

४०९ उच्च कुळात जन्मलेला पण विद्याहीन मनुष्य हा नीच कुळात जन्म घेतलेल्या विद्वान मनुष्याइतका सन्माननीय होत नाही.

(४०४) **श्रुतं प्रज्ञानुगं यस्य प्रज्ञा चैव श्रुतानुगा ।**
असंभिन्नार्थमर्यादः पण्डिताख्यां लभेत सः ।।

—मग ५·३३·२९

(४०५) **कोकिलः काकसंधातैः समवर्णाननाकृतिः ।**
गदितैर्व्यक्ततामेति सभायामिव पण्डितः ।।

—योवा ७·११६·७३

४१० पशूंशी तुलना करताना जसा मनुष्यप्राणी, तसाच अडाणी मनुष्याच्या तुलनेने चांगल्या ग्रंथांचे अध्ययन केलेला विद्वान असतो.

अनुक्रमणिका

अध्याय ४२ – श्रवण

४११ इतर धनसंपत्तीपेक्षा श्रवणसंपत्तीचे (श्रवणमार्गे संपादिलेल्या ज्ञानाचे) मूल्य अधिक आहे. श्रवणसंपत्ती ही सर्व संपत्तीत श्रेष्ठ आहे.

४१२ कानांना द्यावयाचे अन्न (विद्या, ज्ञान) मिळण्यासारखे नसले, तर पोटाला थोडेसे अन्न द्यावे.

४१३ श्रवणाहाराने (श्रवणमार्गे ज्ञानाने) संपन्न होणारे विद्वान हे हविर्भागाने संतुष्ट होणाऱ्या देवांप्रमाणे होत.

४१४ आपण स्वतः विद्याध्ययन केलेले नसले तर निदान विद्वान मनुष्याची वचने ऐकावी. गरजेच्या वेळी ती हातात धरण्याच्या काठीप्रमाणे उपयोगी पडतात.

४१५ निसरड्या जमिनीवरून चालताना जसा (हाती धरण्याच्या) काठीचा उपयोग होतो, त्याप्रमाणे सज्जनांच्या मुखातून आलेली वचने संकटकाळी उपयोगी पडतात.

४१६ कोणाच्याही (लहानाच्याही) तोंडून बाहेर पडणारी चांगली वचने ऐकिली, तर तीही आपणास मोठेपणा देतात.

४१७ सूक्ष्म निरीक्षण आणि श्रवण या मार्गाने ज्ञान संपादन केलेले लोक चुकूनही अयोग्य शब्द उच्चारीत नाहीत.

४१८ ज्ञानाने ज्यांचे कान टोचले नाहीत (ज्यांनी श्रवणमार्गे ज्ञान मिळविले नाही) त्यांना चांगले ऐकू आले तरी ते बहिरेच होत.

४१९ सूक्ष्मतेने श्रवण करून ज्यांचे अध्ययन झाले नाही त्यांच्या भाषणात विनय क्वचितच आढळतो.

४२० श्रवणमाधुर्याचा आस्वाद न घेता जो केवळ जिभेचे चोचले पुरविण्यात आनंद मानतो, तो मनुष्य जगला काय किंवा मेला काय, सारखाच!

(४१६) युक्तियुक्तमुपादेयं वचनं बालकादपि ।
अन्यत्तृणमिव त्याज्यमप्युक्तं पद्मजन्मना ।।

—योवा २·१८·३

अध्याय ४३ – बुद्धिमत्ता

४२१ बुद्धिमत्ता हे विनाशापासून वाचविणारे साधन व शत्रूंनाही दाद न देणारा बालेकिल्ला आहे.

अनुक्रमणिका

४२२ स्वैर मनाला उन्मार्गगामी होऊ न देणे आणि योग्य मार्गाने जाण्यास प्रवृत्त करणे ही कार्ये बुद्धिमत्तेची होत.

४२३ कोणताही विषय कोणाकडूनही कानावर आला, तरी त्यातील सत्य पारखून घेणे हे बुद्धिमत्तेचे काम आहे.

४२४ आपले उपयुक्त विचार दुसऱ्यास समजतील अशा रीतीने व्यक्त करिता येणे व दसऱ्याच्या भाषणातील सूक्ष्म विचार पारखून घेता येणे ही बुद्धिमत्तेची लक्षणे होत.

४२५ जगाची मैत्री संपादन करणे ही बुद्धिमत्ता. फुलासारखे केवळ विकसणे व म्लान होणे ही बुद्धिमत्ता नव्हे.

४२६ जग ज्या मार्गाने जात आहे त्याच मार्गाने आपला व्यवहार करणे हे बुद्धिमत्तेचे लक्षण.

४२७ भविष्यकालीन घटनांचे आगाऊ ज्ञान ज्यास होते तो बुद्धिमान. तसे ज्ञान ज्यास होत नाही तो बुद्धिहीन.

४२८ ज्या गोष्टीचे भय बाळगणे अवश्य आहे, त्याविषयी निर्भय राहणे ही बुद्धिहीनता. त्याचे भय बाळगणे हीच बुद्धिमत्ता.

४२९ भविष्यकालीन घटनांविरुद्ध दूरदर्शीपणाने दक्षता घेणाऱ्या विद्वान लोकांना कोणतीच विपत्ती धक्का देत नाही.

४३० बुद्धिमान लोक (जवळ काही नसले तरी) सर्वसंपन्न असतात. बुद्धिहीन लोक संपन्न दिसले तरी ते दरिद्रीच असतात.

(४२१) ये बुद्धया हि बलिनस्ते भवन्ति बलीयसः ।

— मभा १२·१५६·१२

(४२२) प्रवृत्तिंच निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ।
बंन्धं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी ।।

—गीता १८·३०

(४२९) अनागतविधानं तु कर्तव्यं शुभमिच्छता ।
आपदाशङ्कमानेन पुरुषेण विपश्चिता ।।

—रामा ३·२४·११

अनुक्रमणिका

अध्याय ४४ – दोषनिर्मूलन

४३१ अहंकार, क्रोध व विषयवासना यांपासून मुक्त असलेल्या राजाचा सदैव उत्कर्ष होत राहील.

४३२ लोभीपणा, तेजोहीन (व्यर्थ) सन्मानाचा हव्यास आणि कनिष्ठ प्रतीचा आनंद हे राजाचे दोष आहेत.

४३३ ज्यांना आपली मानहानी सहन होत नाही, त्यांना स्वतःचे तिळाएवढे दोष ताडाएवढे दिसतात.

४३४ स्वतःच्या दोषांकडे गंभीरपणाने दृष्टी ठेवून त्यांपासून सावध राहा. कारण तेच तुमचा अपमान व विनाश करणारे शत्रू आहेत.

४३५ संकट कोसळण्यापूर्वी त्यापासून संरक्षण करण्याची दक्षता जो घेत नाही, त्याचे जीवन अग्निसन्मुख येणाऱ्या तृणासारखे आहे.

४३६ प्रथम स्वतःचे दोष नष्ट केल्यानंतर मगच जो दुसऱ्याचे दोष हुढकतो, त्या राजाला कोणते दोष चिकटणार आहेत?

४३७ आपल्या कृपण स्वभावामुळे जो आपली आवश्यक तीही कर्तव्ये बजावीत नाही, त्याची संपत्ती समूळ नष्ट होते.

४३८ कृपण मनुष्याच्या अतिलोभी स्वभावाची गणना कोणत्याच ज्ञात दोषात करता येत नाही (ती ज्ञात दोषापलीकडे असते).

४३९ स्वतःवर मोठेपणा लादून अहंकाराच्या आहारी जाऊ नका. त्याचप्रमाणे निरर्थक व अनुचित कर्मे करू नका.

(४३१) कामं क्रोधं च लोभं च दंभं दर्पं च भूमिपः ।
सम्यग् विजेतुं यो वेद स महीमभिजायते ।।

—मभा ५·१२९·३३

(४३२) सक्तं ग्राम्येषु भोगेषु कामवृत्तं महीपतिम् ।
लुब्धं न बहु मन्यन्ते श्मशानाग्निमिव प्रजाः ।।

—रामा ३·३३·३

(४३५) पुरतः कृच्छ्रकालस्य धीमाञ् जागर्ति पुरुषः ।
स कृच्छ्रकालं संप्राप्य व्यथां नैवौति कर्हिचित् ।।

—मभा १·२३२·१

अनुक्रमणिका

४४० तुमची इच्छित कार्ये दुसऱ्यास न कळत जर तुम्हास पार पाडता आली, तर त्यांस प्रतिबंध करण्याची तुमच्या शत्रूची इच्छा सफल होणार नाही.

अध्याय ४५ – थोरांचे साहाय्य

४४१ आपल्यापेक्षा ज्ञानाने वृद्ध व सज्जन असलेल्या धर्मशील लोकांचे मूल्य ओळखून त्यांची मैत्री संपादन करा.

४४२ वर्तमान विपत्ती दूर करून आगामी संकटास प्रतिबंध करण्याची पात्रता असणाऱ्या श्रेष्ठ लोकांचे साहाय्य संपादन करा.

४४३ श्रेष्ठ व्यक्तींचा सन्मान करून त्यांची मैत्री संपादन करणे ही दुर्लभातील दुर्लभ गोष्ट आहे.

४४४ आपल्यापेक्षा श्रेष्ठ व्यक्तींची निकट मैत्री संपादन करणे हे श्रेष्ठ प्रकारचे सामर्थ्य होय.

४४५ अमात्य हे राजाचे नेत्र असल्यामुळे त्यांची निवड राजाने अतिशय दक्षतेने केली पाहिजे.

४४६ ज्या राजाला श्रेष्ठ व बलशाली मित्र लाभतील, त्याला शत्रूंकडून कोणत्याही प्रकारची बाधा होणार नाही.

(४४०) **नास्य कृत्यानि बुद्धेयरन् मित्राणि रिपवस्तस्था ।**
आरब्धान्येव पश्येरन्सुपर्यवसितान्यपि ।।

— मभा १·१४०·८२

(४४१) **सकृत्सतां संगतं लिप्सितव्यं**
ततः पदं भविता भव्यमेव ।
ना ऽ तिकामेत्सत्पुरुषेण संगतं
तस्मात्सतां संगतं लिप्सितव्यम् ।।

— मभा ५·१०·२३

(४४२) **संगृह्णीयादनुरूपान्सहायान्**
सहायसाध्यानि च दुष्कराणि ।

— मभा ५·३७·२४

(४४५) **अपण्डितो वा ऽ पि सुहृत् पण्डितो वाप्यनात्मवान् ।**
नापरीक्ष्य महीपालः कुर्यात्सचिवमात्मनः ।।

—मभा ५·३८·१९

अनुक्रमणिका

४४७ वेळप्रसंगी राजाला तंबी देण्यास समर्थ असणारे सहचर त्याच्या परिवारात असले, तर त्याची हानी करण्याचे सामर्थ्य कोणासही नाही.

४४८ ज्याच्या परिवारात तंबी देण्यास समर्थ असलेले टीकाकार नाहीत, अशा राजाचा विनाश, शत्रूच्या अभावीही होईल.

४४९ ज्याच्याजवळ (व्यापारासाठी) भांडवल नसेल, त्यांना लाभ होणे शक्य नाही. ज्याला सामर्थ्यवान साहाय्यक नाहीत त्याला स्थैर्य प्राप्त होणार नाही.

४५० अनेक व्यक्तींच्या शत्रुत्वापेक्षा सज्ञनांच्या स्नेहाचा त्याग दसपट हानिकारक आहे.

अध्याय ४६ – कुसंगतीचा त्याग

४५१ सज्ञनांना कुसंगतीची भीती असते. नीच लोक मात्र स्वतःपेक्षा नीच लोकांशी संबंध ठेवतात.

४५२ पाण्याचे गुणधर्म जमिनीच्या गुणधर्मांप्रमाणे बदलतात. त्याचप्रमाणे मनुष्यांची बुद्धी त्यांच्या सोबत्यांना अनुरूप अशी होत जाते.

४५३ मनुष्याची बुद्धी त्याच्या मनावर आधारलेली असते. कोण मनुष्य कसा आहे हे त्याच्या मित्रांच्या स्वभावावरून सांगता येते.

४५४ मनुष्याची बुद्धी त्याच्या मनापासून उत्पन्न होते असे वाटते. पण वस्तुतः ती त्याच्या सत्संगतीपासून किंवा कुसंगतीपासून निर्माण होते.

४५५ स्वतःच्या मनाची व आचरणाची शुद्धता ही आपल्या मित्रमंडळीच्या शुद्धतेवर अवलंबून असते.

४५६ ज्यांची मने पवित्र असतात, त्यांचे पावित्र्य जन्मभर पुरून त्यांच्या पश्चातही टिकून राहते. ज्यांचे मित्र पवित्राचरणी असतात, त्यांच्या हातून अपवित्र गोष्ट घडतच नाही.

४५७ मनाचे पावित्र्य हेच मानवाचे वैभव. सहकाऱ्यांच्या पावित्र्याने कीर्ती प्राप्त होते.

४५८ विद्वान लोकांना मानसिक पवित्रता लाभली असली तरी, त्यांच्या सहकाऱ्यांच्या पावित्र्याने त्यांना अधिक सामर्थ्य प्राप्त होते.

(४४७) केचिद्धि सौहृदादेव न दोषं परिचक्षते ।
स्वार्थहेतोस्तथैवान्ये प्रियमेव वदन्त्युत ।।

—मभा २·१३·५१

अनुक्रमणिका

४५९ मानसिक पावित्र्यामुळे स्वर्गसुख प्राप्त होते. (किंवा पुनर्जन्मात सुख मिळते.) आपल्या मित्रांच्या पवित्रतेने त्या सुखात वाढ होते.

४६० सत्संगासारखा दुसरा साहाय्यक मित्र नाही. कुसंगतीपेक्षा मोठा दुष्ट शत्रू नाही.

अध्याय ४७ – विवेकपूर्वक कर्म

४६१ प्राप्तीतून खर्च वजा करून आपणास लाभ किती उरेल, याचा विचार करून मग कामास लागा.

४६२ निवडक मित्रांशी सविस्तर चर्चा करून कार्यास आरंभ केला, तर अशा राजाला (किंवा व्यक्तीला) दुर्लभ अशी वस्तू नाही.

४६३ अती लाभाच्या लोभाने मूळ भांडवलही गमावून बसण्याची पाळी येईल अशा कार्यास कोणीही बुद्धिमान मनुष्य (किंवा राजा) प्रवृत्त होणार नाही.

४६४ संभाव्य अपयशामुळे पदरी पडणाऱ्या अपकीर्तीचे ज्यांना भय वाटते. असे लोक (किंवा राजे) ज्यात खरोखर लाभ होण्यासारखा नाही, अशा कार्यास प्रवृत्त होत नाहीत.

४६५ परिस्थितीचा पूर्ण विचार केल्याविना राजाने आपल्या शत्रूवर आक्रमण करणे म्हणजे त्याच्या पोषणासाठी सुपीक जमीन दान करण्यासारखे आहे.

४६६ अनुचित कर्मे करणे आणि उचित कर्मे न करणे, या दोन गोष्टी मनुष्यास अधोगतीस नेतात.

४६७ कोणत्याही कार्याचा प्रारंभ करण्यापूर्वी पूर्ण विचार करा. एकदा प्रारंभ केल्यानंतर विचार करू असे म्हणणे हा मूर्खपणा आहे.

(४६२) तात बुद्ध्यापि तत्सर्वं बुद्ध्यस्व बलमात्मनः ।
नियतं सर्वमित्रेषु बलवत्स्वबलेषु च ।।

—मभा ४·२९·९

(४६३) लोभः प्रज्ञानमाहन्ति प्रज्ञा हन्ति हता ह्रियम् ।

—मभा ५·७२·१८

(४६४) गुरुलाघवमर्थानामारम्भे कर्मणां फलम् ।
दोषं वा यो न जानाति स बाल इति होच्यते ।।

—रामा २·६३·७

४६८ योग्य विचार न करिता आरंभिलेले कार्य, अनेक व्यक्तींचे साहाय्य मिळाले तरी व्यर्थ होईल.

अनुक्रमणिका

४६९ तुम्ही (दुसऱ्यासाठी) चांगले कार्य करीत असताही, दुसऱ्याच्या स्वभावास ते अनुकूल नसले, तर त्यापासून हानी होण्याचा संभव आहे.

४७० लोकांना अनुकूल होतील असा विचार करूनच कर्मे करावी. त्यांना जी अनुकूल नसतील, त्यांना त्यांची मान्यता मिळणार नाही.

अध्याय ४८ – शक्ति-मापन

४७१ इच्छित कार्यास लागणारी शक्ती, स्वतःचे व शत्रूचे सामर्थ्य आणि दोघांच्या साहाय्यकांचे सामर्थ्य, या सर्वांचा नीट विचार करून मगच कार्याचा आरंभ करावा.

४७२ आपले इष्ट कार्य व त्याला अवश्य असणारे सामर्थ्य (किंवा साधने) यांचा नीट विचार करून एकाग्रपणे कार्य करू लागले, म्हणजे दुर्घट असे काही नही.

४७३ आपल्या सामर्थ्याचे योग्य मापन न करता जे आवेशाने कार्यास आरंभ करतात, आणि मग ते मध्येच सोडून देतात, त्यांच्या कार्याचा नाश होतो.

४७४ आपल्या शेजाऱ्याची मैत्री संपादन न करता व आपल्या सामर्थ्याची मर्यादा न ओळखता, केवळ अहंकारास बळी पडून एखादे कार्य घाईने आरंभिले, म्हणजे त्याचा विनाश होतो.

४७५ भरपूर ओझे लादलेल्या गाडीवर एखादे मोरपीसही अधिक झाले, तर गाडीचा आस मोडेल.

४७६ वृक्षाच्या शाखेच्या शेंड्यावर चढल्यानंतरही आणखी वर चढण्याचा प्रयत्न एखाद्याने केला, तर तो आवेश प्राणघातकच ठरेल.

४७७ आपल्या संपत्तीची मर्यादा ओळखून योग्य दान करणे, हाच संपन्नता आणि दातृत्व यांना संभाळण्याचा उचित मार्ग आहे.

(४७०) **एकान्तेन ही सर्वेषां न शक्यं तात रोचितुम् ।**

—मभा १२·८९·१९

(४७१) **सारासारं बलं वीर्यमात्मनो द्विषतश्च यः ।**
जानन्विचरति प्राज्ञो न स याति पराभवम् ।।

—मभा १२·११३·१३

४७८ संपत्तीच्या उत्पादनाचे मार्ग जरी रोडावले, तरी व्ययाचे मार्ग फार भोंगळ नसल्यास हानी होण्याचा संभव नाही.

अनुक्रमणिका

४७९ आपल्या संपत्तीच्या मर्यादा न ओळखता जो समृद्ध जीवन जगू पाहतो, त्याचे ते जीवन समृद्ध दिसले, तरी अल्पजीवी ठरते.

४८० आपल्या संपत्तीची सीमा न जाणता तिचे औदार्याने दान करू लागले, तर ती लवकरच संपून जाईल.

अध्याय ४९ – योग्य संधीचा लाभ

४८१ दिवसाढवळ्या कावळाही घुबडाचा पराभव करू शकतो. शत्रुंजय राजाला हवी असते ती योग्य संधी.

४८२ योग्य संधी पाहून आचरण करण्याची राजाची सवय म्हणजे त्याला व वैभवाला एकत्र बांधणारे दृढ सूत्रच होय.

४८३ योग्य संधी साधून व योग्य साधने जमवून कार्यास प्रवृत्त होणाऱ्या राजाला अशक्य असे काही आहे काय?

४८४ योग्य स्थळ व काळ यांची निवड करून कार्यारंभ करण्याचे ठरविले, तर विश्वाचेही साम्राज्य प्राप्त होईल.

४८५ ज्यांना जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा आहे, ते योग्य संधीची संथपणे व निर्भयपणे वाट पाहतात.

४८६ प्रतिपक्षाला टक्कर देण्यापूर्वी मेंढा दोन पावले मागे सरतो, त्याचप्रमाणे बलशाली मनुष्य (किंवा राजा) मनोनिग्रह करून संधीची वाट पाहतो.

(४८१) **दिवा काकः कौशिकं हन्ति । रात्रौ कौशिकः काकम् ।**

— कौअ १२२

(४८२) **अकाले कृत्यमारब्धं कर्तुर्नार्थाय कल्पते ।**
तदेव काल आरब्धं महतेऽर्थाय कल्पते ।।

—मभा १२·१३८·९५

(४८३) **कालाकालौ संप्रधार्य बलाबलमथात्मनः ।**
परस्परं बलं ज्ञात्वा तत्रात्मानं नियोजयेत् ।।

—मभा १३·१४०·२९

(४८४) **देशे काले च विक्रान्तं कल्याणाय विधीयते ।**

—मभा ४·४९·३

अनुक्रमणिका

४८७ बुद्धिमान लोकांना (किंवा राजांना) कोप आला तर ते तो त्वरित बाहेर दाखवीत नाहीत. योग्य संधीची वाट पाहात ते त्याची ज्वाला आत दाबून ठेवतात.

४८८ शत्रू समोर आला की अवश्य तर नम्र व्हा. (त्याला खांद्यावर घ्या.) पण योग्य संधी आली की त्याचे डोके जमिनीवर आपटेल असा त्यास फेकून द्या.

४८९ इतर वेळी दुर्लभ अशा गोष्टी अनुकूल संधी येताच प्राप्त करून घ्या.

४९० योग्य संधीची वाट पाहात बगळ्याप्रमाणे निश्चल राहा. संधी येताच त्याच्याचप्रमाणे चोचीचा प्रहार करून आपले कार्य शेवटास न्या.

अध्याय ५०—स्थान-माहात्म्य

४९१ युद्धासाठी योग्य स्थळ आढळेपर्यंत (युद्धाचा) कार्यारंभ करू नका. तोपर्यंत शत्रूचा उपहासही करू नका.

४९२ बलवान राजाने आक्रमक युद्धास प्रारंभ केल्यानंतर स्वसंरक्षणासाठी त्याला दुर्गाचा अनेक प्रकारे उपयोग होतो.

४९३ योग्य स्थळ निवडून आपल्या संरक्षणाची व्यवस्था केल्यानंतर शत्रूवर आक्रमण करणाऱ्या दुर्बल राजालाही बलवान राजाप्रमाणे विजय प्राप्त होतो.

(४८७) **न हि वैरं महात्मानो विवृण्वन्त्यपकारिषु ।**
शनैः शनैः महाराज दर्शयन्ति स्म ते बलम् ।।

—१२·१५७·१०

(४८८) **वहेदमित्रं स्कन्धेन यावत्कालस्य पर्ययः ।**
प्राप्तकालं तु विज्ञाय भिन्द्याद् घटमिवाश्मनि ।।

—मभा १२·१४०·१८

(४८९) **यो हि कालो व्यतिक्रामेत्पुरुषं कालकाङ्क्षिणम् ।**
दुर्लभः स पुनस्तेन कालः कर्मचिकीर्षुणा ।।

— मभा १२·१०३·२१

(४९२) **यदा तु पीडितो राजा भवेद्राज्ञा बलीयसा ।**
तदाऽभिसन्धयेद् दुर्गं बुद्धिमान्पृथिवीपतिः ।।

— मभा १२·६९·३३

अनुक्रमणिका

(४९३) **यत्रस्थानं प्रजवश्वाभूमिर्व्यूहस्य, तत्र स्थितः**
प्रजवितश्वोभयथा जीयेत । विपर्यये जयति
उभयथा स्थाने प्रजवे च ।

—कौअ १३१

४९४ योग्य स्थळाची निवड करून शत्रूशी युद्ध नेटाने चालविण्यास जो राजा प्रवृत्त होतो, त्याच्यावर विजय मिळविणे शत्रूला शक्य नाही.

४९५ खोल पाण्याचा आश्रय असेतोपर्यंत नक्र कोणाचाही नाश करील. तो पाण्याबाहेर आला की कोणीही त्याचा बळी घेईल.

४९६ मोठी चक्रे बसविलेला भव्य रथ पाण्यावरून चालणार नाही. पाण्यावरून जाणारी नौका जमिनीवर गतिमान होणार नाही.

४९७ पूर्ण विचार करून व योग्य स्थळाची निवड करून (युद्ध-) कार्यास प्रारंभ केला म्हणजे निर्भयतेवाचून अन्य कोणत्याही साहाय्याची गरज नाही.

४९८ जवळ अल्प सैन्यबळ असूनही जर योग्य स्थळाच्या आश्रयाने दबा धरून बसले तर शत्रूच्या मोठ्या सैन्याचाही नाश करता येईल.

४९९ दुर्ग किंवा मोठे सैन्य इत्यादी अन्य साधनांच्या अभावीही आपल्याच प्रदेशात आपण असलो, तर आपल्यावर आक्रमण करणे दुसऱ्यास दुर्घट होते.

५०० भालाधारी वीराबरोबर टक्कर देणाऱ्या निधड्या हत्तीचे पाय जर चिखलात रुतलेले असले, तर एखादा कोल्हाही त्याचा पराभव करील.

अध्याय ५१ — विचारपूर्वक निवड

५०१ एखाद्या मनुष्यासंबंधी आपले मत बनविताना धर्म, अर्थ, काम व प्राणभय या चार विषयांच्या संदर्भात त्याचे आचरण कसे असेल याचा विचार करावा.

(४९४) **देशकालौ समासाद्य विक्रमेत विचक्षणः ।**
देशकालव्यतीतो हि विक्रमो निष्फलो भवेत् ॥

—मभा १२·१४०·२८

(४९५) **स्थलगतो हि श्वा नक्रं विकर्षति ।**
निम्नगतो नक्रः श्वानम् ।।

—कौअ १२२

अनुक्रमणिका

(४९६) नावं न शक्यमारुह्य स्थले विपरिवर्तितुम् ।
तथैव रथमारुह्य नाप्सु चर्या विधीयते ।।

—ममा १४·५०·३०

(५०१) भयोपधाशुद्धानासन्नकार्येषु (स्थापयेत्) राज्ञः ।

—कौअ १०

५०२ कुलीन, निष्कलंक आचरणाचा व पापभीरू असा मनुष्यच विश्वासपात्र होऊ शकतो.

५०३ निर्दोष आचरणाच्या व विशिष्ट विद्येत प्रवीण असलेल्या लोकांची जर सूक्ष्म परीक्षा केली, तर त्यांच्यातही अज्ञानाचा अभावच असेल असे नाही.

५०४ मनुष्याचे गुण व दोष या दोहोंचीही परीक्षा करून, व आधिक्य कसले आहे याचा विचार करून, मग त्याची निवड करावी.

५०५ मनुष्य आपापले (किंवा त्याच्यावर सोपविलेले) काम कसे करतो, यावरूनच त्याची श्रेष्ठता व नीचता यांची कसोटी लागते.

५०६ ज्यांना भाईबंद किंवा नातेवाईक नाहीत, अशा अकुलीन लोकांची निवड करू नका. कारण बहुधा ते निष्प्रेम असून आपल्या दोषांविषयी ते निर्लज्ज असतील.

५०७ अवश्य ती विद्या (व म्हणून पात्रता) अंगी नसताना, तुमच्या प्रिय व्यक्तीची एखाद्या स्थानी निवड केली, तर पदरी मूर्खपणाच येईल.

५०८ नीट परीक्षा केल्यावाचून आपणास अज्ञात असलेल्या व्यक्तीची निवड विश्वासाच्या अधिकारावर केली, तर आपल्या भावी पिढ्यांनाही त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील.

५०९ माणसाची परीक्षा केल्यावाचून विश्वासाच्या स्थानी एखाद्याची निवड करू नका. एकदा निवड केल्यानंतर मात्र त्याच्यावर विश्वास ठेवा व त्याला योग्य काम नेमून द्या.

५१० परीक्षा केल्यावाचून विश्वासाच्या स्थानी एखाद्याची नेमणूक करणे आणि विश्वासार्ह मनुष्याविषयी संशय घेणे, या दोन्ही गोष्टी हानिकारक आहेत.

अध्याय ५२ — विश्वासार्ह अधिकारी

५११ (सोपविलेल्या) प्रत्येक कार्यापासून होणाऱ्या लाभहानीची परीक्षा करून लाभदायक कार्यास प्रवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्याची निवड करावी.

अनुक्रमणिका

(५०२) दूतं चैव प्रकुर्वीत सर्वशास्त्रविशारदम्

—मनु ७·६३

(५०३) विपश्चित्स्वपि सुलभा दोषाः ।

—चासू १७०

(५०८) विश्वासाद् भयमभ्येति नापरीक्ष्य च विश्वसेत् ।

—मभा १२·१४०·४३

५१२ संपत्तीची आवक वाढविणे, हाती असलेल्या संपत्तीचे रक्षण करणे व मार्गातील अडथळे पूर्वीच हेरून दूर करणे, या सर्व विषयांत जो प्रवीण असेल, त्याचीच नेमणूक अधिकारस्थानावर करावी.

५१३ निष्ठा, बुध्दी, सूक्ष्म दृष्टी आणि निर्लोभिता या चारी गुणांनी जो संपन्न असेल असा मनुष्य विश्वासार्ह असतो.

५१४ नेमणूक करताना मनुष्याची कसून परीक्षा घेतलेली असली, तरी नेमणूक झाल्यावर त्याची बुध्दी अनेक दिशांनी चळण्याचा संभव असतो.

५१५ मार्गातील अडथळ्यांस न जुमानता, नेटाने व चातुर्याने आपले काम पार पाडण्याची पात्रता ज्याच्या अंगी आहे, त्यावाचून अन्य माणसावर, तो आपणास प्रिय असला तरी, चांगले काम सोपवू नये.

५१६ कर्ता व कर्म (कार्य) यांची योग्य प्रकारे निवड करून आणि त्यांची योग्य संधीशी सांगड घालून, मग त्यावर ते कार्य सोपवावे.

५१७ "अमुक मनुष्य अमुक कार्य अमुक साधनानिशी योग्य प्रकारे पार पाडील," असा निर्णय घेऊन त्या मनुष्यावर ते काम सोपवावे.

५१८ विशिष्ट मनुष्य विशिष्ट कार्यास योग्य आहे असा निर्णय घेतल्यानंतर, त्या मनुष्यावर ते काम सर्वस्वी सोपवावे, व त्यावर उत्तरदायित्व टाकावे.

५१९ जो आपले कार्य निष्ठापूर्वक पार पाडीत असेल, त्याच्या निष्ठेविषयी संशय घेणाऱ्यांचा लक्ष्मी त्याग करते.

५२० राज्यातील अधिकारीवर्ग भ्रष्ट झाल्यावाचून प्रजाजन भ्रष्ट होत नाहीत. म्हणून अधिकारीवर्गावर राजाची सदोदित दृष्टी असावी.

अनुक्रमणिका

अध्याय ५३—बंधुजनांचे पोषण

५२१ विपत्तीत सापडलेल्या बंधुजनांचा पूर्वसंबंध लक्षात घेऊन, त्यांचा त्याग न करता त्यांना साहाय्य करावे.

(५१७) यो यस्मिन्कुशलः स तस्मिन्योक्तव्यः ।

—चासू ३५७

(५१८) यो यस्मिन्कर्मणि कुशलस्तं तस्मिन्नेव योजयेत ।

—चासू ११७

(५२१) भक्तानां हि परित्यागो न धर्मेषु प्रशस्यते ।

— मभा ५·१७५·१२

५२२ आपल्यावर अखंड प्रेम करणारे नातेवाईक ज्यास लाभले असतील, त्याला सतत विकासोन्मुख असणारे वैभव प्राप्त होईल.

५२३ बंधुजनांमध्ये ज्याला मोकळेपणाने मिसळता येत नाही, अशाचे आयुष्य म्हणजे भरपूर पाणी असलेल्या, पण बांधच नसलेल्या, मोठ्या तळ्यासारखे आहे.

५२४ आपल्या भोवती आप्तेष्टांच्या घोळक्यात राहणे हेच श्रीमंतीचे वैभव आहे.

५२५ उदार हाताच्या व मधुर वाणीच्या मनुष्याभोवती नातेवाईकांचा नेहमी घोळका असतो.

५२६ स्वभावाने उदार असून ज्याने क्रोध जिंकला आहे, अशा मनुष्याभोवती जितके नातेवाईक जमतात, तितके कोणाभोवतीही जमत नाहीत.

५२७ कावळ्याला अन्न मिळाले की ते एकट्यानेच न खाता तो ओरडून गोतावळा जमा करतो व सहभोजन करतो. असा स्वभाव असणाऱ्या मनुष्याला वैभव प्राप्त होऊन त्याची वृद्धी होते.

५२८ सर्वांस सारखे न लेखता राजाने योग्य कामावर योग्य माणसांची नेमणूक करावी, म्हणजे त्याला लोकप्रियता लाभेल.

५२९ आपल्या परिवारातील लोक काही कारणांमुळे आपणास सोडून गेले असतील, तर ते कारण नाहीसे होताच ते स्वयमेव परततील.

५३० आपल्यापासून दूर गेलेला मनुष्य सकारण परत आला, तर राजाने त्याला संतुष्ट करून दक्षतापूर्वक आपल्या परिवारात येऊ द्यावे.

अनुक्रमणिका

अध्याय ५४—सावधानता

५३१ अत्यानंदाच्या धुंदीत होणारी उपेक्षा ही अतिक्रोधापेक्षाही हानिकारक असते.

(५२५) **ज्ञातिबन्धुजनावेक्षी मित्रसंबन्धि संवृतः ।**
पौरकार्यहितान्वेषी भव कौरवनन्दन ।।

—मभा १२·११९·१९

(५२६) **सहस्रपरिवेष्टारस्तथैव च सहस्रदाः ।**
त्रातारश्च सहस्राणां ते नराः स्वर्गगामिनः ।।

—मभा १३·२३·९४

(५२७) **कच्चित्स्वादुकृतं भोज्यमेको नाश्नासि ।**
कच्चिदाशंसमानेभ्यो मित्रेभ्यः संप्रयच्छसि ।।

—रामा २·१००·७५

५३२ सदोदित ग्रासणारे दारिद्र्य बुद्धीचा वध करते. त्याचप्रमाणे उपेक्षा यशाला प्रतिबंध करते.

५३३ दक्षताहीन व्यक्तींना या जगात यशाची आशा नाही. अनेक ग्रंथकारांनी या सिद्धांताचे प्रतिपादन केले आहे.

५३४ स्वभावाने भितऱ्या राजाला बळकट दुर्गाचाही उपयोग नाही. त्याचप्रमाणे उपेक्षाग्रस्त मनुष्याला सुसंधीचा उपयोग होत नाही.

५३५ आगामी संकटाविरुद्ध दक्षता न घेता निद्रावश होणाऱ्या मनुष्यावर संकटे दुर्दैवाने येऊन कोसळली, म्हणजे मग त्यास पश्चात्ताप होतो.

५३६ सदैव दक्ष राहून जो मनुष्य कोणाच्याही बंधनात सापडत नाही, त्याच्यासारखा सद्‌गुणी मनुष्य दुसरा नाही.

५३७ जो आपली कार्ये दक्षतापूर्वक व नेटाने पार पाडतो, त्याला दुर्घट असे काही नाही.

५३८ थोर लोकांनी प्रशंसिलेली कार्ये दक्षतेने केली पाहिजेत. आपल्या हातून उपेक्षेमुळे जर ती झाली नाहीत, तर सात जन्म सुखाला आंचवावे लागेल.

५३९ स्वतःच्या उपेक्षेमुळे जे लोक विपत्तीने ग्रस्त झाले होते, अशांची विचारपूस राजाने स्वतः अत्यानंदात निमग्न असताना करावी.

५४० पूर्व नियोजित कार्यावर सतत सावधानतेने चित्त एकाग्र केले तर यशःप्राप्ती निश्चित होईल.

अनुक्रमणिका

अध्याय ५५ — न्याय्य शासन

५४१ पूर्ण विचार करून, कोणताही पक्षपात न करता, नीतिशास्त्राच्या आधाराने अपराध्यास शिक्षा देणे हेच खरे न्यायदान.

(५३३) न हि प्रमादात्परमस्ति कश्चित्
वधो नराणामिह जीवलोके ।
प्रमत्तमर्था हि नरं समन्तात्
त्यजन्त्यनर्थाश्च समाविशन्ति ।।

—मभा १०·१०·१९

(५३५) यस्तु कृच्छ्रमनुप्राप्तं विचेता नाऽवबुध्यते ।
स कृच्छ्रकालेः व्यथितो न श्रेयो विन्दते महत् ।।

—मभा १·२३२·२

५४२ आकाशातील मेघांकडे दृष्टी लावून लोक जगात व्यवहार करतात. त्याचप्रमाणे प्रजेचे लक्ष नेहमी राजदंडाकडे असते.

५४३ ऋषिमुनिप्रणीत धर्मग्रंथ आणि तत्प्रणीत नीतिशास्त्र यांना राजदंडाचाच आश्रय असतो.

५४४ जो सम्राट आपल्या प्रजेचे शासन प्रेमाने करतो, त्याच्या पायावर सर्व जग लोटांगण घालील.

५४५ धर्मशास्त्रास अनुसरून राजदंड वापरणाऱ्या राजाच्या राज्यात यथाकाल भरपूर पर्जन्य पडेल आणि भूमी भरपूर पीक देईल.

५४६ राजाला विजय प्राप्त करून देतो तो भाला नव्हे, तर राजदंड. मात्र तो दंड वक्र असता कामा नये.

५४७ राजा जगाचे (आपल्या प्रजेचे) संरक्षण करतो. राजनीतीस अनुसरून त्याने राज्यशासन केले, तर तीच नीती त्याचे संरक्षण करते.

५४८ ज्या राजाचे दर्शन दुर्लभ असून जो योग्य न्यायनिवाडा करीत नाही, त्याची अपकीर्ती व अधोगती होते.

५४९ प्रजेचे संरक्षण करताना प्रजेच्या अपराधाविरुद्ध राजदंडाचा उपयोग करावा लागला, तर तो राज्यकारभारावरील कलंक नसून ते राजाचे कर्तव्यच आहे.

अनुक्रमणिका

(५४२) **नियन्ता चेन्न विद्येत न कश्चिद्धर्ममाचरेत् ।**

—मभा ४·६८·४५

(५४३) **नीतिशास्त्रानुगो राजा ।**

—चासू ४८

(५४६) **सम्यग्दण्डधरो नित्यं राजा धर्ममवाप्नुयात् ।**
नृपस्य सततं दण्डः सम्यग्धर्मः प्रशस्यते ।।

—मभा १२·६९·३०

(५४८) **दुर्दर्शना हि राजानः प्रजा नाशयन्ति ।**

—चासू ५५७

(५४९) **राज्ञो ही परमो धर्मः स्वधर्मस्थानुपालनम् ।**
शासतोऽन्यान् यथाशास्त्रमनापद्युत्पथानिह ।।

—भाग १·१७·१६

५५० राज्यातील आततायी लोकांस मृत्युदंड देणे, हे चांगल्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतातील व्यर्थ तण उपटून टाकण्यासारखे आहे.

अध्याय ५६—दुष्ट शासन

५५१ शस्त्राचा दुरुपयोग करून वधकर्म करणाऱ्या दुष्ट लोकांपेक्षाही प्रजेला अन्यायाने छळणारा राजा अधिक निष्ठुर असतो.

५५२ भाल्याची (किंवा बंदुकीची) भीती दाखवून रात्रीच्या वेळी वाटसरूस लुटणारा दरोडेखोर, आणि राजदंडाचे भय दाखवून प्रजाजनांस छळून लुटणारा राजा हे सारखेच होत.

५५३ प्रजेच्या अपराधांवर प्रतिदिन लक्ष ठेवून जो न्यायदान करीत नाही, तो राजा लवकरच राज्य गमावून बसेल.

५५४ जो राजा परिणामाकडे लक्ष न देता अन्यायाने राज्यकारभार करतो, तो आपले वैभव व प्रजा या दोघांनाही लवकरच गमावून बसेल.

५५५ छळवादाने गांजलेल्या प्रजाजनांच्या डोळ्यांतून वाहणारा अश्रुप्रवाह म्हणजे राजवैभवाचा समूळ नाश करणारी शस्त्रेच नव्हेत काय?

५५६ न्याय्य शासनानेच राजाच्या कीर्तीत भर पडते. ते कोलमडले की यशाचाही अस्त होतो.

अनुक्रमणिका

५५७ पर्जन्याच्या अभावाचा धरित्रीवर होणारा परिणाम व राजकृपेच्या अभावाचा प्रजाजनावर होणारा परिणाम हे सारखेच होत.

(५५०) यथोद्धरति निर्दाता कक्षं धान्यं च रक्षति ।
तथा रक्षेन्नृपं राष्ट्रं हन्याच्च परिपन्थिनः ।।

—मनु ७·११०

(५५२) ऊधश्छिन्द्यात्तु यो धेन्वाः क्षीरार्थी न लभेत्पयः ।
एवं राष्ट्रयोगेन पीडितं न विवर्धते ।।

—मभा १२·७१·१६

(५५५) यानि मिथ्याभिशस्तानां पतन्त्यश्रूणि रोदताम् ।
तानि पुत्रान्पशून् घ्नन्ति तेषां मिथ्याभिशंसनात् ।।

—मभा १२·९१·२०

५५८ अन्यायी राजाच्या शासनात राहण्याचे दुर्भाग्य ज्यांच्यावर ओढवते, त्यांच्या निर्धनतेपेक्षा संपन्नताच अधिक क्लेशकारी असते.

५५९ राजाचे शासन न्यायाविरुद्ध होऊ लागले, तर आकाशातील मेघही कालोचित पर्जन्यवृष्टी करण्याचे टाळतील.

५६० राज्याचे रक्षण करणाऱ्यांकडून राज्यकारभार योग्य प्रकारे झाला नाही तर गाई कमी दूध देतील व षट्कर्मरत ब्राह्मण वेद विसरू लागतील.

अध्याय ५७—क्रूर शासन

५६१ अपराध्याची योग्य चौकशी करून त्याचेकडून पुन्हा अपराध होऊ नये या हेतूने त्यास जो शिक्षा करतो, तोच खरा राजा.

५६२ आपले वैभव दीर्घकाळ टिकावे असे ज्या राजास वाटत असेल, त्याने अपराध्यास उग्र दंडाचे भय दाखवून शेवटी सौम्य शिक्षा देणे हेच योग्य.

५६३ कठोर शासक आपला राजदंड भीतिदायकपणे वापरील, तर त्याचा त्वरित व निश्चितपणे नाश होईल.

५६४ 'हा राजा क्रूर आहे' अशी आरोळी जर प्रजा ठोकीत असेल, तर त्या राजाचे आयुष्य लवकरच संपुष्टात येईल व त्याचा नाश होईल.

अनुक्रमणिका

५६५ ज्याचे दर्शन दुर्लभ आणि मुद्रा कठोर असते, अशा राजाचे दिखाऊ वैभव जणूकाय भुतांनी झपाटलेले असते.

५६६ कठोर वचनी व कोपिष्ट दृष्टीच्या राजाजवळ जरी भरपूर संपत्ती असली, तरी ती स्थिर न राहता त्वरित नाश पावेल.

(५५८) वधबन्धपरिक्लेशो मित्यमर्थवतां भवेत् ।
ममत्वं न च विन्देयुर्यदि राजा न पालयेत् ।।

—मभा १२·६८·१९

(५५९) क्वचिद्वर्षति पर्जन्यः क्वचित्सस्यं प्ररोहति ।
रसाः सर्वे क्षयं यान्ति यदा नेच्छति भूमिपः ।
प्रजाः संरक्षितं सम्यग्दण्डनीतिसमाहितः ।।

—मभा १२·६९·९७

(५६६) अतिमानिनमग्राह्यमात्मसंभावितं नरम् ।
क्रोधनं व्यसने हन्ति स्वजनोऽपि नराधिपम् ।।

—रामा ३·३३·१६

५६७ कटू वचन आणि अमर्याद दंड, या राजाचे विजयी सामर्थ्य तासून कमी करणाऱ्या कानशी आहेत.

५६८ आपल्या सहकाऱ्यांची (अमात्यांची) संमती न घेता, क्रोधास बळी पडून जो कठोर शासन करतो, अशा राजाची संपत्ती क्षीण होऊन नाश पावेल.

५६९ योग्य वेळी स्वसंरक्षणाची दक्षता न घेता, संकट कोसळले म्हणजे मग भयभीत होणारा राजा त्वरित नाश पावतो.

५७० नीच व अडाणी लोकांच्या बंधनात सापडलेल्या व त्यांच्या तंत्राने चालणाऱ्या क्रूर शासकापेक्षा जड भार या धरणीला धारण करावा लागत नाही.

अध्याय ५८—दयादृष्टी

५७१ राजाच्या अंतर्यामी करुणेची वस्ती असते. म्हणूनच जगाची वाटचाल योग्य मार्गाने होते.

५७२ दयेच्या आधारानेच सृष्टिक्रम नीट चालला आहे. ती ज्यांच्यापाशी नसेल, त्यांचा धरणीला भार होतो.

अनुक्रमणिका

५७३ संगीताचे संवादी सूर ज्यात प्रतीत होत नाहीत, ते गीत काय कामाचे? ज्यातून दया पाझरत नाही, ते नेत्र काय कामाचे?

५७४ ज्यातून दयेचे दर्शन होत नाही, असे नेत्र मुद्रेवर असून काय उपयोग?

५७५ दयार्द्रता हे नेत्रांचे भूषण आहे. अन्यथा ते घावांच्या वणासारखे मुद्रेवर दिसतात.

५७६ ज्या मनुष्यांना डोळे आहेत, पण दयार्द्र दृष्टी नाही, ते धरणीवर खड्या असलेल्या नुसत्या वृक्षांसारखेच होत.

५७७ ज्यांच्या अंतःकरणात दया नाही, ते नेत्रहीनच होत. कारण नेत्रसंपन्न लोक निर्दय असूच शकत नाहीत.

५७८ ज्यांची अंतःकरणे करुणामय असून जे कर्तव्यभ्रष्ट होत नाहीत, त्यांचा अधिकार या जगावर चालतो.

५७९ अपराधी मनुष्याने केलेला आपला अपराध दयार्द्र बुद्धीने सहन करणे हा सर्वश्रेष्ठ सद्‌गुण होय.

५८० नागरिक किंवा शिष्ट म्हणून यशस्वी होऊ इच्छिणाऱ्या लोकांपुढे जरी विषपात्र ठेविले, तरी त्यातील विष पाहूनही ते ते शांतचित्ताने पितील.

अध्याय ५९—गुप्तचर

५८१ गुप्तचर आणि सर्वमान्य राजनीतिग्रंथ हे राजाचे दोन नेत्र होत.

५८२ प्रत्येक प्रजाजनाकडून प्रतिदिन घडणाऱ्या प्रत्येक कृतीची जाणीव त्वरित करून घेणे, हे राजाचे कर्तव्य आहे.

५८३ गुप्तचरांच्या द्वारा राज्यातील वस्तुस्थितीचे ज्ञान करून घेणे, यावाचून यशःसिद्धीचा अन्य कोणताही मार्ग राजाला उपलब्ध नाही.

५८४ राजाचा अधिकारीवर्ग, बंधुवर्ग आणि शत्रुवर्ग, या सर्वांच्या आचरणाची टेहळणी करणे हे गुप्तचराचे कर्तव्य आहे.

५८५ आपल्या गुप्त वेषाने वावरण्याचा संशय येऊ देत नाही, व सापडल्यास निर्भय राहून आपली गुपिते उघडकीस येऊ देत नाही, तोच खरा गुप्तचर.

५८६ बैराग्याचा वेष घेऊन जो सर्व ठिकाणांच्या वार्ता गोळा करतो, आणि कोणत्याही परिस्थितीत त्या फुटू देत नाही, तोच खरा गुप्तचर.

अनुक्रमणिका

५८७ गुप्त घटना व गुप्त वार्ता शोधून काढण्याचे सामर्थ्य असून, जमविलेल्या वार्ताविषयी ज्याला अल्पही संशय नसतो, तो खरा गुप्तचर.

५८८ एका गुप्तचराने मिळवून राजास सुपूर्त केलेल्या वार्तांचा मेळ अन्य गुप्तचराने मिळवून आणलेल्या वार्तांशी बसला, तरच राजाने त्यांवर विश्वास ठेवावा.

५८९ एकमेकांचा पत्ता एकमेकांस नसलेल्या तीन हेरांकडून जर सारख्याच वार्ता मिळाल्या, तर त्यावर निःशंकपणे विश्वास ठेवावा.

(५८१) **चारैः पश्यन्ति राजानः ।**

—मभा ५·३४·३४

(५८३) **राज्यं प्रणिधिमूलं हि मंत्रसारं प्रचक्षते ।**

—मभा १२·८३·५१

(५८४) **पूजिताश्वर्थमानाभ्यां राज्ञा राजोपजीविनाम् ।**
जानीयुः शौचमित्येताः पंचसंस्थाः प्रकीर्तिताः ।।

—कौअ ११

(५८९) **त्रयाणामेकवाक्ये संप्रत्ययः ।**

—चासू ३२

५९० गुप्तचरांचा प्रकट सन्मान केव्हाच करू नये. तसा तो केल्यास आपलेच रहस्य आपण उघड केल्यासारखे होते.

अध्याय ६० — उत्साह

५९१ उत्साह हीच खरी संपत्ती. उत्साहाच्या अभावी नुसती संपत्ती ही आपली राहातेच कोठे?

५९२ उत्साह हीच शाश्वत संपत्ती. नुसती संपत्ती ही चंचल असून केव्हाच स्थिर राहात नाही.

५९३ ज्यांचा मानसिक उत्साह अमर्याद असतो, त्यांचे वैभव नष्ट झाले तरी ते त्याच शोक करीत नाहीत.

५९४ ज्यांचा मानसिक उत्साह दांडगा असतो, त्यांचे स्थान शोधीत लक्ष्मी त्यांच्याकडे स्वयमेव येते.

५९५ कमलनालाची लांबी जलाशयाच्या खोलीवर अवलंबून असते. मनुष्याची थोरवी त्याच्या उत्साहाच्या प्रमाणावर अवलंबून असते.

अनुक्रमणिका

५९६ सदोदित महत्त्वाकांक्षा बाळगा. जरी यशःसिद्धि झाली नाही, तरी आकांक्षेचा त्याग करू नका.

५९७ मनोधैर्यवान लोक विनाशसमयीही निराश होत नाहीत. अंगात बाण रुतण्याइतकी शरवृष्टी झाली, तरी हत्ती विचलीत होत नाही.

५९८ ज्यांचे मनोधैर्य दृढ नाही, त्यांना या जगात बलवान व दातृत्वशील होण्याचा आनंद लाभणार नाही.

(५९३) उत्साहवन्तः पुरुषा नावसीदन्ति कर्मसु ।

—रामा ४·१·१२३

(५९४) उत्थानेनामृतं लब्धमुत्थानेनासुरा हताः ।
उत्थानेन महेन्द्रेण श्रैष्ट्यं प्राप्तं दिवीह च ।।

—मभा १२·५८·१४

(५९६) न च कर्मस्वसिद्धेषु दुःखं तेन च न ग्लपेत् ।
सवैंरेव गुणैर्युक्तो द्रव्यवानपि यो भवेत् ।।

—मभा ५·४३·३१

५९९ उत्साहमूर्ती वाघाने आक्रमण केले, तर तीक्ष्णदंत व महाकाय हत्तीसुद्धा भयभीत होतो.

६०० दुर्दम्य उत्साह हेच खरे वैभव होय. त्याच्या अभावी मानव हा मानवदेहधारी वृक्षच होय.

अध्याय ६१ – अनालस्य

६०१ अक्षय तेवत राहणाऱ्या वंशदीपावर आलस्याची काजळी धरली, तर तो क्रमशः निस्तेज होऊन विझुन जाईल.

६०२ ज्याला आपला वंश उत्तम राहावा असे वाटत असेल, त्याने आलस्याचा त्याग केला पाहिजे.

६०३ जो भोळा किंवा अडाणी मनुष्य आळसाला मांडीवर घेऊन त्याचे लाड करील, तो स्वतः नष्ट होण्यापूर्वीच त्याचा वंश नाश पावेल.

६०४ आलस्यग्रस्त होऊन जे उद्योगाचा आश्रय करीत नाहीत, त्यांचे कुल क्रमाक्रमाने कलंकित होऊन नाश पावेल.

६०५ दीर्घसूत्रता, विस्मृती, आलस्य आणि निद्रा या विनाशोन्मुख लोकांना प्रिय असणाऱ्या चार नौका आहेत.

६०६ सम्राटाची संपत्ती जरी पायाशी चालून आली, तरी आळशी मनुष्याला तिचा फारसा लाभ मिळू शकत नाही.

(६००) उत्साहो बलवानार्य नास्त्युत्साहात्परं बलम् ।
सोत्साहस्य हि लोकेषु न किंचिदपि दुर्लभम् ।।

—रामा ४·१·१२२

(६०४) अर्थस्य मूलमुत्थानमनर्थस्य विपर्ययः ।
अनुत्थाने ध्रुवो नाशः प्राप्तस्यानागतस्य च ।।

—कौअ १९

(६०५) षड्दोषाः पुरुषेणेह हातव्या भूतिमिच्छता ।
निद्रा तन्द्री भयं क्रोध आलस्यं दीर्घसूत्रता ।।

— मभा ५·३३·७८

(६०६) अलसस्य लब्धमपि रक्षितुं न शक्यते ।

—चासू ३९

६०७ उद्योगाची कांस न धरता जे आलस्यग्रस्तच राहतील, त्यांना इतरांकडून तिरस्कारयुक्त अपशब्दच ऐकून घ्यावे लागतील.

६०८ कुलीन कुटुंबात आलस्यास आश्रय मिळाला की ते कुटुंब शत्रूच्या गोटात निश्चितच जाईल.

६०९ स्वतःच्या व कुटुंबाच्या कीर्तीवर एखादा कलंक असला, तर आलस्याची हकालपट्टी करताच तो आपोआप नष्ट होईल.

६१० राजा जर निरलस असेल तर वामनावतारात त्रिविक्रमाने तीन पावलांनी आक्रमिलेली भूमी त्याला एकदमच प्राप्त होईल.

अध्याय ६२ – दीर्घोद्योग

६११ कोणतेही कार्य असाध्य समजून स्वस्थ बसू नका. उद्योगाने निश्चित यशःप्राप्ती होईल.

६१२ कार्यारंभ केल्यावर ते मध्येच सोडू नका. काम अपुरे सोडणाऱ्यास जगही सोडते.

६१३ परोपकार करण्याच्या श्रेष्ठ प्रवृत्तीची मुळे दीर्घोद्योगाच्या भूमीत खोल गेलेली असतात.

६१४ दीर्घोद्योगाची कास न धरता परोपकार करू पाहणाऱ्या मनुष्याची इच्छा नपुंसक मनुष्यांच्या हातातील खड्गाप्रमाणे होते.

अनुक्रमणिका

६१५ फळाची आशा न बाळगता जो सतत उद्योग करीत राहतो, तो आपल्या बंधुजनांची दुःखे दूर करून त्यांना स्तंभाप्रमाणे आश्रय देतो.

६१६ प्रयत्नाने वैभवाची वृद्धी होते. आळसाने दारिद्र्य ओढवते.

(६११) न तददस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा क्वचित् ।
पौरुषेण प्रयत्नेन यन्नाप्नोति गुणान्वितः ।।

—योवा ४·६२·१९

(६१२) नाऽसम्यक्कृतकारी स्यादुपक्रम्य कदा च न ।
कण्टको ह्यापि दुश्छिन्न आस्त्रावं जनयेच्चिरम् ।।

—मभा १·१४०·९

(६१६) संग्रहे विग्रहे चैव यत्नः कार्योऽनुसूयता ।
उत्साहश्चापि यत्नेन कर्तव्यो भूतिमिच्छता ।।

—मभा १·१४०·८१

६१७ आळशाच्या घरी अक्काबाईची फेरी असते. सततोद्योगी असणाऱ्याच्या घरी कमलासना लक्ष्मी निवास करते

६१८ दैवाची अनुकूलता नसणे हा काही कोणाचा दोष नाही. जाणूनबुजून उद्योग न करणे हा मात्र दोष सोय.

६१९ प्रतिकूल दैवामुळे प्रयत्नांती यशःप्राप्ती झाली नाही, तरी केलेल्या शारीरिक श्रमांचे वेतन निश्चितपणे मिळेल.

६२० निरंतर निर्भयपणे उद्योग करणारा मनुष्य दुर्भाग्यालाही माघार घेण्यास लावतो.

अध्याय ६३ – विपत्तीत धैर्य

६२१ संकट कोसळले तर भरपूर हसा. संकटाशी लढून त्यावर विजय मिळविण्याचा अन्य मार्ग नाही.

६२२ बुद्धिमान मनुष्य संकटाच्या महापुरात सापडला, तर त्याने धैर्यपूर्वक विचार करावा. म्हणजे ती संकटे नष्ट होतील.

६२३ संकटांनी व्यथित न होणारे लोक त्या संकटांनाच व्यथित करतील.

अनुक्रमणिका

६२४ अनेक अडथळे असलेल्या मार्गातून बैल जसा गाडी ओढून नेतो, त्याचप्रमाणे निर्भय व उद्योगी मनुष्यावर आलेली संकटे दूर पळून जातात.

६२५ उद्योगी मनुष्यावर कितीही संकटे कोसळली, तरी तो भयभीत होत नाही. उलट ती संकटेच भयभीत होऊन पळून जातात.

(६१८) मूढैः प्रकल्पितं दैवं तत्परास्ते क्षयं गताः ।
प्राज्ञास्तु पौरुषार्थेन पदमुत्तमतां गताः ।।

— योवा २·८·१६

(६१९) धर्मकार्यं यतञ् छक्त्या न चेत्प्राप्नोति मानवः ।
प्राप्तो भवति तत्पुण्यमत्र मे नास्ति संशयः ।।

—मभा ५·९३·६

(६२०) दैवं पुरुषकारेण यः समर्थः प्रबाधितुम् ।
न दैवेन विपन्नार्थः पुरुषः सोऽवसीदति ।।

— रामा २·२३·१८

(६२५) न संत्याज्यं च ते धैर्यं कदाचिदपि पाण्डव ।
धीरस्य स्पष्टदण्डस्य न भयं विद्यते क्वचित् ।

—मभा १२·५६·४७

६२६ वैभव आले असता त्याविषयी जे लोभ बाळगीत नाहीत, ते वैभव नष्ट झाल्यानंतर विचलित होऊन दुःख कसे करतील?

६२७ मानवी शरीरे हे संकटाचे लक्ष्यच आहे. हे जाणून संकटे आली असता शहाणे लोक भयभीत होत नाहीत.

६२८ सुखाचा लोभ न धरणारा व संकटाचे आगमन हे स्वाभाविक मानणारा मनुष्य, त्याच्यावर संकटे कोसळली तरी दुःखीत होत नाही.

६२९ सुखप्राप्तीच्या समयी आनंदाने चढून न जाणारा मनुष्य संकटसमयी डगमगत नाही.

६३० जो दुःखालाही सुख मानू लागतो, तो आपल्या शत्रूच्याही प्रशंसेस पात्र होतो.

(६२६) य एवं कृतबुद्धिः स कर्मस्वेव प्रवर्तते ।
नाऽसिद्धौ व्यथते तस्य न सिद्धौ हर्षमश्नुते ।।

—मभा ५·७७·१२

अनुक्रमणिका

(६२८) **या विवेकविकासिन्यो मतयो महतामिह ।**
न ता विपदि मज्ज्ञन्ति तुम्बकानीव वारिणि ।।

—योवा २·१४·११

(६२९) **दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।।**
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ।।

—गीता २·५६

अनुक्रमणिका

भाग २ - राज्याची अंगे

अध्याय ६४ - मंत्री

६३१ नियोजित कार्य, त्याची साधने, त्याला योग्य काळ व ते करण्याची पद्धत, या सर्वांचे ज्यास उत्तम ज्ञान आहे, तो मंत्री.

६३२ निर्भयता, कुलीनता, प्रजेचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य, विद्वत्ता आणि दीर्घोद्योग, या पाच गुणांनी संपन्न असा मंत्री असावा.

६३३ शत्रूत भेद पाडणे, जुने स्नेहसंबंध दृढ करणे, आणि तुटलेले स्नेहसंबंध पुन्हा जुळविणे, या तीनही कार्यांत जो निष्णात असतो, तो उत्तम मंत्री.

६३४ विविध विषयांची चर्चा करून योग्य निर्णय घेण्याची शक्ती, तो निर्णय कार्यवाहीत आणण्याचे सामर्थ्य, आणि स्वतःचा अभिप्राय निर्भयपणे राजाला सांगण्याचे धैर्य, हे मंत्र्याचे गुण होत.

६३५ धर्मज्ञ, विद्यासंपन्न वक्ता, आणि प्रत्येक कार्याचे व व्यक्तीचे मर्म जाणणारा असा मनुष्य, मंत्री व मित्र होण्यास पात्र असतो.

६३६ धर्मग्रंथांचे ज्ञान व कुशाग्र बुद्धी यांनी संपन्न असलेल्या विद्वानापुढे कोणता मनुष्य टिकाव धरू शकेल?

६३७ ग्रंथातरीच्या आचारपद्धतीचे ज्ञान करून घेतलेले असले, तरी त्या तत्कालीन लोकव्यवहारास जुळवून घेतल्या पाहिजेत.

(६३२) अभिजनप्रज्ञाशौचशौर्यानुरागयुक्तानमात्यान्कुर्वीत ।

—कौअ ८

(६३३) दूत एव हि संधत्ते भिनत्त्येव हि संहतान् ।
दूतस्तत्कुरुते कर्म भिद्यन्ते येन वा न वा ।।

— म नु ७·६६

(६३५) अन्यानपि प्रकुर्वीत शुचीन्प्राज्ञानवस्थितान् ।
सम्यगर्थसमाहर्तॄनमात्यान्सुपरीक्षितान् ।।

—म नु ७·६०

६३८ दुसऱ्याने आपल्यासारखा केलेला उपदेश राजाने अज्ञानामुळे पायदळी तुडविला असला, तरीही आपणास योग्य वाटणारा उपदेश राजाला करणे, हे मंत्र्याचे कर्तव्य आहे.

अनुक्रमणिका

६३९ दुष्ट दुराचारी मंत्र्याच्या संगतीत राहण्यापेक्षा, सत्तर कोटी शत्रूच्या सान्निध्यात राहणेही श्रेयस्कर आहे.

६४० ज्यांच्या अंगी दृढ कार्यक्षमता नाही, त्यांनी स्वतःच योजनापूर्वक आरंभिलेली कार्ये त्यांना पार पाडता येणार नाहीत.

अध्याय ६५ – वक्तृत्व

६४१ अन्य कोणत्याही गुणापेक्षा वाक्पटुत्व नामक सद्‌गुणाचे सामर्थ्य अधिक आहे.

६४२ वक्तृत्वात विकासाचे व विनाशाचेही सामर्थ्य आहे. म्हणून आपण बोलताना घसरणार नाही, याची मंत्र्याने सदैव दक्षता घेतली पाहिजे.

६४३ वक्तृत्व तेच, की जे ऐकणाऱ्यास तर वश करतेच पण न ऐकणाऱ्याच्याही मनात (तो वैरी असला तरी) उत्सुकता निर्माण करते.

६४४ श्रोत्यांचे सामर्थ्य ओळखून वक्तृत्व करावे. वाणीच्या सामर्थ्यापेक्षा धर्म व धन यांचीही शक्ती अधिक नाही.

६४५ तुमच्या शब्दाला विरोध करून अन्य कोणी तुमच्यावर विजय मिळविणार नाही, याची दक्षता घेऊन तुमच्या भाषणात शब्दांचा उपयोग करा.

६४६ स्वतःच्या मधुर शब्दांनी श्रोत्यांची तृप्ती करून दुसऱ्याच्या शब्दांतील मर्म शोधून घेणे, हे निष्कलंक चारित्र्याच्या थोर लोकांचे लक्षण आहे.

६४७ ज्यांच्या अंगी वाक्पाटव, निर्दोषत्व व निर्भयता हे गुण आहेत, त्यांना त्यांचे वैरीही जिंकू शकणार नाहीत.

६४८ आपल्या भाषणात माधुर्य व अलंकार यांचा उपयोग करून जे आपले वक्तृत्व गाजवतील, त्यांचा उपदेश सर्व जग आचरणात आणील.

६४९ ज्यांना आपले विचार थोड्या व निर्दोष शब्दांत मांडता येत नाहीत, त्यांनाच पाल्हाळाची हौस असते.

६५० स्वतः अध्ययन करून संपादन केलेली विद्या ज्यांना इतरास शिकविता येत नाही, ते दिसण्यात सुंदर पण गंधहीन पुष्पगुच्छाप्रमाणे होत.

(६४२) जिह्वायत्तौ वृद्धिविनाशौ ।

—चासू ४४०

अनुक्रमणिका

अध्याय ६६ — शुद्धाचरण

६५१ सन्मित्रांच्या साहाय्याने मनुष्याला संपत्तीची प्राप्ती होते. स्वतःच्या शुद्धाचरणाने त्याला हव्या त्या सर्व गोष्टी मिळतात.

६५२ ज्या कार्यामुळे (राजाला) कीर्ती व धर्म या दोहोंचीही प्राप्ती होण्यासारखी नसेल, त्या कार्याचा मंत्र्याने सदैव त्याग केला पाहिजे.

६५३ भविष्यकाळी यशःप्राप्तीची इच्छा करणाऱ्या सदाचारी मनुष्याने, त्या यशास काळिमा आणणाऱ्या गोष्टींचा त्याग केला पाहिजे.

६५४ निश्चल बुद्धीचे लोक विपत्तीत सापडले असताही निंद्य कर्म करणार नाहीत.

६५५ मागाहून पश्चात्ताप करण्याची पाळी येईल अशी कोणतीही गोष्ट करू नका. करण्याचा प्रसंग ओढवलाच, तर आधीच दक्षता घ्या.

६५६ स्वतःच्या मातेचे प्राण भुकेने व्याकुळ होत असले, तरी विद्वज्जनांच्या मते निंद्य ठरेल अशी गोष्ट करू नका.

६५७ दुराचरणाने प्राप्त झालेल्या समृद्धीपेक्षा थोर लोक अती निर्धनताही श्रेष्ठ समजतात.

६५८ थोर लोकांनी निंद्य म्हणून सांगितलेल्या गोष्टींचा त्याग न करता, त्या करीतच राहिले, आणि प्रसंग-विशेषी त्यात यश प्राप्त झाले, तरी अंती संकट ठेवलेलेच.

(६५४) **दैवादेशादापदं प्राप्य**
विद्वांश्वरेन्नृशंसं न हि जातु राजा ।

—मभा १·९२·१७

(६५५) **येन खट्वां समारूढः परितप्येत कर्मणा ।**
आदावेव न तत्कुर्यादध्रुवे जीविते सति ।।

—मभा ५·३९·२९

(६५७) **महान्तमप्यर्थमधर्मयुक्तं**
यः संत्यजत्यनपाकृष्ट एव ।
सुखं सुदुःखान्यवमुच्य शेते
जीर्णां त्वचं सर्प हवावमुच्य ।।

—मभा ५·४०·२

अनुक्रमणिका

६५९ दुसऱ्याचा अश्रुपात करून प्राप्त झालेले वैभव तुम्हांला अश्रुपात करावयास लावून नाहीसे होईल. सदाचरणाने प्राप्त झालेले वैभव निघून गेले तरी पुन्हा परत येईल.

६६० दुराचरणाने मिळविलेले वैभव सुरक्षित राहील अशी ज्याची अपेक्षा आहे, त्याची तुलना मातीच्या कच्च्या मडक्यात पाणी साठविणाऱ्याशीच करावी लागेल.

अध्याय ६७ — दृढ कार्यक्षमता

६६१ स्वतःच्या मनाचा दृढनिश्चय म्हणजेच दृढ कार्यक्षमता, इतर सर्व गोष्टी व्यर्थ होत.

६६२ सिद्धीस न जाण्यासारखी कार्ये हाती न धेणे, व कार्यात अपयश आले तरी निराश न होणे हे दृढ कार्यक्षमतेचे दोन मार्ग आहेत, असे नीतिनिपुण लोक सांगतात.

६६३ आरंभिलेले कार्य यशस्वी होईपर्यंत त्याचे मर्म उघड न करणे, हे सामर्थ्याचे लक्षण आहे. मध्यंतरीच त्याचा स्फोट झाला, तर त्यातून भयंकर संकट निर्माण होते.

६६४ 'आम्ही अमुक करू' अशी आश्वासने देणे सोपे आहे. दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कृती करणे हे दुर्घट आहे.

६६५ मंत्र्यांनी दृढ कार्यक्षमतेच्या बळावर पार पाडलेल्या कृत्यांचे श्रेय राजाला मिळेल, आणि म्हणून ती कृत्ये सर्वांच्या अधिकच आदरास पात्र होतील.

६६६ योजकांच्या अंगी जर दृढ कार्यक्षमता असेल, तर त्यांनी योजनानुसार आरंभिलेली कार्ये नियोजित फळ प्राप्त करून देतील.

(६६२) अर्थानारभते बालो नाऽनुबन्धमवेक्षते ।

—मभा २·१५·१५

(६६३) एकं विषरसो हन्ति शस्त्रेणैकश्च वध्यते ।
सराष्ट्रं सप्रजं हन्ति राजानं मंत्रविप्लवः ।।

—मभा ५·३३·४५

(६६४) यदीदं कत्थनाल्लोके सिद्ध्येत्कर्म धनंजय ।
सर्वे भवेयुः सिद्धार्थाः कत्थने को हि दुर्गतः ।।

—मभा ५·१६०·१७

६६७ मनुष्याचा आकार पाहून त्याला तुच्छ लेखू नका. मोठ्या रथाच्या चक्राच्या आसाच्या लहानशा खिळीसारखा तो (क्षुद्र पण महान कार्यकर्ता) असेल.

अनुक्रमणिका

६६८ निर्दोष योजना करून आरंभिलेले कार्य अखंड परिश्रम करून उत्तम प्रकारे यशस्वी केले पाहिजे.

६६९ कार्याला आरंभ करताना व केल्यानंतर मध्येच संकटे कोसळली, तरी धैर्य धरून कार्यात यश व आनंद प्राप्त करून घेतला पाहिजे.

३७० इतर कसली दृढता असो वा नसो. कार्यकर्त्याच्या अंगी जर कार्यक्षमतेची दृढता नसेल, तर लोक त्याची पर्वा करणार नाहीत.

अध्याय ६८—कार्यपद्धती

६७१ दृढ निश्चयाने कार्याचा आरंभ केल्यानंतर विचाराचा काळ संपला. नंतर शिथिलता आणणे किंवा विलंब लावणे हे हानिकारक आहे.

६७२ एखादे काम विलंबानेच करणे इष्ट असले तर विलंबाने करा. ज्या कामात विलंबास स्थान नाही तेथे मात्र मुळीच विलंब करू नका.

६७३ आरंभिलेले कार्य शक्य तोवर धडाडीने करा. शक्य नसेल, तर ते पुरे करण्यासाठी योग्य उपाय सुचण्याची वाट पाहा.

६७४ अवशिष्ट (अपुरे) कार्य व अवशिष्ट (न जिंकलेले) शत्रू ही दोन्हीही अवशिष्ट अग्नीप्रमाणे तुमचा घात करतील.

(६६८) **निश्चित्य यः प्रक्रमते नान्तर्वसति कर्मणः ।**
अबन्ध्यकालो वश्यात्मा स वै पण्डित उच्यते ।।

—मभा ५·३३·२४

(६७१) **महान्भवत्यनिर्विण्णः सुखं चानन्त्यमश्नुते ।**

—मभा ५·३९·५९

(६७२) **संसारयति कृत्यानि सर्वत्र विचिकित्सते ।**
चिरं करोति क्षिप्रार्थे स मूढो भरतर्षभ ।।

—ममा ५·३३·३४

(६७४) **ऋणशेषमग्निशेषं शत्रुशेषं तथैव च ।**
पुनः पुनः प्रवर्धन्ते तस्माच्छेषं न धारयेत् ।।

— मभा १२·१४०·५८

अनुक्रमणिका

६७५ संपत्ती, साधनसामग्री, योग्य समय, कार्यपद्धती आणि स्थान, या पाच गोष्टींचा विचार करून मगच एखाद्या कार्यास प्रवृत्त व्हावे.

६७६ कोणत्याही कार्यास प्रारंभ करण्यापूर्वी, ते पुरे करण्याची पद्धती, ते चालू असताना मार्गात येणारी संकटे, आणि परिणामी मिळणारे फळ, या तीनही गोष्टींचा विचार करावा.

६७७ आपण अंगीकारलेल्या कार्यासारखे कार्य ज्यांनी पूर्वी केलेले असेल, त्यांच्याकडून त्या कार्याचे मर्म जाणून घेऊन त्या कार्यास प्रवृत्त होणे, हा कार्यसिद्धीचा मार्ग आहे.

६७८ एक कार्य चालू असता त्यातून दुसरे पूर्ण करून घेणे, म्हणजे मदस्रावी हत्तीकडून दुसरा हत्ती पकडण्यासारखे आहे.

६७९ आपल्या मित्राचे त्याच्या साहाय्याबद्दल कौतुक करण्यापूर्वी आपल्या शत्रूच्या शत्रूशी मित्रत्वाचे संबंध जोडणे अगत्याचे आहे.

६८० लहान बलहीन राजांनी आपली अस्थिर व दीनवाणी परिस्थिती जाणून घेऊन, संधी सापडेल तेव्हा, बलवानापुढे नम्र होऊन त्याच्याशी संधी करावा.

(६७५) **अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।**
विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ।।
शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः ।
न्याय्यं वा विपरीतं वा पंचैते तस्य हेतवः ।।

— गीता १८·१४·१५

(६७६) **अनुबन्धं च संप्रेक्ष्य विपाकं चैव कर्मणाम् ।**
उत्थानमात्मनश्चैव धीरः कुर्वीत वा न वा ।।

— मभा ५·३४·९

(६७८) **अधनेनार्थकामेन नार्थः शक्यो विधित्सितुम् ।**
अर्थैरर्था निबध्यन्ते गजैरिव महागजाः ।।

— मभा १२·८·२०

(६७९) **ये सपत्नः सपत्नानां सर्वास्तामुपसेवयेत् ।**
आत्मनश्चापि बोद्धव्याश्चारा विनिहताः परैः ।।

—मभा १२·१४०·३६

(६८०) **परस्माद् हीयमानः संदधीत ।**

— कौअ ९९

अनुक्रमणिका

अध्याय ६९ – दूत (राजदूत)

६८१ स्नेहपूर्णता, कुलीनता आणि राजाला इष्ट असलेले सदाचरण, हे राजदूताला अवश्य असणारे गुण आहेत.

६८२ राजनिष्ठा, विद्वत्ता आणि विवेचक वक्तृत्व, हे राजदूताला अवश्य असणारे तीन गुण आहेत.

६८३ आपल्या राज्याच्या विजयेच्छेने दुसऱ्या शस्त्रधारी राजाच्या सभेत शिष्टाईसाठी जाणारा राजदूत विद्वानात अग्रगण्य असावा.

६८४ बुद्धिमत्ता, आकर्षक रूप आणि विद्याध्ययन, या तीन गुणांनी संपन्न असलेला मनुष्य राजदूत म्हणून पाठवावा.

६८५ कठोर शब्दांचा उपयोग न करता, सौम्य वाणीने आपल्या राजाचे मनोगत थोडक्यात व्यक्त करून त्याला यश मिळवून देतो, तोच चांगला राजदूत.

६८६ गहन विद्वत्ता, निर्भयता, मनोवेधक वक्तृत्व आणि समयज्ञता हे गुण ज्याच्या अंगी असतील, तो राजदूत विजयी होतो.

६८७ स्वकर्तव्यनिष्ठ, देशकाल परिस्थितीचे ज्ञान असणारा आणि परिपक्व विचार व्यक्त करणारा, तोच श्रेष्ठ राजदूत समजावा.

६८८ निर्दोष चारित्र्य, सभासदांशी स्नेह आणि धैर्य, हे तीन गुण, आणि त्याचप्रमाणे सत्य, या गोष्टी उत्तम राजदूतास अवश्य आहेत.

६८९ ज्याच्या तोंडातून चुकूनही सदोष शब्द बाहेर पडत नाहीत, व तरीही जो आपल्या राजाचे विचार दुसऱ्या राजाच्या सभेत निर्भयपणे व्यक्त करतो, तोच यशस्वी राजदूत.

(६८२) **अनुरक्तः शुचिर्दक्षः स्मृतिमान्देशकालवित् ।**
वपुष्मान्वीतभीर्वाग्मी दूतो राज्ञः प्रशस्यते ।।

— मनु ७·६४

(६८४) **कुलीना वाक्यसंपन्ना ज्ञानविज्ञान कोविदाः ।**
रूपवन्तो गुणोपेतास्तथाऽलुब्धा जितश्रमाः ।।

—मभा १२·१६८·१७

(६८६) **कुलीनः कुलसंपन्नो वाग्मी दक्षः प्रियंवदः ।**
यथोक्तवादी स्मृतिमान्दूत स्यात्सप्तभिर्गुणैः ।।

—मभा १२·८५·२८

अनुक्रमणिका

६९० प्राणसंकट ओढविण्याची भीती असली, तरी निर्भयपणे आपल्या राजास यश प्राप्त करून देण्याच्या हेतूने त्याचे विचार जो दुसऱ्या राजाच्या सभेत व्यक्त करतो, तोच खरा राजपूत.

अध्याय ७० – राजसभेतील वर्तन

६९१ (ऊब घेण्याच्या शेकोटीतील) अग्नीपासून फार दूर राहावयाचे नसते, व त्याच्या फार जवळही जावयाचे नसते. राजसभेत रागीट राजापासून योग्य अंतर राखण्यासंबंधी हाच न्याय लावावा.

६९२ राजसभेत वावरणाऱ्या मनुष्याने राजास प्रिय असणाऱ्या गोष्टींविषयी अभिलाषा दाखविली नाही, तर राजाकडूनच त्याला स्थिर वैभव प्राप्त होण्याचा संभव असतो.

६९३ राजकृपा राखावयाची असेल, तर तीव्र दोषांपासून अलिप्त राहिले पाहिजे. राजाला एकदा संशय आला, तर तो दूर करणे कठीण आहे.

६९४ राजाची दृष्टी तुमच्याकडे असताना कोणाच्या कानात कुजबुजणे, किंवा कोणाकडे पाहून स्मित करणे या गोष्टी टाळल्या पाहिजेत.

६९५ राजा कोणाशी रहस्यमय गोष्ट बोलत असेल, तर राजकृपा इच्छिणाराने त्या भाषणाकडे लक्ष देऊ नये, किंवा त्याची चौकशीही करू नये. राजाने एकादे रहस्य (आपण होऊन) सांगितले, तर मात्र ते ऐकून घ्यावे.

६९६ राजाची अनुकूल मनःस्थिती ओळखून व योग्य संधी पाहून त्याला प्रिय वाटतील अशा गोष्टी राजाला मधुर शब्दानी सांगाव्या.

(६९१) **यत्नाच्चोपचरेदेतमग्निवद्देववत्विह ।**
अनृतेनोपचीर्णो हि हन्यादेव न संशयः ॥

— मभा ४·४·२२

(६९४) **न चोष्ठौ न भुजौ जानू न च वाक्यं समाक्षिपेत् ।**
सदा वातं च वाचं च ष्ठीवनं चाऽऽचरेच्छनैः ।।

— मभा ४·४·३५

(६९६) **पृष्टः प्रियहितं ब्रूयान्नब्रूयादहितं प्रिपम् ।**
अप्रियं वा हितं ब्रूयात् श्रृण्वतोऽनुमतो मिथः ।।

—कौला ९४

६९७ राजाला प्रिय व लाभदायक असणाऱ्या गोष्टी त्याच्या कानावर घालाच्या. पण त्याने विचारले तरीही निरर्थक बडबड करण्याचे टाळावे.

अनुक्रमणिका

६९८ "राजे अल्पवयीन आहेत किंवा माझ्या नात्यातील आहेत" असे म्हणून त्यांची अवज्ञा करू नये. त्यांच्या प्रतिष्ठेला शोभेल अशा रीतीनेच त्यांच्याशी व्यवहार करावा.

६९९ राजसभेतील दूरदर्शी व तीव्र बुद्धीचे सभासद, "मी राजाच्या कृपेतील आहे" या ऐटीने राजाला अप्रिय अशा गोष्टी कदापि करणार नाहीत.

७०० राजाशी माझा जुना स्नेहसंबंध आहे या भावनेने जर कोणी अयोग्य आचरण करू लागला, तर ते हानिकारक ठरल्यावाचून राहणार नाही.

अध्याय ७१ – इंगित ज्ञान

७०१ कोणीही न सांगता दुसऱ्याच्या मनातील इंगित अचूक ओळखणारा मनुष्य म्हणजे जलाने सदैव परिपूर्ण असणाऱ्या सागराने परिवेष्टित अशा पृथ्वीचे एक भूषणच आहे.

७०२ दुसऱ्याच्या मनातील इंगित अचूक ओळखणारा मनुष्य हा स्वर्गातील देवासमानच होय.

७०३ मुद्रेवरील भावावरूग जे मनातील इंगित जाणतात, त्यांना यथेष्ट देणग्या देऊन (राजाने) वश करून घ्यावे.

७०४ कोणीही न सांगता दुसऱ्याच्या मनातील इंगित त्याच्या मुद्रेवरून ओळखणारे व तसे न ओळखणारे, हे दोघे सारखेच भासले तरी ते वेगळेच असतात.

(६९७) ऐश्वर्यं प्राप्य दुष्प्राप्यं प्रियं प्राप्य च राजतः ।
अप्रमत्तो भवेद्राज्ञः प्रियेषु च हितेषु च ॥

—मभा ४·४·३३

(६९८) बालोऽपि नावमन्तव्यो मनुष्य इति भूमिपः ।
महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति ।।

—मनु ७·८

(७००) नाऽहमस्य प्रियोऽस्मीति मत्वा सेवेत पण्डितः ।
अप्रमत्तश्च सततं हितं कुर्यात्प्रियं च यत् ।।

—मभा ४·४·३६

७०५ दुसऱ्याच्या मुद्रेवरून त्याच्या मनातील इंगित ज्याला ओळखता येत नाही, त्याच्या पाच ज्ञानेद्रियांपैकी डोळ्यांचा काय उपयोग?

७०६ स्फटिकाशेजारी (किंवा आरशासमोर) ठेवलेल्या वस्तू त्यात जशा स्पष्टपणे दिसतात, तसेच अंतरंगातील विचार मुद्रेवर उमटतात.

अनुक्रमणिका

७०७ जिच्याकडे पाहताच आपल्या अंतरंगातील आनंद वा दुःख ही व्यक्त होतात, त्या मुद्रेपेक्षा अधिक ज्ञानी कोणी आहे काय?

७०८ मुद्रेवरून इंगित जाणणाऱ्यासमोर तुम्ही नुसते उभे राहिलात, तर तुमच्या अंतरंगातील विचार ताबडतोब प्रकट होतील.

७०९ डोळ्यांकडे पाहून अंतरंगाचा ठाव घेणारे लोक राजाच्या पदरी असतील, तर एखाद्याच्या (दुसऱ्या राजाच्या) अंतरंगात आपल्याविषयी असलेले मित्रत्व किंवा शत्रुत्व त्याला अशा लोकांसमोर उभे करून पारखता येईल.

७१० जे आपल्या कुशाग्र बुद्धीचा अभिमान बाळगतात, त्यांचे ज्ञानसाधन किंवा मानदंड म्हणजे दुसऱ्याच्या मनातील इंगित ओळखणारे त्यांचे डोळे.

अध्याय ७२ — श्रोतृ-परीक्षा

७११ एकाच अर्थाचे अनेक शब्द वक्त्यास परिचित असले, तरी श्रोतृवर्गास रुचतील अशा शब्दांचा उपयोग करून त्याने भाषण करावे.

७१२ चांगल्या शब्दांचा उपयोग करण्याची वक्तृत्वशक्ती आपल्या अंगी असली, तरी स्थलकालास अनुरूप शब्दांची योजना आपल्या भाषणात करावी.

७१३ श्रोतृवर्गाचे पूर्ण ज्ञान करून न घेता जे वक्तृत्व गाजवू पाहतात, त्यांना शब्दांच्या अर्थातील छटांचे ज्ञान नसते, आणि विद्वत्ताही बेताचीच असते.

७१४ बुद्धिमान लोकांसमोर आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन करा. कोऱ्या करकरीत लोकां समोर चुन्यासारखे पांढरे फटफटीत व्हा.

(७०६) निर्मले मुकुरे वक्त्रमयत्नेनैव सिध्यति ।

—योवा २·२·१९

(७०७) आकारश्छाद्यमानोऽपि न शक्यो विनिगूहितम् ।
बलाद्धि विवृणोत्येव भावमन्तर्गतो नृणाम् ।।

— रामा ६·१७·६४

७१५ विद्वत्सभेत (अनाहूतपणे) घुसून भाषण न करण्याचा संयम हा सद्गुण सर्वश्रेष्ठ आहे.

७१६ बुद्धिभांडार समृद्ध असलेल्या विद्वानांच्या सभेत चुका करणे, म्हणजे चांगल्या मार्गावर चालताना धडपडून पडण्यासारखे आहे.

७१७ विद्वानांची परीक्षा करण्याची पात्रता अंगी असणारांच्या उपस्थितीतच विद्याध्ययनसंपन्न मनुष्याचे तेज पडेल.

७१८ थोर विद्वानांच्या सभेत भाषण करणे म्हणजे वाढत्या पिकावर जलसिंचन करण्यासारखे आहे.

७१९ विद्वानांच्या सभेत आपला प्रभाव पाडू शकणाऱ्या वक्त्याने मूर्खाच्या सभेत चुकूनही तोंड उघडू नये.

७२० आपल्यापेक्षा निकृष्ट पातळीवरच्या लोकांच्या सभेत भाषण करणे म्हणजे गटारात अमृत ओतण्यासारखे आहे.

अध्याय ७३ — सभाधीटपणा

७२१ एकाच अर्थाचे अनेक शब्द परिचित असणारा विद्वान वक्ता श्रोतृवर्गाचा योग्य अंदाज घेऊन अनुचित शब्दांचा उपयोग करून गडबडणार नाही.

७२२ विद्वानांच्या सभेत आपल्या विद्वत्तेचा प्रभाव पाडणारे वक्तृत्व जे करतील, ते विद्वानांतील विद्वान होत.

७२३ युद्धात शत्रूशी शौर्याने लढत असता प्राणार्पण करणारे वीर अनेक असतील पण विद्वत्सभेत धैर्याने ठाम उभे राहणारे विरळाच.

७२४ विद्वत्सभेत प्रभावी भाषण करून आपल्या विद्वत्तेचे वैभव दाखवा. त्याचबरोबर तुमच्यापेक्षा श्रेष्ठ विद्वानांकडून अधिक ज्ञान संपादन करा.

(७१५) न सभां प्रविशेत्प्राज्ञः सभ्यदोषाननुस्मरन् ।
अंब्रुवन्विब्रुवन्नज्ञो नरः किल्बिषमश्नुते ।।

— भाग १०·४४·१०

(७२०) अशिष्यायाविरक्ताय यत्किंचिदुपदिश्यते ।
तत्प्रयात्यपवित्रत्वं गोक्षीरं श्वदृताबिव ।।

— योवा २·२·२१

(७२४) प्राज्ञं प्राप्य न पृच्छन्ति ये केचित्ते नराधमाः ।

— योवा ३·७८·३३

७२५ सभेत प्रतिपक्षीयांस निर्भयपणे उत्तर देण्याची पात्रता येण्यासाठी तर्कशास्त्र व इतर शास्त्रे यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

अनुक्रमणिका

७२६ मनाने भेकड असणाऱ्या लोकांस खड्गाचा काय उपयोग? कुशाग्र बुद्धिमान लोकांच्या सभेत जे घाबरतात, त्यांच्या ग्रंथाध्ययनाचा काय उपयोग?

७२७ विद्वत्सभेत भयग्रस्त होणाऱ्या सभासदाच्या हातातील ग्रंथ (त्याने केलेले अध्ययन) आणि रणांगणावर शत्रूसमोर उभा राहणाऱ्या नपुंसकाच्या हातातील तेजस्वी खड्ग, ही सारखीच.

७२८ विद्वानांच्या सभेवर जो आपल्या विद्वत्तेचा प्रभाव पाडू शकत नाही, त्याने केलेले विविध ग्रंथांचे अध्ययन व्यर्थ होय.

७२९ विद्याध्ययन केल्यावरही विद्वत्सभेत भाषण करताना जे भीतिग्रस्त होतात, ते अडाणी लोकांपेक्षाही कनिष्ठ प्रतीचे होत.

७३० भीतिग्रस्त होऊन आपल्या अध्ययनाचा प्रभाव जे विद्वत्सभेवर यशस्वीपणे पाडू शकत नाहीत, ते जिवंत असून मेल्यासारखे होत.

भाग – ३ दुर्ग

अध्याय ७४ – राज्य

७३१ सदैव भरपूर पीक देणारी जमीन, सदाचारसंपन्न प्रजा आणि अक्षय संपत्ती यांची एकत्र वस्ती जेथे आहे, तेच राज्य किंवा देश.

७३२ जेथील संपत्तीचे इतरास आकर्षण वाटते, जेथे भरपूर पीकपाणी येते, आणि जेथे विनाशकारी घटनांचा अभाव आहे, तोच उत्तम देश.

७३३ परराज्यातून आश्रयार्थ आलेल्या लोकांचा भार जे सहन करते, आणि जेथील प्रजा न चुकता कर देते, ते उत्तम राज्य.

७३४ भूकबळी, साथीचे रोग व परचक्र यांपासून जे राज्य सदैव मुक्त असते, तेच खरे राज्य.

७३५ विरोधी गुप्त संघटना, अंतःकलह आणि राज्याच्या अस्तित्वावर उठणारे भूमिगत सशस्त्र लोक यांपासून जे मुक्त आहे, तेच खरे राज्य.

७३६ शत्रूच्या आक्रमणापासून मुक्त असून, शत्रूने आक्रमण केले तरीही जेथील समृद्धी कमी होत नाही, तेच उत्तम राज्य, असे ज्ञाते म्हणतात.

७३७ पावसाचे व झऱ्यांचे पाणी, पर्वतराजी व त्यांतून उगम पावणाऱ्या नद्या आणि दुर्गम दुर्ग, ही उत्तम राज्याची लक्षणे होत.

(७३३) **धिक्तस्य जीवितं राज्ञो राष्ट्रं यस्यावसीदति ।**
अवृत्त्यान्यमनुष्योऽपि यो वैदेशिक इत्यपि ।

—मभा १२·१३०·३४

(७३४) **अनुकर्षं च निष्कर्षं व्याधिपावनमूर्च्छनंम् ।**
सर्वमेव न तन्नाऽऽ सीद्धर्मनित्ये युधिष्ठिरे ।।

— मभा २·१३·१४

(७३५) **कच्चित्पौरा न सहिता ये च ते राष्ट्रवासिनः ।**
त्वया सह विरुद्धन्ते परैः क्रीता कथं च न ।।

— मभा २·५·९६

७३८ आरोग्य, संपत्ती, भरपूर पीकपाणी, आनंदी वातावरण आणि सुरक्षितता, हे श्रेष्ठ राज्याचे पाच अलंकार आहेत.

अनुक्रमणिका

७३९ कष्टावाचून जेथे संपत्ती निर्माण होते, असे काही देश असतात. तर काही देशांत संपत्तीची निर्मिती कष्टसाध्य असते.

७४० वरील सर्व गोष्टींची अनुकूलता व समृद्धी असूनही, ज्या राज्यात राजा व प्रजा यांचे संबंध सामरस्याचे नसतात, ते राज्य व्यर्थच होय.

अध्याय ७५ – दुर्ग

७४१ आक्रमक युद्धात दुर्गरूपी संपत्ती महत्त्वाची आहे. त्याचप्रमाणे शत्रूच्या आक्रमणापासून संरक्षण करण्याच्या कामीही दुर्ग उपयुक्त असतो.

७४२ स्फटिकासारखे निर्मळ पाणी, भव्य मैदान (पठार), उंच पर्वत आणि शीतल छाया देणारे दाट वृक्ष असलेले अरण्य, या चार गोष्टींनी युक्त असणारा दुर्ग उत्तम होय.

७४३ ज्या दुर्गाची तटबंदी, उंची, रुंदी, बळकटपणा आणि दुर्लंघ्यता या चारी गुणांनी संपन्न असते, तो उत्तम दुर्ग, असे युद्धशास्त्रज्ञ सांगतात.

७४४ ज्या दुर्गाच्या आतल्या भागात मोठे मैदान असून, बचावाची स्थाने मात्र चिंचोळी असतात, आणि आक्रमक शत्रूचे धैर्य नष्ट करण्याची क्षमता ज्यात असते, तो उत्तम दुर्ग.

७४५ जिंकण्यास दुर्घट, भरपूर धान्याचा साठा असलेला, आणि आतील लोकांस संरक्षण करण्यास सोपा, असा जो दुर्ग, तो उत्तम.

७४६ ज्यावर धान्य व इतर आवश्यक वस्तू यांचा भरपूर साठा आहे, आणि आक्रमक शत्रूचा प्रतिकार करण्यास समर्थ असे योद्धे ज्यावर आहेत, तो उत्तम दुर्ग.

(७४१) **पार्वतं वनदुर्गं वा सापसारप्रतिग्रहम् ।**
स्वभूमौ पृष्ठतः कृत्वा युध्येत निविशेत च ।।

— कोअ १३०

(७४६) **कश्चिद्दुर्गाणि सर्वाणि धनधान्यायुधोदकैः ।**
यन्त्रैश्च परिपूर्णानि तथा शिल्पिधनुर्धरैः ।।

— मभा २·५·३७

७४७ वेढा घालून किंवा वेढा न घालताही शत्रूने केलेले आक्रमण, त्याचप्रमाणे अंतःशत्रूची किंवा बाह्य शत्रूची फितुरी, यांपासून भक्कम संरक्षण करणारा, तो उत्तम दुर्ग.

७४८ शत्रूचा वेढा पडला असता, आपले संरक्षण करून शत्रूवर विजय मिळविण्याचे कौशल्य असलेले शूर योद्धे ज्याच्या अंतर्भागी आहेत, तो उत्तम दुर्ग.

अनुक्रमणिका

७४९ (शत्रूचा वेढा पडला असताही) ज्यातील शूर योद्धे प्रारंभापासून योग्य ते डावपेच लढवून शत्रूवर विजय संपादन करू शकतात, तोच उत्तम दुर्ग.

७५० वरील सर्व गुणांनी युक्त असा दुर्ग असला, पण त्याचे संरक्षण करणारे वीर जर शूर व युद्धकुशल नसले, तर ते गुण असून नसून सारखेच.

अनुक्रमणिका

भाग ४ — अन्न

अध्याय ७६ - धनसंपादनाचे मार्ग

७५१ अज्ञात व्यक्तींना प्रसिद्धीच्या प्रकाशात आणण्यासाठी संपत्तीसारखे दुसरे साधन नाही.

७५२ निर्धनांचा सर्वजण उपहास करतात. श्रीमंत सर्वांच्या प्रशंसेस पात्र होतात.

७५३ संपत्तिनामक सदैव प्रकाशदायी असा दीपक, आपल्या धन्याला इष्ट त्या स्थानी प्रवेश करून देऊन, तेथील अंधकाराचे (शत्रूचे) निरसन करतो.

७५४ नीतिमार्गाने संपादन केलेली संपत्ती, आपल्या धन्याला धर्म व आनंद यांची प्राप्ती करून देईल.

७५५ जी संपत्ती दया व प्रेम यांच्या संगतीने आलेली नसते, तिचा स्वीकार न करता त्याग करावा.

७५६ (राज्यातील बेवारशी लोकांची) स्वयमेव चालून आलेली, जकात व करयांच्या उत्पन्नाची, आणि जिंकलेल्या शत्रूकडून मिळविलेली, ही सर्व मिळून राजाची संपत्ती होते.

७५७ दया ही प्रेमाची कन्या असून, संपत्तिनामक दाईकडून तिचे पोषण होते.

(७५१) लोकप्रियत्वमर्थसंयोगेन ।

—कौअ ७

(७५२) अर्थवान् सर्वलोकस्य बहुमतः ।

—चासू २५५

(७५४) न्यायागतं धनं चैव न्यायेनैव विवर्धितम् ।
संरक्ष्यं यत्नमास्थाप धर्मार्थमिति निश्वयः ।।

—मभा १२·२९२·४

(७५६) नष्टप्रस्मृतमायुक्तदण्डः पार्श्वं पारिहीणिकमौपा-
यनिकंडमरगतकस्वमपुत्रकं निधिश्वान्यजातः ।।

— कौअ २७

७५८ हाती असलेल्या भरपूर संपत्तीच्या साहाय्याने उद्योगास प्रवृत्त होणे, म्हणजे उंच डोंगरावर चढून तेथून सुरक्षितपणे हत्तीची लढाई पाहण्यासारखे आहे.

अनुक्रमणिका

७५९ भरपूर संपत्ती मिळवून तिचा संग्रह करा. शत्रूचा अहंकार नष्ट करण्यासाठी संपत्तीइतके दुसरे तीक्ष्ण शास्त्र नाही.

७६० ज्याने सन्मार्गाने अर्थ प्राप्त करून घेतला आहे, त्याला धर्म व काम हे दुसरे दोन पुरुषार्थ सहज साध्य आहेत.

(७६०) **अर्थाद्धर्मश्च कामश्च स्वर्गश्चैव नराधिप ।**
प्राणयात्राऽपि लोकस्य विनाह्यर्थं न सिध्यति ।।

— मभा १२·८·१७

अनुक्रमणिका

भाग ५ — सैन्य

अध्याय ७७ - सैन्याचे महत्त्व

७६१ विविध अंगांनी परिपूर्ण आणि निर्भयपणे लढून विजय मिळविणारी सेना, ही राजाची श्रेष्ठ संपत्ती होय.

७६२ आणीबाणीच्या वेळी संख्याबळ कमी होत असताही, पराभवाचा धोका पत्करून, संभाव्य हानीचे भय न बाळगता, रणांगणावर शत्रूस तोंड देण्याचे काम राजाच्या परंपरागत सैन्यावाचून होणे शक्य नाही.

७६३ मूषकांच्या मोठ्या सैन्याने सागरासारखी मोठ्याने गर्जना केली, तरी तिचा काय उपयोग? एकाच सर्पाच्या नुसत्या फिसकाऱ्याने ती सर्व सेना नाश पावेल.

७६४ शत्रूकडून नाश न पावता व शत्रूस फितूर न होता, जे सैन्य दीर्घकाळपर्यंत रणांगणावर उभे राहते, तेच खरे परंपरागत सैन्य.

७६५ प्रत्यक्ष यमराजाने आक्रमण केले असताही, संघटितपणे व शौर्याने त्याचा प्रतिकार जे करू शकते, तेच खरे सैन्य.

७६६ शौर्य, प्रतिष्ठा, परंपरागत मार्गास अनुसरून आचरण आणि राजनिष्ठा, हे सैन्याचे चार संरक्षक गुण होत.

७६७ शत्रूच्या आक्रमणाचा योजनापूर्वक प्रतिकार करून, शत्रूच्या आघाडीच्या सैन्यास तोंड देऊन प्रगती करणारी सेना, तीच उत्तम सेना.

७६८ आक्रमणासाठी अवश्य असणारे धैर्य आणि संरक्षणसामर्थ्य यांच्या अभावीही, केवळ वैभवाच्या प्रदर्शनाने सैन्य प्रशंसेस पात्र होते.

७६९ संख्याबळात घट, पराकाष्ठेची अप्रीती आणि दारिद्र्य, या तीन दोषांपासून सैन्य मुक्त असेल, तर ते निश्चित यशस्वी होईल.

७७० सैन्यात शूर सैनिकांचा मोठा भरणा असला, तरी उत्तम सेनापतीच्या अभावी ते निरर्थक होय.

(७७०) **ऋते सेनाप्रणेतारं पृतनासु महत्यपि ।**
दीर्यते युद्धमासाद्य पिपीलिकपुटं यथा ।।

— मभा ५·१५६·२

अनुक्रमणिका

अध्याय ७८ – सैन्याची प्रतिष्ठा

७७१ (एक सैनिक समोरच्या शत्रूसैनिकास म्हणतो) हे मूर्ख सैनिकांनो, आमच्या सेनापतीसमोर असे येऊ नका. त्याच्यापुढे आलेले अनेकजण दगड बनले आहेत. (त्यांच्या पुरलेल्या प्रेतांवर दगड उभे आहेत.)

७७२ सशावर अचूक फेकून त्याला ठार मारणाऱ्या बाणापेक्षा, हत्तीवर प्रहार करताना नेम चुकलेला भाला अधिक श्रेष्ठ आहे.

७७३ शत्रूशी कराव्या लागणाऱ्या कठोरपणास शौर्य असे म्हणतात. पण संकटात सापडलेल्या शत्रूस साहाय्य करणे हे त्याहीपेक्षा श्रेष्ठ पौरुष होय.

७७४ आपल्या हातातील भाला हत्तीवर फेकल्यानंतर, स्वतःच्या छातीत पूर्वीच घुसलेला भाला (युद्धासाठी) उपटून काढण्यात सैनिकास विलक्षण आनंद होतो.

७७५ युद्धात समोरच्या शत्रूवर रोखलेले डोळे, त्याने आपल्यावर नेम धरून फेकलेल्या भाल्यास भिऊन, जर सैनिकाने मिटले, तर तो त्याचा पराजयच नव्हे का?

७७६ (युद्धसमयी) ज्या दिवशी आपल्या अंगावर भयंकर जखमा झाल्या नाहीत, ते दिवस व्यर्थ गेले, असे शूर सैनिक समजतो.

७७७ स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता जो दिगंत कीर्ती संपादू पाहतो, त्या सैनिकास आपल्या पायात अलंकार म्हणून कडे घालण्याचा अधिकार आहे.

७७८ प्राणत्यागाचेही भय न बाळगणारे योद्धे, राजाच्या क्रोधास भीक न घालता (त्याने लढण्याची मनाई केली तरी) आपल्या प्रतिष्ठेस धक्का लागू देणार नाहीत.

७७९ आपली प्रतिज्ञापूर्ती करण्यासाठी जे मरणही पत्करतात, त्यांच्या चुका काढून त्यांना कोण दोष देणार?

७८० राजाच्या डोळ्यांतून अश्रुपात करावयास लावणारे वीरमरण भिक्षा मागूनही प्राप्त करून घेण्यासारखे आहे.

(७७३) अमित्रमपि चेद्दीनं शरणैषिणमागतम् ।
व्यसने योऽनुगृह्णाति स वै पुरुषसत्तमः ।।

— मभा १३·५९·१०

अनुक्रमणिका

भाग ६ — मैत्री

अध्याय ७९ - मैत्री

७८१ अवश्य संपादनीय अशी मैत्रीपेक्षा कोणती गोष्ट अधिक कठीण आहे? त्याचप्रमाणे आपले संरक्षण करणारे मैत्रीसारखे दुसरे काय साधन आहे?

७८२ सज्ञनांची मैत्री ही (शुक्लपक्षातील) चंद्रकोरीसारखी वाढत असते. दुर्जनांची मैत्री पूर्ण चंद्रबिबाप्रमाणे (कृष्णपक्षात) क्षीण होत जाते.

७८३ चांगल्या ग्रंथांचे अधिकाधिक अध्ययन होत गेल्यावर त्यातील सौंदर्य अधिकाधिक प्रतीत होऊ लागते. त्याचप्रमाणे सन्मित्रांच्या अधिकाधिक संपर्काने अधिकाधिक आनंद प्राप्त होतो.

७८४ मैत्री ही केवळ हसण्याखिदळण्यासाठी नसते. आपल्या हातून काही चूक झाली, तर मित्राने पुढे होऊन चांगले ठोकले पाहिजे.

७८५ वारंवार भेटण्यामिसळण्यानेच केवळ मैत्री सिद्ध होत नाही. परस्परांच्या भावना समजून घेण्यानेच मैत्रीची वृद्धी होत जाते.

७८६ मुद्रेवर हास्य धारण करणारी ही खरी मैत्री नव्हे. अंतःकरणात खोलवर आनंद उत्पन्न करणारी तीच खरी मैत्री.

७८७ उन्मार्गावरून दूर करून योग्य मार्गावर नेणारा तो मित्र. विपत्तीच्या वेळी ती आपल्याबरोबर सहन करतो तो मित्र.

७८८ कमरेचे धोतर सैल झाले म्हणजे आपला हात जसा (ते सावरण्यासाठी) आपोआप जातो, त्याचप्रमाणे संकटसमयी धावून येऊन त्यातून जो आपली मुक्तता करतो तो मित्र.

(७८१) **आढ्यो वापि दरिद्रो वा दुःखितः सुखितोऽपि वा ।**
निर्दोषश्व सदोषश्व वयस्यः परमा गतिः ।।

— रामा ४·८·८

(७८७) **पकार्थानर्थसंबन्धमुपकार्यविकारि च ।**
मित्रभावि भवत्येतन्मित्रमद्वैध्यमापदि ।।

— कौअ १०७

७८९ कोणत्याही काळी किंवा परिस्थितीत, मित्र जेव्हा साहाय्यार्थ सिद्ध असतो, तेव्हा मैत्री उत्कर्षाच्या शिखरावर असते.

अनुक्रमणिका

७९० "मी त्याच्याशी असा वागतो" किंवा "तो माझ्याशी असे वागतो" अशी परस्परांची स्तुती जेव्हा मित्र करू लागतात, तेव्हा मैत्रीचे महत्त्व कमी होते.

अध्याय ८० – मित्र-परीक्षा

७९१ मैत्री एकदा जोडल्यानंतर ती तोडण्याचे स्वातंत्र्य नष्ट होते. म्हणून मित्राची निवड करताना त्याची चांगली परीक्षा करावी.

७९२ पुन्हा पुन्हा परीक्षा केल्यावाचून जर मित्राची निवड केली, तर त्या मैत्रीपासून मरणप्राय दुःख होण्याचा संभव आहे.

७९३ चारित्र्य, कुलशील, शारीरिक व्यंगे व कुटुंबियांचे गुण, यांची परीक्षा केल्यानंतर मित्राची निवड करावी.

७९४ जो कुलशीलवान आणि पापभीरू आहे, अशाची मैत्री वाटेल ते मूल्य देऊन संपादन करावी.

७९५ तुमच्याकडून चूक होऊ न देण्याची दक्षता घेणारा व चूक झाल्यास तुमचा निषेध करणारा जो असेल, अशाची मैत्री संपादन करा.

७९६ आपत्तीचाही एक लाभ आहे. आपले मित्र व नातेवाईक यांच्या मनाचा मोठेपणा मोजण्याची ती एक मोजपट्टी असते.

७९७ नीच लोकांची संगती टाळून त्याच्यापासून दूर राहणे हा एक लाभच होय.

७९८ मनातील उत्साह कमी होईल अशा गोष्टी करू नका. विपत्तीत तुमचा त्याग करतील अशा लोकांशी मैत्री जोडू नका.

७९९ आपत्काळी ज्यांनी आपला त्याग केला, अशांची आठवण आपण मृत्युशय्येवर असतानाही आपल्या हृदयाचा दाह करते.

(७८९) सहाय्यः समसुखदुःखः ।

—चासू १८

(७९८) व्यसने क्लिश्यमानं हि यो मित्रं नाऽभिपद्यते ।
अनर्थाय यथाशक्ति तन्नृशंसं विदुर्बुधाः ।।

—मभा ५·९३·१०

८०० निष्कलंक लोकांची मैत्री संपादन करा. कोणी काही देऊ केले तरी विषम लोकांशी संबंध सोडून द्या.

अनुक्रमणिका

अध्याय ८१ – चिरकालीन मैत्री

८०१ चिरमैत्री कोणती? जुन्या मैत्रीच्या अधिकाराने एकादे अपकृत्य घडले तरीही जिचा अंत होत नाही ती.

८०२ अधिकाराने एकादी गोष्ट करणे हा मैत्रीचा एक भाग आहे. तिचा गोड म्हणून स्वीकार करणे हे शहाण्याचे कर्तव्य आहे.

८०३ जुन्या मैत्रीच्या अधिकाराने मित्राने केलेली एकादी गोष्ट आपण स्वतः केल्यासारखी मानू शकलो नाही, तर चिरमैत्रीचा काय उपयोग?

८०४ जुन्या मित्राने न सांगता एकादी गोष्ट जर आपल्या अधिकारात केली, तर शहाणे लोक इष्ट म्हणून तिचा स्वीकार करतात.

८०५ तुमच्या मित्राने तुम्हाला न आवडणारी एकादी गोष्ट केली, तर ती त्याने न कळत केली किंवा त्याने आपल्या अधिकारात केली असे समजा.

८०६ आपल्या मित्राने जर एकादी चूक केली, पण मैत्रीच्या मर्यादेचे उल्लंघन केले नाही, तर त्याच्या चिरमैत्रीचा त्याग करू नये.

८०७ मैत्री प्रेमावर उभारलेली असली, म्हणजे मित्राने आपली काही हानी केली, तरी त्यावरील प्रेमात व मैत्रीत अंतर पडू देता कामा नये.

८०८ मित्राच्या अधिकारावर विश्वास असल्यामुळे, त्याने आपल्यावर एकदा अपकार केला असे ऐकून घेण्याचीही ज्याची सिद्धता नाही, अशावर त्या मित्राने खरोखरच एखाद्या दिवशी अपकार केला, तर तो सुदिन म्हणूनच म्हणावा लागेल.

(८००) **नाऽश्रोत्रियः श्रोत्रियस्य नाऽरथी रथिनः सखा ।**
साम्याद्धि सख्यं भवति वैषम्यान्नोपपद्यते ।।

— मभा १·१३३·६६

(८०१) **अल्पेऽप्यकृते मोहान्न शान्तिमधिगच्छति ।**
तादृशैः संगतं नीचैर्नृशंसैरकृतात्मभिः ।।

— मभा ५·३९·१६

८०९ आपल्या जुन्या मित्रांशी असलेली मैत्री ज्यांनी न सोडता दीर्घकाळ टिकवून ठेवली आहे, त्यांच्याशी मैत्री जोडण्यास जगही उत्सुक असते.

अनुक्रमणिका

८१० आपल्या चिरकालीन मित्रांवरील प्रेमात जे खंड पडू देत नाहीत, त्यांचे शत्रू देखील त्यांची प्रशंसा करतील.

अध्याय ८२ – दुष्टांशी मैत्री

८११ वरवर अपार मैत्री दाखवून अंतरंगात चांगुलपणा नसणाऱ्या लोकांशी मैत्रीचे संबंध वाढविण्यापेक्षा कमी केलेलेच बरे.

८१२ आपल्या लाभकाळी आपल्यावर प्रेम दाखविणारे व संकटकाळी आपणास सोडून जाणारे, अशा लोकांशी मैत्री असली काय किंवा नसली काय, तिचा काय उपयोग?

८१३ मैत्री जोडताना लाभहानीचा हिशेब करणारे, वेश्या आणि चोर, या सर्वांची जात एकच.

८१४ आपल्या पाठीवरील घोडेस्वाराला भर रणांगणावर फेकून देऊन, पळून जाणाऱ्या अशिक्षित घोड्याप्रमाणे वागणाऱ्याबरोबर मैत्री ठेवण्यापेक्षा एकाकीच असणे चांगले.

८१५ साहाय्य करण्याचे पत्करूनही, संकटकाळी ते न करणाऱ्या नीच लोकांशी मैत्री जोडण्यापेक्षा दूर राहणे बरे.

(८०९) **सर्वथा सुकरं मित्रं दुष्करं प्रतिपालनम् ।**
अनित्यत्वात्तु चित्तानां प्रीतिरल्पेऽपि भिद्यते ।।

— रामा ४·३२·७

(८११) **वसेत्सह सपत्नने कुद्धेनाशीविषेण च ।**
न तु मित्रप्रवादेन संवसेच्छत्रुसेविना ।।

— राभा ६·१६·२

(८१२) **एतावता पुरुषं ये त्यजन्ति**
तेषां सख्यमन्तवद् ब्रूहि राजन् ।
राज्ञां हि चित्तानि परिप्लुतानि
सान्त्वं दत्वा मुसलैर्धातयन्ति ।।

— मभा २·६४·१३

(८१५) **सुहृदां हि धनं भुक्त्वा कृत्वा प्रणयमीप्सितम् ।**
प्रतिकर्तुमशक्तस्य जीवितान्मरणं वरम् ।।

— मभा ५·१०७·७

८१६ नीच लोकांच्या गाढ मैत्रीपेक्षा विद्वान लोकांचा द्वेषही कोटीपट अधिक चांगला.

८१७ आपणास लोकांच्या चेष्टेचा विषय बनविणाऱ्या मित्रांपेक्षा द्वेष करणारे शत्रू देखील दहा कोटीपट अधिक लाभदायक असतात.

८१८ करता येण्यासारखी कार्ये करण्याचे जे नाकारतात व ती सोडून देतात अशांची मैत्री त्यांना पूर्वसूचना न देताही सोडावी.

८१९ ज्यांची उक्ती आणि कृती या भिन्न असतात (त्यात मेळ नसतो) अशा लोकांशी केलेली मैत्री स्वप्नातही दाहक असते.

८२० घरी सख्याचा देखावा करून भरसभेत तुमची निंदा करणाऱ्या (तथाकथित) मित्रांशी संबंध टाळा.

अध्याय ८३ – खोटी मैत्री

८२१ अंतःकरणात प्रेमाचा अभाव असताही बाह्यतः दाखविलेली मैत्री, म्हणजे अनुकूल संधी येताच घाव घालण्यास योग्य अशी ऐरण आहे.

८२२ अंतरंगात अस्तित्व नसलेला पण बाहेर दिसणारा बंधुभाव, हा स्त्रियांच्या (वेश्यांच्या) मनासारखा चंचल असतो.

८२३ आपल्या शत्रूंनी पुष्कळ चांगल्या ग्रंथांचे अध्ययन केलेले असले, तरी त्यांच्या अंतरंगास (आपणावर) प्रेमाची निर्मिती होणे अशक्य आहे.

८२४ मुद्रेवर हास्य धारण करून अंतःकरणात प्रेमाचा अभाव असलेल्या दांभिकांची भीती बाळगणेच योग्य होय.

८२५ मनापासून प्रेम न करणाऱ्याच्या कोणत्याही शब्दावर विश्वास ठेवणे हे योग्य नाही.

८२६ आपल्या शत्रूच्या तोंडातून मित्रासारखे मधुर शब्द बाहेर पडले, तरी त्याचा खरा अर्थ आपणास त्वरित कळतो.

(८१६) **श्रेष्ठो हि पण्डितः शत्रुर्न च मित्रमपण्डितः ।**

— मभा १२·१३८·४६

(८२६) **कृतवैरे न विश्वासः कार्यस्त्विह सुहृद्यपि ।**
छन्नं संतिष्ठते वैरं गूढोऽग्निरिव दारुषु ।।

— मभा १२·१३९·४४

अनुक्रमणिका

८२७ धनुष्य कोणी आपल्यासमोर वाकविले म्हणजे जशी विघ्नाची आगाऊ सूचना मिळते, त्याचप्रमाणे शत्रूच्या भाषणातील नम्रता ही भयसूचक समजावी.

८२८ शत्रूने जोडलेल्या हाताच्या पोकळीत शस्त्र लपविले असण्याचा संभव असतो. तसाच त्याच्या डोळ्यांतून पाझरणाऱ्या अश्रूंतही धोका दडलेला असण्याचा संभव असतो.

८२९ जे बाह्यतः मैत्री दाखवून मनातून आपला तिरस्कार करतात, त्यांच्याशी आपणही (राजाने) मैत्रीचे ढोंग करावे; पण आतून मात्र ती नष्ट करावी.

८३० ज्या वेळी आपले शत्रू वाह्यतः आपल्याविषयी मित्रभाव दाखवू लागतील, तेव्हा आपणही हास्य मुद्रा धारण करून अंतःकरणातील प्रेमभाव निपटून काढावा.

अध्याय ८४ – मूर्खपणा

८३१ मूर्खपणा तोच, की जो आपली हानी करतो, आणि लाभ होऊ देत नाही.

८३२ त्याज्य किंवा प्रतिकूल गोष्टींविषयी प्रेम बाळगणे म्हणजे सर्वांत मोठा मूर्खपणा.

८३३ निर्लज्जपणा, उपेक्षाबुद्धी, कठोरपणा आणि तुसडेपणा ही मूर्खपणाची लक्षणे होत.

८३४ विद्येचे अध्ययन, चिंतन आणि अध्यापन करूनही त्याप्रमाणे जो आचरण मात्र करीत नाही, त्याच्यापेक्षा दुसरा कोणी मूर्ख नाही.

८३५ सात जन्म यातना भोगावयास लावणाऱ्या नरकाची प्राप्ती मूर्ख मनुष्य एकाच जन्मात करू शकेल.

८३६ स्वतःला न जमणारे काम मूर्ख मनुष्य करू लागला, म्हणजे ते सिद्धीस तर जात नाहीच. इतकेच नव्हे, तर त्याच्या हातात बेड्याही पडतात.

८३७ मूर्ख मनुष्यास भरपूर संपत्ती कदाचित मिळालीच, तर तिऱ्हाइतांची चैन होईल; पण त्याचे नातेवाईक मात्र भुकेलेलेच राहतील.

(८२८) **हस्तगतमपि शत्रुं न विश्वसेत् ।।**

—चासू १९७

(८३२) **जडः क इव वा नाम गुणागुणमपेक्षते ।**

— योवा ३·७०·६२

अनुक्रमणिका

(८३४) चिरं ह्यपि जडः शूरः पण्डितं पर्युपास्य ह ।
न स धर्मान्विजानाति दर्वी सूपरसानिव ।।

— मभा १०·५·३

८३८ मूर्खाच्या हाती संपत्ती आली, तर त्याची अवस्था आधीच वेड लागलेल्या मनुष्याच्या (मद्य पिऊन) झिंगण्यासारखी होईल.

८३९ मूर्खाशी मैत्री ही मधुर आपत्तीच होय. कारण ती तुटताना आपली काहीच हानी होत नाही.

८४० मूर्खाचा विद्वत्सभेत प्रवेश, म्हणजे चिखलाने बरबटलेले पाय न धुता स्वच्छ अंथरुणावर ठेवण्यासारखा आहे.

अध्याय ८५ — बुद्धिहीनता

८४१ बुद्धीचा अभाव हा सर्वांत मोठा अभाव होय. अन्य अभावांना जग तितके महत्त्व देत नाही.

८४२ मूर्ख मनुष्याने मनापासून जरी दान दिले, तर त्याचे कारण अन्य काही नसून ते मिळणाराची पूर्वपुण्याई होय.

८४३ बुद्धिहीन मनुष्य स्वतःची जितकी हानी करतो, तितकी हानी त्याचे शत्रूही करू शकणार नाहीत.

८४४ बुद्धिहीनतेचे लक्षण हेच की, “आम्ही शहाणे आहो” असे ऐटीने सांगणे.

८४५ स्वतःला अवगत नसलेल्या विषयात आपली चांगली गती आहे अशी ऐट जर मूर्खाने मारली, तर त्याला खरोखरच अवगत असलेल्या विषयातील त्याच्या ज्ञानाविषयीही लोक शंका घेतील.

८४६ आपले दोष दूर न करता आपली नग्नता (वस्त्राने) लपविण्याचा प्रयत्न करणे, हे बुद्धिहीनतेचे लक्षण नव्हे काय?

८४७ मूर्ख मनुष्य आपणास ठाऊक असलेल्या रहस्याची वाच्यता करतो, आणि स्वतःवर हानी ओढवून घेतो.

८४८ मूर्ख मनुष्याला आपण होऊन काही समजत नाही. दुसऱ्याने सांगितलेले तो ऐकत नाही. म्हणून त्याचा प्राण जाईपर्यंत तो म्हणजे (इतरांना) एक संकटच असते.

८४९ मूर्ख मनुष्याला शिकवू पाहणारा स्वतःच मूर्ख बनतो; आणि तरीही मूर्ख मनुष्य स्वतःला समजेल तितकेच शिकतो.

अनुक्रमणिका

८५० ज्याच्या अस्तित्वाविषयी लोकांची श्रद्धा आहे, अशा परमेश्वराला (त्याच्या अस्तित्वाला) जो नाकारतो, तो या पृथ्वीवरील पिशाच्चच होय.

अध्याय ८६ - शत्रुत्व

८५१ जगातील प्राणिमात्रात विरोध निर्माण करणारा जो रोग, त्याचेच नाव शत्रुत्व.

८५२ विरोधापायी कोणाचे अनिष्ट करावयाचे असेल, तरी त्याचा द्वेष करून त्याला दुखवू नका.

८५३ शत्रुत्व नामक रोगाचे निर्मूलन केले, तर निर्दोष व अक्षय कीर्तीची प्राप्ती होईल.

८५४ दुखातील परम दुःख जे शत्रुत्व, त्याचा नाश केला, म्हणजे आनंदातील उत्तम असा जो परमानंद, त्याचा लाभ होईल.

८५५ विरोधास बळी न पडता कार्यरत होण्याचा ज्यांचा स्वभाव आहे, त्यांच्या विरुद्ध विजय मिळविण्याची आशा कोणास असेल?

८५६ शत्रुत्वामुळे आपणास सुखसमृद्धी प्राप्त होईल असे ज्यास वाटते, त्याच्या जीवनातील दुःखाचा व विनाशाचा काळ जवळ आलेला असतो.

८५७ शत्रुत्वरूपी दुर्बुद्धी ज्यांनी धारण केली आहे, त्यांना चिरंतन सत्याचे दर्शन घडणार नाही.

८५८ वैरभावापासून दूर राहण्याने वैभव प्राप्त हाईल. तो वाढू दिला तर विनाश जवळ येईल.

८५९ वैभवाच्या काळी वैरभावाचा कोणी विचार करीत नाही. अधःपात होऊ लागला म्हणजे मात्र वैरभावाची वृद्धी होते.

८६० सर्व दुःखांचा उगम द्वेषापासून होतो. सौहार्दातून आनंद व सुख यांची प्राप्ती होते.

अध्याय ८७ – वैराचा महिमा

८६१ तुमच्यापेक्षा बलाढ्य शत्रूचा प्रतिकार न करता माघार घ्या. शत्रू दुर्बळ असेल, तर मात्र तुमचा वैरभाव सोडू नका.

८६२ अंतःकरणात माया नाही, बलवानांचे साहाय्य नाही, आणि स्वतःही दुर्बळ, अशाला शत्रूचा प्रतिकार कसा करता येईल?

८६३ जो भेकड, बुद्धिहीन व कंजूष असून, ज्याच्या अंतःकरणात माया नाही, तो शत्रूच्या दृष्टीने अगदी सामान्य व दुर्बळ ठरतो.

अनुक्रमणिका

(८६१) समज्यायोभ्यां संधीयेत । हीनेन विगृहणीयात् ।

— कौअ १०१

८६४ जो आपला क्रोध आवरीत नाही, आणि आपली रहस्ये उघड करतो, त्याचा केव्हाही व कोठेही पराभव होईल.

८६५ जो चांगल्या ग्रंथाचे अध्ययन करीत नाही, ज्याचे आचरण शुद्ध नाही, जो निर्लज्ज आणि दुराचारी आहे, तो शत्रूचे सहज भक्ष्य बनतो.

८६६ क्रोधांध आणि अमर्याद विलासमग्न मनुष्याचे शत्रुत्व, जाणूनबुजून हवे ते मोल देऊन विकत घ्यावे.

८६७ एखाद्या कार्यास प्रारंभ केल्यावर, ते तडीस नेण्यासाठी अवश्य ते प्रयत्न न करणाऱ्या मनुष्याचे शत्रुत्व, हवे ते मोल देऊन विकत घ्यावे.

८६८ अंगी गुण मुळीच नसून दुर्गुण मात्र भरपूर आहेत, अशा मनुष्यास मित्र तर मिळत नाहीतच, उलट शत्रूला मात्र त्याचे साहाय्य होते.

८६९ ज्याचे शत्रू बुद्धिहीन व भेकड आहेत, अशाला विजयाचे स्वर्गसुख फार दूर नाही.

८७० बुद्धिहीन शत्रूवर विजय मिळवून त्याच्याकडून किरकोळ खंडणी वसूल करण्याचेही सामर्थ्य ज्याच्या अंगी नाही, त्याला यशोदीपाचे दर्शन केव्हाही होणार नाही.

अध्याय ८८ — शत्रूच्या सामर्थ्याची जाणीव

८७१ शत्रुत्व नामक दुर्गुणाच्या प्राप्तीची इच्छा कोणीही चेष्टेत देखील करू नये.

८७२ धनुर्धारी शेतकऱ्याचे (योध्यांचे) शत्रुत्व एक वेळ केले तरी चालेल. पण शब्दांनी शेत पिकविणाऱ्यांशी (बुद्धिमान मुत्सद्द्यांशी) वैर धरू नका.

८७३ जो एकाकी असून अनेक शत्रू मात्र निर्माण करतो, तो मूर्ख माणसापेक्षाही मंदबुद्धी होय.

८७४ शत्रूचे मित्रात रूपांतर करण्याचे कौशल्य ज्यांच्या अंगी आहे, अशांच्या मोठेपणाचा जगाला आधार असतो.

(८७२) एकं हन्यान्न वा हन्यादिषुर्मुक्तो धनुष्मता ।
बुद्धिर्बुद्धिमतोत्सृष्टा हन्याद्राष्टं सराजकम् ।।

— मभा ५·३३·४३

अनुक्रमणिका

८७५ साहाय्यक मित्र कोणीही नाही, आणि शत्रू मात्र दोन असून आपण एकाकी पडलो, तर दोघा शत्रूंपैकी एकाला आपला साहाय्यक मित्र बनविले पाहिजे.

८७६ आपल्या शत्रूची परीक्षा पूर्वी केलेली असो वा नसो, विपत्काळी त्याच्याशी शत्रुत्वाचे वा मित्रत्वाचे कोणतेही संबंध ठेवू नये.

८७७ तुमच्या मित्रासमोर त्याला माहीत नसलेल्या तुमच्या व्यथेची वाच्यता करू नका. तुमच्या शत्रूसमोर तुमची दुर्बलता व्यक्त करू नका.

८७८ योग्य मार्गाने सामर्थ्य आणि साहाय्य संपादन करून जर तुम्ही आपले संरक्षण केले, तर तुमच्या शत्रूचा अहंकार नष्ट होईल.

८७९ काटेरी झाड कोवळे असतानाच (त्याचे काटे टोचू लागण्यापूर्वीच) तोडून टाका. ते जून झाले (व त्याचे काटे टोचू लागले) म्हणजे ते तोडणाराचा हातच कामी येईल.

८८९ जे आपल्या शत्रूचे गर्वहरण करीत नाहीत, त्यांचे जीवन त्वरित नष्ट होते.

अध्याय ८९ – अंतःशत्रू

८८१ छाया आणि पाणी (नेहमी सुखदायक असली तरी) यांपासून उपद्रव होऊ लागला तर त्यांचे सुख मिळत नाही. आपले बंधुजनही उपद्रव देऊ लागले, तर तेही दुःखदायक होतात.

८८२ खड्गासारख्या (खुल्या) शत्रूचे भय बाळगू नका. बंधुजनांच्या मैत्रीमागे दडलेल्या शत्रुत्वाची मात्र भीती बाळगली पाहिजे.

८८३ अंतःशत्रूंच्या भीतीपासून आपले संरक्षण करा. नाही तर संकटकाळी कुंभाराच्या (ओली माती कापण्याच्या) सुरीसारखा ते तुमचा नाश करतील.

८८४ गूढ शत्रूच्या अंतःकरणात असलेला वैरभाव आपल्या बंधुजनात अनेक किल्मिषे निर्माण करील.

(८७५) **यदि वा मन्येत- "संधिनैकेतः स्वकर्माणि**
प्रवर्तयिष्यामि विग्रहेणैकतः परकर्माण्युपहनिष्यामि ।।
इति द्वैधीभावेन वृद्धिमातिष्ठेत् ।

— कौअ ९९

(८८२) **कृत्स्नाद् भपाद् ज्ञातिभयं सुकष्टं विदितं च नः ।**

— रामा ६·१६·८

अनुक्रमणिका

८८५ तुमच्या बंधुजनांत जर अंतर्वैर निर्माण झाले, तर ते अनेक मरणप्राय संकटे निर्माण करतील.

८८६ अंतेवासी बंधुजनात जर अंतर्वैर निर्माण झाले, तर अंतकाळ फार दूर असणार नाही.

८८७ डबी आणि तिचे झाकण ही एकत्र असली तरी एकच नसतात. त्याचप्रमाणे कुटुंबातील अंतर्वैराची स्थिती असते.

८८८ कानशीचा उपयोग केल्याने सोने जसे थोडे थोडे झिजत जाते, तसाच अंतर्वैराने कुटुंबाचा नाश होतो.

८८९ अंतर्वैर हे तिळाच्या तुकड्यासारखे लहान दिसत असले, तरी त्याच्या अंतरंगात विनाश दडलेला असतो.

८९० भिन्न मताच्या लोकांच्या संगतीत जीवन कंठणे, म्हणजे एखाद्या गुहेत सर्पा समवेत वस्ती करण्यासारखे आहे.

अध्याय ९० — थोरांचा अपमान

८९१ स्वसंरक्षणाची दक्षता घेण्यापेक्षा, आपले कर्तव्य निश्चयाने पार पाडणाऱ्या लोकांचा अपमान न करणे, हे अधिक श्रेयस्कर आहे.

८९२ वृद्ध वा थोर लोकांस आपण आदराने वागविले नाही, तर त्यांच्याकडूनच आपला नाश होईल.

८९३ आपला विनाश ओढवून घ्यावयाचा असेल, तर थोरास न विचारता आपले कार्य करा. तुम्हाला मरणच हवे असेल, तर थोरांचा अपमान करा.

८९४ दुर्बळ माणसाने सामर्थ्यवान मनुष्याची हानी करू पाहणे म्हणजे हात उंचावून यमराजास आमंत्रण देण्यासारखे आहे.

८९५ निष्ठुर राजाच्या कोपास जे पात्र झाले असतील, ते कोठेही गेले तरी त्यांचा नाश चुकत नाही.

(८८७) **यथा हि काष्ठजतुनोर्यथा बदरकुण्डपोः ।**
श्लिष्टयोरपि नैकत्वं देहदेहवतोस्तथा ।।

—योवा ३·११४·६२

(८९५) **एकमेव दहत्यग्निर्नरं दुरुपसर्पिणम् ।**
कुलं दहति राजाग्निः सपशुद्रव्यसंचयम् ।।

— मनु ७९

अनुक्रमणिका

८९६ वणव्यात सापडून होरपळलेल्या मनुष्याचाही प्राण वाचेल. पण थोरांचा अपमान करणारा जिवंत राहणे कठीण!

८९७ विविध प्रकारचे वैभव आणि अगणित धन यांनी संपन्न असून सुद्धा, सज्जनांचा क्रोध ओढवून घेतला असेल, तर त्या जीवनाचा काय उपयोग?

८९८ डोंगराएवढ्या थोर लोकांनी नाश करण्याचेच मनात आणिले, तर जमिनीवर राहणाऱ्या (सामान्य) लोकांचा घरादारासुद्धा नाश होईल.

८९९ उच्च ध्येयानुसार वागणाऱ्या लोकांचा क्रोध अनावर झाला, तर इंद्रासारखे देवही भग्न होऊन नाश पावतील.

९०० श्रेष्ठ तपस्वीजनांचा राग ओढवून घेणाराला कोणीही कितीही साहाय्य केले, तरी त्याचा सर्व नाश होणारच.

अध्याय ९१ — स्त्रैणपणा

९०१ स्त्रीच्या भजनी लागणाराला पुण्यलाभ होणार नाही. अशा प्रकारच्या मनुष्याची कोणतीही महत्त्वाकांक्षा सफल होणार नाही.

९०२ आपले कर्तव्य विसरून जो स्त्रीच्या नादी लागतो, त्याचे वैभव लज्जास्पद होऊन त्याची अपकीर्ती होते.

९०३ स्त्रीच्या भजनी लागण्याचा ज्याचा स्वभाव आहे, त्याची स्थिती सज्जनांच्या समुदायात मोठी लज्जास्पद होते.

(८९६) **अप्येव दहनं स्पृष्ट्वा वने तिष्ठन्ति पादपाः ।**
राजदण्डपरामृष्टास्तिष्ठन्ते नापराधिनः ।।

— रामा ६·२९·१२

(८९८) **अपकृत्य बुद्धिमतो दूरस्थोऽस्मीति नाश्वसेत् ।**
दीर्घौ बुद्धिमतो बाहू याभ्यां हिंसति हिंसितः ।।

— मभा ५·३८·८

(८९९) **पुनर्बाल एव त्वं तपसा भावितः सदा ।**
वर्धते च प्रभवतां कोपोऽतीव महात्मनाम् ।।

— मभा १·४२·५

अनुक्रमणिका

९०४ स्त्रीला भिऊन वागणारास परलोकी सुख प्राप्त होत नाहीच; पण इहलोकीही त्याने संपादिलेल्या यशाची प्रशंसा होत नाही.

९०५ स्त्रीला भिऊन वागणाऱ्या मनुष्यास सज्जनांची सेवा करतानाही भीती वाटेल.

९०६ (पापण्या न मिटणाऱ्या) देवासारखे स्वर्गीय जीवन जगत असतानाही, जो स्त्रीच्या बांबूसारख्या बाहूस भिऊन वागत असेल, त्याला वैभव प्राप्त होणार नाही.

९०७ स्त्रीच्या आज्ञेत राहणाऱ्या निर्लज्ज मनुष्यापेक्षा, लज्जाशील स्त्री हीच अधिक सन्माननीय असते.

९०८ सुंदर स्त्रीच्या वचनात राहणारा मनुष्य आपल्या गरजू मित्रांच्या उपयोगी पडू शकत नाही, किंवा दुसरे एकादे सत्कार्यही करू शकत नाही.

९०९ स्त्रीच्या आज्ञेत राहणाऱ्या स्त्रैण मनुष्यास सत्कर्म, संपत्ती वा इंद्रियसुख यांचा लाभ होण्याची आशा नाही.

९१० चिंतनशील अंतःकरण आणि त्यापासून प्राप्त होणारे वैभव यांचा जो धनी आहे, त्याला स्त्रीच्या भजनी लागण्याचे वेड नसते.

अध्याय ९२ — वेश्या

९११ वेश्यांच्या हातातील कंकणांचा मधुर ध्वनी, प्रेमाची नव्हे तर अर्थलाभाची अपेक्षा सुचवितो; म्हणून तो दुखःदायक होतो.

९१२ तुमच्यापासून होणाऱ्या लाभाचा अंदाज घेऊन गोड गोड बोलणाऱ्या पण्यांगनेच्या स्वभावाचा विचार करून तिच्याशी संबंध टाळला पाहिजे.

९१३ धनलोभी वेश्येस दिलेले गाढ आलिंगन, हे अंधारात अपरिचित प्रेताला मारलेल्या मिठीसारखे आहे.

९१४ ज्यांना पुण्यसंचय करावयाचा आहे, ते केवळ धनालाच सर्वस्व मानणाऱ्या वेश्यांच्या तुच्छ सौंदर्याला स्पर्श करणार नाहीत.

९१५ बुद्धिमान व अध्ययनसंपन्न लोक पण्यांगनांच्या सौंदर्याच्या स्पर्शाला भुलणार नाहीत.

(९०४) अनुकम्प्यो नरः पत्न्या पुष्टो रक्षित एव च ।
प्रपतेद्यशसो दीप्तात्स च लोकान्न चाप्नुयात् ।।

मभा — १४·९०·४७

अनुक्रमणिका

९१६ आपल्या श्रेष्ठत्वाचा प्रसार करू इच्छिणारे लोक आपल्या सौंदर्याचा प्रसार करून सर्वांस भुलविणाऱ्या वेश्यांचा स्कंधस्पर्श करणार नाहीत.

९१७ ज्यांच्या अंतःकरणात नीतीची चाड नाही असेच लोक, एकाच्या मिठीत असताना दुसऱ्यावर मन जडविलेल्या वेश्यांच्या स्कंधांस आलिंगन देतात.

९१८ वेश्येचे आलिंगन हे विवेकहीन लोकांनाच स्वर्गीय अप्सरेच्या आलिंगनासमान वाटते.

९१९ अमर्याद आचरणाच्या वेश्यांचे सालंकृत सुंदर बाहू, म्हणजे नीच लोकांना डुंबण्यासाठी नरकच होय.

९२० लक्ष्मीने लाथाडलेले लोक, अनेकांना नादी लावणाऱ्या वेश्या, मद्य किंवा द्यूत या तीनच गोष्टींचा आधार घेतात.

अध्याय ९३ – मद्यपान

९२१ मद्यप्रेमी लोकांना त्यांचे शत्रू भीत नाहीत. आणि त्यांचा यशोदीपही विझून जातो.
९२२ मद्य सेवन करू नका. थोर लोकांकडून बरे म्हणवून घेण्याची ज्यांची इच्छा नसेल, त्यांनी हवे तर ते करावे.

९२३ मद्यपानामुळे मातेच्या मुखावरील प्रसन्नताही नष्ट होईल. मग थोर लोकांच्या मनावी (त्यांच्यासमोर मद्यपान केले तर) काय अवस्था होईल?

९२४ मद्यपानासारखे भयंकर महत्पाप करणाऱ्यांकडे लज्जानामक ललना पाठ फिरविते

९२५ द्रव्य देऊन मद्यपानाचा उन्माद विकत घेणे हे अज्ञानाचे लक्षण आहे.

९२६ निद्रिस्त मनुष्य हा मृत मनुष्याहून (फारसा) वेगळा नसतो. त्याचप्रमाणे मद्यपी हा विषप्राशन करणाऱ्या समानच होय.

९२७ लपून छपून मद्यपान करणाऱ्यांचे ते व्यसन केव्हा तरी उघडकीस येते. आणि नंतर ते गावकऱ्यांच्या चेष्टेचा विषय होतात.

९२८ "मी मद्य पीत नाही" असे मद्यप्याने उगीच म्हणू नये. तो उन्मादावस्थेत असताना त्याच्या मनात दडलेली रहस्ये उघड झालेली असतात.

९२९ मद्यपी मनुष्याचे मन वळवून त्याला त्याच्या व्यसनापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करणे, म्हणजे पाण्यात बुडालेल्या मनुष्याचा शोध दिवा लावून घेण्यासारखेच आहे.

अनुक्रमणिका

९३० मद्यप्याच्या उन्मादावस्थेतील चेष्टा शुद्धीवर असणाऱ्या दुसऱ्या मद्यप्याच्या दृष्टीस पडल्या, तर आपल्या तशा अवस्थेतील चेष्टांचे त्याला स्मरण होणार नाही काय?

अध्याय ९४ – द्यूत

९३१ द्यूतात यशस्वी झालात, तरी ते (आणखी) खेळण्याची इच्छा धरू नका. कारण ते यश माशाने गिळलेल्या आमिष लावलेल्या गळासारखे आहे.

९३२ एकाने जिंकून शंभरांनी हरणाऱ्या द्यूतकारापुढे, सुखदायक जीवन प्राप्त करून देणारा एखादा व्यवसाय आहे काय?

९३३ लाभाच्या अपेक्षेने जर कोणी (राजा) द्यूतात दंग राहू लागला, तर त्याची सर्व संपत्ती शत्रूच्या हाती जाईल.

९३४ द्युतामुळे अनेक आपत्ती ओढवून यशाचा नाश होतोच. पण द्यूतासारखे दारिद्र्य आणणारे दुसरे काही नाही.

९३५ द्यूत, द्यूतगृह आणि द्यूतविद्येतील कौशल्याचा अभिमान यांचा जो त्याग करीत नाही, तो निर्धन होईल.

९३६ द्यूतविद्या नामक अक्काबाईच्या जाळ्यात सापडलेले लोक, पोट भरू न शकल्याने संकटग्रस्त होतील.

९३७ द्यूतगृहात पाऊल पडले, की वडिलार्जित संपत्ती व कीर्ती यांची हानी होईल.

९३८ धननाश, असत्याचरण, आचारभ्रष्टता आणि इतर विपत्ती या द्यूतामुळे ओढवतात.

९३९ द्यूतात फासे फेकणाराला पुढील पाच गोष्टींचा लाभ होत नाही; वस्त्रे, संपत्ती, अन्न, कीर्ती आणि विद्या.

९४० शरीरव्याधीच्या बुद्धीबरोबर आपले शरीरावरील प्रेम जसे वाढत जाते, तसेच द्यूतात येणाऱ्या अपयशामुळे द्यूतकाराचे फाशावरील प्रेम वाढत जाते.

(९३३) तदलं पुत्र द्यूतेन द्यूते भेदो हि दृश्यते ।
भेदे विनाशो राज्यस्य तत्पुत्र परिवर्तय ।।

— मभा २·५०·१२

(९३४) को हि राज्यं परित्यज्य सर्वस्वं चात्मना सह ।
प्रव्रज्यायैव दीव्येत विना दुर्द्यूतदेविनम् ।।

— मभा ४·८·११

अनुक्रमणिका

अध्याय ९५ – औषधी

९४१ विद्वान लोकांनी सांगितलेल्या वातादी (वात, कफ व पित्त) त्रिदोषापैकी एखाद्याचे न्यूनाधिक्य झाले, तर रोगाचा प्रादुर्भाव होतो.

९४२ पूर्वी खाल्लेले अन्न चांगले पचल्यानंतरच भोजन करण्याची दक्षता घेतली, तर औषधाची गरजच पडणार नाही.

९४३ पूर्वी खाल्लेले अन्न पचल्यानंतरही मर्यादित आहार करा. देहधारी प्राण्यांना दीर्घजीवनाचा हाच एक मार्ग आहे.

९४४ पूर्वी खाल्लेले अन्न पचल्याची खात्री करून घेतल्यानंतर, चांगली भूक लागेल तेव्हा, उचित पदार्थाचे सेवन करा.

९४५ योग्य प्रमाणात आणि शरीराला मानवेल असे अन्न खाल्ले, तर प्राणाला कोणतेच भय नाही.

९४६ मित भोजन करणाराला आरोग्य लाभते. खादाड माणसामागे व्याधी लागतात.

९४९ जठराग्नीची शक्ती विचारात न घेता जो खादाडपणा करतो, त्याला अगणित रोग होतात.

(९४१) **शीतोष्णे चैव वायुश्च त्रयः शारीरजा गुणाः ।**
तेषां गुणानां साम्यं यत्तदाहुः स्वस्थलक्षणम् ।।
तेषामन्यतमोद्रेके विधानमुपदिश्यते ।
उष्णेन बाध्यते शीतं शीतेनोष्णं प्रबाध्यते ।

—मभा १२·१६·१ / २

(९४२) **जीर्णभोजनं-व्याधिर्नोपसर्पति ।।**

—चासू २२०

(९४५) **भारः सौम्य कर्तव्यो यो नरं नावसादयेत् ।**
तदन्नमपि भोक्तव्यं जीर्यते यदनामयम् ।।

— रामा ३·५०·१८

(९४६) **मितभोजनं स्वास्थ्यम् ।**

— चासू २१८

(९४७) **अनारोग्यमनायुष्यमस्वर्ग्यं चातिभोजनम् ।**
अपुण्यं लोकबिद्विष्टं तस्मात्तत्परिवर्जयेत् ।।

— मनु २·५७

अनुक्रमणिका

९४८ रोग, रोगाचे मूळ, त्याच्या निर्मूलनाचे उपचार, या सर्वांची चिकित्सा करून मग (वैद्याने) योग्य उपायांची योजना करावी.

९४९ रोग्याची स्थिती, रोगाचा प्रकार व रोगाचा अवधी, या सर्वांचा विचार करून विद्वान चिकित्सकाने (रोग्यावर) योग्य तो उपचार करावा.

९५० रोगी, वैद्य, औषधि आणि परिचारक अशी वैद्यकशास्त्राची चार अंगे आहेत.

भाग ७ — पुरवणी

अध्याय ९६ — कुलीनता

९५१ चारित्र्यसंपन्नता आणि विनय यांचा उचित संगम सत्कुळांत जन्मलेल्या लोकांतच असतो.

९५२ सदाचरण, सत्यनिष्ठा आणि विनय या तीन गुणांपासून कुलीन लोक भ्रष्ट होत नाहीत.

९५३ प्रसन्न मुद्रा, औदार्य, मधुर वाणी व परनिंदा न करण्याचा स्वभाव, हे कुलीन लोकांचे चार स्वाभाविक गुण होत.

९५४ कोट्यवधी संपत्तीची रास पुढे ओतली, तरी कुलीन लोक क्षुद्र कर्म करणार नाहीत.

९५५ संपत्ती क्षीण झाली, तरी कुलीन लोक आपले (औदार्यासारखे) सद्गुण सोडणार नाहीत.

९५६ आपल्या कुळाच्या कीर्तीचे संरक्षण करण्याची ज्यांची इच्छा आहे, असे लोक त्या कीर्तीला कलंक लागेल अशी कृत्ये करणार नाहीत.

९५७ कुलीन लोकांतील दोष आकाशांतील चंद्रावरील डागाप्रमाणे लोकांना स्पष्ट दिसतात.

९५८ चांगल्या कुळात जन्म झालेल्या मनुष्यात जर प्रेमाचा अभाव दिसून आला, तर त्याच्या कुलीनतेविषयी संशय उत्पन्न होतो.

(९५५) **न तुल्यतेजाः सुकृतं कामयेत**
योगक्षेमं पार्थिव पार्थिवः सन् ।
दैवादेशादापदः प्राप्य विद्वां —
श्चरेन्नृशंसं न हि जातु राजा ।।

— मभा १·९२·१७

(९५८) **न कुलं वृत्तहीनस्य प्रमाणमिति मे मतिः ।**
अन्तेष्वपि हि जातानां वृत्तमेव विशिष्यते ।

— मभा ५·३४·४१

९५९ भूमीतून निघालेल्या अंकुरावरून भूमीचा गुण प्रत्ययास येतो. मनुष्याच्या शब्दावरून त्याने जन्म घेतलेल्या कुळाची ओळख पटते.

९६० सद्गुणी म्हणवून घेण्याची इच्छा असेल तर नम्रता धारण करा. कुळाचे नाव राखावयाचे असेल, तर इतरांविषयी आदर बाळगा.

अनुक्रमणिका

अध्याय ९७ — मानापमान

९६१ अनिवार्य असली तरीही (तुमच्या कुळाच्या) कीर्तीला धक्का पोचेल, अशी कर्मे करू नका.

९६२ सुयश आणि सन्मान यांची आकांक्षा धरणाराने यशस्वी झाल्यावरही दुष्कर्मे करू नयेत.

९६३ वैभवकाळी नम्र व्हा. आपत्काळी (धैर्याने) मान उंच ठेवा.

९६४ सन्माननीय व्यक्तीच्या अभिमानास धक्का पोचला, की त्याची अवस्था डोक्यावरून गळून पडलेल्या केसासारखी होते.

९६५ डोंगराएवढ्या उंच कीर्तीचे लोक, त्यांनी क्षुद्र कर्मे केली, तर गुंजेसमान क्षुद्र होतात.

९६६ जे आपला अपमान करतात, त्यांच्यामागे धावण्यात काय अर्थ आहे? तसे केल्याने इहलोकीचे वैभव व स्वर्गसुख या दोहोंचा लाभ होणार नाही.

९६७ आपला अपमान करणारांवर अवलंबून राहून जीवन कंठण्यापेक्षा एकाकी मरण आलेले चांगले!

९६८ आपला अपमान होऊन कीर्ती नष्ट झाल्यानंतर केवळ जिवंत राहणे हे काय मृत्यूच्या पाशातून वाचविणारे औषध आहे?

(९६४) यदा मानं लभते माननार्ह-
स्तदा स वै जीवति जीवलोके ।
यदावमानं लभते महान्तं
तदा जीवन्मृत इत्युच्यते सः ।।

— मभा ८·६९·८१

(९६७) पराश्रया वासुदेव या जीवति धिगस्तु ताम् ।
वृत्तेः कार्पण्यलब्धाया अप्रतिष्ठैव ज्यायसी ॥

— मभा ५·१०·७३४

९६९ अपमान होण्याचा प्रसंग येताच प्राणत्याग करणारे लोक, केसाला धक्का लागताच प्राण सोडणाऱ्या याक पशूप्रमाणे होत.

९७० अपमान होण्याचा प्रसंग येताच प्राणत्यागास सिद्ध होणारे लोक जगाच्या आदरास व प्रशंसेस पात्र होतात.

अध्याय ९८ – थोरवी

९७१ महत्त्वाकांक्षा हाच मनुष्याच्या आयुष्यातील प्रकाश. "अमुक गोष्टीवाचून माझे चालेल" अशी वृत्ती म्हणजेच त्याचा अस्त.

९७२ सर्व माणसे जन्माच्या दृष्टीने समानच असतात. त्यांच्यात विविधता येते ती त्यांच्या बऱ्यावाईट कर्मामुळेच.

९७३ जे थोर नव्हेत, ते केवळ उच्च स्थानी बसून थोर होत नाहीत. जे नीच नव्हेत, त्यांना केवळ नीच स्थानावर बसावे लागले तरी ते नीच राहात नाहीत.

९७४ स्त्रीच्या पातिव्रत्याप्रमाणे श्रेष्ठत्व हेही स्वकर्तव्यनिष्ठेत असते.

९७५ श्रेष्ठ लोकांस थोडीशी दुःस्थिती प्राप्त झाली, तरी इतरांस दुर्घट वाटणारी कर्मे त्यांच्या हातून पार पडतात.

९७६ थोर लोकांच्या सान्निध्यात येऊन आपण काही त्यांच्यापासून शिकावे, असा विचारही नीच लोकांच्या मनात येत नाही.

९७७ नीच लोकांना जर वैभव आणि यश प्राप्त झाले, तर त्यांच्या अंगी उर्मटपणा येतो.

९७८ थोर लोक नम्रता धारण करतात. नीच लोक स्वतःची प्रौढी गात बसतात.

९७९ अहंकाराचा अभाव म्हणजेच श्रेष्ठपणा. नीचपणात अहंकाराची परिसीमा असते.

९८० दुसऱ्यांच्या दोषांवर पांघरूण घालणे हे थोरपणाचे लक्षण आहे. त्यांचे प्रदर्शन करणे हे नीचपणाचे लक्षण आहे.

(९६९) नैवंविधमसत्कारं राघवो मर्षयिष्यति ।
बलवानिवशार्दूलो वालधेरभि मर्शनम् ।।

—रामा २·६१·१९

(९७७) दर्पो नाम श्रियः पुत्रो जज्ञेऽधर्मादिति श्रुतिः ।

— मभा १२·९०·२६

(९८०) असतां शीलमेतद्वै परिवादोऽथ पैशुनम् ।
गुणानामेव वक्तारः संतः सत्सु नराधिप ।।

— मभा १२·१३२·१३

अनुक्रमणिका

अध्याय ९९ – चारित्र्य

९८१ कर्तव्यनिष्ठ आणि चारित्र्यसंपन्न लोकांस, जगात जे चांगले, ते आपले कर्तव्यच वाटते.

९८२ श्रेष्ठ लोक चारित्र्यासच महत्त्व देतात. इतर गुण त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे नाहीत.

९८३ प्रेम, नम्रता, सदाचरण, दयार्द्रता आणि सत्यवचन हे सच्चारित्र्याचे पाच स्तंभ आहेत.

९८४ अहिंसा ही उत्तम तपश्चर्या होय. दुसऱ्याचे दोष न दाखविणे हे सदाचरणातील पूर्णत्वाचे लक्षण आहे.

९८५ समर्थाचे सामर्थ्य विनयात आहे. त्याच शस्त्राने ते शत्रूचे मित्रात परिवर्तन करतात.

९८६ कनिष्ठांकडूनही पराभव स्वीकारणे ही सर्वगुणसंपन्नतेची कसोटी होय.

९८७ तुम्हाला दुःख देणारासही जर तुम्ही सुख दिले नाही (किंवा अपकारकर्त्यावर उपकार केला नाही) तर तुमच्या श्रेष्ठपणाचा काय उपयोग?

९८८ सद्‌गुणसंपन्नतेचे सामर्थ्य अंगी असले, म्हणजे दारिद्र्य हा काही दोष नव्हे.

०९० सद्‌गुणांचे सागर असे जे श्रेष्ठ लोक, ते प्रलयकालीही आपली (सदाचाराची) मर्यादा उल्लंघीत नाहीत.

९९० सद्‌गुणसंपन्न लोकांच्या गुणात जरी थोडी उणीव निर्माण झाली, तरी पृथ्वीला आपला भार सहन करता येणार नाही.

अध्याय १०० – सुसंस्कृतता

९९१ ज्याला भेटण्यासाठी कोणासही मुक्तद्वार असते, असा मनुष्य (किंवा राजा) सुसंस्कृत म्हणून सहजच गणला जातो.

(९८२) **शीलं प्रधानं पुरुषे तद्यस्येह प्रणश्यति ।**
न तस्य जीवितेनार्थो न धनेन न बन्धुभिः ।।

— मभा ३·१२·६८

(९८८) **वृत्तं यत्नेन संरक्षेद्वित्तमेति च याति च ।**
अक्षीणो वित्ततः क्षीणो वृत्ततस्तु ततो हतः ।।

— मभा ५·३६·३०

अनुक्रमणिका

९९२ प्रेमळपणा आणि कुलीनता ही सुसंस्कृतपणाची दोन लक्षणे होत.

९९३ दोन मनुष्यांच्या शरीरातील सादृश्य हे खरे सादृश्य नव्हे. त्यांच्या स्वभावातील सादृश्य हेच खरे आकर्षक असते.

९९४ अंगी असलेला न्यायीपणा व परोपकारबुद्धी यांच्यामुळे जे लोकांचे हित करतात, त्यांचे वर्तन जगाच्या प्रशंसेस पात्र होते.

९९५ चेष्टेतही निंदा केलेली कोणास आवडत नाही. म्हणून मनुष्य स्वभावाची पारख असलेले लोक वैऱ्यांशी वागतानाही शिष्टाचार सोडीत नाहीत.

९९६ सुसंस्कृत लोकांमुळेच जगातील लोक भूतलावर टिकून आहेत. त्यांच्या अभावी लोक पृथ्वीत गडप होऊन त्यांचा नाश झाला असता.

९९७ ज्याची बुद्धी कानशीसारखी तीक्ष्ण असूनही मन सुसंस्कृत नसेल, तो मनुष्य केवळ वृक्षासारखा निर्बुद्ध होय.

९९८ केवळ मैत्री नसल्यामुळे जे आपला द्वेष करतात, अशा लोकांशी वागतानाही सुसंस्कृतपणा न धरणे हे निंद्य आहे.

९९९ या विशाल विश्वात ज्याला आपले चित्त प्रसन्न ठेवता येत नसेल, त्याला भर दिवसाही अंधारच दिसेल.

१००० असंस्कृत मनुष्यास प्राप्त झालेले मोठे वैभव म्हणजे अशुद्ध पात्रात ठेवल्यामुळे व्यर्थ जाणाऱ्या शुद्ध दुधाप्रमाणे होय.

अध्याय १०१ — संपत्तीचा सद्व्यय

१००१ पुष्कळ संपत्तीने घर भरून तिचा जो उपभोग घेत नाही, तो मृतप्राय होय. कारण त्याला काहीच लाभ झालेला नसतो.

१००२ संपत्तीपासून सर्व सुखे मिळतात अशा समजुतीने जो दान न करता कंजूषपणाने वागतो, त्याला पिशाच्च योनीतच जन्म प्राप्त होतो.

(१०००) कपाले यद्वदापः स्युः श्वदृतौ च यथा पयः ।
आश्रयस्थानदोषेण वृत्तहीने यथा श्रुतम् ।।

— मभा १२·३६·४२

अनुक्रमणिका

(१००२) द्वावम्भसि निवेष्टव्यौ गले बद्ध्वा दृढां शिलाम् ।
धनवन्तमदातारं दरिद्रं चातपस्विनम् ।।

— मभा ५·३३·६०

१००३ संपत्तीचा संग्रह करूनही ज्याला सत्कीर्तीची इच्छा नाही, तो मनुष्य या धरणीला भारभूत होतो.

१००४ जन्मात कधी दान न केल्यामुळे ज्याच्यावर कोणी प्रेम केले नाही, असा मनुष्य आपल्या मृत्यूनंतर मागे काय ठेवणार आहे?

१००५ कोट्यवधी धनाचा संग्रह करून त्याचा व्यय दान करण्यात व स्वतः उपभोग घेण्यात ज्याने केला नाही, तो मनुष्य दरिद्रीच होय.

१००६ जो संपत्तीचा स्वतः उपभोग घेत नाही, किंवा सत्पात्री तिचे दान करीत नाही, तो म्हणजे आपल्या संपत्तीच्या मागे लागलेला रोगच होय.

१००७ गरजवंतास दान न देणाराची संपत्ती म्हणजे विवाह न करता एकाकी वृद्ध होणाऱ्या सुंदर स्त्री प्रमाणे होय.

१००८ (जन्मात कोणासही साहाय्य न केल्यामुळे) अप्रिय असलेला मनुष्य म्हणजे नगराच्या मध्यवस्तीत असून विषारी फळे धारण करणाऱ्या वृक्षाप्रमाणे होय.

१००९ मैत्री, (स्वतःचे) सुख आणि दानधर्म यांचा विचार न करता जमवलेली संपत्ती दुसऱ्याच्या (कोणाच्या तरी) हाती पडेल.

१०१० वैभवसंपन्न लोकांचे अल्पकालीन दारिद्र्य हे पर्जन्यवृष्टीत अल्पकाळ पडलेल्या खंडासारखेच होय.

अध्याय १०२ — विनयशीलता

१०११ दुष्कर्माविषयी वाटणारी लज्जा तीच खरी लज्जा. अन्य लज्जा म्हणजे विनयशील कुमारीच्या भ्रुकुटींवर दिसते तीच.

१०१२ अन्न, वस्त्र व इतर अनेक विषय यांसंबंधी मनुष्यमात्रात भेद नसतो. विनयशीलता ही मात्र श्रेष्ठ लोकांतच दिसते.

१०१३ मांसमय शरीर हे आत्म्याचे वसतिस्थान आहे. त्याचप्रमाणे विनय हे पूर्णत्वाचे निधान आहे.

अनुक्रमणिका

१०१४ विनय हे थोर लोकांचे भूषणच नव्हे काय? त्यावाचून त्यांचे (विनयहीन) आचरण म्हणजे एक उपद्रवच असतो.

(१००५) धनेन किं यन्न ददाति नाश्नुते ।
बलेन किं येन रिपुं न बाध्यते ।।

— मभा १२·३२१·९३

१०१५ स्वतःच्या व इतरांच्याही दुष्कृत्यांची ज्यास लाज वाटते, ते विनयाचे वसतिस्थान असे लोक मानतात.

१०१६ लज्जेची संरक्षक भिंत उभारल्यावाचून थोर लोक या जगात व्यवहार करीत नाहीत.

१०१७ विनयशील व्यक्ती आपल्या चारित्र्याच्या रक्षणासाठी प्राणत्याग करतील. पण प्राण वाचविण्यासाठी आपल्या चारित्र्याचा त्याग करणार नाहीत.

१०१८ दुसऱ्यांना (ही) ज्यांची लाज वाटेल अशी कृत्ये जो निर्लज्जपणे करीत राहतो, त्याची लाज धर्मालाही वाटून तो त्यापासून पळून जातो.

१०१९ आचरणात काही चूक झाली तर कुळाला दोष लागतो. पण निर्लज्ज बनले की चारित्र्याचाच नाश होतो.

१०२० निर्लज्ज लोकांची कृत्ये ही निर्जीव कळसूत्री बाहुल्यांचा भ्रमोत्पादक हालचालीप्रमाणे होत.

अध्याय १०३ — कुलोत्कर्ष

१०२१ "माझे काम संपेपर्यंत माझे हात विश्रांती घेणार नाहीत" असे जो म्हणू शकतो, त्यापेक्षा त्याला गौरवपर असे दुसरे काही नाही.

१०२२ अविश्रांत परिश्रम व बुद्धिमत्ता या दोहोंचा संगम झाला, म्हणजे कुळाची उंची वाढते.

१०२३ आपल्या वंशाची कीर्ती उंचावण्यासाठी जो प्रयत्नशील असतो, त्याच्या साहाय्यार्थ (दैव किंवा) देवसुद्धा कटिबद्ध होतो.

१०२४ आपल्या वंशाची उन्नती करण्यासाठी जो (फारसा) विचार न करताही अविश्रांत परिश्रम करतो, त्याचे परिश्रम सहज सिद्धीस जातात.

१०२५ निर्दोष आचरणाने आपल्या कुळाच्या उत्कर्षासाठी जो परिश्रम करतो. त्याला सर्व जग प्रदक्षिणा घालते (तो सर्व जगाच्या आदरास पात्र होतो).

अनुक्रमणिका

१०२६ आपण जन्म घेतलेल्या कुळाच्या उत्कर्षासाठी आपण जे प्रयत्न करतो, त्यामुळे आपलाच गौरव होतो.

(१०२१) ना सम्यक्कृतकारी स्यादुपक्रम्य कदाचन ।
कण्टको ह्यपि दुश्छिन्नं आस्त्रावं जनयेच्चिरम् ।।

— मभा १·१४०·९

(१०२३) ज्ञातयो वर्धनीयास्तैर्य इच्छन्त्यात्मनः शुभम् ।

— मभा ५·३९·१८

१०२७ रणांगणात युद्धाचा भार जसा सैन्यातील वीर पुरुषांवर पडतो, त्याप्रमाणेच कुलोत्कर्षाचा भार कुळातील कर्तृत्ववान पुरुषांवरच पडतो.

१०२८ कुलोत्कर्षासाठी प्रयत्नशील असणारे लोक संधीची वाट पाहात बसत नाहीत. कारण आळस व वृथाभिमान यांच्या आहारी गेल्यास कुळाचाच नाश होतो.

१०२९ आपल्या कुटुंबाचे जो आगामी संकटांपासून संरक्षण करतो, त्याचे शरीर म्हणजे काय केवळ दुःखभाजनच आहे?

१०३० विपत्तीच्या आघातामुळे कोसळणारा कुटुंबवृक्ष सावरून उभा करण्यास कुटुंबातील एखादा सच्छील मनुष्य उपस्थित नसेल तर त्या वृक्षाचा नाशच होईल.

अध्याय १०४ — कृषि

१०३१ जगातील लोक कोणत्याही व्यवसायात भटकत असले, तरी अंती नांगर हाच त्यांचा (अन्नासाठी) आधार असतो. म्हणून कितीही श्रम पडले तरी कृषी हाच उत्तम व्यवसाय.

१०३२ कृषीवल हाच जगातील सर्व व्यावसायिकांचा कणा (किंवा किल्ली) आहे. कारण नांगर न पेलणाऱ्या अशा सर्वांचा भार त्यालाच सहन करावा लागतो.

१०३३ शेतात अन्न पिकवून जे खातात, त्यांचेच खरे जीवन. इतर लोक त्यांना शरण जाऊन त्यांनी दिलेले अन्न खातात.

१०३४ भाताच्या भरदार लोंब्यांच्या छायेखाली जो कृषीवल (भाताचे पीक भरपूर आल्याने) वावरत असतो, त्याच्या देशाच्या राजछत्राखाली इतर देश येतात.

१०३५ शेतात धान्य पिकवून जे खातात, ते याचना करीत नाहीत. तेच याचकांना भिक्षा घालतात.

अनुक्रमणिका

१०३६ कृषीवल जर हात जोडून स्वस्थ बसले, तर सर्वसंगपरित्याग करणारांचे ही जीवन कठीण होईल.

(१०३०) प्रज्ञाश्रुताभ्यां वृत्तेन शीलेन च समन्वितः ।
तारयेत कुलं सर्वमेकोऽपीह द्विजर्षभ ।।

—मभा १·३२२·३८

(१०३५) रसानां चाथ बीजानां धान्यानां च युधिष्ठिर ।
स्वयमुत्पाद्य दातारः पुरुषाः स्वर्गगामिनः ।।

—मभा १३·२३·१०१

१०३७ जमिनीतील शेरभर मातीची सुकून जर पावशेर धूळ होऊ दिली, तर खत घातल्यावाचून भरघोस पीक येईल.

१०३८ शेत नांगरल्यानंतर खत देणे अधिक महत्त्वाचे आहे. तण काढून टाकल्यानंतर पाणी देण्यापेक्षा राखण करणे अधिक महत्त्वाचे आहे.

१०३९ घर सोडून राहणाऱ्या गृहस्थाची पत्नी जशी त्याला इंद्रियसुख (भोग) देऊ इच्छीत नाही; तशीच शेत सोडून राहणाऱ्या धन्याची जमीन त्याला पीक (भाग) देऊ इच्छित नाही, (तमिळ भाषेत "भोगम्" या शब्दाचे "इंद्रियसुख" व "पीक" असे दोन अर्थ होतात.

१०४० दारिद्र्याचे निमित्त सांगून जे आळशी लोक न हलता स्वस्थ बसून राहतात, त्यांच्याकडे पाहून भूमिसुंदरी नुसती हसतच राहते.

अध्याय १०५ – दारिद्र्य

१०४१ दारिद्र्याहून अधिक दुःखदायक काय आहे असा प्रश्न विचारला, तर त्याचे उत्तर हेच की, दारिद्र्यासारखे दुःखदायक दारिद्र्यच आहे.

१०४२ दरिद्रता (ही अवदसा) आली, म्हणजे इहजन्मी व पुढील जन्मीही सुख मिळू देत नाही.

१०४३ थोर कुलपरंपरा आणि आपल्या शब्दास मिळणारा मान या दोहोंचाही नाश दारिद्र्य करते.

१०४४ उच्च कुळात जन्म घेतलेल्या पुरुषांच्याही तोंडातून दारिद्र्यामुळे अनुचित व उपहासपूर्ण शब्द बाहेर पडतात.

१०४५ दारिद्र्य नामक आपत्तीपासून अनेक व्यथादायक संकटे निर्माण होतात.

अनुक्रमणिका

१०४६ निर्धन मनुष्याच्या तोंडातून कितीही अर्थगर्भ व विचारपरिप्लुत शब्द बाहेर पडले, तरी ते निष्प्रभ ठरून व्यर्थ जातात.

(१०४२) धनात्कुलं प्रभवति धनाद्धर्मः प्रवर्तते ।
नाधनस्यास्त्ययं लोको न परः पुरुषोत्तम ।।

—मभा १२·८·२२

(१०४६) हितमप्यधनस्य वाक्यं न गृह्यते ।

—चासू २९२

१०४७ दुराचारी दरिद्री मनुष्याकडे त्याची मातासुद्धा परक्या मुलासारखी पाहते.

१०४८ (एक नित्यदरिद्री मनुष्य म्हणतो) कालच जवळ जवळ प्राणघातक ठरलेली दरिद्रता आजही पुन्हा माझ्या भेटीस येणार आहे की काय?

१०४९ अग्निज्वाळांच्या मध्यभागीही एखाद्यास झोप येऊ शकेल. पण दरिद्रावस्थेत डोळे मिटून कोणासही झोप येणार नाही.

१०५० दरिद्री लोकांजवळ त्याग करण्यासारखे काहीच राहिलेले नसते, म्हणून त्यांचा डोळा शेजारघरातील मीठ व पेज यांच्यावर असतो.

अध्याय १०६ — याचना

१०४१ याचना करण्यास योग्य अशी व्यक्ती भेटली, तर तिच्याजवळ याचना करा. ती तिने पुरविली नाही, तर तो तिचा दोष, तुमचा नव्हे.

१०४२ मागितलेली वस्तू संतोषाने मिळाली, तर भिक्षा मागण्यातही एक आनंद आहे.

१०४३ कर्तव्यास स्मरून औदार्याने दान देणाऱ्या दात्यासमोर (याचक म्हणून) उभे राहण्यातही एक प्रकारचे सौंदर्य आहे.

१०४४ जवळ काही शेष न ठेवता स्वप्नातही सर्वस्वाचे दान करणाऱ्या दात्यासमोर याचना करणे, हे स्वतः दान देण्याइतकेच सुखप्रद आहे.

१०४५ कोणासही नकार न देता दान करणारे लोक या जगात आहेत आणि म्हणूनच त्यांच्यापुढे हात पसरणारे याचकही आहेत.

१०४६ दानास नकार देण्याच्या रोगापासून मुक्त असणारे दाते दृष्टीस पडले, की याचनेचा रोग त्वरित नष्ट होईल.

अनुक्रमणिका

(१०४७) अधनः स्वभार्ययाऽपि अवमन्यते ।

—चासू २९३

(१०५१) आर्थिनां यन्निराशत्वं सत्तमेऽभिभवो हि सः ।

—योवा १·७·१०

(१०५३) यदेव ददतः पुण्यं तदेव प्रतिगृह्णतः ।
न ह्येकचक्रं वर्तेत इत्येवं ऋषयो विदुः ।।

—मभा १३·१२१·१४

(१०५६) म्रियते याचमानो वै न जातु म्रियते ददत् ।
ददत्संजीवयत्येनमात्मानं च युधिष्ठिर ।।

—मभा १३·६०·७

१०५७ कारुण्यपूर्ण भावनेने व प्रसन्न अंतःकरणाने दान देणारे दाते दृष्टीस पडले, की याचकांची अंतःकरणे हर्षनिर्भर होतात.

१०५८ याचकच न उरल्यामुळे जिकडे तिकडे शीतलतेचे साम्राज्य पसरले, तर हे जग म्हणजे निर्जीव लाकडी बाहुल्यांची रंगभूमी बनेल.

१०५९ भिक्षा मागून पोट भरणारे याचकच जर उरले नाहीत, तर उदार दात्यांना मोठेपणा कसा मिळणार?

१०६० नकार मिळाल्यास याचकाने क्रोधाधीन होऊ नये. दारिद्र्य हाच त्याच्या दुःखाचा भरपूर पुरावा आहे.

अध्याय १०७ – याचनेची भीति

१०६१ नकार न देता प्रसन्न अंतःकरणाने दान देणारा दाता समोर असताही याचना न करणे, हे याचना करण्यापेक्षा कोटीपट उत्तम.

१०६२ भिक्षा मागून पोट भरणारे लोक या जगात असलेच पाहिजेत अशी जर विधात्याची कल्पना असेल, तर तो विधाताही त्या भिक्षेकऱ्यांप्रमाणे भटकत राहून नष्ट होवो !

१०६३ भिक्षा मागून दारिद्र्याची आपत्ती दूर करावी असा विचार करणे ही सर्वांत दुष्ट कठोरता आहे.

१०६४ मोठ्या विपत्तीत असताही जो याचना करीत नाही, त्याची श्रेष्ठता या पृथ्वीपेक्षाही विशाल आहे.

अनुक्रमणिका

१०६५ स्वतः श्रम करून मिळविलेल्या पाण्यासारख्या बेचव अन्नापेक्षा दुसरी मधुर वस्तू या जगात नाही.

(१०५७) यत्र दानपतिं शूरं क्षधिताः पृथिवीचराः ।
प्राप्य तुष्टाः प्रतिष्ठन्ते धर्मः कोऽभ्यधिकस्ततः ।।

—मभा ५·१३२·२८

(१०६३) सततं निरयं प्राप्ताः परपिण्डोपजीविनः ।
न भवेम यथा राजंस्तथा नीतिर्विधीयताम् ।।

—मभा १·१४१·३७

(१०६५) अपि शाकं पचानस्य सुखं वै मघवन् गृहे ।
अर्जितं स्वेन वीर्येण नाप्यनाश्रित्य कं च न ।।

—मभा ३·१९३·२९

१०६६ गायीसाठी सुद्धा घोटभर पाण्याची याचना करण्याइतके जिभेला लज्जास्पद असे दुसरे काही नाही.

१०६७ "भिक्षा मागावयाचीच असेल, तर हात राखून दान करणाऱ्या दात्यांजवळ ती मागू नका" अशी मी याचकांजवळ भिक्षा मागतो.

१०६८ याचना नामक अदृढ (असुरक्षित) नाव नकार नामक खडकावर आपटून फुटेल!

१०६९ भिक्षा मागण्याच्या विचाराने हृदय विरघळून जाते. नकार ऐकून ते फुटूनच जाईल.

१०७० लज्जित होऊन याचना करणाराचे प्राण नकार कानी पडताच निघून जातात. पण तो नकार देणाराचे प्राण कोठे दडून बसतात? (निघून का जात नाहीत?)

अध्याय १०८ — नीचपणा

१०७१ नीच लोकांचे बाह्य स्वरूप तेवढे मानवासारखे दिसते. दुसरे काही साधर्म्य त्यांच्यात आढळत नाही.

१०७२ ज्ञानी लोकांपेक्षा नीच लोकच अधिक भाग्यवान असतात. कारण त्यांच्या मनात कसलीच काळजी नसते.

१०७३ नीच लोकांचे देवाशी साधर्म्य असते. कारण ते आपल्या इच्छेनुसार आचरण करू शकतात.

अनुक्रमणिका

१०७४ स्वतःपेक्षा नीच कृत्ये करणारांशी नीच लोकांची गाठ पडते., तेव्हा त्यांच्यापेक्षा आपण श्रेष्ठ असल्याचा त्यांना अभिमान वाटतो.

१०७५ नीच लोकांची कार्यप्रवृत्ती भीतीतूनच होते. त्याचप्रमाणे तिचा उगम केव्हा केव्हा अपेक्षित लाभात असतो.

१०७६ नीच लोक नगाऱ्यासारखे असतात. कारण नगाऱ्यावर टिपरीने केलेल्या प्रहाराचा ध्वनी तो सर्व दूर पसरवितो. त्याचप्रमाणे नीच मनुष्याच्या कानावर पडलेली रहस्ये तो प्रकट करून सांगतो.

(१०६७) तस्मादविद्वान् विभियाद्यस्मात्तस्मात्प्रतिग्रहात् ।
स्वल्पकेनाप्यविद्वान् हि पंके गौरिव सीदति ।।

—मनु ४·१९१

१०७७ वळलेल्या मुठीने थोबाड फोडल्यावाचून नीच माणसाच्या ओल्या (उष्ट्या) हातचे शीत देखील सुटणार नाही.

१०७८ (याचकाच्या) शब्दांनीच थोर मनुष्याचे मन द्रवून याचक संतुष्ट होतो. नीच मनुष्याच्या हातून तो उसासारखा पिळला गेल्यावाचून काही सुटत नाही.

१०७९ शेजारी अन्नवस्त्रसंपन्न असलेले पाहिले, तर नीच लोक त्यांचे दोषान्वेषण करू लागतात.

१०८० नीच लोक संकटात सापडले, तर ते स्वतःस विकून घेण्यासही सिद्ध होतात. नाहीतर ते दुसरे काय करू शकणार?

अनुक्रमणिका

खंड तिसरा — काम

अनुक्रमणिका

भाग १ — गुप्त प्रेम

अध्याय १०९ — सौंदर्य-दर्शनाची प्रतिक्रिया

१०८१ सुंदर कर्णभूषणांनी अलंकृत अशी ही सुंदरी कोण आहे? ती देवता आहे, की मयूरी, की मानवीच? माझ्या मनात गोंधळ उडालेला आहे.

१०८२ माझ्या दृष्टीस आपल्या नेत्रकटाक्षांनी प्रतिसाद देणारी ती सुंदरी प्रबळ सैन्यानिशी आक्रमण करणाऱ्या सुरकन्येसारखी दिसते.

१०८३ यम कोण ते आतापर्यंत मला ठाऊक नव्हते! आता समजले! सुंदर नेत्रायुधे व स्त्री-वेष धारण करून तोच मजकडे येतो आहे!

१०८४ ही बाला भोळी दिसली, तरी प्रेक्षकाचे प्राणच भक्षण करणारे हे तिचे नेत्र काही वेगळेच आहेत!

१०८५ हे काय मृत्यु-शर, की नेत्रबाण की हरिणीचे नेत्रकटाक्ष? की या तिहींचा संगम या बालेच्या दृष्टिक्षेपात झाला आहे?

१०८६ आपल्या भ्रुकुटी आणखी वक्र करून मग या सुंदरीने आपले नेत्र झाकले, तर तिच्या कटाक्षांनी विद्ध होऊन माझी गाळण उडण्याचा प्रसंग ओढवणार नाही.

१०८७ या सुंदरीच्या कंपायमान उरोजांवरील सूक्ष्म वस्त्र मदोन्मत्त हत्तीच्या डोळ्यांवरील आवरणासारखे आहे.

१०८८ रणांगणात शत्रूच्या हृदयात धडकी भरविणारे माझे सामर्थ्य या सुंदरीच्या नेत्रकटाक्षांनी भंगून गेले आहे.

१०८९ हरिणीचे कोमल नेत्रकटाक्ष आणि विनयाचे सुंदर वस्त्र यांनी ही सुंदरी अलंकृत असल्यावर, अधिक अलंकारांचे काय प्रयोजन?

१०९० मद्यापासून होणारा आनंद उपभोगण्यासाठी त्याचे प्राशन करावे लागते. प्रेमविषयाच्या केवळ दर्शनानेच हर्ष होतो.

अध्याय ११० — प्रेम-संकेत

१०९१ तिच्या अंजनांकित नेत्रांत दोन प्रकारची दृष्टी आहे. एका दृष्टीतून निर्माण होतो रोग, तर दुसरीतून त्या रोगावरचे औषध!

अनुक्रमणिका

१०९२ तिच्या नेत्रांच्या चोरट्या दृष्टिक्षेपात मीलनाचे अर्ध्यापेक्षा अधिक सौंदर्य आहे.

१०९३ मजकडे दृष्टिक्षेप करून ती अधोवदन होते. आणि त्या वेळी तिच्या दृष्टीतून प्रेमांकुरावर जलसिंचन होते.

१०९४ मी तिच्याकडे पाहात असतो, तेव्हा तिची दृष्टी धरित्रीकडे लागलेली असते माझी दृष्टी तिच्याकडे नसते, तेव्हा मात्र ती माझ्याकडे पाहून मंद स्मित करीत असते.

१०९५ ती माझ्याकडे सरळ पाहात नाही, पण अर्धोन्मीलित नेत्रांनी तिरपे कटाक्ष फेकून ती मंद स्मित करते.

१०९६ (प्रेयसीचे) शब्द अपरिचितासारखे भासले, तरी ते प्रेमाने ओथंबलेले असल्याचा प्रत्यय त्वरित येतो.

१०९७ मधुर पण कठोर शब्द आणि क्रोधपूर्ण दृष्टी ही बाह्यतः अपरिचितासारखी वाटली, तरी ती प्रेमपूर्ण असतात, असा प्रेमिकांचा संकेत आहे.

१०९८ मी तिच्याकडे पाहात असतो तेव्हा ती कोमलांगी मंद स्मित करीत असते. त्यातूनच प्रेमाचा किरण दिसू लागतो.

१०९९ अपरिचित (किंवा शेजारी) लोकांसारखे एकमेकांकडे केलेले प्रेमगर्भ दृष्टिक्षेप हे प्रेमिकांनाच साधतात.

११०० नेत्रपल्लवीने प्रेमिकांची जी भाषा होते, तिच्यानंतर तोंडातून शब्द निघण्याची काही गरजच राहात नाही.

अध्याय १११ — मीलन सुख

११०१ शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध ही पंचज्ञानेंद्रियांनी उपलब्ध होणारी सुखे या कंकणभूषित सुंदरीच्या मीलनात एकवटली आहेत.

११०२ रोग व त्यावरील औषध ही सामान्यतः वेगवेगळी असतात. पण या अलंकृत सुंदरीने निर्माण केलेल्या रोगावर ती स्वतःच औषधही आहे.

११०३ प्रेयसीच्या कोमल बाहूंच्या मिठीत मिळणाऱ्या निद्रासुखापेक्षा कमलनयन विष्णूच्या लोकात काय अधिक सुख आहे?

११०४ या सुंदरीने हा अग्नी कोठून संपादन केला, की जो दृढ मीलनाने एकदम शांत होतो, पण पृथक होताच त्वरित प्रदीप्त होतो?

अनुक्रमणिका

११०५ कुसुमालंकृत केशकलापधारी केसांच्या या सुंदरीच्या स्कंधावर विसावताना मला कोणतीही इच्छा पूर्ण झाल्यासारखा आनंद होतो.

११०६ या रमणीच्या स्कंधात अमृतच आहे. कारण त्यांना मिठी मारताच माझ्या प्राणांना जणू अंकुर फुटू लागतात!

११०७ इतरांना तृप्त केल्यानंतर आपल्या घरातील स्वकष्टार्जित अवशिष्ट अन्न खाण्यात जो आनंद आहे, तोच या सुंदरीच्या आलिंगनात आहे.

११०८ एकमेकांच्या घट्ट आलिंगनात प्रेमिक मग्न असले, म्हणजे त्यांच्यामधून वायूलाही मार्ग मिळणार नाही.

११०९ प्रेम-कलह, कलह-समाप्ती आणि पुनर्मीलन हे विवाहित प्रेमिकांच्या आयुष्यांतील तीन लाभ आहेत.

१११० अधिकाअधिक अध्ययन करीत असताना आपल्या अधिकाधिक अज्ञानाचा प्रत्यय येतो. तीच अवस्था भूषणमंडित सुंदरीच्या मीलनात येते.

अध्याय ११२ – सौंदर्य-प्रशंसा

११११ शिरीषपुष्पा [९० व्या कुरळावरील टीप पाहा.] (अनिच्चम्) तुझे कल्याण असो! धन्य तुझ्या कोमलतेची! पण तुझ्यापेक्षा माझी प्रेयसी अधिक कोमल आहे!

१११२ हे हृदया, तुला वाटत होते की लोकांच्या दृष्टीस पडणारी कोमल कुसुमे तिच्या डोळ्यांसारखी असतात. पण तिची नेत्रकुसुमे पाहताच तुझा गोंधळ उडालेला दिसतो!

१११३ बांबूसारखे बाहू असणाऱ्या तिच्या तनूचा वर्ण कोमल पल्लवासारखा आहे. दंतपंक्ती मौक्तिकांसारखी आहे, श्वास सुगंधी आहे, आणि नेत्र तीक्ष्ण बाणासारखे आहेत.

१११४ ही दृष्टीस पडताच नीलकमलिनी अधोवदन होईल, आणि म्हणेल, “या अलंकृत सुंदरीच्या नेत्रांशी माझी तुलनाच होणे शक्य नाही! “

१११५ कोमल शिरीषपुष्पे धारण करताना या कोमलांगीने विस्मरणामुळे त्यांची देठे तोडली नव्हती. त्यांचा भार सहन न झाल्याने (जणू) तिची कमर वाकली.

१११६ आकाशातील चंद्र आणि या रमणीचा मुखचंद्र यातून खरा चंद्र कोणता याचा निर्णय करता न आल्याने, आकाशातील तारका आपापल्या स्थानीच विस्मयचकित होऊन चमचमत आहेत!

११११७ शुक्ल पक्षात प्रतिदिन पूर्णत्वाकडे जाणाऱ्या चंद्रावर कलंक असतो. तसाच कलंक या रमणीच्या मुखचंद्रावर आहे काय?

१११८ चंद्रा, तू जर या रमणीच्या मुखचंद्राप्रमाणे सदैव प्रकाशमान राहणार असशील तरच तुला माझे प्रेम मिळेल. चंद्रा, चिरंजीव हो!

१११९ या कमलनयनेच्या मुखचंद्राप्रमाणे तू तेजस्वी राहणार असशील, तर हे चंद्रा तू (माझ्यावाचून) इतरांच्या दृष्टीस पडू नकोस!

११२० शिरीषकुसुमे आणि हंसाची पिसे ही सुद्धा या सुंदरीच्या पायात काटेरी गोखरूप्रमाणे बोचतात.

अध्याय ११३ – प्रेम-महिमा

प्रियकरः

११२१ मधुर भाषिणी प्रेयसीच्या शुभ्र दंतपंक्तीतून स्रवणारे (चुंबन समयीचे) नीर हे क्षीर-मधु मिश्रणासारखे आहे.

११२२ मी आणि माझी प्रिया यांच्यातील प्रेमसंबंध हे शरीर व मन यांच्यातील संबंधांसारखे आहेत.

११२३ माझ्या नेत्रातील प्रतिमे (बाहुले), तू आपल्या स्थानावरून निघून जाऊन ते मोकळे कर. माझ्या सुभ्रू प्रियतमेजोगे त्यावाचून अन्य योग्य स्थान नाही.

११२४ निवडक अलंकारांनी मंडित अशा माझ्या प्रेयसीशी माझे मीलन झाले की प्राणास जीवन मिळते. तिचा वियोग झाला की तो मृत्यूच!

११२५ तिचे केव्हा विस्मरण झाले असते तरच तिच्या स्मरणाचा प्रश्न. पण नेत्रशरांनी विद्ध करणाऱ्या त्या रमणीचे विस्मरण होणेच शक्य नाही.

प्रेयसी :

११२६ माझ्या प्रियतमाची प्रतिमा माझ्या नेत्रांतून निघून जाणारच नाही. मी पापण्यांची नुसती हालचाल केली तरी तिला दुःख होत नाही. (इतकी ती सूक्ष्म आहे).

११२७ माझ्या प्रियकराची वस्ती माझ्या नेत्रात आहे. म्हणून मी डोळ्यात काजळ घालीत नाही. कारण तेवढ्यातच तो दृष्टीआड होईल ना?

अनुक्रमणिका

११२८ माझ्या प्रियतमाचे वास्तव्य माझ्या हृदयात आहे. म्हणून कोणताही उष्ण पदार्थ भक्षण करण्याचे भय वाटते. त्या उष्णतेचा त्याला त्रास होईल ना?

११२९ डोळ्यांच्या पापण्या मिटल्या तर तेवढ्यात तो लपून बसेल. म्हणून मी पापण्यांची उघडझाप करीत नाही, आणि मग त्याचे माझ्यावर प्रेम नाही असे गावकरी बोलू लागतात!

११३० माझा प्रियकर माझ्या हृदयात मोठ्या आनंदोन वास्तव्य करतो. (तो बाहेर न दिसल्याने) त्याच्या अंतःकरणात प्रेम नाही व म्हणून तो दूर राहतो, असे गावकरी म्हणतात.

अध्याय ११४ – विनयाचा त्याग

प्रियकर :

११३१ एकदा मीलनसुख अनुभविल्यानंतर कामज्वराची पीडा होऊन निराश झालेल्या युवकास कंटकमय [वियोगामुळे निराश झालेला प्रियकर ताडपत्राचा घोडा (मडल) करून त्यावर आरोहण करतो, व क्लेश सहन करून आत्महत्येस प्रवृत्त होतो.] तालपत्राश्वावाचून (मडल) दुसरा सबळ आधार नाही.

११३२ शरीर व प्राण ही दोन्हीही विरहदुःख सहन करण्यास असमर्थ झाल्यामुळे लज्जेचा त्याग करून तालपत्राश्वाच्या आश्रयानेच त्याचे रक्षण करता येईल.

११३३ मी एकदा पराक्रम व विनय यांनी संपन्न होतो. आज मात्र माझ्याजवळ कामज्वरपीडितांचा आधार अशा मडलवाचून दुसरे काही राहिले नाही.

११३४ माझा पराक्रम व विनय यांची नौका कामरूपी वेगवान प्रवाहाने दूर वाहून नेली आहे.

११३५ फुलांच्या गजऱ्यासारखी कोमल कंकणे घातलेल्या माझ्या प्रेयसीने तालपत्राश्व आणि सायंविरह अशा दोन देणग्या मला दिल्या आहेत.

११३६ माझ्या भोळ्या प्रियतमेच्या विरहामुळे माझे नेत्र निद्राधीन होत नाहीत. म्हणून भर मध्यरात्रीही मी तालपत्राश्वावर आरोहण करतो.

११३७ कामसागरात आकंठ बुडालो असताही, तालपत्राश्वावर आरूढ न होता ती पीडा सहन करण्याइतकी सहनशीलता स्त्रीस्वभावावाचून अन्यत्र आढळणार नाही.

प्रेयसी :—

११३८ आम्ही स्त्रिया विनयशील असून कामदेवाच्या प्रभावास बळी पडणाऱ्या नाही. ही गोष्ट विसरून तो आपली मर्यादा ओलांडून प्रेमरहस्य प्रकट करतो.

११३९ आमचे प्रेम अजूनही गुप्त आहे याची जाणीव असूनही कामदेवाचे मन गोंधळते, आणि तो आपली रहस्ये गावातील रस्त्यावर उघडी करतो. (लोकप्रवाद उठतात).

११४० मीलनापूर्वी विरहाचे जे कष्ट आम्हांस भोगावे लागले, त्यांची कल्पना यांना नसल्यामुळे, हे मूर्ख लोक आमच्या देखत हसून आमची चेष्टा करीत आहेत.

अध्याय ११५ — प्रवाद-स्फोट

प्रियकर :

११४१ प्रेमरहस्याच्या प्रवादाचा प्रसार झाल्यामुळे माझे प्राण वाचले. सुदैवाने इतर अनेक लोकांना ही गोष्ट ठाऊक नाही.

११४२ या गावातील लोकांना या कमलनयनेचे मोल माहीत नसल्याने त्यांनी माझ्याविषयीचा प्रवाद पसरविला आहे.

११४३ माझ्याविषयी या गावात उठलेल्या प्रवादामुळे माझा लाभच झाला नाही काय? कारण मला प्रत्यक्ष न मिळालेली गोष्ट आता मिळाल्यासारखीच आहे.

११४४ प्रवादामुळे माझे प्रेम वृद्धिंगत होते. त्यावाचून कदाचित ते क्षीण झाले असते.

११४५ मद्याच्या अधिकाधिक सेवनाने मद्यपानाची इच्छा तीव्रतर होते. आपल्या गुप्त प्रेमाची उघड चर्चा होऊ लागली की, प्रेमाची गोडी वाढत जाईल.

प्रेयसी :

११४६ त्याला मी एकदाच भेटले. पण सर्प (राहू) जसा चंद्रास ग्रासतो, तसा त्या भेटीचा प्रवाद पसरला आहे.

११४७ आमच्या प्रेमरहस्याला गावकऱ्यांच्या प्रवादाचे खत मिळाले आहे आणि माझ्या आईच्या कठोर शब्दांनी त्याला पाणी घातले आहे.

११४८ प्रेमरहस्याचे प्रवाद उठवून प्रेम नष्ट करू पाहणे म्हणजे तुपाच्या धारेने अग्निज्वाला विझविण्यासारखे आहे.

११४९ (युद्धावर) जाण्यापूर्वी सर्वांसमोर “भिऊ नको” असे आश्वासन देऊन त्याने मला लाजविले होते. आता मी या प्रवादाला कशी भिईन?

अनुक्रमणिका

११५० आम्हाला हव्या असलेल्या प्रवादाचा प्रसार गावकरी करीत आहेत. माझा प्रियकरसुद्धा त्यांना साहाय्य करील.

अनुक्रमणिका

भाग २ – पातिव्रत्य

अध्याय ११६ – असह्य विरह

११५१ (हे प्रियतम,) तू जाणार नसशील तर ती वार्ता मला सांग. तुझ्या लवकर परतण्याविषयी काही सांगणार असशील, तर तू परत येईपर्यंत जे जिवंत राहणार असतील, त्यांनाच सांग.

११५२ पूर्वी त्याचे दर्शनही सुखकर असे. पण आताचे आलिंगनही वियोगाच्या भीतीमुळे दुःखदायक होते.

११५३ माझ्या विरहवेदनेची पूर्ण जाणीव असूनही जो दूर जातो, त्याच्या (लवकर परतण्याच्या) आश्वासनावर विश्वास ठेवणे कठीण आहे.

११५४ जाण्यापूर्वी "भिऊ नको" असा धीर देऊन जो जातो, त्याच्या आश्वासनावर विश्वास ठेवणाराचा काय दोष?

११५५ माझा जीव वाचवायचा असेल, तर त्याला जाण्यापासून परावृत्त करा. नाहीतर एकदा वियोग झाला, की पुनर्मीलन अशक्य आहे.

११५६ तो जाणार असल्याचे मला सांगण्याइतका कठोर असला, तर तो परत आल्यातंतर माझ्यावर प्रेम करील अशी आशा करणे व्यर्थ आहे.

११५७ (पतीच्या दीर्घ विरहामुळे कृश झालेली त्याची प्रेयसी म्हणते,) माझ्या हातातून घसरत जाणारी कंकणे सागरी प्रांतावर सत्ता गाजविणाऱ्या माझ्या प्रियकराच्या दीर्घ विरहाची साक्ष देत नाहीत काय ?

११५८ कोणीही मित्र किंवा परिचित नसलेल्या गावी एकटे राहणे हे दुःखदायक आहेच. पण त्याहूनही दुःखदायक आहे तो प्रियतमाचा वियोग!

११५९ अग्नीला स्पर्श करताच चटका बसतो. पण कामाग्नीप्रमाणे तो वियोगानंतरही जाळतो का?

११६० दीर्घकाळ विरहवेदना सहन करून वियोगानंतर जीवन जगणारे अनेक आहेत!

अध्याय ११७ – विरहिणीचा विलाप

११६१ माझी विरहव्यथा मी लपवून ठेवीन. पण एकीकडे पाणी उपसले जात असतानाही वारंवार वर उसळणाऱ्या निर्झराप्रमाणे ती वाढतच आहे.

११६२ माझी विरहवेदना मला लपवून ठेविता येत नाही. आणि ज्याच्यामळे ती निर्माण झाली, त्याला ती निर्लज्जपणे सांगवतही नाही.

११६३ माझ्या प्राणरूपी खांद्यावर धरलेल्या काठीच्या (कावडीच्या) दोन टोकांना टांगलेल्या प्रेम व लज्ञा या दोन भावनांचा भार असह्य झाला आहे.

११६४ माझ्यापुढे विशाल कामसागर पसरलेला आहे. पण तो तरून जाण्यासाठी सुरक्षित अशी नौका मात्र दिसत नाही.

११६५ प्रेमातूनही जो दुःख निर्माण करतो, तो वैरी बनला म्हणजे काय करणार नाही?

११६६ कामीजनांच्या मीलनाचा आनंद समुद्रासारखा विशाल असतो. पण विरहाची वेदना त्याहूनही विशाल असते.

११६७ कामवासनेच्या महापुरात सापडून मी तरंगत आहे. पण अजून कोठेच तीर दिसत नाही. मध्यरात्र झाली तरी मी एकटीच आहे.

११६८ या रात्रीच्या अंकावर सर्व जीवसृष्टी निद्रावश झाली आहे. पण त्या बिचाऱ्या रात्रीला माझ्यावाचून (पतिविरहामुळे मीच तेवढी जागी असल्यामुळे) कोणाचीही सोबत नाही.

११६९ माझ्या निष्ठुर प्रियकरापेक्षाही या रात्री अधिक निष्ठुर आहेत. कारण त्यांची दीर्घता वृद्धिंगत होत आहे.

११७० माझ्या अंतःकरणाप्रमाणे माझे नेत्रही प्रियकरापर्यंत पोचले असते, तर त्यांना आपल्याच अश्रूंच्या पुरात पोहावे लागले असते.

अध्याय ११८ – नेत्रांची विरह-वेदना

११७१ काजळ घातलेल्या या डोळ्यांनीच मला माझ्या प्रियकराचे दर्शन दिले. आणि म्हणूनच ही असह्य विरहवेदना मला छळीत आहे. असे असूनही या डोळ्यांनीच का विलाप करावा?

११७२ त्या दिवशी दूरदृष्टी न राखता हे अंजनांकित नेत्र त्याच्याकडे धावले. आता आपल्या त्या अपराधाची लाज न वाटता ते दुःख का भोगीत आहेत?

११७३ काजळ घातलेले हे डोळे त्या दिवशी घाईने व उत्सुकतेने धावले आणि आता तेच अश्रुपात करीत आहेत. हे हास्यास्पद नाही का?

११७४ काजळ घातलेल्या माझ्या या डोळ्यांना मला तीव्र व मरणप्राय वेदना दिल्या. आणि आता रडूनरडून पाणी आटल्याने त्यांना रडताही येईनासे झाले आहे.

अनुक्रमणिका

११७५ समुद्रापेक्षा विशाल आणि असह्य अशा कामवेदना निर्माण करून हे नेत्र आता स्वतः निद्रानाशाच्या वेदना भोगीत आहेत.

११७६ माझ्या ठिकाणी असह्य कामवेदना निर्माण करणारे हे नेत्र आता स्वतःच कसे संकटात सापडले आहेत! फार उत्तम झाले! (खोड मोडली!)

११७७ त्या दिवशी त्याच्याकडे हावरटपणाने दृष्टिक्षेप करणारे हे नेत्र रडूनरडून दुःख भोगून आतील पाणी आटल्यामुळे थकून जावोत!

११७८ त्याने एकदा मजवर प्रेम केले ते केवळ शब्दांनीच, अंतःकरणापासून नव्हे! त्याला (पुन्हा) प्रत्यक्ष पाहिल्यावाचून माझ्या डोळ्यांचे समाधान होणार नाही!

११७९ तो दूर असेल तेव्हा त्याची मार्गप्रतीक्षा करीत असल्यामुळे डोळे निद्रावश होत नाहीत. प्रियतमाच्या आगमनानंतरही त्यांना निद्रेपासून दूर राहावे लागते. म्हणून त्यांना केव्हाही असह्य वेदनास तोंड द्यावे लागते.

११८० माझे डोळे जणू काही ढोल बडवून विरहवेदना व्यक्त करीत असताना गावातील लोकांना आमचे रहस्य समजणे कठीण नाही.

अध्याय ११९ – निस्तेजतेची व्यथा

११८१ तो गेला तेव्हा त्याच्या जाण्यास मी संमत्ती दिली. आता माझ्या शरीराच्या निस्तेजतेची व्यथा कोणास सांगू?

११८२ माझ्या प्रियकरानेच निर्माण केले असल्याच्या अहंकाराने चढून जाऊन हा निस्तेजपणा माझ्या शरीरावर आक्रमण करू लागला आहे!

११८३ जाताना त्याने माझे लावण्य व लज्जा यांना हिरावून नेले आणि निस्तेजता व विरहव्यथा या दोन देणग्या त्याने मला दिल्या.

११८४ मी त्याचे चिंतन करते आणि गुणगानही करते आणि तरीही ही निस्तेजता? ही शुद्ध फसवणूक आहे!

११८५ माझा प्रियकर निघून जाऊन तिकडे भटकतो आहे आणि इकडे हा फिकटपणा माझे शरीर व्यापून टाकतो आहे!

११८६ ज्याप्रमाणे दिवा विझण्याची वाट अंधकार पाहात असतो, त्याचप्रमाणे आमच्या गाढ आलिंगनातून प्रियतम मुक्त होण्याची वाट हा फिकटपणा पाहात होता!

अनुक्रमणिका

११८७ गाढ आलिंगनात मग्न असताना क्षणभरच मी बाजूस झाले. इतक्यात या फिकटपणाने मला आपल्या पकडीत घेतले!

११८८ “ही निस्तेज झाली आहे” असे म्हणणारे लोक आहेत. पण “त्याने हिचा त्याग केला” असे मात्र कोणी म्हणत नाही.

११८९ माझी संमती घेऊन गेल्यानंतर तो जर निरपराध व खुशाल असला, तर येऊ दे बापडा माझ्या शरीरावर निस्तेजपणा!

११९० माझा प्रियतम मला सोडून गेला म्हणून लोक जर त्याची निंदा करणार नसतील, तर माझ्या फिकटपणाला लोकांनी नावे ठेवली तरी चालेल!

अध्याय १२० – विरहाची तीव्रता

११९१ पतीचे पत्नीवर व पत्नीचे पतीवर प्रेम असले, म्हणजे रसाळ बेदाणा खाण्यासारखा त्यांना मीलनात आनंद प्राप्त होतो.

११९२ पतीचे प्रिय पत्नीवर प्रेम हे मेघांनी स्वर्गातून पृथ्वीवर केलेल्या पर्जन्यवृष्टीसारखे असते.

११९३ पतीचे पत्नीवर गाढ प्रेम असले म्हणजे त्यांच्या पुनर्मीलनानंतर “सुखमय एकत्र जीवन जगू” असे त्यांना अभिमानाने म्हणता येते.

११९४ ज्या स्त्रीवर तिच्या पतीचे प्रेम नसते, तिला तिच्या मैत्रिणींनी वा अन्य स्त्रियांनी मान दिला, तरी ती खरी भाग्यवान होत नाही.

११९५ मी माझ्या पतीवर जसे प्रेम करते, तसे त्याने माझ्यावर जर केले नाही, तर त्याचा काय उपयोग?

११९६ एकपक्षीय प्रेम हे पीडादायक असते. कावडीच्या दोन टोकांना तर सारखाच भार असला, तर जसा समतोल साधतो, तसे दोन्ही पक्षांचे एकमेकांवर सारखेच प्रेम हवे.

११९७ पक्षपाती होऊन कामदेव मला एकटीलाच व्यापून राहिला आहे. त्याला माझे दुःख व शोक यांची कल्पना नाही काय?

११९८ पतीकडून गोड शब्दही वाट्यास न येता जिला आपले आयुष्य कंठावे लागते, अशा पत्नीपेक्षा अधिक कठोरहृदयी कोणी नाही.

११९९ (पुनरागमनानंतर) माझ्या प्रिय पतीने माझ्यावर प्रेम दाखविले नाही, तरी (इतरांनी काढलेले) त्यांच्या प्रशंसेचे उद्गार माझ्या कानांस गोड लागतात.

अनुक्रमणिका

१२०० हे हृदया, तुझे भले होवो! भावनाशून्य प्रियतमापुढे तू आपल्या दुःखाचा पाढा वाच. ठीक आहे! (पण) तुझा तो प्रयत्न समुद्र कोरडा करण्यासारखा (निष्फळ) आहे!

अध्याय १२१ – शोकमय स्मृति

प्रियकर :

१२०१ प्रेमाची माधुरी मद्यापेक्षाही अधिक आहे. कारण प्रेमाच्या केवळ स्मृतीनेच अत्यानंद होतो.

१२०२ प्रियतमेचे स्मरण करताच दुःखाचा नायनाट होतो. खरोखरच प्रेम हे किती आनंददायक आहे!

प्रेयसी :

१२०३ शिंक येते येतेशी वाटताच जिरली! काय माझा प्रियकर माझे स्मरण करताकरताच पुन्हा मला विसरला?

१२०४ माझ्या हृदयात त्याचे नित्य वास्तव्य आहे. मलाही त्याच्या हृदयात तसेच स्थान आहे का?

१२०५ त्याच्या हृदयात प्रवेश करण्यास मला प्रतिबंध करताना, माझ्या हृदयात मात्र वारंवार प्रवेश करण्याची त्याला लाज कशी वाटत नाही?

१२०६ त्याच्या संगतीत घालविलेल्या दिवसांच्या स्मृतींच्या बळावरच मी जीवन कंठीत असते. नाहीतर मी जिवंतच कशी राहिले असते?

१२०७ त्याच्या संगतीत घालविलेले मधुर दिवस मी विसरले नाही. त्यांच्या स्मरणानेच माझे अंतःकरण जळू लागते. विस्मरणाने माझी काय अवस्था होईल?

१२०८ माझ्या प्रियतमाचे मी कितीही स्मरण केले, तरी तो रुष्ट होत नाही. यामुळेच त्याच्या प्रेमाचे दर्शन होत नाही का?

१२०९ "आपण निरंतर एकच आहोत" असे तो (जाण्यापूर्वी) म्हणाला होता. असे असूनही त्याच्या निष्ठुरपणाची शंका घेऊन मी आपले प्राण (उगीच) का झिजवीत आहे?

१२१० चंद्रा, चिरंजीव हो! मला सोडून गेल्यानंतरही ज्याचे वास्तव्य माझ्या हृदयात आहे, त्याला मी डोळ्यांनी समक्ष पाहीपर्यंत अस्तास जाऊ नको! स्थिर राहा!

अनुक्रमणिका

अध्याय १२२ – स्वप्न-कथन

प्रेयसी :

१२११ माझ्या प्रियकराकडून संदेश घेऊन त्याचा दूत माझ्या स्वप्नात आला. हा उत्सव मी कसा साजरा करू?

१२१२ माझे अंजनांकित मीनाकृती नेत्र जर माझ्या विनंतीवरून निद्रावश झाले, तर स्वप्नात दर्शन देणाऱ्या माझ्या प्रियकरासमोर मी आपली व्यथा प्रकट करीन.

१२१३ मी जागी असताना तो मला केव्हाच भेटत नाही. स्वप्नात होणाऱ्या त्याच्या दर्शनामुळेच तर मी जिवंत राहिले आहे.

१२१४ मी जागी असताना तो मला केव्हाच भेटत नाही. त्याचे दर्शन मला स्वप्नात होते. म्हणून स्वप्नसृष्टी ही माझ्या भाग्याचीच गोष्ट आहे.

१२१५ मी जागी असताना झालेली आमची भेट ही तर आनंददायक होतीच. पण तसेच नुकतेच स्वप्नसृष्टीत झालेले आमचे मीलन हेही भाग्याचेच होते.

१२१६ जागृती नावाची अवस्थाच जर अस्तित्वात नसती, तर स्वप्नसृष्टीत भेटणारा माझा प्रियकर माझ्यापासून दूर झालाच नसता.

१२१७ मी जागी असताना मला संतुष्ट न करणाऱ्या माझ्या प्रियतमाला स्वप्नसृष्टीत मला त्रास देण्याचा काय अधिकार आहे?

१२१८ स्वप्नसृष्टीत तो माझ्या बाहूंच्या मिठीत विसावतो. जागी होताच मात्र तो त्वरेने माझ्या हृदयात प्रवेश करतो.

१२१९ ज्यांना स्वप्नसृष्टीत भेटणारे प्रियकर नाहीत, त्या स्त्रिया माझा प्रियकर मला जागेपणी भेटत नाही म्हणून त्याला दोष देतात.

१२२० "मी जागी असताना माझा प्रियकर मला टाकून गेला" असे या गावातील स्त्रिया म्हणतात. तो मला स्वप्नात येऊन भेटतो हे त्यांना माहीत नसते!

अध्याय १२३ – सायं-वेदना

प्रेयसी :

१२२१ हे संध्ये, तुझे कल्याण असो! तू संध्या नाहीस. प्रेमिकांचे प्राण हरण करणारे तू शस्त्र आहेस!

अनुक्रमणिका

१२२२ संध्ये, चिरंजीव हो! तुझी दृष्टी मंद झाल्यासारखी दिसते. तुझा प्रियकरसुद्धा माझ्या प्रियकराप्रमाणे कठोर हृदयी झाला आहे काय?

१२२३ संध्येच्या आगमनसमयी पूर्वी केवळ प्रकाश धूसर होत असे. आता त्या वेळी जीवनाविषयी तिरस्कार व भीती वाटू लागतात.

१२२४ माझा प्रियकर दूर गेला असताना संध्या जेव्हा येते, तेव्हा ती वधभूमीकडे येणाऱ्या सशस्त्र वधकासारखी दिसते.

१२२५ प्रातःकाळावर मी काय उपकार केले आहेत आणि सायंकाळची काय हानी केली आहे, कोणास ठाऊक?

१२२६ माझा प्रियकर मला सोडून जाण्यापूर्वी सायं-वेदना कशा असतात याची मला कल्पना नव्हती!

१२२७ प्रेमव्यथारूपी ही कलिका प्रातःकाळी मूक व आकाराने लहान असते. दिवसाबरोबर ती वृद्धिंगत होत जाते, व सायंकाळी तिचा पूर्ण विकास होऊन ती मला अतीव पीडा देते.

१२२८ गोपाळाची मुरली ही सायंकाळी मला अग्नीसारखी जळजळीत व माझ्या वधार्थ येणाऱ्या प्राणघातक शस्त्रासारखी वाटते.

१२२९ सायंछायांनी माझे मन जसे गोंधळून जाईल, त्याचप्रमाणेच या गावातील लोकांची मनेही गोंधळून जाऊन शोकमग्न होतील.

१२३० द्रव्यार्जनासाठी दूर गेलेल्या माझ्या प्रियकराचे स्मरण करीत करीत, आतापर्यंत देहास सोडून न जाता मागे राहिलेला माझा प्राण, सायंकाळाच्या आगमनाने आता बाहेर जाऊ पाहात आहे.

अध्याय १२४ – शरीर सौंदर्याची क्षीणता

सखी :

१२३१ आपल्याला येथे सोडून तो प्रवासाला गेल्यानंतर तुझ्या कमलनेत्रातील दृष्टी क्षीण झाल्यामुळे सुंदर फुलांच्या दर्शनानेही तू लज्जित होत आहेस.

१२३२ अश्रूपात करून क्षीण व निस्तेज झालेले तुझे नेत्र जणू काही प्रियकराच्या प्रेमाच्या अभावाचीच घोषणा करीत आहेत.

१२३३ प्रथम मीलन-दिनी आनंदाने पुष्ट दिसणारे तुझे बाहू आता क्षीण झाले असून विरहवेदना व्यक्त करीत आहेत.

अनुक्रमणिका

१२३४ प्रियतमाच्या विरहापूर्वी पुष्ट असलेले तुझे बाहू सौंदर्यहीन होऊन इतके क्षीण झाले आहेत, की सुवर्णाची बाहुभूषणे शिथिल झाली आहेत.

१२३५ शिथिल झालेली बाहुभूषणे व सौंदर्यहीन आणि क्षीण झालेले तुझे बाहू प्रियकराची निष्ठुरताच व्यक्त करीत आहेत.

प्रेयसी :

१२३६ बाहुभूषणे शिथिल झाली असली आणि बाहू क्षीण झाले असले, तरी तू माझ्या प्रियतमाला निष्ठुर म्हणून दूषणे दिलीस, याचे मला दुःख होते.

१२३७ हे हृदया, माझे बाहू क्षीण झाल्याची व लोकप्रवाद मात्र वाढत असल्याची वार्ता माझ्या प्रियतमास ऐकवून तुला काय मोठेपणा मिळवावयाचा आहे?

प्रियकर :

१२३८ एकदा तिचे बाहू माझ्या घट्ट मिठीत असताना मी ते थोडे शिथिल सोडले. बाहुभूषणांनी मंडित अशा माझ्या भोळ्या प्रियेचा भालप्रदेश विवर्ण झाला!

१२३९ आम्ही घट्ट मिठीत असताना मंद वाऱ्याची झुळूक आमच्यामध्ये शिरली. माझ्या भोळया प्रियेचे शीतल आणि विशाल नेत्र निस्तेज होऊ लागले.

१२४० माझ्या प्रियतमेच्या भालप्रदेशावर विवर्णता लवकर पसरलेली पाहून नेत्रांच्या निस्तेजतेला अधिक दुःख झाले.

अध्याय १२५ – स्वगत चिंतन

प्रेयसी :

१२४१ हे हृदया, थोडासा नीट विचार करून माझ्या या असाध्य रोगावर उपयोगी पडेल असे एखादे औषध तू सुचविणार नाहीस काय?

१२४२ हे हृदया, धन्य आहेस तू! त्याचे माझ्यावर प्रेम नसताना तुझा विलाप म्हणजे केवळ मूर्खपणा होय!

१२४३ हे हृदया, येथे राहून तू त्याच्यासाठी का शोक करीत आहेस? तुझ्या शोकाला कारण असलेल्या माझ्या प्रियकराला तुझे स्मरणसुद्धा नाही.

अनुक्रमणिका

१२४४ हे हृदया, तू माझ्या प्रियकराकडे जाताना माझ्या नेत्रांना बरोबर घेऊन जा. त्याच्या दर्शनासाठी ते इतके भुकेले आहेत, की ते येथे मलाच खाऊन टाकतील!

१२४५ त्याच्या भेटीसाठी मी इतकी उत्सुक असताना तो मात्र तशी उत्सुकता दाखवीत नाही, म्हणून हे हृदया, तो आपला शत्रू समजून त्याचा नाद आपण सोडून देऊ का?

१२४६ दुःखाचे सांत्वन करण्यासाठी तो जेव्हा आलिंगन देईल तेव्हा प्रथम कोप आल्याचे ढोंग करून तू त्याच्या मिठीत शिरशील. हे हृदया, तुझा आताचा शोक हा खोटा आहे!

१२४७ माझ्या भल्या हृदया, तू एक तर प्रेमाचा, नाहीतर लज्जेचा त्याग कर. या दोहोंचा भार एकाच वेळी मला सहन करता येणार नाही!

१२४८ हे माझ्या भोळ्या हृदया, त्याचे प्रेम नसल्यामुळे एकीकडे तू शोक करीत आहेस, तर त्याच वेळी त्याच्या मागे धावतोही आहेस, मूर्ख आहेस झाले!

१२४९ हे हृदया, माझ्या प्रियकराचे वास्तव्य तर माझ्या अंतःकरणातच आहे. मग तू कोणाच्या मागे लागून भटकतो आहेस?

१२५० माझ्यावर प्रेम न करता ज्याने माझा त्याग केला, त्याला मी माझ्या हृदयात आश्रय दिला, तर माझ्या सौंदर्याची अधिकच हानी होईल!

अध्याय १२६ – लज्जेचा त्याग

प्रेयसी :

१२५१ विनयाचा अडसर घालून बंद केलेला निष्ठेचा दरवाजा कामदेव आपल्या कुऱ्हाडीने फोडील!

१२५२ कामदेव निर्दय व बलवान आहे. भर मध्यरात्रींही माझ्या मनावर तो आपला अधिकार चालवतो!

१२५३ मी कामदेवाला माझ्या अंतःकरणात दडवून ठेवते. पण पूर्वसूचना न देता तो अचानक शिंकेसारखा प्रकट होतो.

१२५४ मी स्वतःला स्त्रीसुलभ लज्जेच्या आवरणात सुरक्षित समजत होते. पण ते आवरण फाडून टाकून कामदेव अंतःकरणाबाहेर येऊन प्रकट होतो.

१२५५ आपणास टाकून जाणाऱ्या प्रियकराच्या मागे न लागण्याइतका स्वाभिमान प्रेमव्यथेने पीडित झालेल्या प्रेयसीला राहात नाही!

अनुक्रमणिका

१२५६ जो माझा द्वेष करतो, त्याच्यामागे लागण्यास मला भाग पाडणारी माझी ही विरहव्यथा किती गौरवशाली आहे पाहा!

१२५७ माझी इच्छा जर माझ्या प्रियकराने पूर्ण केली, तर लोक जिला लज्जा म्हणतात, ती भावना मी विसरून जाईन.

१२५८ माझ्या युक्तिवान आणि वंचक प्रियकराची नम्र वचने म्हणजे स्त्रीच्या विनयशीलतेवर उगारलेली शस्त्रेच नव्हेत काय?

१२५९ रोषाचे प्रदर्शन करण्याच्या मिषाने मी प्रियतमाकडे गेले. पण जवळ जाताच माझ्या हृदयाने मला फसविले, आणि मी त्याच्या मिठीतच सापडले!

१२६० मेण अग्नीजवळ गेले म्हणजे वितळल्याविना जसे राहात नाही, तसेच प्रेयसीचे हृदय प्रियकराच्या सान्निध्यात गेल्यानंतर क्रोधवशतेचे ढोंग करू शकत नाही!

अध्याय १२७ – परस्परांची मार्गप्रतीक्षा

प्रेयसी :

१२६१ प्रियतमाची वाट पाहून पाहून नेत्रांचे तेज क्षीण झाले, दृष्टी मंद झाली, आणि विरह झाल्यापासूनचे दिवस मोजता मोजता हाताची बोटे झिजत चालली!

१२६२ हे अलंकारमंडित स्त्रिये, आजही जर मी त्यास विसरून गेले, तर माझे सौंदर्य नष्ट होऊन ही बाहुभूषणेही गळून पडतील!

१२६३ विजयाच्या आकांक्षेने व उत्साहाचे साहाय्य घेऊन दूरदेशी गेलेल्या माझ्या प्रियकराची वाट पाहात मी अजूनही जिवंत आहे!

१२६४ दीर्घ वियोगानंतर माझा प्रियकर परत येणार आहे व माझ्यावर प्रेमाचा वर्षाव करणार आहे, या कल्पनेनेच माझे हृदय आनंदाने फुलून गेले आहे.

१२६५ (प्रत्यागमनानंतर) माझ्या प्रियकराकडे नेत्रांची तृप्ती होईपर्यंत मी एकदा पाहिले, की माझ्या कोमल बाहूंवर आलेली निस्तेजता तत्काल दूर होईल!

१२६६ माझ्या प्रियकराला एक दिवस परत येऊ द्या. त्याला डोळे भरून पाहताच माझी विरहवेदना तत्काळ पळून जाईल!

१२६७ नयनाप्रमाणे प्रिय असणारा माझा प्रियकर परत आल्यानंतर त्याच्याशी प्रेमकलह करू, की त्याला मिठी मारू, की दोन्हीही एकदम करू?

अनुक्रमणिका

प्रियकर :

१२६८ राजाने आपले (युद्धाचे) कर्तव्य (पुरे) करून यश संपादन करावे; इकडे मी माझ्या प्रियेच्या आलिंगनात आजची सायंकाळ साजरी करीन!

१२६९ दीर्घकाळपर्यंत दूर गेलेल्या आपल्या प्रियजनाची मार्गप्रतीक्षा करणारांना एक दिवस सात दिवसांसारखा दीर्घ वाटतो!

१२७० दीर्घकालीन विरहामुळे भग्नहृदय होऊन धरणीवर कोसळलेल्या (गतप्राण) प्रेयसीचेच दर्शन व्हावयाचे असेल, तर घरी परतण्याचा आणि मीलनाच्या प्रतीक्षेचा काय उपयोग?

अध्याय १२८ – संकेताची अभिव्यक्ति

प्रियकर प्रेयसीस :

१२७१ तू लपविण्याचा कितीही प्रयत्न केलास तरी तुझे अंजनांकित नेत्र तुझ्या प्रतिबंधास न जुमानता काही तरी सांगू पाहात आहेत!

प्रियकर सखीस :

१२७२ बांबूसारखे बाहू असलेल्या या सुंदरीचे लावण्य माझ्या डोळ्यांत मावत नाही. आणि तिचा स्वभाव बांबूसारखाच सरळ आहे.

१२७३ स्फटिकमाला ओवलेल्या सूत्राप्रमाणे या सुंदरीच्या अंतःकरणात (बाहेरून न दिसणारे) काही तरी गूढ आहे.

१२७४ अर्धोन्मीलित कलिकेतील मंद सुगंधाप्रमाणे या सुंदरीच्या मंद स्मितात काही तरी गूढ आहे.

१२७५ घट्ट चुडा भरलेल्या या सुंदरीच्या मनात ज्या युक्त्या आहेत, त्यांचा उपयोग माझी विरहवेदना सौम्य करण्यासाठी औषधासारखा झाला.

प्रेयसी सखीस :

१२७६ त्याच्या आताच्या गाढ आलिंगनाने मी तृप्त आणि सुखी झाले असून पूर्वीच्या विरहवेदना आणि त्याच्या प्रेमाविषयी मला असलेला संशय यांचे निराकरण करण्याचे सामर्थ्य त्यात आहे.

१२७७ शीतल समुद्रतीराचा स्वामी अशा माझ्या प्रियकरापासून होणाऱ्या माझ्या वियोगाची कल्पना माझ्यापूर्वी माझ्या कंकणांना आली होती.

अनुक्रमणिका

१२७८ माझा प्रियकर मला कालच सोडून गेला. पण एका दिवसातच माझे शरीर एका आठवड्याने वृद्ध झाले आहे, असे त्याच्या निस्तेजपणाकडे पाहून वाटते.

सखी प्रियकरास :

१२७९ तिने आपली (शिथिल) कंकणे पाहिली. नंतर तिची दृष्टी तिच्या (निस्तेज झालेल्या) बाहूंकडे गेली आणि शेवटी तिने आपल्या (कृश झालेल्या) पावलांकडे पाहिले. इतक्याच गोष्टी तिने केल्या.

प्रियकर सखीस :

१२८० विरहवेदना आणि वियोगास द्यावयाचा नकार यांची अभिव्यक्ती नेत्रांच्या द्वारे करण्याची सुंदर स्त्रियांची विशिष्ट पद्धती आहे.

अध्याय १२९ – मीलनाची उत्सुकता

प्रेयसी :

१२८१ केवळ स्मरणाने सुख व दर्शनाने आनंद देण्याचे सामर्थ्य मदिरेत नाही. पण प्रेमात ते आहे.

१२८२ प्रेमाचे प्रमाण ताडाएवढे वाढले, तरी कलहाचे प्रमाण तिळाइतकेही असता कामा नये.

१२८३ माझा प्रियकर माझ्या सुखाचा विचार न करता त्याला हवे असेल तसे वागतो. हे जरी खरे असले, तरी त्याला मी डोळ्यांनी पाहिल्यावाचून माझ्या हृदयाचे समाधान होणार नाही.

१२८४ हे सखे, मी त्याच्याकडे कलह करण्याच्या उद्देशाने गेले खरी. पण माझ्या हृदयास त्या उद्देशाचा विसर पडला, आणि ते त्याला मिठी मारण्यास उत्सुक झाले.

१२८५ नेत्रांत शलाकेने अंजन घालताना नेत्रांना ती शलाका जशी दिसत नाही, त्याचप्रमाणे माझा प्रियकर माझ्या सन्निध असतानाही त्याचे दोष मला दिसत नाहीत!

१२८६ माझ्या प्रियकराच्या सान्निध्यात मी असले, म्हणजे त्याचे दोष मला दिसत नाहीत. पण तो दूर जाऊन दिसेनासा झाला, म्हणजे त्याच्या दोषांवाचून दुसरे मला काहीच दिसत नाही.

१२८७ प्रवाहाबरोबर आपण वाहात जाऊ हे ठाऊक असता जाणूनबुजून त्या प्रवाहात कोणी उडी घेत नाही; त्याचप्रमाणे आपणास धीर धरवणार नाही हे ठाऊक असताना प्रेयसीने कलहाचे सोंग का करावे?

अनुक्रमणिका

सखी :

१२८८ मद्यपानामुळे प्राप्त होणाऱ्या अपकीर्तीची जाणीव असूनही मद्यपी मद्यसेवन करतो. हे वंचका, तुझे हृदय तिला मद्यासारखे वाटते.

प्रियकर स्वगत :

१२८९ प्रेम हे कुसुमापेक्षा कोमल असते. त्याचे 'खरे स्वरूप फारच थोड्यांना माहीत असते.'

१२९० तिच्या नेत्रांत क्रोधाची भावना होतीच. पण आमची गाठ पडताच माझ्यापेक्षा मीलनाची घाई तिलाच अधिक दिसली.

अध्याय १३० – हृदयाशी संवाद

प्रेयसी :

१२९१ हे हृदया, त्याचे हृदय त्याच्याशी सहकार्य करते आणि हे पाहूनही तू मात्र माझ्याशी सहकार्य करीत नाहीस!

१२९२ हे हृदया, त्याचे तुझ्यावर प्रेम नाही हे उघड आहे, असे असूनही त्याचा तुला विरोध नाही अशा समजुतीने तू त्याच्याजवळ कशासाठी जातोस?

१२९३ विपदग्रस्तांस कोणी मित्र नसतात, अशा समजुतीने, हे हृदया, तू माझा त्याग करून त्याच्यामागे धावतो आहेस का?

१२९४ त्याच्याजवळ प्रेमापूर्वी तू रोषाचे प्रदर्शन करावयाचे होते. (मी सांगूनही तू तसे केले नाहीस म्हणून) यानंतर अशा गोष्टी तुझ्याजवळ कोण बोलेल?

१२९५ विरहकाळी माझे हृदय भीतिग्रस्त होते. मीलनानंतरही (पुन्हा वियोग होईल या शंकेने) त्याला भीती वाटते. एकूण माझ्या हृदयामागचे भय आणि दुःख काही टळत नाही.

१२९६ एकांतवासात मी त्याचे सदैव चिंतन करीत असते. तेव्हा माझे हृदय मला जणू खाऊनच टाकावयास निघते.

१२९७ प्रियकराला विसरून जाण्याइतका स्वाभिमान माझ्या मूर्ख हृदयात उरला नाही. त्याच्या तावडीत मी सापडल्यामुळे माझ्या (स्त्रीसुलभ) विनयाचेही मला विस्मरण झाले आहे.

१२९८ माझ्या प्रियकराची निंदा केली तर आपली अपकीर्ती होईल या कल्पनेने माझे हृदय त्याच्या केवळ गुणांचेच चिंतन करीत जिवंत राहिले आहे.

अनुक्रमणिका

१२९९ आपल्या विपत्काळी आपले स्वतःचेच हृदय जर आपणास साहाय्य करणार नसेल, तर दुसरे कोण करणार?

१३०० आपलेच हृदय आपल्याशी स्वकीय भावनेने वागत नाही, तेव्हा बाहेरचे लोक आपल्याशी कुटुंबियांसारखे वागत नाहीत, हे स्वाभाविकच आहे.

अध्याय १३१ – प्रेम-कलह

सखी प्रेयसीस :

१३०१ थोडा वेळ रागावल्याचे सोंग कर आणि आलिंगन न देता दूर राहा. या रागावण्याच्या वेदना त्याला कशा जाणवतात, ते तरी आपण पाहू या.

१३०२ प्रेमिकांच्या कलहाचे प्रमाण खाद्यपदार्थांतील मिठासारखे असते. त्याचा अतिरेक होता कामा नये.

प्रेयसी :

१३०३ रागावल्याचे सोंग करणाऱ्या प्रेयसीला आलिंगनसुख न देणे म्हणजे आधीच व्यथित झालेल्या चित्तावर आणखी तीव्र दुःख लादण्यासारखे आहे.

१३०४ रागाचे सोंग केलेल्या प्रेयसीची समजूत न घालणे म्हणजे कोमेजलेल्या वेलीच्या मुळावर घाव घालण्यासारखे आहे.

प्रियकर :

१३०५ कुसुमनयना पत्नीने केलेले प्रेमकलहाचे प्रदर्शन हे देखील गुणवान पतीला आकर्षक वाटण्यासारखे आहे.

१३०६ लहान मोठे प्रेमकलह ज्यात नाहीत असे जीवन म्हणजे एकतर अगदी कच्च्या किंवा पिकून अधिक झालेल्या फळासारखे आहे.

१३०७ दीर्घ विरहानंतरचे मीलन लवकर होणार की विलंबाने, अशी एक दुःखदायक शंका प्रेमकलहाच्या प्रसंगी येत असते.

१३०८ तुझे दुःख प्रेमळपणाने ऐकून घेण्यासारखे तुझ्याजवळ कोणी नसताना, तुझ्या दुःख करण्याचा काय उपयोग?

अनुक्रमणिका

१३०९ शीतल छायेत बसून केलेले जलपान हे अधिक संतोषदायक असते. त्याचप्रमाणे प्रेमकलह व्हावयाचा तो प्रियतम जनात झाला, तरच तो मधुर होतो.

प्रेयसी :

१३१० पूर्वी माझा त्याग करून मला दीर्घ विरहवेदना भोगावयास लावणाऱ्या प्रियतमाबरोबर होणाऱ्या आनंददायक मीलनाची मला उत्सुकता आहे.

अध्याय १३२ – प्रेमकलहातील सूक्ष्मता

प्रेयसी :

१३११ (प्रियकरास उद्देशून) सर्वच स्त्रिया आपल्या नेत्रांनी तुला जणू खाऊन टाकतात. (व तू त्यांना वश होतोस) तुझ्या छातीवर मी नाही विसावत!

१३१२ मी कोपाकुल असताना त्याने शिंक दिली. त्याला वाटले की, "शतायुषी हो!" असे मी त्याचे शुभचिंतन करीन.

प्रियकर :

१३१३ मी एकदा पुष्पमाला धारण केली तर ती क्रोधवश होऊन म्हणाली, "(दुसऱ्या) कुणाला दाखविण्यासाठी ती घेतली आहेस?"

१३१४ मी एकदा म्हटले, "सर्वांपेक्षा तुझ्यावर माझे अधिक प्रेम आहे." रुष्ट होऊन तिने प्रश्न केला, "आणखी कोणापेक्षा?"

१३१५ "या जन्मात मी तुझा त्याग करणार नाही" असे तिच्या भयनिवारणार्थ मी तिला आश्वासन दिले. (पुढील जन्मी काय होणार या शंकेने) तिचे डोळे अश्रूंनी भरून आले!

१३१६ मी तिला म्हटले, "विरहकालातही मला तुझे स्मरण होत असे." तिने फणकाऱ्याने मला विचारले, "पण त्यापूर्वी मला विसरलातच कसे?" आणि माझ्या मिठीत न येता ती दूर जाऊन बसली.

१३१७ मला एकदा शिंक आली. तेव्हा तिने (नेहमीच्या संवयीने) "शतायुषी हो!" असा आशीर्वाद दिला. पण लागलीच तिने विचारले "कोणाच्या आठवणीमुळे ही शिंक आली?"

१३१८ पुन्हा एकदा मला शिंक आली, पण मी ती दाबली. तिने तत्काळ विचारले, "कोणत्या प्रियेची आठवण तू माझ्यापासून लपवून ठेवतो आहेस?"

१३१९ ती रुष्ट झाली असता मी तिची समजूत घालून तिला शांत करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ती म्हणाली “दुसऱ्यांचीही तू अशीच समजूत घालतोस का?”

१३२० तिच्या सौंदर्याचे कौतुक करीत मी तिच्याकडे मुकाट्याने पाहात होतो. ती रुष्ट होऊन म्हणाली, “माझ्याकडे इतके पाहात असताना विचार कोणाचा करीत आहेस?”

अध्याय १३३ – प्रेमकलहातील आनंद

प्रेयसी :

१३२१ माझ्या प्रियकराच्या अंगी काहीच दोष नाहीत. पण कृतककोपामुळे त्याच्या आलिंगनातील सुख अधिक प्रमाणात प्रत्ययास येते.

१३२२ अल्पजीवी कृतककोपामुळे प्रेम प्रथम कमी होऊन त्रास होतो खरा. पण त्याचा पुन्हा विकास होतो तो अधिक मनोहर असतो.

१३२३ पृथ्वी आणि जल यांच्या एकजीव मिश्रणाप्रमाणे पतिपत्नींच्या मनाचे मीलन ज्या प्रेमकलहामुळे होते, त्यापेक्षा स्वर्गलोक काही वेगळा असतो का?

१३२४ गाढ आलिंगनानंतर झालेल्या प्रेमकलहात माझ्या हृदयावर आघात करणारे शस्त्र दडलेले असते.

प्रियकर :

१३२५ स्वतःच्या अंगी काही दोष नसले, तरी प्रेमकलहाच्या निमित्ताने प्रियेच्या कोमल बाहूंच्या आलिंगनापासून काही काळ दूर राहण्यातही काही आनंद आहे.

१३२६ अन्नाच्या भक्षणापेक्षा पचनातच अधिक आनंद असतो. त्याचप्रमाणे प्रेम हे मीलनापेक्षा कलहातच अधिक आनंददायक असते.

१३२७ प्रेमयुद्धात शरणागती पतकरणारा पक्षच विजयी होतो. कलहानंतरच्या मीलनात याचा प्रत्यय येतो.

१३२८ (प्रेमकलहानंतर झालेल्या मीलनातून मुक्त झाल्यावर) प्रेमकलहोत्तर झालेल्या मीलनात प्रेयसीच्या भालप्रदेशावर स्वेदबिंदू आले आहेत. असाच प्रेमकलह आणि त्यानंतरचे मीलन यांचे सुख पुन्हा मिळेल का?

१३२९ तेजस्वी अलंकार धारण केलेल्या या सुंदरीने पुन्हा प्रेमकलह करावा, मी तिची समजूत करीत राहावे, आणि तोपर्यंत ही रात्र लांबतच राहावी!

अनुक्रमणिका

१३३० प्रेमकलहाने प्रेमाला अधिक माधुरी येते. त्यानंतरच्या मीलनाने कलहातील आनंद वाढतो.

* * *

अनुक्रमणिका

विषय-सूचि

विषय	अध्याय	विषय	अध्याय
अक्रोध	३१	चिरकालीन मैत्री	८१
अनासक्ति	३७	तत्त्वबोध	३६
अनालस्य	६१	तपश्चर्या	२७
अनित्यता	३४	थोरवी	२७
अव्यभिचार	१५	थोरांचा अपमान	९०
असह्य विरह	११६	थोरांचे साहाय्य	४५
अस्तेय	२९	दया दृष्टि	५८
अहिंसा	३३	दयाळूपणा	२५
अंतःशत्रू	८९	दान	२३
आतिथ्य	९	दारिद्रय	१०५
आत्मसयमन	१३	दीर्घोद्योग	६२
इंगितज्ञान	७१	दुर्ग	७५
ईशस्तुति	१	दुष्ट शासन	५६
उत्साह	६०	दुष्टांशी मैत्री	८२
औषधी	९५	दूत	६९
कर्तव्यनिष्ठा	२२	दृढ कार्यक्षमता	६७
कार्यपद्धति	६८	दैव	३८
कार्ति	२४	दोष-निर्मूलन	४४
कुलीनता	९६	दंभाचरण	२८
कुलोत्कर्ष	१०३	द्यूत	९४
कुसंगतीचा त्याग	४६	धन संपादनाचे मार्ग	७६
कृतज्ञता	११	धर्माचे सामर्थ्य	४
कृषि	१०४	निर्लोभिता	१८
क्रूर शासन	५७	निस्तेजतेची व्यथा	११९
खोटी मैत्री	८३	निंदा	१९
गुप्तचर	५९	निःपक्षपात	१२
गृहस्थ-जीवन	५	नीचपणा	१०८
चारित्र	९९	नेत्रांची विरह-वेदना	११८
न्याय्य शासन	५५	वक्तृत्व	६५

अनुक्रमणिका

परपीडा	३२
परस्परांची मार्गप्रतीक्षा	१२७
पर्जन्य महिमा	२
पापभीरूता	२१
प्रवाह-स्फोट	११५
प्रेम कलह	१३१
प्रेमकलहांतील आनंद	१३३
प्रेमकलहांतील सूक्ष्मता	१३२
प्रेम-महिमा	११३
प्रेम-संकेत	११०
बुद्धिमत्ता	४३
बुद्धिहीनता	८५
बंधुजनांचे पोषण	५३
मत्सर	१७
मद्यपान	९३
मधुर भाषण	१०
मानापमान	९७
मित्र-परीक्षा	८०
मीलन-सुख	१११
मीलनाची उत्सुकता	१२९
मूर्खपणा	८४
मैत्री	७९
मंत्री	६४
मांसाहार	२६
यति-महिमा	३
याचना	१०६
याचनेची भीति	१०७
योग्य संधीचा लाभ	४९
राजसभेतील वर्तन	७०
राजाचे गुण	३९
राज्य	७४
विचारपूर्वक निवड	५१
विद्याध्ययन	४०
विद्याराहित्य	४१
विनयशीलता	१०२
विनयाचा त्याग	११४
विपत्तीत धैर्य	६३
विरहाची तीव्रता	१२०
विरहिणीचा विलाप	११६
विवेकपूर्वक कर्म	४७
विश्वासाई अधिकारी	५२
वेश्या	९२
वैराचा महिमा	८७
व्यर्थ प्रलाप	२०
शक्ति-मापन	४८
शत्रुत्व	८६
शत्रूच्या सामर्थ्याची जाणीव	८८
शरीर सौंदर्याती क्षीणता	१२४
शुद्धाचरण	६६
शोकमय स्मृति	१२१
श्रवण	४२
श्रोतृपरीक्षा	७२
सत्यवचन	३०
सदाचरण	१४
सभाघीटपणा	७३
सहधर्मिणीचे गुण	६
सहनशीलता	१६
सायंवेदना	१२३
सावधानता	५४
सुसंस्कृतता	१००
सैन्याची प्रतिष्ठा	७८
सैन्याचे महत्त्व	७७

अनुक्रमणिका

लज्जेचा त्याग	१२६
स्थान-माहात्म्य	५०
स्नेहसंपदा	८
स्वगत चिंतन	१२५
स्वप्त कथन	१२२
संसतीचा लाभ	७
स्त्रैणपणा	९१
संन्यास	३५
संपत्तीचा सद्व्यय	१०१
सौंदर्य दर्शनाची प्रतिक्रिया	१०९
हृदयाशी संवाद	१३०

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ भाषांतरमालेतील प्रकाशने:

इस्ललामची जीवनपद्धती	-	प्रा. अ. प. सूर्यवंशी
(जफर शरीफलिखित 'कानून-इ-इस्लाम' चा अनुवाद)		
इस्ललामची सामाजिक रचना	-	श्री. श्रीपाद केळकर
(स्तांदाललिखित *Scarlet and Black (Part I)* चा अनुवाद)		
युद्ध आणि शांती	-	प्रा. आ. ना. पेडणेकर
(टॉलस्टॉयलिखित *War and Peace* चा अनुवाद)		
मी इझाडोरा	-	श्रीमती रोहिणी भाटे
(इझाडोरा डंकनलिखित *My Life* चा अनुवाद)		
स्ट्रॅविन्स्कीचे सांगीतिक सौंदर्यशास्त्र	-	प्रा. अशोक दा. रानडे
(इगॉर स्ट्रॅविन्स्कीलिखित *Poetics of Music* चा अनुवाद)		
समाजवादाचे भवितव्य	-	श्री. माधव लिमये
(सी. ए. आर. क्रॉसलंडलिखित *The Future of Socialism* चा अनुवाद)		
बंडखोरीचे तत्त्वज्ञान	-	श्री. भि. वि. मराठे
(अलबर्ट कामूलिखित *Rebel* चा अनुवाद)		
आक्रमण	-	डॉ. दि. धों. कर्वे
(कोन्राड लोरेंत्सलिखित *On Aggression* चा अनुवाद)		
तुरूंगातील पत्रे	-	श्री. द्वा. भ. कर्णिक
(एम्. एन्. रॉयलिखित *Letters from Jail* चा अनुवाद)		
पिता पुत्र	-	प्रा. व. वि. बडवे
(तुर्गेनेव्हलिखित *fatiter and Sons*हान् चा अनुवाद)		
वैज्ञानिक तत्त्वज्ञानाचा उदय	-	प्रा. ग. वि. कुंभोजकर
(हान्स रायशेनबाखलिखित *Rise of Scientific Pililosophy चा अनुवाद*)		

अनुक्रमणिका